# शब्द रुची

४१

मे २०२४ । मूल्य १० रु. । पृष्ठे ९६

बालकुमार विशेषांक




Celebrating
५२ वर्ष वृद्धिंगतेची
१९७२-२०२४
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
आता व्यावसायिकांना अधिक सुलभ, जलद QR कोड सेवा
QR कोडच्या खात्रीशीर आर्थिक व्यवहाराला आता गतिशील आवाजा सहित SMS ची जोड
TJSB Sandesh
Scanning...
PAY
TJSB Sandesh
ठळक वैशिष्ट्ये
• प्रत्येक यशस्वी व्यवहार SMS व आवाजा सोबत
• एकापेक्षा जास्त मोबाईलवर सुविधा
• सेवा अँड्रॉइडवर उपलब्ध
• स्थानिक भाषेच्या पर्यायासहित
GET IT ON Google Play

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची ४९

मे २०२४, वर्ष बारावे
अंक पहिला, मूल्य १० रु.
बालकुमार विशेषांक

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

अतिथी संपादक : **एकनाथ आव्हाड**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ व आतील चित्रे : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
**shabdruchee24@gmail.com**

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**

**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**समीर कदम**


संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee24@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

ग्रंथाली




**एका अभूतपूर्व मुलाखतमैफलीचे पुस्तक**

ग्रंथालीने १९८५ मध्ये पं. कुमारगंधर्व यांची गायनासह रागदारी उलगडून दाखवणारी सलग सहा दिवस मुलाखतमैफल आयोजित केली होती, त्यातील त्यांच्या संगीतविचारांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्यावेळी त्यांनी गायलेल्या बंदिशी/चिजांचे चौपन्न क्यूआर कोड पुस्तकात आहेत. अतुल देऊळगावकर यांनी संपादन केलेल्या या पुस्तकाला पं. सुरेश तळवलकर यांची प्रस्तावना लाभली आहे. वाचावे, संग्रही ठेवावे, भेट द्यावे असे हे गंधर्वांचे देणे!

**मूल्य ८०० रु.**
**सवलतीत ५०० रु.**

घरपोच हवे असल्यास
पाठणावळ खर्च वेगळा
संपर्क : ९२२३४६६८६०

**'शब्द रुची'साठी shabdruchee24@gmail.com याच नवीन ईमेलवर संपर्क साधावा.**

'शब्द रुची' अंकाबाबत डिसेंबरमध्ये नव्याने विचार होणार आहे. अंकासाठी वर्गणी भरल्यास डिसेंबर २०२४पर्यंतचे अंक पोस्ट केले जातील. ज्यांची वर्गणी डिसेंबर २०२४च्या पुढची भरली असेल, त्यांना ती संपण्याच्या महिन्यांइतके वर्गणी जमा होण्याच्या तारखेपूर्वीचे अंक मिळतील. आता वर्गणी फक्त डिसेंबर २०२४ पर्यंतचीच स्वीकारली जाईल.

**– सुदेश हिंगलासपूरकर**
विश्वस्त, संपादक

# अनुक्रम


रेनकोट / ६
**गुलाब बिसेन**



हसरे चेहरे / ९
**डॉ. सुमन नवलकर**

वाघाला पळवणारी वाघीण / ११
**डॉ. सुरेश सावंत**

गोष्ट दोन भावांची / १३
**डॉ. विशाल तायडे**

श्रमाचे मोल / १७
**प्रा. श्रीकांत नाईक**



वाघोबा रागावले / १९
**सुरेश वांदिले**

सदाकोची गोष्ट / २३
**डॉ. मधुमंजिरी गटणे**

नवे मित्र / २५
**रश्मी गुजराथी**



जंगू आणि जीत / २७
**मीना नाईक**

भुरी मांजर (कङ कङ) / ३०
**अनुवाद – प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर**

योग्य शिशुआहार–दामदुपटीची बालविकास पॉलिसी / ३५
**अरुंधती कुलकर्णी–जोशी**

पुस्तके का वाचायची असतात? / ३७
**शरद काळे**

ॲलिस इन वंडरलॅण्ड – लुईस कॅरॉल / ४१
**राजीव श्रीखंडे**

कविता / ४४ ते ५१
**श्रीकांत पेटकर, मोहन काळे, डॉ. कैलास दौंड, सदानंद पुंडपाळ, रमेश वंसकर, रवींद्र सोनवणे, डॉ. संगीता बर्वे, उत्तम कोळगावकर, विलास सिंदगीकर, डॉ. प्रतिमा जगताप, प्रा. लीला शिंदे, प्रभाकर साळेगावकर, प्रा. डॉ. वर्षा तोडमल, माधव चुकेवाड**

काव्यकोडी / ५२
**ज्योती कपिले**



पुस्तकाने बोट धरले तेव्हा... / ५४
**प्रवीण दवणे**

वाचन घडवी जीवना / ५६
**विद्या प्रभू**

विज्ञानिका / ६०
**उमेश घेवरीकर**

साने गुरुजी विद्यार्थिप्रिय शिक्षक / ६२
**आशा कुलकर्णी**



सागरगान / ६५
**संध्या कुलकर्णी**

सुट्टीतली धमाल! / ६८
**डॉ. मीरा शेंडगे**

स्वप्नांचे ओझे / ७०
**राधिका देशपांडे**



असंस्कृत / ७१
**निर्मला भाटे**

मूल्यमापनाचे मूल्यमापन / ७२
**डॉ. अंजली पटवर्धन–कुलकर्णी**

नोबेल? त्यात काय मोठे? डोरिस लेसिंग्ज / ७५
**संजीवनी खेर**

एनसीपीएमध्ये रंगणार 'प्रतिबिंब' नाट्योत्सव / ७९
**राजीव जोशी**

वृत्तांत / पुस्तक परिचय व ग्रंथपाने / ८३–९४
**अरुण भंडारे, चांगदेव काळे**

# संपादकीय...



नमस्ते बालदोस्तांनो,

कसे आहात तुम्ही सर्व जण? मस्त मजेत आहात ना? आता उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या असतील. 'शाळेला सुट्टी, अभ्यासाशी कट्टी आणि खेळाशी गट्टी' हे गाणे आपसूक तुमच्या ओठांवर येत असेल. दंगा, मजा मस्ती तुमची सुरू असेल. मुलांनो, उन्हाचा पारा सध्या चांगलाच वर चढलाय. अगदी चाळीस अंशांच्या वर गेलाय. त्यामुळे उन्हाळ्यात आपण तब्येतीची विशेष काळजी घेतली पाहिजे. दुपारच्या वेळी शक्यतो उन्हात बाहेर जाणे टाळावे. मैदानावर खेळण्यासाठी किंवा इतर महत्त्वाच्या कामासाठी सकाळी किंवा संध्याकाळीच घराबाहेर पडावे. घरातल्या घरात बैठे खेळ खेळावे. आणि विशेष म्हणजे, आपल्या आवडीचे छंद जोपासावे.

मुलांनो, छंद म्हणजे नेमके काय? तर छंद म्हणजे आवड, ओढा, ध्यास. एखादी गोष्ट लहानपणापासूनच आवडू लागली तर ती आयुष्यभर आपल्या मनात घर करून राहते. मग ती गोष्ट पुढे-पुढे अजून फुलवण्याचा आपण प्रयत्न करतो. यालाच खरे तर छंद म्हणतात. छंद आपल्याला आनंद देतात. त्यातून आपल्याला समाधान मिळते. म्हणून प्रत्येकाने किमान एक तरी छंद जोपासायला हवाच. छंद जोपासणाऱ्या मुलांचा मेंदू इतरांच्या तुलनेत अधिक तल्लख, प्रफुल्लित आणि ताजातवाना राहतो हे आता विज्ञानाने सिद्ध केलेय. छोट्या-छोट्या छंदांतून आपल्याला मोठ्ठा आनंद मिळत असतो.

एका मुलाच्या घरात प्रत्येकाचा वेगवेगळा छंद होता. त्याला त्या छंदांबद्दल काय वाटते माहितीय? सांगतो. तो मुलगा म्हणतो,

आमच्या घरात प्रत्येकाचा, छंद आगळावेगळा
छंदात जीव रमला, की आळस पळतो सगळा
पोस्टाची तिकिटे जमवण्याचा, छंद आहे मला
तिकिटांसोबत अख्खे पोस्ट, येत असे जोडीला
जुनी नाणी जमवण्याचा, छंद ताईला भारी
नाण्यांवरून इतिहासाची, माहिती मिळते खरी
दादाला चित्रे काढण्याचा, छंद आहे जुना
चित्रांच्या दुनियेतल्या अचूक, सांगतो खाणाखुणा
बाबांना कविता करण्याचा, छंद केवढातरी
कवितांची मैफल घरातच, ते भरवतात वरचेवरी
नवनवीन पदार्थ बनवण्याचा, आईला आहे छंद
सर्वांना पोटभरून जेवू, घालण्यात तिला आनंद
छंदावर जिवापाड, प्रेम आमचे जडते
छंदामुळे आमच्या, ज्ञानातही भर पडते
छंदामुळे होई रंजन, मन होते ताजेतवाने
निर्मितीच्या आनंदापुढे, आकाशही वाटे ठेंगणे

मुलांनो, या घरातील प्रत्येकाचा छंद वेगवेगळा परंतु त्याचा गाभा एकच आहे, तो म्हणजे नवनिर्मितीचा आनंद.

तुम्ही तुमचा छंद जोपासण्याचा प्रयत्न करत राहाल, तसतसे तुम्हाला विशिष्ट कौशल्येही प्राप्त होत जातात. आपल्याला कंटाळा येतो, दुसरे काही करायची इच्छा नसते, तेव्हा छंदच आपल्या मदतीसाठी येतात. आपला कंटाळा ते दूर करतात.

एक छंद असा आहे जो आपल्या ज्ञानात भर घालतो. आपली आनंदाची बाग फुलवतो. तो छंद म्हणजे वाचनाचा छंद. वाचन हे आपल्या जीवनाला उन्नत करणारी बाब आहे. वाचनाने आपली बुद्धिमत्ता अधिक वाढते. तसेच माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा सर्वात मोठा वाटा असतो. वाचन माणसाला माणूस बनवते, जीवनाला एक नवी दिशा देते, विचार करायला शिकवते. म्हणूनच वाचन हा एक उत्तम छंद आहे.

मुलांनो, तुमच्या या सुट्टीचा सदुपयोग व्हावा, तुम्हाला वाचनाची आवड लागावी, या तापदायक उन्हात वाचनानंदाचा तुमच्यावर जणू शिडकावा व्हावा, म्हणूनच ग्रंथालीने मे महिन्यात 'शब्द रुची'चा तुम्हा मुलांसाठी खास सुट्टी विशेषांक प्रकाशित करायचे ठरवले. या विशेषांकाची संपादक म्हणून जबाबदारी माझ्यावर सोपवली. मुलांसाठी नवीन काही करण्यासाठी मी नेहमीच तयार असतो. मी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. आपला हा सुट्टी विशेषांक मुलांना आवडेल, रुचेल, मुलांची वाचनाची आवड जोपासेल असा असला पाहिजे आणि महत्त्वाचे म्हणजे, मुलांना तो आपला वाटला पाहिजे हा विचार या अंकाचे संपादकीय काम करताना अगदी अग्रक्रमाने होता. बालसाहित्यातील विविध साहित्यप्रकार या अंकात यावे आणि वेगवेगळ्या प्रदेशांतील लेखकांच्या साहित्याला या अंकाच्या निमित्ताने एकत्र आणावे, असेही मनापासून वाटत होते. कथा, कविता, नाटिका, नाट्यछटा, काव्यकोडी, चरित्र, अनुवाद, लेख, ललित अशा सर्वच साहित्यप्रकारांनी हा अंक सजलेला आहे. मुलांनो, खरे तर हा अंक तुमचा आहे. तुम्ही तो जरूर वाचा. तुमच्या मित्रमंडळींना आवर्जून वाचायला द्या. आणि हा अंक वाचून तो तुम्हाला कसा वाटला हे आम्हाला कळवायला विसरू नका.

शेवटी जाता जाता एवढेच सांगेन, प्रत्येकाने एखादा तरी छंद जोपासा आणि हो, वाचत राहा, पुस्तकांशी दोस्ती करा. कारण,

पुस्तक हा माझा मित्र, सदासर्वकाळ हसरा
पुस्तकासारखा खराखुरा, मित्र नाही दुसरा
तर बालदोस्तांनो, भेटू पुन्हा असेच. मस्त राहा. स्वस्थ राहा.

तुमचा मित्र,

**– एकनाथ आव्हाड**
भ्रमणध्वनी : ९८२१७७७९६८
eknathavhad23@gmail.com



कथा



# रेनकोट

**गुलाब बिसेन**

रजत सकाळपासूनच बाबांच्या मागे लागला होता,

''बाबा, मला शाळेसाठी दफ्तर, शूज आणि रेनकोट आजच हवेत.''

पण मागल्या वर्षीची स्कूल बॅग आणि रेनकोट तर चांगलंच आहे अजून.''

''नाही. मला नवीनच हवं. माझे मित्रपण नवीन रेनकोट, स्कूल बॅग घेणार आहेत.''

''हे बघ, रेनकोट नवीन-जुना बघून वापरायचा नसतो. तो खराब झालाय की चांगला आहे हे बघायला पाहिजे.'' बाबा समजावत बोलले.

नाही, नाही. मला नवीनच पाहिजे. मोन्यानं तर मागल्या रविवारला घेतलंसुद्धा.''

बाबांच्या समजावण्यानेही रजत ऐकायला तयार नसल्याने बाबा रजतसाठी स्कूल बॅग आणि रेनकोट खरेदीला नाइलाजास्तव तयार झाले. रविवार असल्याने बाबांनाही सुट्टीच होती. बाबांच्या सोबत गाडीत बसून रजत बाजारात गेला.

बाजारात स्कूल बॅग, रेनकोट, छत्र्या, वह्या, पुस्तकांची दुकाने सजली होती. रंगबेरंगी स्कूल बॅग, रेनकोटवर कार्टूनची चित्रे पोराबाळांना आकर्षित करत होती. रविवार असल्याने बाजारात सर्वत्र खरेदीची झुंबड उडाली होती. रजतही बाबांसोबत नेहमीच्या ओळखीच्या दुकानात गेला. दुकानाबाहेर लावलेले रेनकोट बघत दुकानात प्रवेश केला. रजतला रेनकोट निरखून बघताना दुकानदाराची नजर रजतवर पडली,

''रजत, मागल्या वर्षीचा रेनकोट फाटला काय?''

रजत काहीच बोलला नाही. दुकानदाराच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत रेनकोट निवडण्यात दंग झाला. थोड्याच वेळात आपल्या मनासारखा रेनकोट आणि स्कूल बॅग घेऊन दोघेही बाहेर पडले.

मनासारखी खरेदी झाल्याने रजत खूपच खूश होता. शाळेत मित्रांमध्ये मिरवायला त्याला आणखी एक कारण मिळाले होते. बाबांसोबत गाडीत बसून दोघेही घरच्या रस्त्याला लागले. घरी जाता जाता आईने भाजीबाजारातून भाजीचा फणस आणायला सांगितल्याची त्याने बाबांना आठवण करून दिली. तशी बाबांनी गाडी भाजी बाजाराकडे वळवली. भाजी बाजारात एका मुलाजवळ ताजा ताजा हिरवा फणस होता. बाबा गाडीतून उतरून फणस घेऊ लागले. रजत गाडीतच बसलेला होता. सहज गाडीच्या खिडकीतून बाहेर डोकावत तो बाजाराभर नजर फिरवू लागला. हे करत असताना त्याचे लक्ष बाजारातील एका फणस विक्रेत्यावर खिळले. तेवढ्यात फणस विक्रेत्याचे लक्ष गाडीच्या खिडकीकडे गेले. रजत आणि विक्रेत्याची नजरानजर झाली. तसा तो फणस विक्रेता खाली मान घालून आपला चेहरा लपवण्याचा प्रयत्न करू लागला. फणस घेऊन ते घराकडे निघाले. गाडीत बसून रजत त्या फणस विक्रेत्याचाच विचार करत होता. बऱ्याच वेळानंतर त्याला आठवलं. तो फणस विक्रेता त्याच्या वर्गात शिकत असलेला बिट्टू होता.

दोन दिवसांत उन्हाळी सुट्टी संपून शाळा सुरू झाली. सर्व मुले रंगीबेरंगी छत्री, रेनकोट, स्कूल बॅग घेऊन शाळेत आले. नवीन वर्ग, नवीन बेंच, नवीन वर्गशिक्षक यामुळे वर्गातील वातावरण उत्साही होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत गावतरला गेलेली मुलेमुली आपापसात चर्चा, दंगामस्ती करण्यात दंग होती. रजतही मित्रांसोबत उन्हाळ्याच्या गावतरच्या चर्चेत रंगला होता. पावसाची चाहूल लावणारे ढग आकाशात गर्दी करू लागले होते. काही भागात पावसाने हजेरीही लावली होती. अशातच एकाएकी रजतचे लक्ष अर्धे अंग भिजलेल्या बिट्टूवर गेले. रजत आपल्या जागेवरून उठून बिट्टूजवळ गेला. रजतला बघून बिट्टू त्याच्याकडे लक्ष नसल्यासारखा करू लागला.

''हाय बिट्टू! तू काल बाजारात फणस विकत होतास ना?'' रजतने बिट्टूला थेटच विचारले. सर्वांच्या पुढ्यात बिट्टूला जरा अवघडल्यासारखे झाले.

''होय.'' बिट्टू हळूच म्हणाला.

''तुझे बाबा भाजी विकतात?''

''हो.''

''तू, भाजी विकणाऱ्याचा मुलगा आहेस?'' रजत चिडवण्याच्या इराद्याने प्रश्नावर प्रश्न विचारत होता. बिट्टूही त्याला तितक्याच सहजतेने उत्तर देत होता.

''होय. माझे बाबा आमच्या शेतातला भाजीपाला विकतात. मीही सुट्टीत त्यांना भाजी विकायला मदत करतो.''

''म्हणजे काल बाजारात फणस विकणारा तूच होतास तर!''

आता रजतच्या खोचक प्रश्नांनी बिट्टू पुरता बेजार झाला.

''मला या वर्षी नवीन रेनकोट हवा होता. मी बाबांना तसं सांगितलं. तर ते म्हणाले, आता फणसाचा हंगाम सुरू आहे. आणि तुला शाळेला सुट्ट्याही आहेत. आपल्या शेतातले फणस विकायला मदत कर आणि घे तुला हवा तो रेनकोट. त्यामुळे मी चार-पाच दिवसांपासून फणस विकत आहे.'' बिट्टूने एका दमात सारे सांगून टाकले.

''मग घेतलास का रेनकोट?''

''नाही. अजून पूर्ण पैसे जमायचे आहेत.'' हे ऐकताच रजत आपल्या जागेवर जाऊन बसला. आता त्याचे मित्रांच्या बोलण्याकडेही लक्ष लागेना. काहीसा गोंधळल्यासारखा मनातल्या मनात विचार करू लागला.

मी मागल्या वर्षीच नवीन रेनकोट घेतला होता. तो चांगला असताना या वर्षी परत नवीन रेनकोट घेतलाय. आणि बिट्टूला मात्र त्याचा पहिला रेनकोट घ्यायला बाजारात बसून फणस विकावे लागत आहेत. तो मनातल्या मनात काहीसा दुःखी झाला.

शाळेचा पहिला दिवस आनंदात घालवून संध्याकाळी रजत घरी आला. दफ्तर ठेवून काहीतरी शोधत बसला. रजतला शोधाशोध करताना बघून आई म्हणाली,

''काय शोधतोयस रजत?''

''आई, माझा गेल्या वर्षीचा रेनकोट शोधतोय.''

''तुला नवीन रेनकोट घेतलाय ना? मग जुना का शोधत बसलास आता?'' आईने विचारले.

''दे ना ग आई. काम आहे मला त्याचं.''

आईला काहीच कळेना. तिने लॉफ्टवरून बॅगेत ठेवलेला रेनकोट काढून दिला.



दुसऱ्या दिवशी रजत नवीन रेनकोट शाळेत घेऊन गेला. आणि शाळेत बिट्टूला शोधू लागला. थोड्या वेळात त्याला बिट्टू शाळेच्या गेटमधून आत येताना दिसला. बिट्टू वर्गात आल्याआल्या रजतने नवीन रेनकोटची पिशवी बिट्टूच्या पुढे धरली.

''बिट्टू, ही घे तुला माझ्याकडून नवीन रेनकोटची भेट. आता तू दुसरा रेनकोट घेऊ नकोस. फणस विकून साठलेले पैसे तुझ्या पिगी बँकमध्ये ठेव.''

''नाही, नाही. मी रेनकोटसाठी पैसे साठवत आहे. आता एक-दोन दिवसांतच माझ्याजवळ पुरेसे पैसे जमतील.''

''अरे, दोनच दिवस झालेत, हा रेनकोट घेऊन. याची घडीही मोडलेली नाही. नवा कोराच आहे. मित्राकडून गिफ्ट म्हणून तर घेऊ शकतोस ना?''

रजतने खूप आग्रह केला, परंतु बिट्टूने रजतचा रेनकोट घेतला नाही. शेवटी रजतचा नाइलाज झाला. त्याने बिट्टूला देऊ केलेला नवीन रेनकोट तसाच दफ्तरात ठेवून दिला.

त्या दिवशी शाळेतून खिन्न मनाने रजत घरी परतला. रात्री त्याने शाळेत घडलेली सारी गोष्ट आई-बाबांना सांगितली. ती ऐकून त्यांना बिट्टू आणि रजत दोघांच्या कृतीचा अभिमान वाटला.

''बाबा, माझा नवीन रेनकोट दुकानदाराला परत करा. नकोय मला दोन दोन रेनकोट. मी गेल्या वर्षीचाच रेनकोट घालणार. रजतने मनातले बाबांना सांगितले. दुसऱ्या दिवशी बाबांनी रजतचा नवीन रेनकोट दुकानदारला परत केला.

दोन-तीन दिवस शाळेच्या नवलाईत निघून गेले. जून महिना संपल्याने पावसानेही आपली कूस बदलली. पावसाची रोज रिमझिम सुरू झाली. अजूनही बिट्टू छत्रीतच शाळेत येत होता. छत्रीमुळे कधी शर्ट भिजायचा, तर कधी पँट भिजलेली असायची. रजतच्या मनात असूनही बिट्टूसाठी काहीच करता येत नसल्याची खंत वाटत होती. एक दिवस शाळेच्या गेटवर रजत रिक्षातून उतरत असताना त्याचे लक्ष शाळेत पायी येणाऱ्या मुलांकडे गेले. त्यांच्यात एक मुलगा नवाकोरा रेनकोट घालून मजेत येताना दिसला. रजतने त्या मुलाला शाळेच्या गेटवरच गाठले. तो नवीन रेनकोट घातलेला मुलगा बिट्टू होता. बिट्टूला रेनकोटमध्ये बघून रजत खूप खूश झाला.

''बिट्टू, कधी घेतलास रेनकोट?'' रजतने विचारले.

''कालच घेतला मी! कसा आहे माझा नवीन रेनकोट?''


''एकदम झकास.'' असे म्हणत रजतने त्याचा हात हातात घेतला आणि दोघेही आनंदात वर्गात गेले.


**– गुलाब बिसेन**
gulab0506@gmail.com

ग्रंथाली


## अशोक बेंडखळे यांचे बालसाहित्य












**मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.**
**टपालखर्च ५० रु.**



कथा



# हसरे चेहरे

## डॉ. सुमन नवलकर

गेला आठवडाभर शाळेत नुसती लगबग सुरू होती. शहरातून राजेश ठाकूर शाळेच्या वार्षिक समारंभाला प्रमुख पाहुणा म्हणून येणार होता. आतापर्यंत त्याला आम्ही रेडिओ, टीव्ही आणि चित्रपटांत ऐकलं-पाहिलं होतं. त्याची सगळीच्या सगळी मुलांची पुस्तकं आम्ही वाचलीत. त्याच्या विनोदी भूमिका जितक्या हसवतात, तितकीच त्याची पुस्तकंही. एवढा मोठा लेखक-अभिनेता. वयानेही आमच्याहून इतका मोठा. पण मोठे नट, मोठे गायक कधी-कधी आपल्याला इतके जवळचे वाटतात, की 'अहो'पेक्षा 'अरे'च बरे वाटतात. तसा हा राजेश ठाकूर.

तयारी जोरात सुरू होती. राजेशच्या 'गोंधळात गोंधळ'चं मुखपृष्ठ नववीतल्या राधिकानं सभागृहाच्या प्रवेशद्वाराशीच रांगोळीरूपात काढलं होतं. आठवीतल्या विराजनं काढलेलं त्याचं रेखाचित्र मंचावर पाठच्या पडद्यावर लावलं होतं. त्याच्या पुस्तकांच्या, नाटकांच्या, चित्रपटांच्या नावांचे फलक शाळेच्या प्रवेशद्वारापासून सभागृहाच्या प्रवेशद्वारापर्यंत दुतर्फा लावले होते. शिक्षक, विद्यार्थी, शिपाई, सफाई-कामगार सर्वच त्याला प्रत्यक्ष पाहण्यासाठी आतुरलेले होते.

राजेश ट्रेननं सिरसी स्टेशनला उतरून पुढे शाळेच्या मुख्याध्यापकांबरोबर शाळेच्या गाडीतून येणार होता. परत जातानाही तो ट्रेननंच जाणार होता. त्यामुळे आम्हा मुलांना तो आमच्यासारखाच वाटत होता. आदल्या रात्री आम्ही लवकर जेवून झोपून घेतलं. त्याच्यापुढे आपण पेंगुळलेले, मरगळलेले दिसू नये, असं प्रत्येकालाच वाटत होतं. सर्वांनी आपापल्या गणवेशाला इस्त्री केली होती. शाळेला जाताना आम्ही आमचे केसही छान विंचरून बसवले. चपला चांगल्या ओल्या फडक्यानं पुसल्या आणि त्या पुन्हा धुळीनं भरू नयेत म्हणून नेहमीप्रमाणे धपा-धपा न चालता जपून पावलं टाकत गेलो शाळेपर्यंत. जणू काही राजेश आम्हाला प्रत्येकाला डोक्यापासून पायापर्यंत न्याहाळणार होता. त्यानं आपल्याकडे पाहून एखादं तरी स्मित करावं, अशी प्रत्येकाचीच इच्छा.

शाळेच्या प्रवेशद्वाराशी तो गाडीतून उतरला, तेव्हा त्याच्याबरोबर मुख्याध्यापक गोरेसर असूनही मुलांनी राजेश-राजेश असा एकच गलका केला. गंमत म्हणजे, या वेळी राजेशबरोबर गोरेसरही छानसं हसले. ''आपले गोरेसर हसले की छान दिसतात नै?'' या माझ्या प्रश्नावर सौरभही म्हणाला, ''खरंच रे, नेहमी का हसत नाहीत हे?'' ''अरे, मुख्याध्यापक म्हटल्यावर जरा दरारा हवा असतो ना?'' मीही समजूतीनं म्हटलं. राजेश दीपप्रज्वलन करून मंचावरच्या आसनावर स्थानापन्न होईपर्यंत टाळ्यांचा गजर चालूच होता. दहावीतल्या गौरीनं राजेशसाठी लिहिलेलं स्वागतगीत तिच्या मैत्रिणींबरोबर म्हटलं. त्यात मात्र तिनं राजेशचा उल्लेख 'अहो-जाहो' असा केला होता. स्वागतगीत इतकं छान होतं, की त्याची एक प्रत मी मागूनच घेतली तिच्याकडून.

*'राजेशजी आलात तुम्ही आज आमच्या शाळेत,*
*इतक्या दुरून येऊनही आलात अगदी वेळेत.*
*रेडिओवर, टीव्हीवर, नाटकांत, चित्रपटांत,*
*ओळखीचे तर आम्हाला आधीपासून होतात.*
*पुस्तकंही वाचलीत तुमची आम्ही सारी-सारी,*
*प्रत्यक्षात भेटायची आवड होती तरी.*
*आमच्या आनंदपुरात आनंद विद्यामंदिर शाळा,*
*तुमच्या स्वागतासाठी सजलाय वर्गा-वर्गात फळा.*
*व्यग्र वेळापत्रकातून तुमच्या, सवड तुम्ही काढलीत,*
*राजेश ठाकूर, तुम्ही आलात, आमची कॉलर टाईट.'*

सर्वांबरोबर राजेशनंही खूप टाळ्या वाजवल्या. गौरीला गीतलेखनाबद्दल स्वतःच्या 'वारंवार बेजार' या नव्या पुस्तकाची प्रत सही करून दिली. गौरीची कॉलर खरोखरच टाईट झाली.

राजेशसाठी नाट्यछटा, छोटंसं नाटुकलं, नकला, नृत्य असे अनेक कार्यक्रम मुलांनी सादर केले. शेवटी मुख्याध्यापकांच्या भाषणानंतर राजेश बोलण्यासाठी उभा




राहिला, तेव्हा पुन्हा टाळ्यांचा कडकडाट झालाच. राजेशनं सुरुवातीलाच हात जोडून, सर्वांकडे पाहून असं स्मित केलं, की सर्व जण खूश झाले. 'मी एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलो. अभिनयाची आवड असूनही आधी शाळा-कॉलेजचं शिक्षण पूर्ण करून नोकरीला लागलो. अभिनयक्षेत्रात जम बसेपर्यंत नोकरी आणि अभिनय अशी दुहेरी कसरत केली. रात्र-रात्र जागून संवाद पाठ करायचो. थोरा-मोठ्यांचे अभिनय पाहात स्वतःला घडवत गेलो. आई, वडील, धाकटी बहीण यांचे मृत्यू लहान वयातच पाहिले. पण दुःखातून, संकटांतून मार्ग काढत लोकांचं मनोरंजन करत राहिलो. वेळात वेळ काढून मोठ्यांसाठी-लहानांसाठी विनोदी लेखन करत राहिलो.' राजेशचं भाषण ऐकताना डोळे भरून येत होते. शेवटी त्याने त्याच्या 'खुसू-खुसू हसू' या एकपात्री नाटकातला एक प्रवेश करून आम्हाला इतकं हसवलं की आम्ही हसून अगदी 'लोटपोट' झालो.

सर्वात थोर गोष्ट म्हणजे राजेशने शाळेच्या नव्या इमारतीसाठी मोठ्या रकमेची देणगी दिली, पण सर्वांसमोर मंचावरून गाजावाजा करत नव्हे, तर गुपचूप गोरेसरांच्या कचेरीत, त्यांच्या हातात. त्याच्या मुलांच्या पुस्तकांचे पाच संचही त्यानं शाळेच्या वाचनालयाला देणगीदाखल दिले. आता मुलाना हवं ते पुस्तक हवं तेव्हा वाचता येणार होतं. मैदानात घातलेल्या मांडवात त्यानं आमच्याबरोबर सहभोजनाचा आनंद घेतला. तेव्हा मात्र तो आम्हाला आमच्यातलाच वाटला.

निघण्यापूर्वी त्यानं आमच्याकडून कबूल करून घेतलं, की कोणत्याही क्षेत्रात उतरायचं ठरवलं, तरी त्या आधी आम्ही आमचं शिक्षण पूर्ण करू. तो म्हणाला, की शिक्षण ही एकच बाब आहे, जी अपयशातही पुन्हा उभं राहायची ताकद देते. वाट दाखवते.

तो म्हणाला, ''मला तुमची शाळा खूप आवडली. तुम्ही मुलं खूप आवडलात. मी पुन्हा तुमच्या आनंदपुरात नक्की येईन. तेव्हा तुम्ही बहुतेक शाळा संपवून कॉलेजात गेलेले असाल. मला तुमच्या कॉलेजात यायला आवडेल. मी मोठ्यांसाठीही विनोदी पुस्तकं लिहिलीत. ती मी तेव्हा तुम्हाला, तुमच्या कॉलेजला देईन. आज ज्यांनी माझं मनोरंजन केलं, त्यांना मी स्वाक्षरी करून माझ्या 'कमाल-धमाल' पुस्तकाच्या प्रती देतोय. त्यांनी एकेकाने येऊन त्या घ्याव्या.'' कार्यक्रमात भाग न घेतल्याचं खूप वाईट वाटलं मला त्या दिवशी. शाळेच्या गाडीतून राजेश सिरसी स्टेशनकडे जायला निघाला, तेव्हा दूरपर्यंत तो गाडीच्या खिडकीतून आम्हाला हात करत होता.

''आतापर्यंत शाळेत आलेल्या पाहुण्यांत हा पाहुणा मला सर्वात जास्त आवडला'', सर्वेश म्हणाला. सर्वेश हा सर्वात अबोल मुलगा. प्रश्नांची उत्तरं द्यायसाठीही तोंड न उघडणारा. तोंड उघडावं लागतं म्हणून खो-खो, कबड्डी न खेळणारा. त्याच्या तोंडून इतकं मोठं वाक्य? राजेशची जादू शाळाभर पसरली होती. मुलांना प्रेरणा आणि प्रेम दोन्ही दिलं त्यानं. शिक्षकांच्या मनांतही स्वतःविषयी आदर निर्माण केला. आमच्या गणिताच्या पद्माताईंना तर नट-अभिनेते वगैरे आवडतच नाहीत. ''तो तुमचा राजेश ठाकूर यायचाय ना, त्याच्याच तयारीत लागलेत सगळे.'' असं बडबडणाऱ्या पद्माताई, त्या दिवशी गणित शिकवताना मधेच थांबून म्हणाल्या, ''तो आपला राजेश रे, काय छान लिहितो ना? मी हल्ली वाचनालयातून घेऊन वाचते त्याची पुस्तकं. ते त्याचं 'वारंवार बेजार' वाचलंत की नाही?'' बोलता-बोलता पुस्तकातला कुठलासा विनोद आठवून त्या हसतच सुटल्या. हसल्यावर इतक्या छान दिसल्या. याही वेळी सर्वेश म्हणालाच, ''आपल्या मुख्याध्यापकांसारख्या आपल्या पद्माताईही हसल्यावर खूप छान दिसतात ना?''

''हसल्यावर तर सगळेच छान दिसतात. तूही छान दिसतोस सर्वेश.'' सलोनी म्हणाली. तिच्या या वाक्यावर अख्खा वर्गच हसला आणि छानही दिसला.

**– डॉ. सुमन नवलकर**
suman.navalkar@gmail.com



सत्यकथा



# वाघाला पळवणारी वाघीण

डॉ. सुरेश सावंत

ही गोष्ट आहे एका बहादूर मुलीची, जिने हिमतीने वाघाला मारून पळवून लावले. जिने वाघापासून आपल्या शेळ्यांचे, आपल्या आईचे आणि आपलेही प्राण वाचवले. तिचे नाव रूपाली मेश्राम. भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील ऊसगाव (चांदोली) हे तिचे गाव.

ऊसगाव हे गाव घनदाट जंगलात आहे. गावापासून जरा दूरच्या वस्तीत एका झोपडीवजा घरात रूपाली आणि तिची आई जिजाबाई, ह्या दोघीच मायलेकी राहत होत्या. त्या झोपडीला लागूनच त्यांची शेळ्या बांधायची झोपडी होती. रूपालीची झोपडी तशी एकाकीच होती. शेजारी इतर कुणाच्या झोपड्या नव्हत्या. गावच्या शिवारात त्यांची दोन एकर जमीन होती. तिथे कष्ट करून त्या पोट भरत होत्या. संसाराला आधार म्हणून त्यांनी चार शेळ्या पाळल्या होत्या. आपल्या शेतातील काम संपल्यावर आई इतरांच्या शेतात मजुरी करत असे. जंगलातील तेंदूपत्ता गोळा करून विकायची. त्यातून चार पैसे मिळत.

रूपाली जंगलात शेळ्या चारायला घेऊन जायची. कधी एखादा कोल्हा, लांडगा शेळीचे एखादे पिलू पळवून न्यायचा. एखादा वाघ, बिबट्या शेतकऱ्यावर, गुराख्यावर हल्ला करत असे. हिंस्र जनावरांशी त्यांचा असा अधूनमधून सामना होतच असे. जंगलात राहायचे, तर जंगलातील प्राण्यांना घाबरून कसे चालेल?



आईसोबत रूपाली

एके दिवशी रात्री मायलेकी आपल्या झोपडीत झोपल्या होत्या. वेळ असेल रात्री साडेबाराची. बाहेर कुट्ट काळोख पसरला होता. रातकिडे किरकिरत होते. दूर कुठे तरी कुत्री रडत होती. जिवाच्या आकांताने कुत्री भुंकत होती. वातावरणात एक प्रकारची भीती दाटली होती. अशा भीतिदायक वातावरण झोपडीतील एक शेळी अचानक रडायला, ओरडायला लागली. दिवसभर खूप मेहनत केल्यामुळे आई थकली होती. ती गाढ झोपेत होती.

शेळीच्या रडण्या-ओरडण्यामुळे रूपालीला एकदम जाग आली. तिची एक शेळी गाभण होती. तिचे दिवस भरले होते. म्हणजे ती लवकरच पिलांना जन्म देणार होती. रूपालीला वाटले, त्यामुळेच शेळी ओरडत असेल. काही का असेना, पण रूपालीला झोप येत नव्हती. पशुपालकांचा आपल्या पाळीव जनावरांमध्ये फारच जीव गुंतलेला असतो. गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्यांना ते पोटच्या लेकरासारखे सांभाळतात. जनावरांच्या दुःखाने ते दुःखी होतात.

आताही रूपाली शेळीच्या ओरडण्यामुळे चिंतेत पडली होती. आईला उठवले, तर तिची झोपमोड होईल, म्हणून रूपाली एकटीच उठली. तिने हळूच आपल्या झोपडीचे दार उघडले. दबक्या पावलांनी ती शेळ्यांच्या गोठ्यात शिरली. ती सावधपणे परिस्थितीचा अंदाज घेऊ लागली. पाहते तर काय! तिची एक लाडकी शेळी वाघाच्या हल्ल्यात जखमी झाली होती. शेळीच्या शेजारीच वाघ दबा धरून बसल्याचे तिच्या लक्षात आले. आपल्या जिवाभावाच्या शेळ्यांना वाचवणे तर आवश्यक होते.

रूपालीने परिस्थितीचा अंदाज घेतला. तिच्याजवळ काही

शस्त्र तर नव्हते. बंदूक नाही ना तलवार नाही. वाघाचा प्रतिकार केला नाही, तर त्याने शेळ्यांचा जीव घेतला असता. रूपाली वाघावर लक्ष ठेवून होती. वाघ रूपालीवर लक्ष ठेवून होता. तो दबा धरून बसला होता. रूपालीने वाघाच्या शिकारीत अडथळा आणला होता. त्यामुळे तो रागातच होता. आवडत्या शेळीला जखमी केल्यामुळे रूपालीही वाघावर रागावली होतीच.

कोणाला मदतीला बोलावण्यासारखी परिस्थिती नव्हती. जवळ कोणाचा शेजारही नव्हता. आईला उठवून तिला अडचणीत टाकायची रूपालीची इच्छा नव्हती. जे व्हायचे ते आपलेच होऊ दे. रूपालीने मनाशी निर्धार केला. रूपालीच्या पायाजवळ शेळ्या राखायची एक काठी पडली होती. तिने सावधपणे काठी उचलण्याचा प्रयत्न केला. वाघाचेही तिच्याकडे लक्ष होतेच. रूपालीने काठी उचलण्यापूर्वीच वाघाने रूपालीवर हल्ला केला. वाघाच्या पंजामुळे रूपाली जखमी झाली. तिने दोन्ही हातांनी जोर लावून वाघाला दूर ढकलले. वाघाचा दुसरा वार चुकवत रूपालीने काठी उचलली. संपूर्ण शक्ती एकवटून रूपालीने वाघावर काठीने वार करायला सुरुवात केली. वाघाची आणि रूपालीची झुंज साधारण वीस मिनिटे चालू होती. झटापटीत जखमी झाल्यामुळे रूपालीच्या तोंडून अजाणतेपणी 'अम्मा' अशी आर्त हाक बाहेर पडली.

रूपालीच्या किंचाळण्याने आई खडबडून जागी झाली. रूपालीला शोधत ती गोठ्यात आली. रूपालीची वाघासोबत चाललेली झुंज पाहून ती हादरून गेली. जिजाबाईला वाटले, आता आपली रूपाली वाचत नाही. क्षणाचाही विलंब न लावता आईने दुसरी काठी घेऊन वाघाला झोडपायला सुरुवात केली. एकीकडून रूपालीचे वार आणि दुसरीकडून जिजाबाईचे वार. दोघी मायलेकींमध्ये आज वीरश्री संचारली होती. ह्या झटापटीत वाघाचा पंजा जिजाबाईच्या चेहऱ्यावर लागला. रूपाली आधीच रक्तबंबाळ झाली होती. तिचा चेहरा रक्ताने माखला होता. आता आई जिजाबाईही रक्तबंबाळ झाली.

दोघींच्या काठ्यांचा मार खाऊन वाघ गळाटला होता. ह्या दोन वीर वाघिणींपुढे आता आपला निभाव लागणार नाही, हे त्याने ओळखले होते. वाघाने पराभव पत्करला. एक मोठी डरकाळी फोडून त्याने गोठ्याच्या बाहेर उडी मारली. अखेर शेपूट घालून त्याने पळ काढला. वाघ अंधारात गुडूप झाला.

एव्हाना रात्रीचा दीड वाजला होता.

दोघी मायलेकी एकमेकींना धीर देत होत्या. रूपालीने स्वतःला सावरत सोनेगावच्या मुनेश्वर शिंगाडे यांना फोन केला. वाघाच्या हल्ल्याची माहिती दिली. आई आणि आपण दोघीही जखमी झाल्याचे सांगितले. दोघींनाही लवकरात लवकर दवाखान्यात नेण्याची विनंती केली.

शिंगाडे यांनी वनखात्याच्या कॉलनीत जाऊन कर्मचाऱ्यांना उठवले. पहाटे अडीच वाजता वनखात्याचा ताफा रूपालीच्या




झोपडीवर पोहोचला. रूपालीची आणि तिच्या आईची अवस्था बघून सगळेच हैराण झाले. रूपालीची झोपडी रक्ताने माखली होती. ऊसगावच्या खाजगी डॉक्टरांनी मायलेकींवर प्राथमिक उपचार केले. फार जास्त रक्तस्राव झाल्यामुळे पहाटे पहाटे रूपाली बेशुद्ध पडली.

सुरुवातीला ह्या मायलेकींवर साकोलीच्या दवाखान्यात उपचार करण्यात आले. त्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तिला नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे तिच्यावर महिनाभर उपचार करण्यात आले. जखमा भरून येईपर्यंत रूपालीला महिनाभर नागपुरातच राहावे लागले.

वाघाशी मुकाबला करणारी मुलगी आहे तरी कशी, हे पाहण्यासाठी दवाखान्यात अनेक लोक येत होते. त्यात पत्रकारही होते. पत्रकारांनी रूपालीच्या धाडसाची बातमी तिच्या फोटोसह अनेक वृत्तपत्रांत छापली. शाळा-कॉलेजमधील मुली रूपालीसोबत आपला सेल्फी काढून घेत होत्या. स्वतःचा आणि आपल्या आईचा जीव वाचवणारी मुलगी म्हणून लोक तिचे कौतुक करू लागले. तेव्हापासून रूपाली त्या परिसरात 'वाघाला लोळवणारी शूर वाघीण' म्हणूनच ओळखली जाते.

आपण कुत्र्याला घाबरतो. मांजराला घाबरतो. फार कशाला, पालीला आणि झुरळालाही घाबरतो. मात्र वाघाला लोळवून त्याला पळवून लावणाऱ्या शूर मुलीही आपल्या देशात आहेत. त्या अबला नसून सबला आहेत. त्या आजही इतिहासातील वीरांगनांचा वारसा पुढे चालवत आहेत. त्यांच्याकडून आपल्याला खूप काही शिकण्यासारखे आहे.

**– डॉ. सुरेश सावंत**
sureshsawant2011@yahoo.com







कथा



# गोष्ट दोन भावांची

**डॉ. विशाल तायडे**

या वर्षी दिवाळीचा सण नोव्हेंबर महिन्यात होता. नुकतीच थंडी सुरू झाली होती. सगळीकडे हिरवागार होते. शेखर सणासाठी विशेष सुट्टी घेऊन गावाकडे आला होता. गेल्या पाच वर्षांपासून शेखर पुण्यात होता. तिथल्या एका कंपनीत मोठ्या हुद्यावर तो काम करत होता. त्याला पगारही भरपूर होता. त्याने पुण्यात घरही घेतले होते आणि महागडी गाडीही.

रात्रभर प्रवास करून तो पहाटेच घरी पोहोचला होता. थकव्यामुळे शेखरला झोप लागली होती. सकाळी तो बराच उशिरा उठला. तोपर्यंत घरचे सगळे आपापल्या कामात मग्न झालेले होते. परवा लक्ष्मीपूजन होते. त्याची सगळी तयारी सुरू होती. शेखरला बाजेवर उठून बसलेलं दादांनी पाहिलं.

''शेखर, अरे, उठलास का? प्रवासाने थकला असशील ना? झोप हवं तर आणखी काही वेळ.'' असे म्हणत दादा त्याच्या जवळ गेला.

''नाही दादा, आता छान वाटतंय. उठतो आता.'' शेखरने आपल्या मोठ्या भावाकडे पाहिले. तोपर्यंत दादा बाजेवर येऊन बसला होता.

''कसं चाललंय तुझं काम?'' दादांनी विचारलं.

''चांगलं सुरू आहे, दादा.'' शेखर थोडक्यात म्हणाला.

''तुझी कंपनी खूप मोठी आहे म्हणे.''

''हो. दादा. दोन हजारपेक्षा जास्त लोक काम करतात तिथे.'' शेखर म्हणाला.

दादांच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसू लागले. त्यांना आपल्या लहान भावाचा सार्थ अभिमान वाटत होता.

''बरं ऊठ. तोंड धुऊन घे. मी चहा ठेवायला सांगतो.'' असे म्हणत दादांनी आपल्या पत्नीला हाक मारली. थोड्या वेळाने तयार होऊन शेखर दादाजवळ येऊन बसला. दोघे भाऊ चहा घेत गप्पा मारत होते. शेखर चहा घेता घेता आपल्या मोठ्या भावाकडे पाहत होता. अतिशय धष्टपुष्ट शरीरयष्टी, पांढरा कुर्ता व पयजामा, गळ्यात उपरणे आणि मण्यांची माळ. दिवसभर उन्हापावसात काम करून दादाचा चेहरा चांगलाच रापलेला होता. हातावरही घट्ट पडलेले होते. अंगावरच्या कपड्यांनाही कुठे कुठे माती लागलेली होती. दादाच्या डोक्यावर पांढरे केस डोकावायला लागले होते. शेखर चहा घेत घेत आपल्या भावाला न्याहाळत होता. विचार करत करतच तो आपल्या भूतकाळात हरवला.

त्यांच्या बालपणी घरची परिस्थिती फारशी चांगली नव्हती. तसे म्हणायला घरी पंधरा एकर शेती होती; पण ती सगळीच कोरडवाहू. पाऊस फार कमी पडत असे. त्यामुळे शेतात उत्पन्नही फार कमी येई. त्यावर कसेबसे त्यांचे घर चालत असे. दोन्ही भाऊ गावातल्या शाळेतच जात असत. दादा प्रकाश शेखरपेक्षा तीन वर्षांनी मोठा होता. दोन्ही भाऊ अभ्यासात खूप हुशार होते. आपापल्या वर्गात पहिला नंबर ते कधीच सोडत नसत. शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकही दोन्ही भाऊ आवडते होते. या दोन भावांची जोडी म्हणजे अगदी राम-लक्ष्मणासारखी आहे, सर कौतुकाने म्हणत.

मोठा प्रकाश तर आपल्या धाकट्या भावाची खूप काळजी घेत असे. शेखरला कसलाही त्रास होऊ नये, यासाठी त्याची नेहमी धडपड सुरू असे. शेखर पाचवीत होता तेव्हाची ही गोष्ट. त्यांच्या वर्गाला खेळाच्या तासात मैदानावर सोडलेले होते. हा तास म्हणजे शेखरचा विशेष आवडीचा. त्याला अभ्यासासोबत खेळाची खूप आवड होती. मैदानात कबडी सामना सुरू होता. खेळताखेळता एका मुलाने शेखरचा पाय ओढला. त्यामुळे तो जोरात तोंडावर पडला. त्याला बरेच लागले होते. नाकातून रक्त वाहत होते. मुलांनी शेखरला उचलून बाकड्यावर झोपवलं. रक्ताने त्याचा शर्ट भरला होता. त्याला खूप वेदना होत होत्या.

त्यावेळी प्रकाश प्रयोगशाळेत होता. एका विद्यार्थ्याने पळत जाऊन त्याला ही बातमी दिली. प्रकाश हातातले काम तसेच सोडून धावत मैदानावर आला. आपल्या भावाला जखमी झालेले पाहून तोही मोठ्याने रडायला लागला. त्याने पुढे होत

शेखरचा चेहरा आपल्या मांडीवर घेतला आणि 'डॉक्टरला बोलवा, डॉक्टरला बोलवा.' असं जोरजोरात ओरडू लागला. सगळे त्याला समजावण्याचा प्रयत्न करत होते. तोपर्यंत मुख्याध्यापक आणि इतर शिक्षकही तिथे आले. शिपायाने पळत जाऊन प्रथमोपचारपेटी आणली. सरांनी कापसाने शेखरच्या चेहऱ्यावरचे रक्त पुसलं. रक्त आणखी वाहू नये म्हणून त्यांनी जखमेवर कापसाचा बोळा लावला. प्रकाशने लगेच आपल्या भावाला उचलून घेतले आणि सरांच्या पाठीमागे मोटारसायकलवर शेखरला बसवून ते दवाखान्यात निघाले. शेखर शांत असला तरी प्रकाश सतत रडतच होता. दवाखान्यात शेखरवर व्यवस्थित इलाज करून त्याला घरी आणल्यावरचे प्रकाशचे रडणे थांबले. एकदा वरच्या वर्गातल्या काही टारगट पोरांनी शेखरची खोडी काढली. तेव्हाही प्रकाश त्यांच्यावर असाच तुटून पडला होता. एकट्यानेच त्या मुलांची धुलाई केली होती. मात्र तेव्हापासून कोणीही शेखरला त्रास दिला नाही.

एके दिवशी वर्गात शिपाई सूचनावही घेऊन आला. सरांनी सूचना वाचून दाखवली. शाळेची वार्षिक सहल या वर्षी कोकणात जाणार आहे. सहल पाच दिवसांची असेल. ज्या विद्यार्थ्यांना सहलीला जाण्याची इच्छा आहे, त्यांनी सोमवारपर्यंत एक हजार रुपये आपल्या वर्गशिक्षकाकडे जमा करावेत. दोन्ही भावांच्या वर्गात ही सूचना वाचून दाखवण्यात आली. शाळा सुटल्यावर नेहमीसारखा शेखर शाळेच्या मैदानावर आपल्या भावाची वाट पाहत थांबला.

प्रकाश जवळ येताच त्याने विचारले, ''दादा, तुमच्या वर्गातही सहलीची सूचना वाचून दाखवली का?''

''हो.'' प्रकाश शांतपणे म्हणाला.

''मग दादा, जायचं ना आपल्याला? मला कोकण पाहण्याची खूप इच्छा आहे. पुस्तकातच कोकणाविषयी आतापर्यंत वाचलं. आता ते बघण्याची संधी आली.'' शेखर उत्साहाने म्हणाला. यावर प्रकाशने काहीच उत्तर दिले नाही. तो शांतपणे चालत राहिला.

थोडे थांबून शेखरने पुन्हा विचारले, ''दादा, तू बोलत का नाहीस? आपण जाऊया ना कोकणाच्या सहलीला. तू आई-बाबांना सांग.'' पण प्रकाशला हे चांगले माहीत होते, की त्याच्या वडिलांना दोन्ही भावांच्या सहलीची फी परवडणारी नव्हती. फार तर ते एकाची फी देऊ शकतील आणि तीही पोटाला चिमटा काढूनच. मात्र हे आपल्या लहान भावाला कशाला सांगावे. त्याच्या आनंदावर विरजण पडेल. हा विचार करून प्रकाश शांत बसला.

काही वेळाने प्रकाश म्हणाला, ''शेखर, सहलीला तूच जा. आधीच माझा खूप अभ्यास राहिलाय करायचा. सोबत तुझ्या वर्गातले मित्र असतीलच की.''

भावाचे हे बोलणे ऐकून शेखर हिरमुसला. तो म्हणाला, ''असं काय करतो रे दादा? जाऊ या ना आपण सहलीला. किती मज्जा येईल.''

''अरे, शेखर, मी सांगितलं ना, की माझा खूप अभ्यास बाकी आहे. मी परीक्षेत नापास झालो तर आवडेल का तुला?'' प्रकाश काहीसा रागावूनच बोलला.

त्यावर शेखर गप्प झाला. घरी गेल्यावरही प्रकाशने वडिलांना असेच सांगितले. आपल्या भावाला सोडून सहलीला जाण्याची शेखरची ही इच्छा नव्हती, पण प्रकाशने त्याला जाण्यासाठी तयार केले. त्याने वडिलांकडून सहलीच्या फीचे पैसे घेऊन शेखरला सहलीला पाठवले.

दोघा भावांतील बंधुप्रेमाचा त्यांच्या आई-वडिलांना फार अभिमान होता. गावातील लोकही त्यांच्याविषयी फार कौतुकाने बोलत असत. त्यांच्या गावातील शाळा दहावीपर्यंतच होती. कॉलेजचे शिक्षण घेण्यासाठी तालुक्याला जावे लागत असे. या वर्षी प्रकाश दहावीत होता. पुढच्या वर्षी शिक्षणासाठी त्याला शहरात जावे लागणार होते. त्याच्यापाठोपाठ शेखरही कॉलेजला येणार होता. दोन्ही मुलांचा शहरात राहण्याचा आणि शिक्षणाचा खर्च त्याच्या आई-वडिलांना परवडणारा नव्हता.

एके रात्री आपल्या आई-वडिलांचे बोलणे प्रकाशने ऐकले.

वडील म्हणाले, ''आपली एवढी गुणी पोरं. कधी शाळेत नंबर सोडत नाहीत. आता तर एका मागोमाग कॉलेजला जाणार आहेत.''

''हो, ना. किती भराभर दिवस गेले. शहराचा खर्च खूप असेल ना?'' आईने शंकेने विचारले.

''मलाही तीच चिंता सतावत आहे. दोन्ही पोरांचा कॉलेजचा खर्च मला झेपणार नाही. शेतीही साथ देत नाही. या वर्षी तर पाऊसच पडला नाही. डोळ्यांसमोर पीक जळून गेलं.'' वडील म्हणाले.

''हो ना, काहीच पिकलं नाही यंदा.'' असं म्हणताना आईचा हुंदका दाटून आला.

''मीच करंटा आहे बघ. एवढी सोन्यासारखी पोरं आपली, पण मी त्यांना शिकवू शकत नाही.'' असे म्हणताना वडिलांनाही भरून आले.

दोघांनाही अंधारात रडताना प्रकाशने पाहिले. त्याला खूप वाईट वाटले. त्याने शेजारी झोपलेल्या आपल्या भावाचा अंदाज घेतला. तो गाढ झोपेत होता. त्या रात्री प्रकाश रात्रभर झोपला नाही. त्याने खूप विचार केला. पहाटे पहाटे त्याच्या डोळ्याला डोळा लागला. सकाळी मनाशी काहीतरी खूणगाठ बांधूनच तो उठला. त्या वर्षी प्रकाशने दहावीची परीक्षा दिली. अपेक्षेप्रमाणे तो चांगल्या गुणांनी पास झाला, पण निकालाच्या दिवशीच तो वडिलांना म्हणाला, ''बाबा, आता मला पुढे शिकण्याची इच्छा नाही.''




''काय? काय म्हणालास तू?'' बाबांनी आश्चर्याने विचारले.

''हो बाबा, बरोबर ऐकलं तुम्ही. मला पुढे शेती करायला आवडेल.'' तो शांतपणे म्हणाला.

''नाही, नाही. तू शहरात जाऊन पुढचं शिक्षण घे. त्यासाठी मी पैशांची तरतूद करत आहे.'' बाबा म्हणाले. बापलेकाचे बोलणे ऐकून त्यांची आईही तिथे आली.

ती म्हणाली, ''प्रकाश, तुला पुढे शिकता यावं यासाठी तुझ्या बाबांनी काय काय प्रयत्न करून पैसा जमवला आहे आणि तू शिकायचं नाही म्हणतोस?''

''मी शिकायचं कुठं नाही म्हटलं? पण यापुढे मी कॉलेजला जाऊन शिकणार नाही. मी शेतीत शिकणार. तिथे नवनवीन प्रयोग करणार. आपल्या शेतीत आणखी चांगलं उत्पन्न कसं येईल यासाठी प्रयत्न करणार.''

अशा चर्चेच्या वेळी काय बोलायचं हे त्याने आधीच ठरवून ठेवलं होतं. त्यामुळे तो आई-बाबांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देत होता.

''अरे बाबा, शेतीचे हाल तर तू पाहतच आहेस. वेळेवर पाऊस पडत नाही म्हणून पीक नाही आणि त्यामुळे आपली परिस्थिती सुधारण्याचे नाव घेत नाही. मला वाटतं तुम्ही दोन्ही पोरांनी शिकून आपल्या पायांवर उभं राहिलं पाहिजे.'' बाबा त्याला समजावण्याचा प्रयत्न करत होते.

''हो, बाबा. शेतीतूनही आपल्याला चांगलं उत्पन्न घेता येईल. आहे त्या पाण्याचा चांगला उपयोग करावा लागेल. मी

इस्त्रायल देशाचं शेतीतंत्रज्ञान अभ्यासलं आहे. त्यांनी अत्यंत कमी पाण्यावर आपल्या देशातल्या शेतीचा कायापालट केला आहे. तसं मी आपल्या शेतीत करू इच्छितो.'' प्रकाश आपल्या वडिलांना समजावत म्हणाला.

नंतर अनेकांनी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण प्रकाशने कोणाचेही ऐकले नाही. आपण कॉलेजला गेलो नाही तर आपल्या धाकट्या भावाच्या शिक्षणाचा खर्च होऊ शकेल. दोन्ही भावांच्या शिक्षणाचा खर्च वडिलांना पेलणार नाही, हे तो पक्के जाणून होता. मग प्रकाशने स्वतःला शेतीत झोकून दिले. तो शेतीत राबराब राबला. त्याने नवनवीन प्रयोग केले. कमी पाण्यावर येणारी पिके घेतली. कृषीविज्ञानकेंद्राच्या शेतीकार्यशाळेत तो उपस्थित राहिला. तिथल्या तज्ज्ञांकडून शेती आणि इतर पूरक व्यवसाय कसे करता येतील हे शिकून घेतले. त्याने शेतीत लक्ष घातल्यापासून त्यांच्या शेतीचा कायापालटच झाला होता.

इकडे पुढच्या वर्षी शेखर दहावी अत्यंत चांगल्या गुणांनी पास झाला. प्रकाश स्वतः त्याला शहरातल्या कॉलेजमध्ये घेऊन गेला आणि तिथे त्याला प्रवेश घेऊन दिला. नंतर दोन्ही भाऊ तिथून बाहेर पडले तेव्हा मागे वळून प्रकाशने डोळे भरून ते कॉलेज पाहून घेतलं. काही क्षण तो आपल्या कल्पनाविश्वात हरवला होता. मग तो शेखरला म्हणाला, ''शेखर, खूप शीक. मोठा हो. आपण दोघंही खूप शिकावं असं आई-बाबांचं स्वप्न होतं. पण मी ते पूर्ण करू शकलो नाही. तू ते पूर्ण कर. मी तुला काही कमी पडू देणार नाही.''

थोडे थांबून शेखरने आपल्या मोठ्या भावाला विचारले, ''दादा, एक विचारू का?''

''काय रे? विचार की.'' प्रकाश म्हणाला.

''दादा, आपले बाबा दोघांच्या शिक्षणाचा खर्च उचलू शकणार नाही म्हणून तू शिक्षण सोडलंस ना? मला उच्चशिक्षण मिळावं म्हणून तू शेतीचा मार्ग स्वीकारलास ना?''

''अरे, नाही शेखर. तसं काही नाही. मला शेती करायला आवडते.'' प्रकाश त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला. मात्र आपल्या मोठ्या भावाच्या बोलण्यातील वेदना शेखरच्या नजरेतून लपली नाही. शेखरच्या डोळ्यांतून अश्रू व्हायला लागले. 'दादा!' असं म्हणत तो आपल्या मोठ्या भावाच्या गळ्यात पडला आणि हमसून हमसून रडू लागला. प्रकाश त्याच्या पाठीवरून हात फिरवत होता. त्याच्याही डोळ्यांत अश्रू तरळले होते. त्याने ते शेखरपासून लपवले.

तो म्हणाला, ''खूप शीक. खूप मोठ्या पदावर जा. मीही आपल्या शेतात क्रांती करतो की नाही बघ.''

''हो, दादा.'' असं म्हणत शिखर आणखीनच त्याला बिलगला.

शेखर एक एक वर्ग शिकत पुढे इंजिनीयर झाला. त्याची गुणवत्ता पाहून पुण्यातील एका कंपनीने त्याला मोठ्या पदावर घेतले. तिथेही त्याने आपल्या कामाची चुणूक दाखवली. त्यामुळे लवकरच त्याला वरच्या पदावर बढती मिळाली. इकडे प्रकाशने शेतीत नवनवीन प्रयोग करत अतिशय चांगले उत्पादन घ्यायला सुरुवात केली. लवकरच एक प्रगतिशील शेतकरी म्हणून त्याचा नावलौकिक झाला. त्याने शेजारची आणखी एक शेतीही विकत घेतली.

इतका वेळ भूतकाळातील आठवणीत हरवलेला शेखर भावाच्या हाकेने भानावर आला.

''बोल, दादा.'' तो कसंबसं म्हणाला.

''अरे, कुठे हरवला होतास? मी जनावरांच्या गोठ्यात जाऊन आलो पण तुझा चहा अजून संपला नाही. कसला विचार करत होतास?'' प्रकाशने पुन्हा बाजेवर बसत विचारले.

''काही नाही दादा. आपला भूतकाळ आठवला. माझ्यामुळे तुझं शिक्षण होऊ शकलं नाही.''

''अरे, तसला काही विचार करू नकोस. घरच्या परिस्थितीमुळे तेव्हा तसा निर्णय घ्यावा लागला. त्यावेळी आपल्या दोघांचं शहरातलं शिक्षण आई-वडिलांना शक्यच नव्हतं.'' शेखरला मध्येच थांबवत प्रकाश म्हणाला.

काही वेळाने तो म्हणाला, 'शेखर, माझी एक इच्छा आहे. परिस्थितीमुळे माझ्यासारख्या इतर कोणाचं शिक्षण राहून जाऊ नये, असं मला वाटतं. त्यामुळे गावातच दर्जेदार शिक्षणाची सोय झाली पाहिजे. आपल्याला आपल्या गावातच कॉलेज सुरू करता येईल का? पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. हवं तर कॉलेजसाठी आपल्या शेतीतलाच एक-दोन एकराचा तुकडा देऊन टाकू.''

''हो, करता येईल की, दादा.'' शेखरही उत्साहाने म्हणाला.

''मग घे तर मनावर. गावात कॉलेज झालं तर मला सारं काही मिळाल्यासारखं होईल.'' प्रकाश म्हणाला.


''हो, दादा. पुढच्या वर्षापासूनच गावात कॉलेज सुरू होईल यासाठी मी प्रयत्न करतो.'' शेखर असे म्हणाला आणि दोन्ही भावांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. त्याचवेळी बाहेर अंगणात मुलांनी दिवाळीचे फटाके वाजवायला सुरुवात केली होती आणि घरातून फराळाचा घमघमाटही येत होता.

**- डॉ. विशाल तायडे**

vishal18198@gmail.com



कथा



# श्रमाचे मोल

प्रा. श्रीकांत नाईक

मुलांनो, आज मी तुम्हाला एक खरीखुरी गोष्ट सांगणार आहे. तुम्हाला पूज्य सानेगुरुजी माहिती आहेतच. फुलामुलांचे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत ते. त्यांची 'खरा तो एकचि धर्म' ही प्रसिद्ध कविता तुम्ही नेहमी म्हणत असाल ना? या कवितेला प्रार्थनेचे मोल आहे. अनेक शाळांमधून प्रार्थना म्हणून ती गायली जाते.

बरे का मुलांनो, आपल्या महाराष्ट्रात अनेक जिल्हे आहेत, त्यातलाच एक जिल्हा म्हणजे कोल्हापूर. कोल्हापूर म्हटले, की महालक्ष्मी तथा अंबाबाईचे मंदिर आणि राजर्षी छत्रपती शाहूमहाराज या दोन गोष्टी नक्कीच आठवणार.

तर अशा या कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील उत्तूर हे छोटेसे गाव. या गावातील 'उत्तूर विद्यालय, उत्तूर' ही एक अनोखी शाळा. तिथलीच एक घडलेली कथा आहे ही.

पूज्य सानेगुरुजींच्या विचाराने चालणारी शाळा. या शाळेचे ब्रीदवाक्य आहे, 'एक हृदय हो भारत जननी.' किती छान ब्रीदवाक्य आहे पाहा! या शाळेत आजूबाजूच्या वीस-पंचवीस खेड्यांतून मुलेमुली येत असतात. या शाळेचे मुख्याध्यापक व संस्थापक म्हणजे दुसरे सानेगुरुजीच. त्यांचे नाव आहे श्री. अनंतराव आजगावकर. अगदी साधे खादीचे कपडे, प्रसन्न चित्ताने मुलांत रमणारे. त्यांना सहकारी लाभले तेही असेच ध्येयवादी तळमळीने शिकवणारे. अल्पावधीतच ही शाळा नावारूपाली आली. सुसंस्कार, शिस्त, राष्ट्रप्रेम आणि बंधुभावना ही चार मूल्ये शिकवणारी शाळा. या शाळेत श्रमसंस्काराला फार महत्त्व होते, आजही आहे.

या शाळेत येणारी मुले-मुली ही प्रामुख्याने शेतकरी कष्टकरी घरांतून येत असतात. त्यांच्या ठिकाणी असलेल्या गुणांचा उपयोग करून तो वाढीला कसा लागेल याकडे शाळेचे विशेष लक्ष असते.

दिवाळी आणि मे महिन्याच्या सुट्टीत येथील मुले शेतात कामाला जातात आणि काम करून आपल्या शालेय शिक्षणाचा खर्च भागवतात. अशा या शाळेतील ५०-५५ वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे.

सुरू झाले १९७२ साल. महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला होता. पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. दळणवळणही सुरळीत नव्हते. मुले काट्याकुट्यातून, नाल्यातून चालत शाळेला येत असत. त्या वेळेची ही गोष्ट. दुष्काळामुळे शेतकरी अगदी मेटाकुटीला आला होता. पोट भरण्याची काळजी. त्यामुळे शैक्षणिक खर्च कसा करणार?

अशा कठीण परिस्थितीतच शेतकऱ्यांपुढे आपल्या पाल्याचे शिक्षण कसे करायचे हाच प्रश्न होता. ही परिस्थिती पाहून मुख्याध्यापक मा. आजगावकरसरही व्यथित झाले, ते विचार करू लागले आणि एक दिवस सर्व मुलांना व शिक्षकांना एकत्र करून ते आपले मनोगत सांगू लागले. त्यांच्या शब्दाशब्दांतून मुलांबद्दलचा कळवळा वाहत होता. सर्वांचेच डोळे पाणावले. ते पुढे म्हणाले,

''मुलांनो, आपण काम करू आणि आपला शैक्षणिक खर्च आपणच भागवू. मग कराल का काम?''

मुलांनी उत्स्फूर्त होकार दिला. ''आम्ही काम करू, आमच्या पालकांना आम्ही त्रास देणार नाही. आमचा शैक्षणिक खर्च आम्ही काम करून भागवू.''

पाठोपाठ शिक्षकही तयार झाले. त्यांनीही मुलांबरोबरच काम करून ही मजुरी मुलांसाठी द्यायची तयारी दाखवली. मुख्याध्यापक आजगावकरसरही भारावून गेले. त्यानंतर आजगावकरसरांनी जिल्हाधिकारी साहेबांची भेट घेऊन त्यांना सर्व हकीगत सांगितली. जिल्हाधिकारी आश्चर्यचकित झाले. त्यांनी सर्व ते सहकार्य करायचे ठरवले.

मुलांनो, काय काम केले असेल मुलांनी? तर या उत्तूर गावात एक सुंदर तलाव आहे, तो तलाव या दुष्काळात पूर्ण आटला होता. एक थेंबही पाणी नव्हते. आजगावकरसरांनी पाहिले तर तळ्यात प्रचंड गाळ साचला होता. क्षणभर त्यांच्या



डोक्यात एक कल्पना आली, हा गाळ काढण्याचे काम केले, तर भविष्यकाळात तो उन्हाळ्यात आटणार नाही. आपण हेच काम करू या.

झाले जवळजवळ २५० विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि एकोणीस शिक्षकांनी काम करायचे ठरवले. जिल्हाधिकारी साहेबांनी खोरी, टिकाव, बुट्ट्या हे साहित्य पुरवले आणि कामाला सुरुवात झाली. एक 'श्रमयज्ञ' मोठ्या उत्साहात सुरू झाला. गाणी म्हणत मुले काम करताना पाहून पालकही आश्चर्यचकित झाले. या सर्वांचे नियोजन करण्याची जबाबदारी दिली होती त्यावेळचे तरुण शिक्षक श्रीकांत नाईक यांच्याकडे. स्वतः आजगावकर सरही यात सामील झाले.

हे श्रमदानाचे काम जवळजवळ तीन आठवडे चालले. उन्हाळ्यात उन्हातान्हाचा कोणताही बाऊ मुलांनी केला नाही. असे म्हणतात, की आवडीचे काम असले की त्याचे श्रम वाटत नाहीत, उलट हलके वाटते. साथीला सानेगुरुजींची गीते म्हटली जायची.

तीन आठवड्यांनंतर सर्वांना शासनाकडून दहा हजार रुपये मजुरी मिळाली. आपल्या कष्टाचे पैसे पाहून मुलांना अत्यंत आनंद झाला, पालकांनाही आनंद झाला. शिक्षकांनीही आपली मजुरी यात मिसळली. पुढे याच पैशांनी शाळेत पोस्टाच्या मदतीने 'बचत बँक' सुरू झाली, हीच ती संचयिका. तिच्यात पैसे ठेवले.

मुलांना बचतीचे धडे दिले आणि योग असा की याच वर्षी नवा अभ्यासक्रम आला, नवी पुस्तके आली, पण त्यांच्या किमतीही खूप होत्या. पण मुलांनी केलेल्या कामामुळे त्यांचा खर्च, युनिफॉर्मचा खर्च याचे ओझे पालकांवर पडले नाही.

जून महिन्यात शाळा सुरू झाली आणि लवकरच मृग नक्षत्राच्या पावसाला सुरुवात झाली. थोड्याच दिवसांत तलाव पूर्ण भरला. ते तुडुंब भरलेले पाणी पाहून मुलांना खूप आनंद झाला. त्यांचा ऊर आनंदाने भरून आला. सर्वांनी तलावाभोवती उभे राहून आनंदाने जल्लोष केला. श्रमाचे मोल समजले. तो तलाव आज बावन्न वर्षे झाली त्यानंतर कधीही आटला नाही. आहे की नाही चमत्कार! आज या श्रमदानात काम केलेली मुलेमुली आता साठ वर्षे ओलांडून म्हातारे झाली असून शिक्षकांनी तर आपली ८०-८५ वर्षे ओलांडली आहेत. आमचे मुख्याध्यापक माननीय आजगावकरसर, ते तर आज ९५ वर्षांचे झाले आहेत, शतकाची वाट पाहत आहेत. मुलांनो, हे एक छोटेसे काम, पण त्याने इतिहास घडवला आहे. हा 'श्रमाचा इतिहास' आहे.

आवडली ना गोष्ट तुम्हाला? तुमच्याही आयुष्यात असा एखादा संस्मरणीय क्षण असेलच की!

**– प्रा. श्रीकांत नाईक**
snaik.1946@gmail.com



कथा



# वाघोबा रागावले

## सुरेश वांदिले

सगळी टोळी आनंदात होती. कारण अनेक महिन्यांपासून ठरवलेलं स्वप्न साकार होणार होतं. ताडोबाच्या जंगलात जाऊन वाघोबाचं दर्शन घ्यायचं, असं अनेक दिवसांपासून टोळीतल्या प्रत्येकाच्या घरी ठरत होतं. या टोळीमध्ये रवी, शशी, मीना, तेजोमयी आणि रंगनाथ होते.

ताडोबाच्या जंगलामध्ये वाघोबाचं दर्शन करण्यासाठी, पहाट-दुपार आणि रात्र, अशा तीन वेळा असतात. रात्रीच्या सफारीला फार कमी लोकांना परवानगी दिली जाते. ही परवानगी ऑनलाइन पद्धतीनं दिली जाते. रवीच्या बाबांकडे ऑनलाइन बुकिंगचं काम सोपवण्यात आलं. पहाट आणि दुपारी दोनच्या सफारीचं बुकिंग झालं. मात्र रात्रीच्या सफारीचं बुकिंग होऊ शकलं नाही.

सकाळी सहा वाजता पहिली सफारी असल्यानं रवीचे आईबाबा इतरांसोबतच आदल्या रात्री ताडोबाजवळच्या अंधारी अभयारण्याच्या बाहेर असणाऱ्या हॉटेलमध्ये मुक्कामास थांबले.

दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाच वाजताच सगळी मंडळी तयार झाली. बरोबर सहा वाजता सफारीच्या गाडीमध्ये, गाइडसोबत बसून मंडळी ताडोबाच्या जंगलात शिरली.

अद्याप सूर्य उगवायचा होता. त्यामुळे अंधाराचं साम्राज्य सभोवताल होतं. थंडगार वारा सुटला होता. झाडाच्या पानांची सळसळ सुरू होती. गाडी जशी समोर जाऊ लागली, तसे काही प्राण्यांचे आवाज ऐकायला येऊ लागले. काही पक्ष्यांचं कूजन सुरू झालं होतं. त्या नीरव शांततेत हे पक्ष्यांचं कूजन लक्ष वेधून घेत होतं. वेगवेगळ्या प्रकारचे आवाज कानावर पडायला लागताच मुलं कान टवकारून ऐकू लागली. मोठ्या मंडळींना पक्ष्यांच्या या गुंजारवात फारसा रस दिसला नाही. सर्व वडीलधारी मंडळी, वाघ कधी दिसणार या चर्चेतच गुंग होती.

सफारीची गाडी या वाटेतून त्या वाटेकडे जात जंगल भ्रमंती घडवत होती. रस्त्यात माकडांचा थवा आला तेव्हा गाडी थांबली.

'माकडांना काय बघायचं,' रवीची आई म्हणाली.

'इथे वेळ दवडला तर वाघोबाचं दर्शन घडायचं नाही.' तेजोमयीचे बाबा म्हणाले.

'काय रे बरोबर ना,' मीनाच्या आईनं गाइडला विचारलं.

तो फक्त हसला. काहीच बोलला नाही. याचा अर्थ गाइड आपल्या बाजूनं बोलतोय, असं टोळीच्या आईबाबांना वाटलं.

०००

मुलांचं लक्ष माकडांकडेच होतं. मोठ्या माकडांसमवेत खूप छोटी माकडं होती. त्यांची दंगामस्ती चालली होती. झाडाच्या फांद्यावर ती कधी सरळ तर कधी उलटी लटकायची, तर कधी एकमेकांचा पाठलाग करायची. एकमेकांवर दात विचकायची. एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारायची. झाडाच्या फांद्यांना लटकून झुलायची. लहानग्यांच्या खेळाकडे मोठी माकडं शांतपणे आणि कौतुकानं बघत होती. हे सारं दृश्य मजेशीर होतं. ते बघण्यात सर्व छोटी कंपनी गुंग झाली. माकडांचा हा खेळ आणखी काही वेळ बघत राहावा असं सर्व छोट्या कंपनीला वाटत होतं, पण आईबाबांनी गाइडला फार काळ तिथे राहू दिलं नाही. त्यामुळे मुलांचा हिरमोड झाला.

गाडी पुढे निघाली. काही क्षणांनंतर हरणांची टोळी रस्त्यावर बागडताना दिसली. सर्व बच्चे कंपनी एका सुरात, वाव! वाव! म्हणाली. हरणांना, प्राणिसंग्रहालयात सर्वांनी बघितलं होतं. प्रत्यक्ष जंगलात बघण्याची त्यांची ही पहिलीच वेळ. ती लहान-मोठी अशी २०-२५ तरी हरणं असावीत. गाडीचा आवाज ऐकून ती काही घाबरली नाहीत. त्यांनी फारसं लक्षही दिलं नाही. सर्व हरणं आपल्याच तालात त्या ठिकाणी विहरत होती. हरणाची कांती आणि त्यावरचे ठिपके मनमोहक होते. एव्हाना ऊन आलं होतं. त्यामुळे त्यांची कांती चमचम करत होती. यातच एखादा सुवर्णमृग दडलेला असावा असं रवीला वाटलं. त्यानं तसं शशीला सांगितलं. शशी आईबाबांना विचारता झाला. परंतु शशीच्या आईबाबांना या हरणाच्या

कळपात जराही रस दिसला नाही. इतरांचे आईबाबासुद्धा बघून न बघितल्यासारखे करत होते. मीनाचे बाबा गाइडला म्हणालेसुद्धा,

'अरे, हरणं बघायला आम्ही थोडच इथे आलो आहोत. वाघ दिसला तरच खरी जंगलसफारी.'

गाइड यावर काहीच बोलला नाही. फक्त हलकंसं हसला. ती बागडणारी, पळणारी हरणं बघण्यात वडीलधाऱ्यांना फारसा रस न नसल्यानं गाइडनं गाडी पुढे काढली. एव्हाना बऱ्यापैकी ऊन आलं होतं. जंगलातली बोचणारी थंडी तितकीशी जाणवत नव्हती. पक्ष्यांचा किलबिलाट वाढला होता.

०००

गाडी पुढे जात असताना गाइडनं गाडी थांबवली. सर्वांचं लक्ष एका झाडाकडं वेधलं, त्या झाडाच्या फांद्यांवर ५० पेक्षा जास्त पोपट बसले होते. जणू काही पोपटांची शाळाच भरली होती. झाडांच्या फांद्यावर झुलणारी लाल चोच आणि हिरवेकंच रंगाचे पोपट बघून छोटी मंडळी हरखून गेली. पोपटा पोपटा बोलतोस गोड, घे ना जरा पेरूची फोड, ही कविता, मीनाला आठवली. आपण यांना पेरू देऊ या का, तिने गाइडकाकांना विचारलं. पण जंगलात गाडीच्या खाली उतरायचं नसतं, असं काकांनी सांगितलं. त्यामुळे मीना हिरमुसली. गाइडकाका म्हणाले,

'जंगलातल्या या पक्ष्यांना काही द्यायची गरज नाही. त्यांना भूक लागली की ते बरोबर त्यांना आवडणाऱ्या फळांच्या झाडांकडे जाऊन मजेत खातात.'

'जंगलातले पोपटसुद्धा बोलतात का हो?' रवीनं विचारलं.

'माणसासारखं तर बोलत नाहीत. त्यांची स्वत:ची भाषा आहे. ती त्यांनाच कळते. ते तसे बोलतात, तसेच ते गातही असावेत. आपणास त्यांची भाषा कळत नसल्यानं त्यांचं गाणं कळत नसावं.'

'आपण पोपट झालो तर?' मीना म्हणाली.

काहीतरी सळसळ झाली, त्यामुळे पोपटांची ती रांग उडाली. पन्नास पोपट पहिल्यांदाच मुलांनी एकत्र बघितले होते. धनुष्यबाणासारखा आकार करत ते उडणारे पोपट बघून मुलांनी टाळ्या वाजवल्या. वडीलधाऱ्या मंडळींना यातही फार रस दिसला नाही.

रवीच्या बाबांनी पुन्हा एकदा गाइडला विचारलं, 'अरे, हे काय दाखवत बसलास, वाघ दाखव ना.'

'हो साहेब', असं गाइड बोलला आणि त्यानं गाडी पुढे काढली. पाच मिनिटांनंतर गाडी एके ठिकाणी थांबली. रस्त्याच्या एका बाजूला चारपाच बारशिंगे उभे होते. गाडी थांबल्याबरोबर ते सावध होऊन आत झाडीत पळाले. राखाडी रंगाचे ते बारशिंगे बघून मुलांचा आनंद व्दिगुणित झाला. गाइडनं आता गाडी हळूहळू पुढे न्यायला सुरुवात केली. कारण त्याच्यामते आणखी काही बारशिंगे त्यांना दिसू शकले असते. त्याचं म्हणणं खरं ठरलं. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला आठ-दहा छोटेमोठे बारशिंगे गवत चरत होते. त्यांचं काही गाडीकडे लक्ष नव्हतं. त्यामुळे मुलांना बारशिंग्यांना अगदी जवळून बघता आलं. डौलदार बारशिंगे बघून सर्वांना आनंद झाला. बारशिंग्यावर हल्ला करण्याआधी वाघही विचार करतो अशी माहिती गाइडकाकानं मुलांना दिली.

गाडी अशीच हळूहळू समोर जात असताना एके ठिकाणी दोन रानगवे दिसले. मुलं आणि मोठी माणसं पहिल्यांदाच, धिप्पाड असे रानगवे, बघत होते. गाडीचा आवाज ऐकून त्या रानगव्यांनी गाडीकडे बघितलं. या गाडीचं आणि माणसांचं त्यांना फार अप्रूप असावं असं वाटलं नाही. एक नजर टाकताच ते पुन्हा आपल्याच तोऱ्यात गवत चरू लागले. गव्याच्या मानेवर तीक्ष्ण व टोकदार शिंगं होती. या गव्यांच्या वाटेला वाघ जात नाही. असं गाइडनं सांगितलं. वाघ जंगलाचा राजा असेल तर हे गवेसुद्धा त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात राजासारखेच वावरतात. स्वत:हून कुणाच्या वाटेला जात नाही. मात्र कुणी यांच्या वाटेला गेलं तर मग त्याची खैर नसते. अशी माहिती गाइड देत असतानाच तेजोमयीची आई त्याला म्हणाली, 'अरे बाबा, हे खरं असलं तरी आम्हास वाघोबा कधी दिसणार ते सांग ना.'

मुलांना सर्व प्राणिपक्ष्यांमध्ये आनंद मिळत होता तर मोठ्यांचं मात्र वाघोबा कधी दिसणार, कधी दिसणार, असं सारखं चाललं होतं.

तेजोमयीच्या आईला गाइड म्हणाला, 'अहो ताई, वाघोबा जसा या जंगलाचा राजा, तसाच स्वत:च्या मनाचाही राजा! त्याला वाटेल तेव्हाच तो आपल्याला दर्शन देईल ना.'

'म्हणजे काय, वाघ दिसणारच नाही का?' सीमाचे बाबा म्हणाले.

'असं मी म्हणालो नाही साहेब. वाघ जिथं जिथं येऊ शकतो, त्या ठिकाणी मी तुम्हाला नेतच आहे. कधीना कधी तो या ठिकाणी आलेला आहे. आज तो आतापर्यंत का आला नाही, हे मी कसं सांगणार?'

'म्हणजे, वाघ दिसणारच नाही का?' मीनाचे बाबा निराश होत म्हणाले.

'असे निराश होऊ नका, आता नाही दिसला तर दुपारी दिसेल.'

'दिसेल, दुपारी दिसेल,' रवी आणि सीमा हसत हसत म्हणाले.

गाडी पुढे निघाली. गाडी हळूहळू जात होती. एके ठिकाणी दोन मोर आणि तीन-चार लांडोर उभे होते. मुलांनी मोरपीस बघितलं होतं, पण मोरास पहिल्यांदाच बघत होते. मोरांना बघून सर्व मुलं हरखून गेली. एकटक त्यांच्याकडे बघत राहिली. अचानक एका मोरानं पिसारा फुलवला. पंखा हलवतो



तसा तो पिसारा हलवू लागला. ते दृश्य अतिशय मनोहारी होतं. पिसारा हलवता हलवता तो मोर, मागे पुढे करायचा. त्यामुळे तो जणू काही नाचत आहे असं वाटतं होतं. 'नाचरे मोरा, आंब्याच्या वनात नाच,' ही कवितेची ओळ रवीला आठवली. 'हे आंब्यांचं वन आहे का हो?' असं त्यानं गाइडला विचारलं.

या ठिकाणी आंबा, साग, वेळू अशी वेगवेगळी झाडं आहेत. मोर फक्त आंब्याच्याच वनात नाचतो असं नाही. तो इथे रस्त्यावर येऊनही नाचू शकतो. जंगलात वाघ दिसणं हे आपल्या हाती नसतं तसं मोर नाचताना दिसणं हेसुद्धा आपल्या हाती नसतं. आजचा दिवस चांगला म्हणून हा पिसारा फुलवलेला मोर दिसला. गाइड म्हणाला. त्या मोर आणि लांडोरीचं टोळीकडे बहुधा लक्ष गेलं असावं. त्यामुळे ते सावध होऊ झुडपात गुडूप झाले.

मोर आणि त्याच्या पिसाऱ्याचा मनुराद आनंद मुलांनी घेतला. आईबाबांनी मोर बघताना वाघाची आठवण काढली नाही. परंतु मोराच्या पिसाऱ्याऐवजी ते, वाघ कधी दिसतो, याचीच चिंता वाहत असल्याचं दिसत होतं.

'वाघाला काय एवढं आईसक्रीम लागलं असतं रे, आपल्या आईबाबांचं काहीच कळत नाही बुवा. दिसला तर दिसला नाही तर गेला उडत.' सीमाच्या कानाजवळ जाऊन रवी पुटपुटला. तिला हसू आलं. गाइडलाही ते ऐकू गेलं असावं, तोही हसला.

'जास्त शहाणपणा करू नकोस हं,' रवीची आई त्याच्याकडे डोळे मोठे करून म्हणाली.

गाडी पुढे जात असतानाच वाटेत दोन कोल्हे रस्ता पार करताना दिसले. पंचतंत्रातला धूर्त कोल्हा इंग्रजी कुत्र्यासारखा दिसत होता. त्याची नजर भेदक होती. त्याची ठेवण बुटकीशी होती. काही क्षण गाडीसमोर थांबून ते दोन्ही कोल्हे झुडपांत गुडूप झाले.

गाइडनं गाडी पुढे तीन-चार पाणवठ्यांवर नेली. या ठिकाणी पाणी पिण्यासाठी वाघ येतो. ही वाघाचं दर्शन घडणारी हक्काची जागा. पण अशा तीन-चार ठिकाणी दहा-वीस मिनिटं थांबूनही वाघोबा काही आले नाहीत.

गाडी पुढे निघाली. दुसऱ्या बाजूनं इतर पर्यटकांना घेऊन गाडी परतीला निघाली होती. यांच्या गाडीजवळ ही थांबली. गाडीतली सर्व मंडळी आंनदी दिसत होती. कारण त्यांना एका पाणवठ्यावर वाघ दिसला होता. सर्व प्रवाशी खूश होते.

'तरी, आम्ही म्हणत होतो की वेळ दवडू नका. मोर काय, हरीण काय नंतर कधीही बघता येतील, पण वाघोबा दिसणार नाही.' रवीचे बाबा वैतागून म्हणाले. इतर

आईबाबांनाही त्यास सहमती दर्शवली. ज्या ठिकाणी आज वाघानं दर्शन घडवलं होतं, त्या दिशेनं गाडी निघाली. वाघोबा आता येतील, मग येतील असे करत बराच वेळ गेला, पण वाघोबांना काही यांची दया आली नाही. आईबाबा मंडळी, वाघोबाकडे डोळे लावून बसले असताना मुलं मात्र त्या पाणवठ्यातील मगरी, त्यांच्या खरबरीत पाठीवर शांतपणे बसलेले बगळे, पाण्यातील झाडांवर गोळा झालेले आणि डोळे लावून बसलेले बगळे आणि इतर काही पक्षी यांचे निरीक्षण करत होते. त्यांचा आंनद घेत होते. अर्ध्या तासानंतर आईबाबा मंडळींना कंटाळा आला. सकाळच्या सफारीची वेळ संपत आली होती. त्यामुळे गाइडनं गाडी परतीच्या प्रवासाला घेतली.

पोपट, मोर, वानर, गवा, हरीण, बारशिंगे, मगर, बगळे असे पशुपक्षी दिसल्यानं मुलं आनंदात होती, तर वाघ दिसला नाही म्हणून आईबाबा मंडळी दु:खीकष्टी झाली होती. हे हिरमुसलेपण घेऊन सर्व जण हॉटेलमध्ये परतले. जेवण आणि थोडी विश्रांती घेऊन मंडळी दुपारच्या सफारीला निघाली.

०००

सकाळपेक्षा दुपारचं जंगल वेगळं भासत होतं. सूर्य मावळतीला लागला होता. त्यामुळे उन्हाची किरणं आता कमी प्रमाणात येत होती. थंडगार वारा अंगाला बोचू लागला होता. सकाळी दिसणारी झाडं आता थोडीशी गूढ वाटायला लागली. झाडाचं सळसळणंही थांबलं होतं. वेगळीच नीरव शांतता सर्वत्र भरून राहिली होती. सकाळपेक्षा दुसऱ्या मार्गाने गाइड गाडी नेत होता. त्यामुळे वेगळ्या प्रकारची झाडं-झुडपं-वेली बघायला मिळत होत्या. काही वेली तर अंगावर कोसळतात की काय इतक्या खाली आल्या होत्या. त्या वेलींमुळे अंगावर ओरखडे उमटू नये म्हणून वेली आल्या की खालीच वाकावं लागत असे. अशी वेगवेगळ्या प्रकारची झाडं बघण्याची मुलांची पहिलीच वेळ होती. त्यामुळे अस्ताव्यस्त पसरलेली झाडं बघून मुलांना आनंद होत होता.

वाटेत येणाऱ्या पाणथळावर गाडी थांबायची. वाघोबा येण्याची वाट बघितली जायची. पण तीन-चार पाणवठे होऊनही वाघोबा काही दिसले नाहीत. सहाच्या आत जंगलातून बाहेर पडायचं असल्यानं गाडी परतीला फिरली. अखेर वाघ दिसलाच नाही. आईबाबा मंडळी जाम निराश झाली. मुलं मात्र खुश होती. वाघ नाही तर नाही, इतर प्राणी-पक्षी-चित्र विचित्र झाडंझुडूपं बघून त्यांचा आंनद गगनात मावेनासा झाला होता.

अंधार दाटून आला होता. गाडी वेगानं निघाली. हॉटेलमध्ये मंडळी परतली, तेव्हा आईबाबांचे चेहरे पडले होते. वाघोबांनी त्यांना निराश केलं होतं. रात्रीचं जेवण झालं. थोडावेळ गप्पा मारून सर्व जण झोपी गेले.

००००

टक टक टक!

रवी आणि त्याचे आईबाबा ज्या खोलीत झोपले होते, त्या खोलीच्या दारावर कुणीतरी टक टक करत होते.

'क क कोण?' रवीचे बाबा घाबरून उठले.

'मी वाघोबा!'

'क क काय?' बाबा आणखी घाबरले.

'सकाळी आणि दुपारच्या सफारीत मी तुम्हाला भेटलो नाहीना, मग आता स्वत: आलोय दर्शन द्यायला.'

'न न न नको.' बाबांची घाबरगुंडी उडाली होती.

'अरे, का नको? मघा तर सारखा सारखा वाघोबा वाघोबा करत होतास.'

'त त त प म्हणजे भीती वाटते.' बाबा कसेबसे बोलले.

'माझी कशाची भीती वाटते?'

'न न न नाही म्हणजे हो म्हणजे...'

'आता दार उघड. बघून घे मला, जवळून. मी दिसतो कसा, माझ्या मिश्या कशा, माझे ठिपके कसे, वाघनखं कशी, जबडा कसा? सारं काही जवळून दाखवतो की तुला.'

'न न नको.'

'अरे घाबरुटल्या, जंगलाचा आनंद घ्यायला शिकाना. वाघ म्हणजेच काही जंगल नाही. जरा पोरांकडून शिका. कशी मजेत जंगल बघत होती. बघता बघता दंगली होती. दंगून रंगली होती. आनंदून गेली होती. मुलांसारखा आनंद घ्या. वाघ दिसला नाही म्हणून मुलं रडत बसली नाहीत तुमच्यासारखी...'

'हो हो बरोबर आहे...'

'चल, मग दार उघड.'

'न न नको.'

'उघड म्हणतो ना. नाहीतर दरवाजा फोडून आत शिरेन आणि...'

०००

'न न नाही नाही, वाचवा वाचवा...'

असं बाबा खूप जोरात ओरडून गादीवरून खाली पडले. त्यांच्या आरडाओरडीमुळे आई आणि रवी उठला. त्यांनी दिवा लावला. बाजूच्या खोलीतील आई-बाबा आणि मुलं धावत आली. रवीच्या बाबांना दरदरून घाम फुटला होता. रवीनं त्यांना पाणी दिलं. काय झालं ते आता सर्वांच्या लक्षात आलं होतं. बाबांना काहीतरी भयानक स्वप्न पडलं होतं.

बाबांनी मग स्वप्नात आलेल्या वाघोबाची गोष्ट सांगितली. ती ऐकून सर्व मुलं हसली. आईबाबांना त्यांची चूक उमगली. वाघोबाच्या नादात जंगलसफारीचा खरा आंनद घालवून बसल्याचं त्या सर्वांच्या लक्षात आलं.

**– सुरेश वांदिले**

ekank @hotmail.com



कथा



# सदाकोची गोष्ट

डॉ. मधुमंजिरी गटणे

ओसाकावरून हिरोशिमाला जाणाऱ्या बुलेट ट्रेनमध्ये ते सर्व ४० भारतीय प्रवासी बसले होते. ताशी २७० किलोमीटर वेगानं ती गाडी पळत होती. आतमध्ये बसलेल्या प्रवाशांच्या पोटातलं पाणीसुद्धा हलत नव्हतं. या अतिवेगवान गाड्यांचं जाळं जपानमध्ये विणलं गेल्यालाही ५० वर्षं उलटून गेलेली, इतका हा प्रगत देश! पण 'पळती झाडं' काही प्रवाशांच्या नजरेस पडत नव्हती. अधूनमधून रेल्वे रुळाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या स्वच्छ वस्त्या आणि फार उंच नसलेल्या इमारती तेवढ्या मागे पळताना गाडीतून दिसत होत्या.

एवढ्यात त्यांच्याबरोबर असलेली मियू उठून प्रत्येक प्रवाशाजवळ जायला लागली आणि प्रत्येक प्रवाशाच्या हातात तिनं एक रंगीत चौरस कागद दिला.

'कागद? कशाला दिलाय मियूने हा?' प्रत्येक जण तो उलटसुलट करून पाहताना मनाशी विचार करत होता.

मियू म्हणजे जपानमध्ये त्या भारतीय प्रवाशांना मार्गदर्शन करणारी जपानी मार्गदर्शक! आपल्या मोडक्यातोडक्या इंग्रजीतून तिने प्रवाशांना जे सांगितलं, ते मी तुम्हाला मराठीतच सांगते.

''या कागदाचे बगळे बनवा.'' ती म्हणाली.

''बगळे? कशाला?''

''आपल्याला हिरोशिमाला पोचल्यानंतर ते अर्पण करायचे आहेत.''

हिरोशिमा हे जपानमधलं अणुबॉम्बमुळे उद्ध्वस्त झालेलं शहर! दुसरं महायुद्ध संपत आलंय असं वाटत असतानाच ६ ऑगस्ट १९४५ या दिवशी अमेरिकेनं जपानच्या हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकले आणि 'लिटिल बॉय' असं नामाभिधान लाभलेल्या त्या अणुबॉम्बची विनाशक क्षमता सगळ्या जगाला जाणवली.

ते बेचिराख झालेलं शहर कसं होतं, आता कसं असेल हे पाहायची उत्सुकता प्रत्येक प्रवाशाच्या मनात होतीच. त्या जोडीला आता आणखी एक उत्सुक प्रश्न सर्वांच्या मनात घोळायला लागला– कागदाचे बगळे? कसे करायचे? कुणाला भेट द्यायचे?

मग जो तो ते बगळे करायचा प्रयत्न करायला लागला. कागदाच्या वेगवेगळ्या प्रकारे फक्त घड्या घालून, त्याला आकार देऊन प्राणी, पक्षी, वस्तूंचे विविध आकार करण्याच्या जपानच्या हस्तकलेला 'ओरिगामी' असं म्हणतात. पण जपानमध्ये नुसतं गेलं म्हणून तो ओरिगामी बगळा बनवणं जमणार होतं थोडंच? मग मियू आपल्या मुलायम आवाजात स्वतः हातात कागद घेऊन बगळे कसे बनवायचे ते प्रत्येकाला शिकवायला लागली. मग प्रत्येकाचा कसा का होईना, तो बगळा तयार होतो न होतो तोच हिरोशिमा स्थानक आलंसुद्धा.

स्थानकाबाहेर पडल्यावर 'हेच ते शहर होतं जे अणुबॉम्बने बेचिराख केलं होतं' यावर विश्वास ठेवणं कठीण जात होतं. एका अत्याधुनिक, महत्त्वाच्या ऐतिहासिक शहरात आपण आलो आहोत हे प्रत्येकाला जाणवलं. मग बसनं सर्व एका इमारतीपाशी पोचले. फक्त सांगाडा, थोड्याफार भिंती शिल्लक असलेल्या त्या तीन मजली इमारतीला कुंपण घातलं होतं आणि कुंपणात दगड विटांचा खच पडला होता. हीच होती ती 'डोम' – जपानची शस्त्रागाराची इमारत जिच्यावर अमेरिकेनं अणुबॉम्ब टाकला होता. आणि आजूबाजूचा कित्येक मैलांच्या परिघातला परिसर उद्ध्वस्त झाला. हिरोशिमा त्यावेळी कसं बेचिराख झालं, अनेक निरपराध माणसं कशी पोळून निघाली याचं करुण दर्शन घडवत प्रवाशांना त्या काळात नेणारं वस्तुसंग्रहालय त्या डोमच्या जवळच उभारलं आहे.

आणि समोरच निर्माण केलंय पीस पार्क – शांतिवन! युद्ध करून, अणुबॉम्ब आणि विनाशक अस्त्रं वापरून मानवी जीवनाची वाताहत करू नका' हा संदेश देणारं! त्या बागेतच एक कमान होती. कमानीच्या मध्यावर उंचावर एक घंटा टांगली होती. घंटेवर बगळ्याची प्रतिकृती होती. कमानीला भेट देणारे त्या घंटेच्या टोलाला बांधलेला दोर ओढून घंटा वाजवत होते.



जपानमध्ये त्याकाळी अनेक लहान मुलांना हा आजार झाल्याचं दिसून आलं. कारण अणुबॉम्ब टाकल्यावर पुढे अनेक वर्षं अणुकिरणांचा उत्सर्ग सुरूच राहिला आणि त्याचा विशेषतः वाढीच्या वयातल्या मुलांवर दुष्परिणाम झाला. या आजाराला डॉक्टरांनी 'बॉम्बचा आजार' असं नाव दिलं होतं.

सदाकोवर मग इस्पितळात उपचार सुरू झाले. ती वाचण्याची शक्यता नव्हतीच. पण तिची एक मैत्रीण हिझुको तिला भेटायला येताना काही चौरसाकार कागद घेऊन आली. ती म्हणाली, आपण जपानी लोक बगळ्याला शुभ, पवित्र पक्षी मानतो. आणि आजारी माणसानं कागदाचे हजार ओरिगामी बगळे बनवले तर तो आजारातनं बरा होतो. सदाकोच्या मनात मग आशा पालवली. तिनंही ठरवलं, आपण असे हजार बगळे करायचे आणि या आजारातनं बाहेर पडायचं. आजारामुळे सदाकोला खूप वेदना होत होत्या. शिवाय इस्पितळात कागद तरी कितीसे मिळणार? मग ती मिळेल तो कागद, अगदी औषधाच्या वेष्टनाचा कागदही यासाठी उपयोगात आणत असे. आणि तिनं हजार बगळे बनवण्याची शर्थ केली.

''मग बरी झाली ना सदाको?'' एका लहानग्यानं विचारलं.

''बॉम्बचा आजार हा इतका गंभीर आजार की त्यातनं वाचणं शक्यच नव्हतं – मियू पुढे सांगायला लागली. अनेक निरागस मुलं या आजाराची शिकार झाली. आणि मग सदाकोच्या मित्रमैत्रिणींनी, आप्तांनी ठरवलं की सदाकोचं स्मारक बनवायचं आणि जगाला सांगायचं युद्धाचे परिणाम किती भीषण असतात आणि लहान मुलांसाठी शांतता किती आवश्यक असते. म्हणून हे स्मारक उभारलं. दरवर्षी लाखो पर्यटक या स्थानाला भेट देऊन इथे ओरिगामी बगळे अर्पण करतात आणि त्या लहानग्यांची आठवण जपतात.''

सदाकोची कथा ऐकून नि:शब्द झालेल्या प्रवाशांनी ते ओरिगामी बगळे सदाकोला अर्पण करून शांततेनं तिचा निरोप घेतला.

कमानीच्या बाजूलाच काचेचं एक कपाट होतं. त्यात टांगल्या होत्या रंगीबेरंगी कागदांच्या ओरिगामी बगळ्यांच्या माळा!

तुम्ही बनवलेले बगळे आता या कपाटात आपण भेट म्हणून ठेवून द्या, मियू म्हणाली. आणि मग प्रवाशांची उत्सुकता पुढे अधिक न ताणता तिनं सांगायला सुरुवात केली, १९४५ साली दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्ब हे अस्त्र पहिल्यांदा वापरलं गेलं. त्याचे दुष्परिणाम इतके भयानक आणि दीर्घ काळापर्यंत होत राहतील याची कल्पनाही कुणी केली नव्हती. बॉम्ब टाकलेल्या परिसरातली हजारो माणसं अक्षरश: जळून गेली. थोड्या वेळानं पाऊस पडायला लागला आणि तहानेलेले लोक ते पावसाचं पाणी प्यायला लागले. मात्र प्रत्यक्षात ते पाणी नव्हतंच. ते होतं किरणोत्सर्गी पदार्थाचं रासायनिक द्रव्य. मरणाचं अक्षरश: तांडव सुरू असताना दोन वर्षांची चिमुकली सदाको सासाकी ही मुलगी मात्र त्यातनं आश्चर्यकारकरीत्या सुखरूप राहिली. तिचे पालकही वाचले. बॉम्ब पडला त्या जागेपासून दोन किलोमीटर अंतरावर ती राहत होती. आपण सुखरूप आहोत हे पाहून त्यांना आनंद झाला. सदाको पुढे शाळेत जायला लागली. सातवीत शिकत असताना बारा वर्षांच्या सदाकोनं शर्यतीत तिच्या संघाला विजय मिळवून दिला. परंतु शर्यतीनंतर तिला खूप थकल्यासारखं वाटायला लागलं. म्हणून मग तिची वैद्यकीय तपासणी केली. त्यात तिला रक्ताचा कर्करोग झाल्याचं समजलं. केवळ सदाकोच नाही तर

**– डॉ. मधुमंजिरी गटणे**
mrsgatne@yahoo.co.in



**कथा**



# नवे मित्र

**रश्मी गुजराथी**

सोनम नावाची एक मुलगी असते. शाळेतून सायकलवरून घरी येत असताना वेगाने येणाऱ्या बसचा तिला धक्का बसतो व भीषण अपघात होऊन तिच्या पायाचे ऑपरेशन करावे लागते. डॉक्टरकाका तिच्या आईबाबांना सांगतात, सोनमवर आपण योग्य ते उपचार करत आहोत ती नक्की बरी होईल. परंतु पायावर केलेली शस्त्रक्रिया फार मोठी असल्याने तिला सहा महिने तरी शाळेत जाता येणार नाही. तिला नीट बसताही येणार नाही. सहा महिने तिची फार काळजी घ्यावी लागेल. आईबाबा मनातून हादरतात. सोनमला कसे समजावावे असा त्यांना प्रश्न पडतो.

सोनम सातवीच्या वर्गात शिकणारी मुलगी असते. तिच्या सर्वच मैत्रिणी चांगल्या असतात. सोनमला घरी आणल्यावर त्या सोनमला भेटायला, तिच्याशी गप्पा मारायला तिच्या घरी येऊ लागतात. सोनमची आई त्यांना कल्पना देते आता ती सहा महिने तरी शाळेत येणार नाही. म्हणून त्या वर्गात शिकवलेल्या विषयांच्या नोटही तिला आणून देऊ लागतात. आलटूनपालटून सर्वच मैत्रिणी तिच्या घरी सुट्टीच्या दिवशीसुद्धा चक्कर मारतात. सोनमला ही तिचे आईबाबा तिच्या अपघाताबाबत सर्व कल्पना देतात व आता सहा महिने तरी शाळेत जाता येणार नाही हेही खरे सांगतात. सोनमचा अभ्यास घरच्या घरी सुरू होतो. तरीही खेळ, शाळा, क्लास सारे काही बंद. सोनमला कंटाळा येऊ लागतो. तिला वाचनाची खूप आवड असते. त्यांच्या घराच्या जवळ पुस्तकांचे ग्रंथालय असते. सोनमची आई ग्रंथालयात जाऊन ग्रंथपालांना भेटते व त्यांच्या मार्गदर्शनाने सोनमला वेगवेगळी नवनवी पुस्तके वाचायला आणून देऊ लागते. सर्वच विषयांवरील पुस्तके सोनम झपाट्याने वाचून काढते.

आपल्या व्यंगावर मात करून पुढे आलेल्या अपंग लोकांच्या, त्याचप्रमाणे शूरवीरांच्या कथा वाचून तिच्या मनात जिद्द निर्माण होते. तिचा आत्मविश्वास वाढतो ती संयमाने वेदना सहन करू लागते. आपण चांगले बरे होऊन चांगला अभ्यास करून पास होऊन पूर्वीप्रमाणे चालू शकू, खेळू शकू या आत्मविश्वासाचे बक्षीसच तिला या कथापुस्तके वाचनातून मिळते.

पुस्तक वाचनातून कधी जंगलात फिरून येते. कोकिळेची, मैनेची गाणी ऐकते तर पोपटाची शीळही ऐकते. मोराच्या सुंदर पिसाऱ्याचे वर्णन वाचून तिचे भान हरपते. पुस्तकाचा हात धरून ती नदीकिनारी जाते. समुद्रकिनारी फिरून येते. किनाऱ्यावरील शंख, शिंपले, रंगीत दगड-गोटे जमा करते. रंगीबेरंगी मासे, विविध मोती, मगर, सुसर यांसारख्या जलचर प्राण्यांची माहिती मिळवते. पुस्तकांतून तिला अक्राळविक्राळ राक्षसही भेटतो तर सुंदर पंखपरीच्या पंखांवर बसून ती जादूई नगरी फिरून येते. सुंदर चमचम करणारे कपडे घालते. विविध पक्वान्नांचा आस्वाद घेते. जादूच्या उडणाऱ्या चटईवरही बसते. नभातही फिरून येते. ती पुस्तके वाचण्यात इतकी तल्लीन होते की ती पुस्तकातील वाऱ्याच्या गाण्याच्या लहरींवरही फिरते. पुस्तकातून तिला नवीन जग दिसते. सारीच पुस्तके गुणी, ज्ञानरंजनाचा खजिना देणारी. कोणी हसवतात तर कोणी रडवतात. ती त्यातून ज्ञानामृत पिऊन घेते.

परंतु पर्यावरणरक्षणावरील पुस्तकांमधील झाडांची माहिती उपयोग वाचून तिला झाडांविषयी फारच आपुलकी वाटू लागते. झाडामुळे प्रदूषण दूर होण्यास मदत होते. शुद्ध हवा मिळते. झाडे, औषधे, फळे, फुले देतात. उन्हात सावली देतात. जमिनीची धूप थांबवतात. झाडांची मुळेही औषधी असतात. झाडांमुळे पक्ष्यांना निवारा, गारवा मिळतो, पाऊस पडण्यास मदत होते. अशा परोपकारी झाडांबरोबर तिला मैत्री करावी असे वाटू लागते.

दोन-तीन महिन्यांत तिच्या पायाच्या वेदना कमी होतात व ती थोडे थोडे अंतर धरून धरून हळूहळू चालू लागते. तिच्या खोलीजवळच मोठी गॅलरी असते. आई तिला बऱ्याच लहानमोठ्या झाडांच्या कुंड्या आणून देते. ती त्या कुंड्यांमध्ये असलेल्या झाडांना पुस्तकात वाचल्याप्रमाणे नेमाने खत, पाणी



घालून त्यांची काळजी घेऊ लागते. रोजच ती गॅलरीपर्यंत, घरातल्या घरात चालण्याचा सराव करू लागते. कुंड्यांमध्ये नवीन बिया लावते, रुजवते, रोपही वाढवते. ती वाढवताना आनंद घेते. वाऱ्याबरोबर वाऱ्याच्या झोताबरोबर कुंड्यांमधील हलणाऱ्या झाडाच्या फांद्या. पाने, फुले यांच्याशी संवाद साधू लागते. गप्पा मारू लागते. स्वतःचे मन रमवते व दुःख, वेदना विसरून जाते. हळूहळू तिला चांगले बरे वाटते. तिला उठणे, बसणे जमू लागते. ती स्वतःच्या पायांनी चालत शाळेतही जाऊ लागते.

सोनमचे आईबाबा या दुखण्यात तिची खूप काळजी घेतात. शाळेतील मैत्रिणीही तिला खूप मदत करतात व वैद्यकीय उपचारांमुळे तिला छान बरे वाटते. त्याचबरोबर तिला आपल्या व्यंगावर मात करून यश मिळवलेल्या जिद्दी माणसांची पुस्तके वाचून तिच्यात नवा आत्मविश्वास, जिद्द निर्माण होते. पुस्तकांशी तिची चांगलीच मैत्री जमलेली असते. पर्यावरणरक्षणाच्या पुस्तक वाचनातून तिची झाडांबरोबरही छान मैत्री जुळते. झाडांबरोबरची मैत्री जोपासण्यासाठी, हिरवाईचे संचित जपण्यासाठी तिची पावले आता आपोआपच मातीकडे वळली आहेत. तिने नवनवीन झाडे लावण्याचा वसाच घेतला आहे. झाडांप्रमाणे परोपकारी बनण्याचे ठरवले आहे.

त्याचप्रमाणे सोबत ज्ञानरंजनाचा खजिना असणाऱ्या पुस्तकांबरोबरसुद्धा पुस्तकांचे रोजचे नेमाने वाचन करून मैत्री जोपासण्याचा प्रयत्न करणार आहे.

सोनम आता म्हणते, या भीषण अपघातामुळे खूप वेदना झाल्या, दुःख झाले, त्रास झाला, मात्र त्याचबरोबर ज्ञानाचे भांडार असलेले पुस्तक व परोपकारी झाड यांसारखे दोन चांगले मित्रही मिळाले. ज्यांच्याबरोबरची मैत्री मी कायम टिकवणार आहे, जोपासणार आहे.

**– रश्मी गुजराथी**
gujarathi.rashmi.r@gmail.com



कथा



# जंगू आणि जीत

**मीना नाईक**

एका टेकडीवरच्या हवेलीत एक मावशीबाई राहायच्या. टेकडीच्या पायथ्याशी एक नदी होती. नदीच्या पलीकडच्या तीरावर एक गाव होतं. मावशीबाई एकट्या नव्हत्या बरं का! त्यांचे प्राणी मित्र त्यांच्याबरोबर होते. झांबी मांजर, जंगू उंदीर आणि जीत मगर.

झांबी मांजर फक्त एकच विचार करायची, जंगू उंदराला पकडायचं कसं? मावशीबाई जेव्हा जंगूसाठी खाणं ठेवायच्या, तेव्हा झांबी त्याच्यावर झडप घालायला सज्ज असायची. पण जंगू उंदराला जादू येत होती. जादूने स्वतःला तो अदृश्य करायचा. त्यामुळे झांबीला तो कधीच पकडता यायचा नाही. त्यामुळे वाट बघून बघून शेवटी झांबीला डुलकी लागायची आणि ती विसरून जायची आपण कसली वाट पाहत होतो ते.

उन्हाळ्यात गरम व्हायला लागलं, की जीत मगर टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या नदीत डुंबायला जायचा. पण मावशीबाईंनी तिथे एक सूचनाफलक लावला होता. ' सावधान येथे मगर आहे.' त्या फलकापुढे जायची जीतला परवानगी नव्हती. खरं तर जीत खूपच शांत, सौम्य होता. कुणालाही कधी त्रास न देणारी. पण मावशीबाईंना वाटायचं लोक त्याला बघून घाबरतील. जीतला मात्र वाटायचं आपण सगळ्यांकडे बघून हसलो तर त्यांना कळेलच की आपण अजिबात त्रासदायक नाही. उलट खूप गरीब आहोत. कधी कधी डुंबता डुंबता जीत डोकं बाहेर काढून हळूच बघायचा कुणी आसपास आहे का. नेमकं कोणी तिथे असलं तर जीतला बघून 'वाचवा वाचवा' म्हणून पळून जायचे. जीतला खूप वाईट वाटायचं.

या सगळ्या प्राण्यांचा मावशीबाईंवर खूप जीव होता. मावशीबाई तरुणपणात नेहमी दूरदेशी फिरायच्या. घरी परतताना काहीतरी वेगळं बरोबर घेऊन यायच्या. त्यांना हौस होती. झांबी मांजर, जीत मगर हे असेच त्यांच्याबरोबर आले होते. जंगू उंदीर मात्र हवेलीत आधीपासूनच होता.

दररोज संध्याकाळचे पाच वाजले की सगळे जण दिवाणखान्यात जमायचे. चहा, बिस्किटांचा फडशा पाडायचे. दरम्यानच्या काळात काय काय घडलं ते सगळं मावशीबाईंना सांगायचे.

'आता या चहाच्या वेळेस जंगू उंदरावर झडप घालण्याचा अजिबात प्रयत्न करायचा नाही.' असं मावशीबाईनं झांबीला बजावलं होतं. पण जंगूला झोंबीबद्दल खात्री नव्हती. तो स्वतःला अदृश्य करूनच तिथे यायचा. मावशीबाई बिस्किटाचा तुकडा जंगूसाठी त्याच्या रशीच्या बास्केटजवळ ठेवायच्या आणि एका झटक्यात तो नाहीसा व्हायचा.

मे महिन्यातल्या एका दुपारी सगळे चहासाठी बसले असताना बास्केटमधून एक बारीकसा आवाज आला. सगळ्यांना आश्चर्य वाटलं. जंगू उंदीर वास्तविक खूप लाजाळू. कधी फारसं बोलंत नसे. तर तो म्हणाला, पुढचे ३० दिवस ३० रात्री खूप पाऊस कोसळणार. माझ्या शेपटीनं मला सांगितलंय. आणि ती सांगते ते नेहमी खरंच होतं. तेव्हा आपण सावध असलं पाहिजे. मावशीबाई चटकन खिडकीजवळ गेल्या. आकाशात पाहिलं तर ढग नव्हते. त्यांनी जंगूला पुन्हा विचारलं, नक्की ना रे! जंगू म्हणाला, माझी शेपटी नेहमीच खरं सांगते.

मावशीबाई म्हणाल्या, हे वादळ केव्हा येणारे कोण जाणे. आपण सगळी तयारी ठेवली पाहिजे. मेणबत्त्या, खाण्याच्या वस्तू आणि हो, बरीचशी पुस्तकं. जीतनं लाकडाचे ओंडके जमवून ठेवले. मावशीबाईंनी पुरेसे खाद्यपदार्थ, मेणबत्त्या आहेत की नाही पाहिलं.

झांबीनं मात्र आपल्या वाटणीची बिस्किटं खाल्ली आणि शांतपणे झोपून गेली. दुसऱ्या दिवशी सकाळीच पावसाला सुरुवात झाली. दुपारपर्यंत पावसाचा जोर वाढला. मावशीबाई पुस्तकातल्या गोष्टी मोठमोठ्यानं वाचू लागल्या. अधूनमधून खिडकीबाहेर डोकावून पाऊस पाहत होत्या. बघता बघता मध्यरात्र झाली. अचानक मावशीबाई उठल्या आणि जंगूला म्हणाल्या, काय रे जंगू! नदीपलीकडच्या गावातल्या लोकांना

माहीत आहे का, ३० दिवस ३० रात्री हा असा पाऊस कोसळणार आहे म्हणून? नदीला पूर आला तर सगळं गाव पाण्यात बुडेल. जंगू म्हणाला, अं हं. फक्त आपल्यालाच माहितीये. दुसऱ्या दिवशी सकाळी मावशीबाईंनी ठरवलं, पूर येणार असल्याचं आपण त्या गावातल्या लोकांना कळवलं पाहिजे. त्यांनी भराभरा कपडे बदलले आणि त्या घराबाहेर पडल्या. पण, 'बापरे किती हा चिखल' असं म्हणत परत फिरल्या. मावशीबाई तुम्ही ना पत्र लिहा. मी नेऊन देते हवं तर. झांबी म्हणाली.

असं म्हणतेस. बरं तर आपण महापौरांना पत्र लिहू या. मावशीबाईंनी पत्र लिहिलं. माननीय महापौरसाहेब, सांगायला वाईट वाटतं पण पुढचे ३० दिवस ३० रात्र भरपूर पाऊस कोसळणार आहे. त्यामुळे नदीला पूर येऊन गावात पाणी येऊ शकतं. तरी ते कसं थोपवता येईल याचा विचार करावा.

कळावे,

आपली शेजारीण टेकडीवरच्या मावशीबाई.

झांबीनं पत्र घेतलं आणि पावसात बाहेर पडली. पण तत्काळ ती परत आली. म्हणाली, पूल पाण्याखाली गेलाय. त्यामुळे मला पलीकडे जाताच येत नाही.

तर मग मी जातो. मला कुठल्याही पाण्यात पोहता येतं. जीत म्हणाला.

बाबा काळजी घे. मावशीबाई म्हणाल्या. त्यांनी पत्राची घडी केली आणि जीतच्या तोंडात ठेवली. जीत चिखलातून सुर्रकन सरळ नदीतच गेला. डोकं वर काढून पोहत होता, पत्र भिजू नये म्हणून काळजी घेत होता. पण नदीला खूप जोर होता. पाण्याचा लोंढा अंगावर येत होता. जीतला पोहायला खूप कष्ट पडत होते. एकदा त्याला वाटलं नदी पार करून जायला आपल्याला जमेल की नाही. भीतीनं तो थरथरायला लागला. पण त्यानं पोहणं थांबवलं नाही. आणि एकदाचा पलीकडच्या तीरावर पोहोचला. पण गाव कुठे दिसेना. गावापर्यंत पोहोचायला बरंच चालावं लागणार होतं. जीतला तर चालायची सवय नव्हती. पोहून पोहून थकलेला जीत तरीही चालत राहिला. हळूहळू त्याला गाव दिसायला लागलं. रस्त्यावरून छत्री घेऊन एक गृहस्थ चालले होते. जीत त्यांच्याजवळ गेला आणि आदबीनं त्यानं विचारलं, महापौरसाहेब कुठे राहतात हो? जीतला बघून त्या गृहस्थानं छत्री तिथेच फेकली आणि थरथरत जीव घेऊन पळत सुटला. जीतला वाईट वाटलं. तेवढ्यात त्याला एक बाई दिसल्या. जीतनं त्यांना पाहून स्मित केलं. आणि पुढे विचारणार तेवढ्यात बाईंनी छत्री टाकून एका दुकानात पळ काढला. रस्त्यावरची सगळी माणसं जीतला बघून सैरावैरा धावत होती. रस्त्यावर शेवटी एकटा जीतच राहिला. थकूनभागून तो एका फूटपाथवर बसला. त्याला रडू कोसळलं.



इतक्यात तिथे एक छोटा मुलगा आला. त्यानं जीतला रडताना पाहिलं. त्यानं विचारलं, काय झालं रे? जीत म्हणाला, मला हे पत्र महापौरसाहेबांना द्यायचंय. तुला माहितीये का ते कुठे राहतात ते? मुलगा म्हणाला, हो. या रस्त्याच्या टोकालाच तर ते राहतात. जीत म्हणाला, तू पोहोचवशील का हे पत्र त्यांच्यापर्यंत?

हो. पोचवेन की. असं म्हणून त्यानं जीतच्या तोंडात हात घालून पत्र घेतलं. जीत म्हणाला, खूप खूप आभारी आहे. पण विसरू नकोस हं. नक्की दे. मुलगा म्हणाला, बिलकूल विसरणार नाही. बरं. अच्छा.

इकडे मावशीबाई काळजीनं येरझारा घालत होत्या. जंगूला म्हणाल्या, रात्र होत आली, अजून जीत आला नाही. कुठे गेला असेल हा. पण जंगू काहीच बोलला नाही. झांबी म्हणाली, मला भूक लागलीय. जेवू या.' जेवून मस्तपैकी झांबी निमुटपणे झोपी गेली. मावशीबाई अस्वस्थपणे वाट पाहत बसल्या. त्यांना झोप येईना. मध्यरात्री परत एकदा त्यांनी जंगुला विचारलं, जीत सुरक्षित असेल ना रे!

मला वाटतं, आहे. जंगू झोपेतच उत्तरला. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत पाऊस कोसळतच होता. मावशीबाई गेल्या गच्चीवर. त्यांनी दुर्बिणीतून पाहिलं. त्यांना फक्त पाऊसच दिसला. पण नंतर काही जण रेतीच्या पिशव्या रचून त्याची भिंत तयार करताना दिसले. अच्छा! म्हणजे महापौरांपर्यंत पत्र पोहोचलेलं दिसतंय. पण जीत! तो कुठाय? दुर्बिणीतूनच त्या शोधत होत्या. पण जीत काही दिसेना. दुपारच्या जेवणाची वेळ झाली. झोंबी गेली गच्चीवर मावशीबाईंना जेवणाची आठवण करायला. मावशीबाई दुर्बिणीतून टेहेळणी करतच होत्या. त्यांना रेतीच्या पोत्यांची भिंत वाढलेली दिसली. पण नदीचे पाणीही वाढलेलं होतं. बापरे, आता भिंत वाढणार की नदीचे पाणी वाढणार! त्यांना प्रश्न पडला. संध्याकाळी पाचच्या सुमारास काळोख दाटून आला. चहाची वेळ झाली म्हणून सगळ्यांना बोलावणार इतक्यात मावशीबाईंना दरवाजाजवळ काहीतरी खुडबुड ऐकू आली. म्हणून धावत जाऊन त्यानी दरवाजा उघडला तर दारात जीत चिखलानं माखलेला, थकलेला, भुकेला. घरात आल्याबरोबर त्याला शिंका, पडसं आणि हुडहुडी भरली. मावशीबाईंनी ताबडतोब त्याला पुसून काढलं. गरम गरम चहा दिला. खायला दिलं आणि पांघरूण घालून झोपवलं. जीत आजारी पडला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मावशीबाई गच्चीवरून दुर्बिणीत पाहायला गेल्या. नदीचा पूर काही ओसरला नव्हता. मोठ्या मोठ्या लाटा रेतीच्या पोत्यांच्या भिंतीवर आपटत होत्या. पण ही भिंत एवढी अभेद्य होती की लाटा आपटून परत जात होत्या. मावशीबाईंना हायसं वाटलं. गाव सुरक्षित होतं. त्या जीतला ही बातमी सांगायला आल्या. जीत बिचारा सर्दीपडशानं बेजार होता. मावशीबाईंनी त्याच्या कपाळाला हात लावला तर ते चांगलंच तापलं होतं. अरे देवा! आता काय करू? इतक्यात तिथे झांबी आली, जीतची चौकशी करायला. वास्तविक ती आली होती जंगूवर झडप घालायला. पण तिला तो कुठे दिसलाच नाही. त्या रात्री मावशीबाई जीतच्या उशाशी बसून होत्या. शेवटी न राहवून जंगूला विचारायला गेल्या, जंगु, बाबा या जीतचं काय करायचं! अर्धवट झोपेत जंगू पुटपुटला, आपल्या जेवणाच्या टेबलावर बघा. मावशीबाईनी टेबलावर पाहिलं तर 'जीतसाठी' असं लिहिलेलं एक छोटं बिस्कीट तिथे होतं. मावशीबाईंनी ते घेतलं आणि धावत जाऊन जीतला भरवलं. आणि काय आश्चर्य. ते खाल्ल्याबरोबर जीत हसला. मावशीबाईंना खूप बरं वाटलं. दुसऱ्या दिवशी पाऊस पडतच होता. पण जीतला आता खूप बरं वाटायला लागलं होतं. सकाळच्या नाश्त्यानंतर झांबी आणि जीत थोडावेळ खेळलेसुद्धा. मावशीबाईंची दुर्बिणीतून टेहेळणी चालूच होती. गाव सुरक्षित होतं. त्या पाहत होत्या. पाऊस कोसळतच होता. खाद्यपदार्थ संपत आले होते.

एक दिवस त्या सकाळी उठल्या, तर त्यांना काहीतरी वेगळंच वाटायला लागलं. सगळीकडे खूप शांत शांत होतं. मग लक्षात आलं, अरे पाऊस थांबलाय. नदीचा पूर ओसरलाय. गावातल्या लोकांनी रेतीची पोती काढून टाकली आहेत. नदीवर एक नवीन पूल बांधायला घेतलाय. तो महाभयंकर पाऊस, तो पूर सगळं विस्मरणात गेलंय.

एका दुपारी मावशीबाईंच्या कानावर छान सूर पडले. त्यांनी जाऊन दरवाजा उघडला, तर दारात साक्षात महापौर आणि सारे गावकरी जमले होते. महापौरांनी भाषण द्यायला सुरुवात केली. मावशीबाई, तुम्ही आम्हाला विसरला नाहीत. तुम्ही आमच्यासाठी जे काही केलं त्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोत. त्यासाठी हे रुप्याचे पदक आम्ही आपणास देऊ इच्छितो.

हे जीतला द्या, असं म्हणून मावशीबाईंनी पदक जीतच्या गळ्यात घातलं. त्या पावसाळी रात्री जीतनं नदीतून पोहत जाऊन काय साहस केलं ते सर्वांना सांगितलं. जीतच्या हुशारीचं सर्वांनी खूप कौतुक केलं. आणि सगळे आपल्या गावाला परत गेले. मावशीबाईंनी पदक निरखून पाहिलं आणि म्हणाल्या, वा! किती छान आहे पदक! त्यात काय एवढं झांबी म्हणाली. जीतनं स्वतःला आरशात पाहिलं. पदक बघून त्याला मनापासून आनंद झाला. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहिले. रश्शीच्या बास्केटमधून जंगूसुद्धा खुदूखुदू हसला.

**– मीना नाईक**

meenanaik.51@gmail.com



अनुवादित कथा



# भुरी मांजर (कङ कङ)

अनुवाद – प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर

एक होती न्यू न्यू.
न्यू न्यूला चित्र काढण्याचा नाद होता.
न्यू न्यू चित्रविचित्र चित्र काढत असे.
तर एके दिवशी तिनं चित्र काढलं आणि प्रदर्शनात मांडलं.
तिनं चित्र काढलं एका भुऱ्या रंगाच्या मांजरीचं.
लोक म्हणाले, ‘वाह वा! चित्र सुंदर आहे’
मित्र म्हणाले, ‘वाह वा, चित्र सुंदर आहे.’
लोकांचं खरं होतं, मित्रांचंही खरंच होतं
भुऱ्या रंगाची मांजरी एकदम सजीव आणि सुंदर दिसत होती.
असं वाटे की चटकन जावं आणि पटकन मांजरीला उचलून घ्यावं.

भुऱ्या रंगाच्या मांजरीला लक्षात आलं, ती तर सुंदर आहे.
ती जर सुंदर आहे तर मग चित्रात बसून राहण्यात काय फायदा?
नाही का?
इथे केवळ प्रदर्शन पाहायला आलेले लोकच मला पाहू शकतात.
माझं सौंदर्य सर्वांनी पाहायला हवं!
मला इथून बाहेर पडायला हवं, नाही का?

एके दिवशी प्रदर्शनाला होती सुट्टी.
भुऱ्या मांजरीला सापडली सोन्यासारखी संधी.
ती आली चित्रातून बाहेर
आणि फिरू लागली इकडे तिकडे.
जगाला यावं कळून, मांजरीला वाटलं
तिच्यासारखी मांजरी नाही चोहीकडे.

ती बाहेर आली खिडकी उघडून
आणि तिला भेटला एक उंदीर.
तिला पाहताच उंदीर लागला इकडेतिकडे पळू.
उंदराला कळेना समोर जाऊ की मागे वळू?
भुऱ्या मांजरीने त्याच्याकडे पाहिले तुच्छतेनं, म्हणाली–
भित्र्या उंदरा, दूर हो माझ्या नजरेपुढून
मी आहे जगातील सर्वात सुंदर मांजर!
माझ्याइतकं जगात कुणीच नाही सुंदर!
तू गल्लीच्छ, घाणेरडा प्राणी
मी टापटीप, सुंदर माझी राहणी.

उंदराला आला थोडा धीर, त्यानं डोळे फाडून पाहिलं तिच्याकडे
त्याला वाटलं टळलं संकट, तो थोडा जवळ गेला मांजरीच्या
मग आलं त्याला कळून
अरे का जायचं पळून?
ही आहे चित्रातील मांजर, दिसायला सजीव आणि सुंदर

उंदीर म्हणाला मांजरीच्या कानाजवळ जाऊन
तू सुंदर आणि मी नशीबवान
तुला मी पाहू शकलो हीच माझी शान
मनातल्या मनात उंदीर म्हणाला, या गर्विष्ठ मांजरीचं गर्वहरण केलं पाहिजे
लक्षात राहील अशी अद्दल भुऱ्या मांजरीला घडवली पाहिजे.

जा बाहेर
फिर जग
मोरसुद्धा तुझ्यापुढे
टिकणार नाही मग!
तुलाच तुलाच
बघतील सारे
तुझं गाणं
गातील वारे !!

उंदराचे शब्द ऐकून मांजर अजून खुशीत आली
मी महान! मी महान !! ती स्वत:लाच सांगू लागली.
'आता लवकरच मी निघणार जगप्रवासाला
चल पळ इथून, तुझ्या मित्रांना सांग, मला भेटण्याला.'

उंदराला आले लक्षात ही संधी आहे नामी
जीव वाचला याबद्दल आपण सांगू कहाणी
तो झाला फुर्रर्र
पळाला सुर्रर्र

भुरी मांजर बसून राहिली
दोन्ही पाय जवळ घेऊन एकदम ताठ
आता येतील उंदीर
आणि मांडतील तिच्यापुढे जेवणाचे ताट

खूप खूप वेळ झाला तरी एकही उंदीर फिरकला नाही
ती स्वत:शी म्हणाली, ते तर गलीच्छ भित्रे उंदीर आणि मला भूकही नाही

मांजरी आली बागेत, तिथे सर्वत्र फुलांचे ताटवे
त्यांच्याकडे पाहून मांजरी म्हणाली, मी सुंदर, मीच सुंदर!
तेव्हा एक मंजुळ आवाज आला ऐकू
तिनं वळून पाहिलं आणि दिसलं एक फुलपाखरू.
'तू कुठे जात आहेस?' त्यानं फुलांवर बागडत बागडत विचारलं.
मांजरी म्हणाली, 'मी तुझ्याच शोधात निघाले आहे.
सगळेच म्हणतात की मी फार सुंदर आहे
माझ्याकडे पाहून सांग, लोकांच्या म्हणण्यात काही तथ्य आहे?
मी जगातील सुंदर मांजरी, मी सुंदर! मीच सुंदर!

फुलपाखरू म्हणालं, 'तू सुंदर हे खरं
पण तुझं रूप खोटं खोटं
मी जन्मलो निसर्गाच्या कुशीत
आणि तुला निर्माण केलं चित्रकारानं स्वत:च्या खुशीत.'

मांजरी म्हणाली, 'तू तर अगदीच उद्धट आहेस
मोठ्यांशी कसं बोलतात, तुला जरादेखील ठाऊक नाही
मी तुझ्यापेक्षा अधिक सुंदर,
तू चित्रकाराच्या रंगांची चर्चा करण्याचं कारणच नाही'
मांजरीनं फुलपाखराकडे फिरवली पाठ
आणि तडक निघाली समोर होऊन ताठ

चालता चालता ती पोहचली शेतात
शेतात होतं गव्हाचं पीक
जवळ होतं जंगल दाट
त्याच्यापलीकडे होते डोंगर
धुक्यात ते दिसत अधिकच सुंदर
मांजरीनं दुर्लक्ष केलं सर्वांकडे
आणि म्हणाली, मी सुंदर! मीच सुंदर!!


नंतर तिला लागलं एक तळं
तिथे उमललेली होती कमळं
पण भुरी मांजरी तर स्वत:तच होती बुडालेली
तिला तळ्यात दिसली केवळ तिचीच सुंदर सावली

छपाक!
अचानक तळ्यात पडला एक बारीक खडा
पाण्यावर उठले तरंग
आणि मांजरीच्या प्रतीबिंबाचे वाजले तीन तेरा

मांजरीनं दचकून पाहिलं इकडे तिकडे
मांजरीनं दचकून पाहिलं खाली वर
तेव्हा तिला दिसला भरतपक्षी बसलेला फांदीवर
पक्षी म्हणाला, 'तू तिथे अशी ताठ मानेनं कशासाठी बसली आहेस?'
मांजरीला आला राग, तिला वाटलं घ्यावी झेप आणि घ्यावा पक्ष्याचा घास.
पण विचार होता जरी सोपा तरी कृती अवघड

म्हणून ती म्हणाली, 'मी सामान्य मांजर नाही. मी प्रदर्शनातील सुंदर मांजर आहे.
माझ्याइतकं सुंदर कुणीच नाही
तू नाही आणि तुमचा अमरपक्षीदेखील नाही.
मी सुंदर! मीच सुंदर!'

पक्षी म्हणाला, 'अगं, अशी उगी वेडी होऊ नको,
तुझी सुंदरता डोक्यात जाऊ देऊ नको
चित्रकार नसता
तर तूसुद्ध नसतीस
कागद-ब्रश नसता
तर तूसुद्धा नसतीस
इतरांमुळे तू आहेस
हे कधी विसरू नकोस
तुझा गर्व असा डोक्यात जाऊ देऊ नकोस.'



भरतपक्षी पुढे बोलणारच होता
तेवढ्यात मांजरीनं घेतली झेप
नेम चुकला, पक्षी उडाला
तो जाऊन बसला कमळाच्या पानावर थेट

भुरी मांजरी ईर्ष्येला पेटली, तिनं उडी मारण्यासाठी जसा पाण्यात पाय ठेवला
पंजावरचे रंग गेले विरघळून आणि कागदही झाला ओला,
पाण्यामध्ये एकेक रंग तरंगत गेला
आणि भुऱ्या मांजरीचा चक्क एक पाय फिक्कट झाला

भुरी मांजर लंगडत लंगडत जवळच्या गवतात गेली
आणि तिथे लोळत लोळत आपला पाय वाळवू लागली
'हा पक्षी माझ्या सुंदरतेची ईर्ष्या करतो', ती स्वत:शीच म्हणाली
'मी आहेच खूप सुंदर, त्यात माझा कुठे आहे दोष?
मी आहेच सुंदर. मी सुंदर! मीच सुंदर!'

उन्हात मांजरीचा पाय थोडा बरा झाला
म्हणून ती पुढे निघाली
तेव्हा तिला मधमाश्यांचा थवा दिसला
तो रस्त्याशेजारी फुलांफुलांवर गाणी म्हणत उडत होता
'तुम्ही काय करत आहात?' मांजरीनं त्यांना विचारलं
'आम्ही काम करत आहोत, काम! काम! काम!' एका मधमाशीनं उत्तर दिलं.

भुऱ्या मांजरीला तिचं बोलणं कळालं नाही
'मी तर कुठलंच काम करत नाही
दिवसभर बसून असते
येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडे टक लावून बघत राहाते
तरी प्रदर्शनात माझं किती किती कौतुक होतं
तुम्ही कशासाठी काम करता, त्यानं काय साध्य होतं?'

मधमाशी म्हणाली, 'काम न करता खाणार काय?
लेकराबाळांना देणार काय?
तू अगदी कामचुकार दिसतेस
इकडेतिकडे भटकत असतेस
अग, जरा लाज
थोडी नीट वाग

तुझ्या सुंदरतेचं श्रेय तुला नाही
ते न्यू न्यूला आहे
तिनंच ब्रश, कागद, रंग आणले
आणि तुला चित्रित केलं.'

मधमाशीचं बोलणं संपता संपता
भुऱ्या मांजरीनं तिच्याकडे झेप घेतली
'मला नको तुमचा उपदेश
नको तुमचे सांगणं
मला ठाऊक मी सुंदर
माझंच योग्य आहे वागणं.'

'या सर्वांना माझ्यासारखे सुंदर रंग नाहीत
म्हणून ते अफवा पसरवतात'
मांजरीनं स्वत:च्या शरीराला दिला जोराचा झटका
ती रंगावर ओरडत म्हणाली,
'दूर व्हा माझ्यापासून
तुमच्याशिवायही मी सुंदर असेन जगात अवघ्या'

तिच्या रंगांचे ओघळ जमिनीवर पडले.
काही रंग इथे काही तिथे उडाले
निराश होऊन रंग म्हणाले –
'तू आमच्यावर का राग काढत आहेस?
आम्ही तुझं काय बिघडवलं?
नंतर तुझंच तुला वाईट वाटेल
तेव्हा वेळ गेलेली असेल.'
मांजरी म्हणाली,
'मला आणि वाईट वाटणार?.... स्वप्न पाहा!
चला निघा इथून.... नजरेपुढून दूर व्हा!'

रंग निघून जाताच मांजर भुरी राहिली नाही
ती झाली एकदम शुभ्र
तिनं विचार केला, झालं ते छान झालं
आता कुणी रंगाविषयी अफवा पसरवणार नाही
आता माझं सौंदर्य नाकारण्याचं एकही कारण नाही.
ती मग अजूनच फुगली
आणि सर्वत्र भटकत राहिली.
मी सुंदर! मीच सुंदर!' ती स्वत:शीच म्हणत राहिली.

मांजरीची खोड मोडू
तिला योग्य धडा शिकवू
फुलपाखरानं निश्चय केला
भारतपक्षी म्हणाला, खोड मोडू

मधमाश्या म्हणाल्या, धडा शिकवू
सर्वांनी एकत्र येऊ, मांजरीचं गर्वहरण करू
तिला कष्टाचा पाठ पढवू.

मांजर फिरत फिरत तिकडेच आली
आणि त्यांना पाहून ओरडत म्हणाली
'आता बोला! खरं सांगा!
आहे की नाही, मी सुंदर?
तुमच्या सर्वांपेक्षा सुंदर!'

भारतापक्षी म्हणाला, 'रंगाशिवाय तू फिरू शकतेस पण कागदाशिवाय नाही.
हा कागद इतरांच्या परिश्रमातून आला आहे.'
त्याचं बोलणं ऐकताच मांजरीचा पारा चढला,
'निघून जा, दूर हो' ती कागदावर ओरडली.
बिच्चारा कागद, तो तरी काय करणार?
खाली मान घालून तो निघून गेला.

आता मांजरीजवळ केवळ रेषा होत्या. न्यू न्यूनं रेखाटलेल्या
तिथे रंग नव्हते
कागदही नव्हता
तरी तिचा गर्व काही कमी झाला नाही
ती म्हणाली, 'बघा माझ्याकडे
मी तर अजूनही सुंदर आहे. सर्वात सुंदर.
आहे की नाही?'

तेव्हा खोडकर मधमाशी पुढे येऊन म्हणाली,
'अग बाई, पण या रेषा तर न्यू न्यूच्या आहेत.
हो की नाही?'

मांजरीला तेव्हा तर खूप खूप राग आला
ती जोरजोरात ओरडून म्हणाली,
'ए रेषांनो, जा निघून.'

आणि मांजरीनं हे शब्द उच्चारताच गंमत झाली
तिच्या खांद्याची रेषा मिटताच मांजरीचा खांदा गायब झाला.
मांजरीच्या लक्षात आलं, रागारागात नक्की मोठी गडबड झाली
तिला खूप भीती वाटली
ती म्हणाली – म्याऊ म्याऊ
'माझ्या रेषा गेल्या तर मी जगणारच नाही'
म्याऊ म्याऊ
तिला असं भ्यालेलं पाहून सगळे प्राणी हसू लागले.

तेव्हा मधमाशी म्हणाली, 'हसू नका
आपलं काय ठरलं होतं.
मांजरीचा गर्व संपवायचा
तिला वास्तवाची जाणीव करून द्यायची
तिला श्रमाचा पाठ शिकवायचा.
सांग बाई मांजरी
तुझं काय म्हणणं आहे?'
मांजरीनं आपली मान खाली घातली
'आता मला समजलं
कष्टाला पर्याय नाही
श्रमासारखे सुंदर जगात दुसरं नाही.
जिथे मेहनत आहे तिथेच यश आहे.'
ती म्हणाली

'हं आता कसं?'
सगळे एकत्र म्हणाले.
मांजरीला तिची चूक कळून आली
म्हणून सर्वांनी निरनिराळ्या दिशेला जाऊन
कागद आणि रंग शोधून आणले.


आता भुरी मांजर पुन्हा पहिल्यासारखी सुंदर झाली.

ती पुन्हा प्रदर्शनातील फ्रेममध्ये परतून आली.
ती सुरुवातीप्रमाणेच आताही सजीव आणि सुंदर आहे.
प्रत्येक व्यक्ती तिच्याजवळ थांबते आणि तिच्या सौंदर्याची
प्रशंसा करते
पण जेव्हा कुणी तिच्या सौंदर्याचं कौतुंक करू लागतं
भुरी मांजर स्वत:ला समजावून सांगते
'गर्व करावं असं माझ्याकडे स्वत:चं काही नाही
खरं यश अविरत परीश्रामातून साध्य होत असतं.'

(मुलांसाठी लिहिलेल्या या कथेच्या मूळ लेखिका कङ कङ या आहेत. १९८० साली चीन सरकारच्या पेकिंग येथील विदेश मंत्रालयाच्या वतीनं ही कथा पुस्तकरूपात प्रकाशित करण्यात आली. सदरील कथेच्या प्रस्तुत मराठी अनुवादाचे हक्क खुले आहेत. हा अनुवाद वापरासाठी अनुवादकाच्या परवानगीची आवश्यकता नाही. अनुवादकाचे नाव वगळून अथवा बदलूनही तो वाचकांपर्यंत पोहचवता येईल. मराठी मुलांपर्यंत जगभरातील उत्तमोत्तम गोष्टी पोहचाव्यात, मुलांना श्रेष्ठ जागतिक बालसाहित्याचा परिचय व्हावा एवढीच या अनुवादामागील भूमिका आहे. डॉ. पृथ्वीराज तौर हे नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक आहेत.)

**– प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर**
drprithvirajtaur@gmail.com

ग्रंथाली




**मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.**

## सुरेश वांदिले यांची दोन पुस्तके

▪

**धम्माल, चित्तथरारक
आणि
अंतर्मुख
करणाऱ्या कथा**

▪




**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**












# योग्य शिशुआहार- दामदुपटीची बालविकास पॉलिसी

अरुंधती कुलकर्णी-जोशी

मागच्या आठवड्यात किराणा सामान घ्यायला गेले असताना एक विलक्षण मनोहारी दृश्य दिसले. एक ६-७ वर्षांची चिमुरडी, ड्रॅगन फ्रूट हवे म्हणून हट्ट करत होती. मुलगी स्वतःहून फळे मागते आहे म्हणून तिचे वडील खूश होऊन म्हणतील, 'हव्वे ते देतो, ग सोने' असे मला खात्रीने वाटले. पण झाले भलतेच! वडील डाफरले, 'उगीच काहीतरी नवीन दिसले की घेतेस आणि मग नाही आवडले तर सगळे वाया जाते. किती महाग आहे महितीये का हे फळ? त्यापेक्षा नेहमीचे वेफर्स घे, नाहीतर तुझे ते चॉकलेट उचल आणि चल आता पटकन'. मी घरी आले तरी झाल्या प्रसंगाबद्दलची माझी चीड कमी होत नव्हती. काय म्हणावे ह्या नतद्रष्टपणाला? मी स्वतः आहारतज्ज्ञ असल्याने मुलांच्या खाण्यापिण्याच्या तक्रारीने ग्रस्त पालक रोज बघते. औषधांचा डोस जसा लिहून देता येतो तसा आहाराचा 'डोस' असता तर किती बरे झाले असते. वजनाची बँक असती तर वाटेल तेव्हा जास्तीचे वजन त्यामध्ये ठेवता आले असते आणि गरजेला स्वतः किंवा इतरांसाठी काढून सहज वापरता आले असते.




आजच्या एआयच्या जगात दिवंगत गायकांच्या आवाजात नवीन गाणी गाऊन घेता येण्याइतपत आपली प्रगती (की अधोगती?) झालेली असली तरी आपण कष्ट न करता फिट राहण्याची किमया अजूनतरी साध्य झालेली नाही. त्यामुळे चांगल्या आहारसवयींचे बाळकडू मुलांना योग्य वयात देण्याशिवाय सध्यातरी गत्यंतर नाही. मुलांच्या भवितव्याचा विचार करून, पै पै साठवून एखादा विमा उतरवायला आपल्याला कोणी वेगळे सांगावे लागत नाही. त्याचप्रमाणे निरोगी आयुष्यासाठी लागणारे फूड स्किल्स मुलांना देणे ही त्यांची आयुष्यभराची स्वास्थ्यपुंजी ठरेल. आहारशास्त्र आता इतके प्रगत झाले आहे की कोणत्या टप्प्यावर काय आणि किती खाल्ल्यावर अंगी लागेल हे नक्की माहीत झाले आहे. आहारतज्ज्ञांबद्दलची माहिती आणि त्यांची संख्या वाढल्याने आजच्या काळात वैयक्तिक पोषणसल्ला मिळवणे तसे सोपे झाले आहे. इंटरनेटच्या जाळ्यात नुसते 'डाएट' असे शोधले तर कैक अब्ज 'हिट्स' मिळतात. पण ह्यामधील कोणते सल्ले खरे व शास्त्रशुद्ध आहेत हे ताडणे म्हणजे चिकाटीचे काम आहे. आहाराविषयी काही उत्तम संदर्भपुस्तके आपल्याकडे उपलब्ध आहेत.

डॉ. कमला सोहोनी, डॉ. मालती कारवरकर यांच्यासारख्या विदूषींची पुस्तके प्रत्येकाने आपल्याजवळ बाळगावीत व त्याचे वाचन, मनन, चिंतन आणि आचरण करावे इतकी उत्तम आहेत. २०१५ मध्ये नीलंजना सिंग यांचे लहान मुलांच्या आहाराबद्दल एक उत्कृष्ट इंग्रजी पुस्तक आले, 'अवर किड इट्स एवरीथिंग. अतिशय सोपी भाषा आणि उत्तम उदाहरणांच्या आधाराने केलेली मीमांसा ही ह्या पुस्तकाची बलस्थाने आहेत. मराठीत हे पुस्तक वाचले जावे असे मनापासून वाटल्यामुळे मी त्याचा अनुवाद करून 'आमची मुले सगळं खातात' हे विश्वकर्मा प्रकाशनच्या मार्फत प्रकाशित केले.

आपण जन्माला येतो तेच मुळी ९ महिन्याची पुंजी घेऊन. गर्भारपणात सकस आहार घेतला गेला असेल तर बाळाची सुरुवात बळकट आरोग्याने होते व जडणघडणीचे पुढचे टप्पे व्यवस्थित गतीने पार होतात.

‘आमची मुले सगळंऽऽऽ खातात’, यामध्ये मुलांच्या आहाराच्या अगदी पहिल्या घासापासून कशी सुरुवात करावी ह्याचे विस्तृत स्पष्टीकरण आहे. ह्या पुस्तकाचा मूळ गाभा एका महत्त्वाच्या दृष्टिकोनावर रचलेला आहे. लेखिकेचे म्हणणे आहे की पालकांनी स्वतः ‘व्हिक्टीम’-बळी किंवा पिडलेले असल्याची मानसिकता सोडून, जबाबदारीची भूमिका उचलावी. म्हणजे ‘माझे मूल माझे ऐकतच नाही, अमुक नाही दिले तर रडून गोंधळ घालते किंवा मूल हट्टी आहे, त्याच्या आवडीचे नसेल तर अजिबात जेवत नाही’ ह्या मनोवृततीतून बाहेर पडून ‘माझे मूल माझे आहे, त्याला जशी चांगल्यावाईट बाबींची ओळख मी करून दिली तशीच आता चांगल्या वाईटाची पारख करून देणे सुद्धा माझीच जबाबदारी आहे’ असा विचार करायला शिका. मूल जितके लहान तितके चांगल्या सवयी लावणे सोपे. त्यामुळे अगदी उष्टावणापासून सुरू झालेला खाद्यप्रवास जितका विविध नैसर्गिक रंग आणि चवींनी समृद्ध करता येईल तितका करा. मुलांना बाजारात घेऊन जा आणि धान्य, भाज्या, फळांच्या मनोहारी जगताची ओळख करून द्या. ऋतुमानानुसार आपल्या देशात जितकी भाज्यांची व फळांची विविधता आहे तितकी जगात शोधून सापडणार नाही. ह्यामध्ये कधीतरी मुलांना कोणतीतरी चव आवडेल वा कधी अजिबात आवडणार नाहीत. पण म्हणून त्यांचेही शोधकार्य थांबू देऊ नका. दहा रुपयांचे वेफर्सचे पॅक निःसंशय संपणार असले तरी त्यामधून तुमच्या बाळाच्या पोटात कोणता कचरा हमखासपणे जातोय ह्याचे भान ठेवा. फळांचा तुकडा चावून थुंकून टाकला तरी त्या फळाचा रस पोटात गेलेला असतो, शिवाय मुलाला नवीन चव, फळाचा पोत, वास इत्यादी महत्त्वाच्या ओळखी झालेल्या असतात. बालपणीच अनुभव घेण्याची सवय, हिंमत आणि मुभा मिळाली तर मुले सर्वांगीण दृष्टीने सशक्त बनतात.

‘आमची मुले सगळं खातात’मध्ये बाजारात मिळणारे ‘हेल्थी फूड’ कसे पारखून घ्यावे ह्याबद्दल सविस्तर चर्चा वाचायला मिळते. भारतात फूड लेबल म्हणावी तशी स्पष्ट नाहीत व त्यावर योग्य तो नियामक अंकुश नाही. त्यामुळे ग्राहकांची पॅकबंद प्रॉडक्टबाबतची जागरूकता अतिशय महत्त्वाची ठरते. फक्त लेबलवर ‘हेल्थी’ लिहिल्याने काय ते खरेच तसे असते? धावपळीच्या आयुष्यात रेडिमेड पदार्थ सोयीचे आहेत खरे; पण ते हेल्थी का आहेत, कसे आहे, त्यामध्ये कोणती पोषणमूल्ये, किती प्रमाणात आहेत, ही पोषणमूल्ये आत्ताच्या घडीला तुम्हाला गरजेची आहेत का हे सगळे जाणून घेतल्याशिवाय त्यांना आहाराचा भाग करून घेऊ नका. ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या लेबलमुळे एका नावाजलेल्या ‘स्पोर्ट्स ड्रिंक’च्या कंपनीला कोर्टाने चांगलाच चाप बसवल्याची ताजी घटना तुम्हाला माहीत असेल. दुर्दैवाने ही काही एकटीदुकटी घटना नाही. आपल्या देशात हे व अशा पद्धतीचे अनेक चुकीचे संदेश बाजारातील पदार्थांवर बिनदिक्कत छापलेले दिसतात. कुठे ‘रियल फ्रूट’च्या नावाखाली साखरेचे पाणी सापडते तर कुठे पॅक बंद, प्रिझर्व्हेटिव्ह असलेले ‘फ्रेश’ पदार्थ राजरोसपणे आपल्यासमोर नाचवले जातात. कोर्टाच्या ह्या आशादायक निर्णयामुळे आणि ह्या घटनेने वेधलेल्या लक्षामुळे फूड लेबलविषयी जागरूकता वाढेल ह्यात शंका नाही.

सकस आहार नेहमीच कंटाळवाणा, अळणी आणि कडक शिस्तीचाच असतो असे तुम्हाला वाटले तर ते साफ चुकीचे आहे! पुस्तकामधे लेखिकेने पदार्थ बनवताना/ वाढताना करायच्या काही अतिशय कल्पक युक्त्या सांगितल्या आहेत ज्यामुळे मुलांना मजेदार आणि ट्रेंडी गोष्टी खाल्ल्याचा आनंद नक्की मिळेल. पदार्थ ऑर्डर करताना छोटेसे बदल करून किती मोठा फायदा मिळू शकतो ह्याची अनेक उदाहरणे पुस्तकात दिलेली आहेत. पिझ्झा मागवताना थिन क्रस्ट मागवा, बर्गरची पॅटी राजमा, काळ्या वाटाण्याची बनवा, पेयांमधून मिळणाऱ्या अतिरिक्त कॅलरीपासून कसे सावध राहायचे, जेवतांना कोणत्या सवयी कटाक्षाने पाळाव्यात इथपासून थेट अन्नाची निगा कशी राखावी, कोणत्या धातूची भांडी वापरावी इथपर्यंतची माहिती तुम्हाला मिळेल. आदर्श आहाराचे नियोजन कसे करावे तसेच मुलांना आवडतील अशा विविध प्रकरच्या पौष्टिक पाककृती तुम्हाला ह्यामध्ये सापडतील. मुलांचे भविष्य सुखकर करायचे असेल तर उत्तम सवयींची शिस्त लावण्यात पालक म्हणून अजिबात घाबरून जाऊ नका. तुमच्या स्वतःच्या सवयी सुधारायची गरज असेल तर तेही निःसंकोचपणे मान्य करा आणि मुलांसोबत स्वतःदेखील चांगल्या आहाराची मजा लुटा. तुमचे अनुकरण तुमची मुले कळत-नकळत करत असतात. त्यामुळे आयुष्यातील ज्या ‘लाइफ स्किल’ त्यांनी शिकाव्यात असे तुम्हाला वाटत असेल त्या आधी तुम्ही करून दाखवा. दिवसातील ७० टक्के जेवण पौष्टिक असेल तरी तब्येतीत आणि रोगप्रतिकारक शक्तीत प्रचंड सुधारणा होईल ही काळ्या दगडावरची रेघ. उत्तम फूड स्किलचे बीज तुम्ही मुलांमध्ये पेरले तर कोणत्याही दामदुपटीच्या पॉलिसीपेक्षा आरोग्याचा उत्तम परतावा काही वर्षांतच तुम्हाला मिळेल हे वेगळे सांगणे न लगे!

https://www.amazon.in/mchi-Sagala-Khatat-Neelanjana-Singh/dp/B0798Q68PJ

**– अरुंधती कुलकर्णी–जोशी**
रजिस्टर्ड डाएटीशियन (भारत, यू. के. व कॅनडा)
j_arundhati_1@hotmail.com
सध्या वास्तव्य – टोरोन्टो, कॅनडा



**नाटिका**



# पुस्तके का वाचायची असतात?

**शरद काळे**

सुनील, सुनीत, प्रतिभा, विद्या आणि सुलभा हे आठव्या इयत्तेतील विद्यार्थी आपापसात चर्चा करत आहेत. त्यांचे परीक्षांचे निकाल जाहीर होऊन सर्व जण उत्तम गुणांनी पास झाल्यामुळे आनंदात आहेत. सुट्टीत काय काय करायचे, यासंबंधी त्यांची चर्चा रंगात येऊ लागली आहे.

सुनील – ''दीड महिन्याची सुट्टी उद्यापासून सुरू होणार! मज्जाच मज्जा आहे ना! सुट्टीत आम्ही काही दिवस मामाच्या गावी जाणार आहोत. मग काही दिवस बाबांनी आणि आईनं म्हैसूर-बंगलोरला जायचा बेत आखला आहे.''

प्रतिभा – ''वा वा! (गाणे म्हणू लागते) झुकू झुकू झुकू झुकू आगीनगाडी। धुरांच्या रेषा हवेत काढी, पळती झाडे पाहूया, मामाच्या गावाला जाऊ या. सर्वजण तिच्या स्वरांत स्वर मिळवतात.''

विद्या – ''खरंच, आता आगीनगाडीचा जमाना संपला तरी गाण्याची गोडी काही कमी झालेली नाही. हे गाणं लागलं किंवा लावलं तर आपल्या बाबतीतही तसं घडावं असं वाटू लागतं.''

सुनीत – ''हो ना. अगदी खरं आहे विद्या तू म्हणतेस ते. आम्हीपण काही दिवस काझीरंगाला जाणार आहोत. जायला चाळीस तासांपेक्षा थोडा अधिकच वेळ लागतो, पण ट्रेनचा प्रवास पूर्वीइतका खडतर राहिलेला नाही असं बाबा म्हणत होते.''

सुनील – ''हो ना, आता कोळशाची इंजिन तर इतिहासजमा झाली आहेत. कुठेतरी संग्रहालयात पाहायला मिळतं. डिझेल आणि विद्युतशक्तीवर चालणारी इंजिनेच आता सर्वत्र दिसतात. प्रवासही पूर्वीपेक्षा आता खूप जलद झाला आहे.''

सुलभा – ''आम्ही एक आठवडा सिंगापूरला जाणार आहोत! मी तर वाट पाहात आहे त्या दिवसाची! सिंगापूरच्या शिस्तबद्ध समाजाविषयी खूप काही ऐकलं आहे, शिवाय अतिशय स्वच्छ आणि सुंदर शहर आहे, असंही म्हणतात.''

विद्या – ''सिंगापूरला तुम्ही आगगाडीनं जाणार आहात?'' (सर्व जण हसतात.)

सुलभा – ''मग तिथे पोहोचण्यासाठीच आठ दिवस जातील!'' (पुन्हा सर्व जण हसतात.)

तेवढ्यात प्रदीपसर आणि वीणामॅडम प्रवेश करतात.

सर्व मुले – ''नमस्ते प्रदीप सर, नमस्ते वीणा मॅडम.''

प्रदीपसर – ''काय मुलांनो, कसले एवढे हास्याचे फवारे उडताहेत? सुट्टी लागणार म्हटल्याबरोबर कसे चेहरे पालटले आहेत मुलांचे, पाहा ना वीणामॅडम!''

वीणामॅडम – ''का नाही त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पालटणार बर सर? दीड महिना शाळेची कटकट नाही, झोपायला भरपूर मिळेल, गृहपाठ नाही, परीक्षा नाही! व्हिडीओ गेम आणि विविध वाहिन्यांवरील मालिका पाहायला मिळतात. शिवाय कुठेतरी फॅमिली ट्रिप असतेच! खायचीप्यायचीही चंगळ असते. मग का नाही बरे आनंद वाटणार मुलांना?''

सुलभा – ''तसंच काही नाही वीणामॅडम! पण थोडंफार तसं असतं खरं. पण खरं सांगू, सुट्टीचा काहीतरी सदुपयोग करावा असे मला नेहमी वाटते, पण काय करावे ते सुचतच नाही. आणि सुट्टी संपून जाते! या वर्षी मला त्यात बदल करायचाच आहे, वीणामॅडम. तुम्ही सांगा ना आम्ही काय करावे?''

वीणामॅडम – ''तू असा विचार करत आहेस, तेच कौतुकास्पद आहे. हल्लीची पिढी असले प्रश्न विचारत नाही, असाच आमचा अनुभव आहे. हो की नाही प्रदीपसर?''

प्रदीपसर – ''हो ना, तसं आहे खरं! पण ही बॅच थोडी वेगळी आहे. आणि सुलभाचा प्रश्न ते वेगळेपण दर्शवतो.''

सुनीत – ''प्रदीपसर, या सुट्टीत मी पोहायला शिकणार आहे.''

सुलभा – ''सर, मीपण शिवणकाम शिकणार आहे. हल्ली फॅशन डिझाइनच्या जमान्यात तशी मशिनपण उपलब्ध आहेत. आणि

मला फॅशन डिझाइन करायला आवडतं.''

विद्या – ''मीपण रोबोटिक्स क्लास लावणार आहे वीणामॅडम.''

प्रतिभा – ''मलाही आई नेहमी म्हणते, तुझा आवाज खूप गोड आहे, पण गाणं शिकलीस तर त्याचा उपयोग होईल. म्हणून मी आता गाणं शिकणार आहे.''

प्रदीपसर – ''अरे वा वा! पाहिलंत वीणामॅडम, मुलांनी काहीतरी ठरवलं आहे. आज मी आणि वीणामॅडम मुद्दाम तुमच्याशी याच विषयावर बोलण्यास आलो आहोत. तुमच्या हे लक्षात येतंय का तुम्ही ठरवलेल्या गोष्टी करूनदेखील तुमच्याकडे सुट्टीत भरपूर वेळ असणार आहे. तो तुम्ही कसा वापरणार आहात?''

प्रतिभा – ''खूप वेळ आहे असं वाटतं, सर! पण सुट्टी संपल्यावर वेळ कसा निघून गेला हे लक्षातदेखील येत नाही.''

वीणामॅडम (हसून) – ''खरंय तुझं प्रतिभा. पण तुम्ही सुट्टीत तुमच्या घरच्या मंडळींशी बोलून शाळेला जो रोज वेळ देता, तेवढा वेळ दिवसातून नक्कीच काढू शकता. तुम्ही कधी पुस्तकं वाचता का?''

सुनीत – ''वीणामॅडम, पुस्तकं वाचायला मला आवडतच नाही. एक तर पटापट वाचता येत नाही, आणि वाचलं तर बऱ्याच शब्दांचे अर्थही समजत नाहीत. मग कशासाठी पुस्तक वाचायचं?''

सुनील – ''मी कधीतरी एखादं इंग्रजी पुस्तक वाचतो. पण सुनीत म्हणतो ते खरंच आहे. बऱ्याच वेळा लेखक काय म्हणतो ते समजतच नाही.''

प्रदीपसर – ''अरे, तेच तर तुम्हाला आम्ही आज सांगणार आहोत. पुस्तकं आपल्या गुरूचं काम करत असतात. आणि मुख्य म्हणजे ती आमच्यासारखी रागावत किंवा ओरडत नाहीत तुमच्यावर!'' (सर्व जण हसतात.)

विद्या – ''खरंय सर, तसा विचार कधी केला नव्हता. पण मलाही पुस्तकं वाचायचा खूप कंटाळा येतो. मोबाइल फोनवरच्या इंटरनेटवरून किंवा संगणकातून पाहिजे ते माहिती मिळते की, मग पुस्तकं वाचण्याची गरज काय?''

प्रदीपसर – ''मुलांनो, पुस्तकं वाचण्याचे अनेक फायदे आहेत. तुम्ही विचार केला तर तुमच्यापण लक्षात येतील ते फायदे. चला, मीच सुरुवात करतो. पुस्तकं वाचल्यामुळे आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. पुस्तके तुम्हाला नवीन कल्पना, वेगळे दृष्टिकोन आणि विविध माहिती तर देतातच, त्याशिवाय महत्त्वाचं म्हणजे वाचनामुळे जगाविषयी आणि जगण्याविषयी तुमचं आकलन वाढतं, त्याचा फायदा तुम्हाला भावी आयुष्यात खूप चांगला होतो. हो की नाही?''

विद्या – ''हो सर, हे पटलं.''

वीणामॅडम – ''आताच हा सुनीत म्हणाला की पुस्तक वाचताना बऱ्याच शब्दांचे अर्थ लागत नाहीत आणि पटापट वाचता येत नाही म्हणून, हो ना? भाषेचं ज्ञान वाढवण्याचं कार्य पुस्तकं करतात. पुस्तक वाचताना शब्दसंग्रह वाढतो व त्या अनुषंगानं शब्दज्ञान वाढतं. नियमित वाचन भाषाकौशल्यंदेखील वाढवतं, त्यामुळे संभाषणकला वाढते व प्रभावी बनते. तुमचा शब्दसंग्रह समृद्ध होतो आणि त्यामुळे संवादक्षमता सुधारते.

सुलभा – ''सर आणि मॅडम, तुमच्या बोलण्यातून हे मात्र नक्की जाणवतं. किती छान छान शब्दप्रयोग करता तुम्ही. वर्गात शिकताना ऐकत राहावंसं वाटतं. बरेच शब्द कळत नाहीत, पण ऐकायला मात्र सुंदर असतात.''

वीणामॅडम – ''अरे, मग विचारायचं नाही का जेव्हा शब्द अडतात तेव्हा? प्रदीपसर तर दर आठवड्याला एक नवं पुस्तक वाचतात. मलाही वाचनाची आवड आहे, आणि वेळ मिळाला की वाचन करत असते. तुम्हाला माहीत आहे का, प्रदीपसर तर शब्दकोश घेऊन पुस्तकं वाचतात!''

सुनील – ''अरे वा, हे छान. आमच्या घरातही वेगवेगळ्या डिक्शनऱ्या आहेत. मी आता त्या उघडून ठेवतो व पुस्तक वाचायला घेतो. सर, मी या सुट्टीत तसा प्रयत्न नक्की करणार आहे.''

वीणामॅडम – ''पुस्तकं वाचल्यामुळे आकलनशक्ती वाढते. रहस्यकथा, काल्पनिक कथा आणि विज्ञानकथा वाचताना आपल्या विचारशक्तीला व कल्पनाशक्तीला उत्तेजन मिळतं. एखाद्या समस्येवर गंभीरतेनं विचार करण्याची सवय होते, त्याचा उपयोग रोजच्या जीवनात नक्कीच होतो. त्यामुळे समस्या सोडवण्यास मदत तर होतेच, शिवाय आपली सर्जनशीलता वाढीस लागते. मुलांनो, यातले कोणते शब्द तुम्हाला कळले नाहीत सांगा बरं?'' (सर्व जण हसतात).

सुनील – ''वीणामॅडम, किती छान बोलता तुम्ही, ऐकत राहावंसं वाटतं. पुस्तकं वाचण्याचे हे फायदे कधी लक्षातच आले नाहीत.''

वीणामॅडम – ''उगीच हरभऱ्याच्या झाडावर चढवू नकोस सुनील मला!'' (सर्व जण पुन्हा हसतात).

सुनीत – ''पण तो म्हणतो ते बरोबर आहे वीणामॅडम!''

प्रदीपसर – ''पुस्तकं मनावरचे ताणतणाव कमी करण्यास मदत करतात. एखाद्या चांगल्या पुस्तकात स्वतःला गुंतवून घेणं हा एक अतिशय हृद्य असा अनुभव असतो. हा विश्रांतीचाही एक प्रकार असू शकतो. त्याचा मानसिक आरोग्यावर खूपच सकारात्मक असा परिणाम होतो. आपल्या मनाची संवेदनशीलताही वाढते. आपल्या मनातील करुणा ही भावना वाढीस लागते.''

सुलभा – ''वा वा प्रदीपसर. तुम्हीही किती छान सांगत आहात. सर, ही संवेदनशीलता वाढल्यानं आपल्या मनातील



सहसंवेदना पण वाढीस लागते, हो ना? नकळत आपण त्या पुस्तकातील पात्रांच्या व्यक्तित्वाशी समरस होण्याचा प्रयत्न करतो. त्यातूनच आपल्याला न दिसलेले मार्गही सापडू शकतात. सर, 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक वाचताना मला हे खूप जाणवलं होतं.

वीणामॅडम – ''काय सुंदर बोललीस सुलभा तू! तुमच्यातील हेच सुप्त गुण जागे करण्याचं काम पुस्तकं करतात. या सुट्टीत सुलभानं उल्लेख केलेल्या 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाचं वाचन जरूर करा मुलांनो तुम्ही. वाचताना तुम्ही नकळत कार्व्हरांच्या पुस्तकाशी एकरूप होता. पुस्तकात हरवून जाण्याचा हा अनुभव शब्दातीत असतो. एकदा घेऊन पाहाच!''

सुनीत – ''शुभस्य शीघ्रम! मॅडम, आजच मी ते पुस्तक मिळवतो आणि वाचायला सुरुवात करतो.''

वीणामॅडम – (आपल्या पर्समधून पुस्तक काढतात व सुनीतच्या हातात देतात, सर्वजण अवाक् होतात!). ''हे घे सुनीत पुस्तक.''

सुनीत – ''वीणामॅडम, काय बोलू मी? माझ्याकडे शब्दच नाहीत तुमचे आभार मानायला!''

वीणामॅडम – ''मग नको मानू आभार (सर्व जण हसतात.) तुझ्या भावना समजल्या मला सुनीत. हे पुस्तक वाचताना खूप वेगळं वाटतं हे खरंच. अशी अनेक पुस्तके आहेत. ती तुम्ही वाचली पाहिजेत. आता तुम्ही सांगा पाहू, पुस्तकं वाचायचे आणखी कोणते फायदे तुम्हाला दिसतात?''

सुनील – ''वीणामॅडम, पुस्तकं आपली स्मरणशक्ती वाढवतात. वाचन केल्याने तुमच्या मेंदूचा व्यायाम होतो, स्मरणशक्ती टिकून राहते आणि वीणामॅडम जसं म्हणाल्या त्याप्रमाणे आपली आकलनशक्ती वाढते.''

प्रदीपसर – ''वा वा छान. सुनील, चांगला विचार करत आहेस तू. अजून कुणी सांगेल वाचनाचे काय फायदे आहेत ते?''

प्रतिभा – ''सर, पुस्तकं आपली करमणूक करतात. वाचकांना

विविध विषयांची ओळख करून देतात आणि विविध अनुभवांचा परिचय करून देतात. प्रत्यक्ष अनुभव त्यातून आले नाहीत तरी या अनुभवांची शिदोरी तुमचं जीवन संपन्नच करणार आहे, हे लक्षात आलं सर. मनुष्यस्वभावाची यातून छान ओळख होऊ शकते. पु.लं. देशपांडे यांचं 'व्यक्ती आणि वल्ली' पुस्तक वाचताना हा अनुभव मला मिळाला आहे. जयवंत दळवींच्या 'सारे प्रवासी घडीचे' या पुस्तकातूनही तसाच अनुभव आला होता.''

प्रदीपसर – ''बघा वीणामॅडम, आपली मुलं किती सुंदर विचार करताहेत आणि ते वाचनही करत असतात. मुलांनो, मीही नेमकी हीच दोन पुस्तकं आणली आहेत तुम्हाला सुट्टीत द्यायला. आता वाचण्यासाठी तुमच्याकडे तीन पुस्तकं झाली. हो ना?''

विद्या – ''पुस्तकं वाचताना एकाग्रतेचे महत्व लक्षात येते. वाचनाकडे सतत लक्ष देणं आवश्यक असते, ज्यामुळे मन एकाग्र करण्यास मदत होते. महाभारतातील गुरू द्रोणाचार्यांच्या परीक्षेतील अर्जुनाने घेतलेला पक्ष्याच्या डाव्या डोळ्याचा लक्ष्यवेध किती महत्वाचा आहे हेही लक्षात येतं.''

वीणामॅडम – ''वा वा विद्या, सुंदर. विशेषतः इतिहासाशी संबंधित पुस्तकं वाचताना काळानुसार मानवी वर्तन कसं बदलत गेलं याचा अभ्यास करता येतो. भूतकाळातील घटनांचं परीक्षण करून, आपण त्यातील लोक त्यांच्या पद्धतीनं तसे का वागले, त्यांना कशामुळे प्रेरणा मिळत गेली, आणि त्यांच्या कृतींचा इतिहासाच्या वाटचालीवर कसा प्रभाव पडला याबद्दल बरेच काही शिकत असतो. मानवी वर्तनाची ही समज मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि राजकारणासह विविध क्षेत्रांमध्ये मौल्यवान आहे. म्हणजेच भावी आयुष्यात त्याचा अधिक उपयोग होतो. त्यासाठीच सुट्टीतील कालावधी एक गुंतवणूक असते.''

प्रदीपसर – वा वा, वीणामॅडम, आवडली ही तुमची विचारधारा. लोक पैशांची जी विविध मार्गांनी गुंतवणूक करत असतात, ती भविष्य सुरक्षित राहावं म्हणून! वाचन ही बुद्धीची आणि वेळेची गुंतवणूक आहे, असं लक्षात घेतलं तर भावी आयुष्य समृद्ध झाल्याशिवाय राहाणार नाही. इतिहासाशी संबंधित अनेक पुस्तकं प्रथितयश लेखकांनी रसाळ भाषेत लिहिली आहेत. 'श्रीमान योगी', 'राजा शिवाजी', 'स्वामी', 'छावा', 'झुंज', 'झेप' अशा अनेक सुंदर कलाकृती मराठीत उपलब्ध आहेत. शाळेच्या वाचनालयात ही पुस्तकं आहेत.''

सुनील – ''प्रदीपसर, वाचनामुळे विश्लेषणात्मक कौशल्यं वाढतात ना? साहित्यातील विश्लेषणात्मक विचार आणि आकलन क्षमता वाढते असे माझी आई नेहमी म्हणते. ती खूप वाचत असते. इतके दिवस मी तिच्याकडे फारसं लक्ष देत नव्हतो. पण आजच्या चर्चेनं माझे डोळे उघडले. या सुट्टीत मी पुस्तकं वाचण्याचा निश्चय केला आहे. तुम्ही दिलेली पुस्तकं तर वाचणार आहेच, शिवाय माझ्या घरी पुस्तकांचा खजिना आहे. आपण दर शनिवारी या कारणासाठी मुद्दाम एकत्र येऊन त्या आठवड्यात कोणतं पुस्तक वाचलं यावर चर्चा करत जाऊ.''

सुलभा – ''अतिशय सुंदर कल्पना आहे. प्रत्येक आठवड्यात आपण एकेकाच्या घरी भेटत जाऊ, म्हणजे ही चर्चा ऐकताना त्या त्या घरातील वडीलधारी मंडळींच्या अनुभवाचाही आपल्याला फायदा मिळेल. शिवाय सुट्टी संपेपर्यंत आपली कमीत कमी ५–६ तरी पुस्तकं वाचून होतील.''

वीणामॅडम – ''वाचण्याची सवय आपल्याला आजीवन शिक्षण ही संकल्पना शिकवते. वाचनातून आयुष्यभर शिकण्याची सवय लागते. त्यामुळे जिज्ञासावृत्ती आणि बौद्धिक वाढीस प्रोत्साहन मिळत राहते. मुख्य म्हणजे पुस्तकं वाचत राहिलं की आयुष्यातून कंटाळा हा शब्दच हद्दपार होतो. प्रतिभासंपन्न समाजनिर्मितीसाठी कंटाळा हा फार मोठा शत्रू आहे. हा कंटाळा सार्वजनिक स्वरूपाचा असेल तर त्याचे परिणाम देशाच्या प्रगतीवरदेखील होत असतात.''

प्रदीपसर – ''मुलांना विविध प्रकारांचा शोध घेण्यास प्रोत्साहित केल्यानं वाचनाची आवड निर्माण होण्यास आणि त्यांची क्षितिजं विस्तृत करण्यात मदत होऊ शकते. त्यांना त्यांच्या आवडी आणि वाचनक्षमतांशी जुळणारी पुस्तकं निवडू देणंदेखील महत्त्वाचं असतं. तुमच्या पालकांनाही ही जाणीव करून द्या. तुम्हां सर्वांचे पालक सुशिक्षित आहेत, ही मोठीच जमेची बाजू आहे.

वीणामॅडम – ''इतिहास हा विजय आणि अपयश या दोन्ही उदाहरणांनी भरलेला आहे. ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करून आपण भूतकाळातील चुकांमधून खूप काही शिकू शकतो आणि भविष्यात त्यांची पुनरावृत्ती टाळू शकतो.''

प्रतिभा – ''वा वा! किती सुंदर चर्चा झाली सर आणि मॅडम तुमच्यामुळे. मुख्य म्हणजे त्यातून आम्हाला सुट्टीत काय करायचं हा प्रश्नच सुटला. आता ही पुस्तकं वाचायला वेळ पुरेल का, हा नवा प्रश्न मात्र पडला आहे!'' (सर्व जण हसतात).

वीणामॅडम – ''तुम्ही तोही प्रश्न सोडवाल मुलांनो, याची खात्री आहे. सुट्टीसाठी तुम्हाला खूपखूप शुभेच्छा.''

प्रदीपसर – ''माझ्याही शुभेच्छा मुलांनो, तुम्हा सर्वांना!''

सर्व मुले – ''धन्यवाद प्रदीपसर, धन्यवाद वीणामॅडम.''

**– शरद काळे**

sharadkale@gmail.com







# ॲलिस इन वंडरलॅण्ड
# लुईस कॅरॉल
## Alice in Wonderland
## by Lewis Carroll

**राजीव श्रीखंडे**

Lewis Carroll या टोपणनावाने जगभर सुप्रसिद्ध असलेला इंग्लिश लेखक Charles Lutwidge Dodgson याचा जन्म २७ जानेवारी १८३२ रोजी डेर्सबरी (Daresbury) येथे झाला. त्याच्या आई-वडिलांच्या ११ अपत्यांपैकी तो तिसऱ्या नंबरचा. त्याचे वडील एका छोट्या चर्चचे धर्मगुरू होते. चार्ल्स ११ वर्षांचा असतानाच त्यांचे सगळे कुटुंब यॉर्कशायर परगण्यातील Living of Croft-on-Tees या स्थळी स्थलांतरित झाले. त्यांचे आरंभीचे शिक्षण घरीच झाले. लहानपणापासून त्याला लिहिण्याची प्रचंड आवड. तो लहानपणी बोलताना चाचरायचा. वयाच्या १२ व्या वर्षी तो Richmond Grammer School या उत्तर यॉर्कशायर परगण्यात असलेल्या शाळेत दाखल झाला.

सन १८४६ मध्ये चार्ल्सला रग्बी शाळेत प्रवेश मिळाला. तिथला त्याचा काळ फारसा सुखकारक नव्हता, तरी तिथे त्याची गणितातली प्रगती बघून त्याचे शिक्षक थक्क झाले. पुढे १८५० मध्ये तो मॅट्रिक्युलेट झाला. १८५२ मध्ये त्याला गणितामध्ये प्रथम वर्ग मिळाला. १८५४ मध्ये त्याने बी.ए. पदवी घेतली. त्यात तो गणितात पहिला आला. पुढे ख्राइस्ट चर्च विद्यापीठात त्याने गणित विषय शिकवायला सुरुवात केली. तिथे त्याने २६ वर्षे काढली.

लहानपणापासून तो कविता करत असे आणि कथाही लिहीत असे. यातल्या काही कविता आणि कथा सुप्रसिद्ध नियतकालिकांत प्रसिद्धही झाल्या. मार्च १८५६ मध्ये Lewis Carroll या नावाने त्याची पहिली Solitude ही कविता प्रकाशित झाली.

१८५६ मध्ये डीन हेन्री लिडेल हे ख्राइस्ट चर्च, ऑक्स्फर्ड विद्यापीठात दाखल झाले. त्यांचे कुटुंबही त्यांच्याबरोबर होते. चार्ल्सची त्यांची पत्नी लॉरिना आणि त्यांच्या तीन लहान मुली लॉरिना, एडिट आणि ॲलिस यांच्याबरोबर चांगली मैत्री झाली. चार्ल्स या तीन लहान मुलींना घेऊन नौकाविहाराला जात असे.

अशाच एका नौकाविहाराच्या वेळी ४ जुलै १८६२ रोजी चार्ल्सने एक कथा ॲलिस लीडेलला सांगितली जी त्याने रचली होती. ॲलिसला ही कथा अतिशय आवडली आणि तिने त्याला ती लिहिण्याची विनंती केली. चार्ल्सने बऱ्याच विलंबानंतर या कथेचे हस्तलिखित नोव्हेंबर १८६४ मध्ये ॲलिसला दिले. यात त्याने अनेक रेखाचित्रेही काढलेली होती.

लिडेल कुटुंबाचे मित्र आणि मार्गदर्शक जॉर्ज मॅक्डोनाल्ड यांनी हे हस्तलिखित वाचले. त्यांना आणि त्यांच्या मुलांना ते अतिशय आवडले. त्या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे चार्ल्सने ते प्रकाशित करायचा विचार केला. त्याने ते हस्तलिखित Macmillan या प्रकाशन संस्थेकडे पाठवले. त्यांनाही ते आवडले आणि अखेर अनेक सोपस्कारांनंतर हे पुस्तक Alice's Adventures in Wonderland या नावाने Lewis Carroll या नावाखाली १८६५ साली प्रकाशित झाले. या पुस्तकातील रेखाचित्रे सर जॉन टेनियल या प्रसिद्ध चित्रकाराने काढलेली होती.

या पुस्तकांच्या प्रचंड यशाने चार्ल्सचे आयुष्यच बदलून गेले. Lewis Carroll हे नाव जगभर प्रसिद्ध झाले. पुढे १८७१ मध्ये चार्ल्सने या पुस्तकाचा पुढचा Through the looking Glass and What Alice Found There हा भाग प्रसिद्ध केला. हे पुस्तक जरा गंभीर प्रकृतीचे आहे. १८७६ मध्ये चार्लसने The Hunting of The Snark ही दीर्घकविता प्रकाशित केली. Fantastical Nonsense या वाङ्मयप्रकारात या कवितेचा

समावेश होतो. पुढे १८९५ साली त्याने सिल्व्ही आणि ब्रुनो ही परीकथा दोन खंडांत प्रकाशित केली.

चार्ल्सला छायाचित्रणाचाही नाद होता आणि त्यात त्याने चांगले प्रावीण्य प्राप्त केले होते. त्याने गणितावरही जवळजवळ डझनभर पुस्तके आपल्या खऱ्या नावाने प्रसिद्ध केली. त्याचे विषय होते भूमिती, रेखीय आणि मॅट्रिक्स बीजगणित, गणिती तर्कशास्त्र इत्यादी. इतकी प्रसिद्धी आणि पैसा मिळूनही चार्ल्सने आपली प्राध्यापकी कधी सोडली नाही. तो १८८१ पर्यंत ख्राइस्ट चर्च विद्यापीठातच राहिला. तिथून निवृत्त झाल्यावर त्याचे वास्तव्य तिथेच होते. त्याच्या पुढच्या पुस्तकांना ॲलिसच्या पुस्तकांइतके यश कधी मिळाले नाही. त्याच्या शेवटच्या पुस्तकाने (Sylvie and Bruno) तर त्याची निराशाच केली. चार्ल्सचे १४ जानेवारी १८९८ रोजी त्याच्या बहिणीच्या घरी निधन झाले. गणिती असून लहान मुलांसाठी रंजककथा लिहिणारा Lewis Carroll हा मात्र जगात अजरामर झालेला आहे. ॲलिसच्या कथा आजही अत्यंत आवडीने वाचल्या जातात.

----

ॲलिसही एक छोटी मुलगी एके दिवशी दुपारी नदीकाठी जरा कंटाळलेल्या अवस्थेत बसली असताना तिला एक पांढरा ससा तिकडून लगबगीने जाताना दिसतो. त्याने कोट घातलेला असतो आणि त्याच्याकडे घड्याळ असते. तो उशीर झाला असे पुटपुटत असतो. ॲलिसला आश्चर्य वाटते आणि ती त्याच्यामागून जाते. तिथे एका बिळात तो गेला आहे हे बघून तीही त्यात शिरते आणि कित्येक फूट खाली पडते. परंतु तिला इजा होत नाही. ती एका खोलीत पडली आहे हे तिच्या लक्षात येते. या खोलीत एका टेबलावर एक किल्ली असते आणि एका छोट्या दाराची ती आहे हे तिच्या लक्षात येते. पुढे काय करावे या विचारात असतानाच तिला टेबलावर एक बाटली दिसते. त्यावर लिहिलेले असते की मला पी. त्याप्रमाणे ती त्यातले द्रव्य पिते. आश्चर्य म्हणजे त्याबरोबर ती लहान होते आणि त्या छोट्याशा दारातून पलीकडे असलेल्या उद्यानात जाते. पण गडबडीत ती ती किल्ली खोलीतच विसरते. त्या उद्यानात तिला काही केक दिसतात. त्यावर लिहिलेले असते की मला खा. ॲलिस त्यातले काही केक खाते त्याबरोबर तिचा आकार प्रचंड होतो. यामुळे तिला रडू कोसळते. तिथून जाणारा पांढरा ससा घाबरून तिकडून पळ काढतो. त्यावेळी त्याच्या हातातला पंखा आणि त्याचे दोन हातमोजे खाली पडतात. ॲलिस त्या पंख्याचा उपयोग करते आणि त्याबरोबर तिचा आकार खूप लहान होतो. ती रडल्यामुळे तिच्या अश्रूंचे तळे बनलेले असते आणि ती त्याच्यातच पडते. ती पोहू लागते. या अश्रूंच्या तळ्यात तिला कित्येक वेगवेगळे प्राणी आणि पक्षी भेटतात. ते तळ्याच्या काठावर जमा होऊन स्वतःला कोरडे करण्यासाठी शर्यत लावतात. ॲलिस त्यावेळी तिच्या मांजराबद्दल बोलते त्यामुळे ती शर्यत संपल्यावर ते सगळे प्राणी आणि पक्षी तिकडून घाबरून पळ काढतात.

पुढे ॲलिस रानात जाते. तिथे तिला एक सुरवंट, मश्रूम च्या बाजूला बसून हुक्का पिताना दिसतो. त्याच्याशी ॲलिस स्वतःच्या समस्यांबद्दल बरेच बोलते. सुरवंट तिला मश्रूमच्या साहाय्याने ती स्वतःला छोटे किंवा मोठे कसे करू शकेल त्याची






**लुईस कॅरॉल**

युक्ती सांगतो. पुढचा प्रवास करताना ॲलिस एक सरदारणीच्या घरात पोचते. तिथे तिला एक हसरे मांजर भेटते जे तिला Hatter आणि March Hare कडे कसे जायचे ते सांगते. ॲलिस त्यांना शोधण्यात यशस्वी होते पण तेव्हा ते एका चहापानाच्या समारंभात असतात. द हॅटर ॲलिसला सांगतो की त्या ठिकाणी नेहमीच संध्याकाळचे सहा वाजलेले असतात. कारण काळ हॅटरला शिक्षा देत असतो, त्याने काळाला मारण्याचा प्रयत्न केलेला असतो. जरा वैतागूनच ॲलिस समारंभातून काढता पाय घेते.

ॲलिसला पुढे एका झाडात दार दिसते. त्या दारातून ती मागच्याच उद्यानात जाते. तिथे बदामाच्या राणीचा दरबार भरलेला असतो आणि पत्त्यांचा खेळ रंगात आलेला असतो. ॲलिसही त्या खेळात भाग घेते. हे पत्ते जिवंत असतात. राणी भडक डोक्याची असते आणि सारखी कुणाकुणाची डोके उडवण्याच्या आज्ञा करत असते. त्या हसऱ्या मांजराचे नुसते डोकेच तिथे येते तेव्हा ती तशीच आज्ञा करते, पण सगळे तिला सांगतात की हे करणे अशक्य आहे. ॲलिस राणीला विनंती करते की तिने त्या सरदारणीला बंदिवासातून मुक्त करावे म्हणजे या समस्येचे निराकरण होऊ शकेल. त्याप्रमाणे सरदारणीची मुक्तता करण्यात येते. ती नीतिमत्तेच्या गोष्टी बोलू लागल्यावर राणी संतापते आणि तिला तिकडून निघून जाण्याची आज्ञा देते.



पुढे ॲलिसला ग्रेफॉन नावाचा एक प्राणी, एक खटला चालू असतो तिथे घेऊन जातो. हा खटला बदामाच्या गुलामावर असतो कारण त्याच्यावर राणीची बिस्किटे चोरल्याचा आरोप असतो. बदामाचा राजा हा खटला चालवत असतो आणि ॲलिसला आधी भेटलेले प्राणी आणि पक्षी ज्युरी असतात. हा खटला चालू असताना ॲलिसचा आकार आणि आत्मविश्वास वाढत जातो आणि खटला चालू असताना त्यातल्या अनेक तर्कविसंगत गोष्टींबद्दल ती जोरदार आक्षेप घेते. संतापून राणी ॲलिसच्या शिरच्छेदाची आज्ञा देते. ॲलिस तिला उडवून लावते आणि म्हणते की राणीचे सैन्य म्हणजे केवळ पत्तेच आहेत. पत्ते सगळे ॲलिसवर चालून जातात.

तेवढ्यात ॲलिस जागी होते. तेव्हा तिची बहीण तिच्या चेहऱ्यावर जमलेली झाडांची पाने बाजूला करत असते आणि ही कादंबरी इथेच संपते.

--

लुईस कॅरॉलने या अद्‌भुतरम्य कथेची रचना अत्यंत कल्पकतेने केलेली आहे. सशाच्या बिळात पडल्यापासून ॲलिसवर एकामागून एक जे चित्रविचित्र प्रसंग येतात या प्रसंगांची गुंफण करून लुईसने या कादंबरीचे कथानक रचलेले आहे. लहान मुलांच्या कल्पनाशक्तीची भरारी आणि सामर्थ्य ओळखूनच त्याने हे कथानक विणलेले आहे. यात सगळे प्राणी, पक्षी बोलतात आणि इथले पत्तेही जिवंतच आहेत इतकेच नव्हे तर राणीचे सगळे सैन्यच पत्त्यांचे आहे. ॲलिसच्या आकारात होणारे बदल, त्या बदलांमुळे तिला येणारे विस्मयकारक अनुभव, तिच्या अश्रूंचे होणारे तळे, लहान मुलांचे प्राण्यात रूपांतर होणे या अशा अनेक चमत्कृतींनी भरलेले हे कथानक आहे. यात कविता आहेत, गाणी आहेत, Nonsense rhymes देखील आहेत. पण यात लुईस कॅरॉलने प्रतीकांचाही अप्रतिम वापर केलेला आहे. स्वतःच्या आयुष्याला एक वेगळेच अद्‌भुत रूप देण्याचे विलक्षण काम त्याने केले आहेच,

यात व्हिक्टोरियन काळातील लहान मुलांच्या संगोपनावर गर्भित टीकाही आहे. ॲलिसला जी इतर प्राण्यांकडून (पक्षी आहेत त्यात) वागणूक मिळते ती म्हणजे त्या काळात प्रौढांकडून मुलांना जी वागणूक मिळायची त्याचेच चित्रण आहे.

लुईस कॅरॉलची कथनशैली या कथेचा अद्‌भुतरम्य वातावरणाला साजेशी अशीच आहे. त्यात सहजता आहे, अनौपचारिकता आहे, कथा रंजक करण्याची त्यात विलक्षण हातोटी आहे. ही कथा आपण वाचत नसून ती लेखक आपल्याला सांगतच आहे अशी जाणीव होत राहते. लहान मुलांसाठी अशाच कथनशैलीची आवश्यकता असते. त्यातल्या रेखाचित्रांमुळे तर या कथेला फार देखणे रूप प्राप्त झालेले आहे. या कथेत अनेक अत्यंत चमत्कारिक गोष्टी आहेत पण त्या जराही खटकत नाहीत कारण लुईस कॅरॉल या सगळ्याच गोष्टी अशा थाटात सांगतो की जणू त्या रोजच्या, नेहमीच्या घडणाऱ्या घटना आहेत. Alice in Wonderland चे अभूतपूर्व यश कदाचित यातच दडलेले आहे.

लुईस कॅरॉलच्या भाषेत शब्दांचा खेळ आहे, श्लेष आहे, उपरोध आहे, विडंबन आहे. हे सगळे लुईसने अतिशय नेमकेपणे केलेले आहे. नवीन वाचकांसाठी शब्दांचे भान निर्माण व्हावे इतकी ताकद या भाषेत आहे. या कथेत अनेक कविता आहेत, गाणीही आहेत. यांनी लुईस कॅरॉलच्या भाषेला एक वेगळीच खुमारी प्राप्त झाली आहे.

अनेक व्यक्तिरेखांनी गजबजलेली ही कथा आहे. यात ॲलिस सोडली तर सगळेच वेगळे आहेत, कारण त्यांचे जग मानवी जगापेक्षा पूर्ण वेगळे आहे, त्यातले नियमही सर्वस्वी भिन्न आहेत. यात पांढरा ससा आहे, ज्यामुळे ॲलिसची ही विलक्षण सफर घडते, यात हुक्का ओढणारा सुरवंट आहे जो ॲलिसला एक महत्त्वाचे गुपित सांगतो. यात बंदिवान असणारी सरदारीण आहे, हसरे मांजर आहे, द हॅटर आहे, द मार्च हेअर आहे ज्यांच्या चहापानाच्या समारंभामुळे ॲलिसला वेगळ्या जगाचे दर्शन घडते. यात बदामाची राणी आहे जी शीघ्रकोपी आहे आणि सतत बाकीच्यांचा शिरच्छेद करण्यासाठी उत्सुक असते. यात बदामाचा राजा आहे. बदामाचा गुलाम आहे, ग्रॅफॉन हा काल्पनिक प्राणी आहे आणि अनेक प्राणी, पक्षी आहेत ज्यांचा ॲलिसशी संबंध आहे. या सगळ्या चित्रविचित्र व्यक्तिरेखा लुईस कॅरॉलने मोजक्याच शब्दांत अतिशय सामर्थ्याने रेखाटलेल्या आहेत, या सगळ्यांना त्याने अतिशय कल्पकतेने मानवी रूप दिलेले आहे. या सर्वांशी Relate करणे सहजशक्य होते. ही लुईस कॅरॉलच्या लेखणीची कमालच म्हटली पाहिजे. असेही म्हटले जाते की त्या काळातील काही प्रमुख व्यक्तीच लुईस कॅरॉलने या प्राण्यांद्वारे, पक्ष्यांद्वारे दाखवलेल्या आहेत.

या कदंबरीतले संवादही या कथानकाच्या सगळ्या जादुई वातावरणाला साजेसे असेच आहेत. साधे, सरळ आणि तरीही अतिशय अर्थपूर्ण, बालमनाला सहज उमगणारे आणि बालकांना अनेक मोठ्या गोष्टी साध्या भाषेत सांगणारे. यात कुठेही अवडंबर नाही. कुठलाही आविर्भाव नाही. या मुलखावेगळ्या जगाची आपल्याला ओळख करून देण्यात या संवादांचा मोलाचा वाटा आहे.

Alice in Wonderland प्रसिद्ध होताक्षणीच अत्यंत लोकप्रिय झाली. अनेक प्रसिद्ध टीकाकारांनीदेखील या कादंबरीची मुक्तकंठाने स्तुती केली. जगातल्या अनेक मान्यवरांनीही या कादंबरीची वाखाणणी केली. ज्यात सुप्रसिद्ध अमेरिकन चित्रपट निर्माता Walt Disney चा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. ही कादंबरी सतत प्रकाशित होत राहिलेली आहे. आजही या कादंबरीची अफाट लोकप्रियता अबाधित आहे. या कादंबरीच्या धाटणीची असंख्य पुस्तके पुढे बालगोपाळांसाठी लिहिली गेली. या कादंबरीवर अनेक चित्रपट निघाले, रंगभूमीवरही या कादंबरीवर आधारित नाटके सादर केली गेली. ऑपेरा आणि बॅलेही आले आणि यापुढेही येतील. भा.रा. भागवत यांनी या पुस्तकाचे 'जाईची नवलकहाणी' या नावाने मराठीत भाषांतर केलेले आहे.

लुईस कॅरॉलच्या मूळ गावच्या चर्चच्या खिडक्यांवर या कादंबरीतील पात्रे कोरलेली आहेत. The Mad Hatter चहापान समारंभ इंग्लंडमध्ये एका शिल्पात कोरलेला आहे, न्यूयॉर्कच्या सेंट्रल पार्कमध्ये ॲलिसचा पुतळा उभारला गेला आहे. तसाच ऑस्ट्रेलियातील ॲडलेड या शहरातदेखील. या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या १५०व्या वर्धापनदिनी ब्रिटिश सरकारने या कादंबरीतील पात्रे असलेले पोस्टाचे स्टँप काढले.

बालवाङ्‌मयाचं संपूर्ण स्वरूप आमूलाग्र बदलण्याचे महान काम लुईस कॅरॉलने या कादंबरीद्वारा केले. उपदेशाच्या जोखडातून बालवाङ्‌मय पूर्णपणे मुक्त करणारी पिढ्यान्‌पिढ्या बालकांना तसेच प्रौढांना आपल्या जादुई जगात रममाण करणारी लुईस कॅरॉलची ही अद्‌भुतरम्य कादंबरी आता जागतिक साहित्यात एक क्लासिक म्हणून सर्वमान्य झालेली आहे.

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com






## एक गोष्ट सांगतो ऐका

एक गोष्ट सांगतो ऐका
तुम्हा सांगतो खरी
भटकायला जातो मी
उंच उंच दरी!

एक गुपित माझं बघा
तुम्हा सांगतो बरं
आभाळात चंद्रावर
माझं घर खरं!

एक गोष्ट पूर्वीच मी
तुम्हास सांगितलेली
घरामध्ये शाळा भरेल
ऑनलाइनमधली

एक गोष्ट सांगतो तुम्हा
अमिताभ भेटला पुन्हा
सिनेमात येऊन म्हणे
केलाच मोठा गुन्हा

एक गोष्ट पहिल्यांदा
आता मला कळली
बाताड्या थापाड्या म्हटलं मला
जेव्हा माझी पाठ वळली!

**– श्रीकांत पेटकर**
shrikantpetkar@yahoo.com



## स्वच्छता

इथे तिथे टाकून कचरा
करू नका हो घाण
स्वच्छ परिसर राखून
मिळवू टापटिपीचा मान!

प्लास्टिक आहे घातक हे
सत्य साऱ्यांनाच कळले
सगळे जण आता कसे
कापडी पिशवीकडे वळले!

ओला कचरा, सुका कचरा
तुम्ही वेगळा करा
कचऱ्याचा हा मंत्र
नीट ध्यानी धरा!

झाडे लावा, झाडे जगवा
मंत्र नव्या युगाचा
पशुपक्षी गुरेढोरे यांना
जीवनदान देण्याचा!

मग, हिरव्या झाडावर
येतील रंगीत फुले
आनंदाने बागडतील
शाळेमधली मुले!



घर, दार नि परिसर अपुला
करू या सारा स्वच्छ
झाड मग वाऱ्याला
मिठी मारेल गच्च!



एवढं सगळं केलं तर
नक्की काय हवं
स्वच्छ, सुंदर देशाला
मिळेल रूप नवं!

**– मोहन काळे**
kalemohanm@gmail.com

## टरबूज




ऊन वाढलं
दण दण दण
अंग शेकलं
सन् सन् सन्.

सावली धुंडू
गार गार गार
डोक्यावर
आली दुपार.

दुपारीला
लागली तहान
पाण्याची मात्र
होती वाण.

जवळ होती
टरबूजवाडी
आठवू लागल्या
लाल फोडी.



तिथं होती
एक आजी
तिनं दिली
फोड ताजी.

खाता खाता
भागली तहान
ऊनसुद्धा
झालं लहान.

आजीनं
त्याला गोंजारलं
दमलास का
विचारलं?

आजीजवळ
बसलं ऊन
टरबूज हसलं
त्याला पाहून.

**– डॉ. कैलास दौंड**
kailasdaundgmail.com

## बाळे झाली साक्षर



अंगणात आली एक
चिमणी लहान
टूण टूण नाचायची
वळवून मान

होती घरट्यात तिची
छोटी बाळे दोन
हळूच पाहायची वाकून
आले कोण कोण

मिळविण्या सगळे ज्ञान
शाळेत धाडले
धावताना त्यांनी धांदलीत
तक्ते सारे पाडले

चित्रे गुरुजींची सुरेख
हुबेहूब काढली
चेहरा पाहून गुरुजींचा
वहीच फाडली

गणिताच्या त्या धाकाने
जायची खंगून
बाईंनी शिकवता नाच
जायची रंगून

नाचता नाचता काढले
सुंदर अक्षर
बाळांना लागली गोडी
झालीच साक्षर.

**– सदानंद पुंडपाळ**
sadanandpundpal@gmail.com





## वाऱ्या वाऱ्या आंबे पाड

आंबे पिकले झाडावर
उंच उंच फांदीवर
आंब्याखाली जमली मुले
दगड मारता पोहचेना वर ।।

थंड सावलीत लागता खेळू
वारा येतो जोराचा
आंबे पडती जमिनीवर
आवाज होतो मुलांचा ।।

धावून गोळा मुले करती
पट पट आंबे गोड गोड
रंगू लागला मुलांचा खेळ
चाखता चाखता आंब्याची फोड ।।

आंब्याभोवती फेर धरून
बोलावू लागली वाऱ्याला
वाऱ्या वाऱ्या जोरात ये
खाली पाड तू आंब्याला ।।

खाली आंबे पाड तू
आंब्याच्या फांद्या हालव तू
आंबे आम्ही गोळा करू
आंब्यासाठी परत ये तू ।।

वारा ऐकतो मुलांचे
म्हणून मुलांना येते वाऱ्याची याद
गोड गोड आंबे खाता खाता
मुले देती आंब्याला धन्यवाद ।।

**– रमेश वंसकर**
onskarramesh@gmail.com



## अंकुर

पावसा पावसा तुझे
आगमन लवकर होऊ दे
वेळेत येऊन पिकांनी
रान माझं डोलू दे

पावसा पावसा तुझी
फारच वाट पाहतोय
तू येत नाहीस तर
माझा शेतकरी बाप रडतोय

हंगामाचा अंकुर अरे,
मातीतून उमलू दे
आभाळाची माया
आम्हावरी बरसू दे

कोरडी पडलीय माती
तिला तहान लागलीय
मागच्या सालात पण, कुठं
तुझ्यामुळं तहान भागलीय

म्हणून पावसा पावसा
तुझ्या सरीवर सरी येऊ दे
आमचं शेत यंदातरी
आबादानी होऊ दे

**– रवींद्र सोनवणे**
ravindrasonawane881@gmail.com





## वाटत नाही इथून जावे

जिकडे तिकडे माती पाणी
रानझऱ्यांची मंजुळ गाणी
हिरवे वैभव बघत रहावे
वाटत नाही इथून जावे

आभाळातून मेघ उतरती
पाऊसधारा झरझर झरती
पाऊस झेलत मस्त भिजावे
वाटत नाही इथून जावे

हिरवाईने नटली धरती
पिके डोलती वाऱ्यावरती
शेतशिवारी गात फिरावे
वाटत नाही इथून जावे

रानोमाळी किती पाखरे
मजेत चरती गुरेवासरे
वाटे आपण उंच उडावे
वाटत नाही इथून जावे

समोर दिसतो हिरवा डोंगर
जागोजागी सुंदर निर्झर
निसर्गास या कवेत घ्यावे
वाटत नाही इथून जावे

**– उत्तम कोळगावकर**
uttamkolgaonkar734@gmail.com



## खूप अभ्यास करते...

आकाशातून रोज रोज
जाते एक विमान
मी आपली बघत बसते
उंच करून मान!

मला खूप आवडतात
विमानाचे पंख
विमानात बसायचं म्हणून
करते नुसता शंख!

आई म्हणते, मोठी हो,
मग जा कुठेही...
विमानातून जाण्याची
बाळा, आपली ऐपत नाही..!

विमानात बसल्याचे
स्वप्न मला पडते
शिष्यवृत्ती मिळावी म्हणून
खूप अभ्यास करते...!

**– डॉ. संगीता बर्वे**
dr.sangeeta.barve@gmail.com

## जीवन



ढगात विजांची
टाळी वाजू दे,
पावसाच्या ढगाला
धारा फुटू दे

काळी काळी माती
चिंब भिजू दे
काळ्या कुपीतून
सुगंध दरवळू दे

डोंगरदरी शेती
हिरवीगार बहरू दे
गाईगुरे पक्ष्यांना
चारा मिळू दे

मोरा रे मोरा, रंगीत
पिसारा फुलू दे
इंद्रधनू सप्तरंगाची
मोरपिसं मिळू दे

शेतात पेरलेल्या
बिया रुजून येऊ दे
सगळ्यांना खायला
धान्य मिळू दे

काळ्या आईच्या पुस्तकात
मोरपंखी स्वप्न पेरू दे
या पुस्तकाच्या रूपानं
माझं जीवन फुलू दे

**– विलास सिंदगीकर**
vilassindgikar1970@gmail.com

## खोपा



खोप्यामधी खोपा
काय सांगू त्याची बात
उंच फांदीवर पाहा
कसा झुलतो झोकात.

काडी काडी वेचून
खोपा हा विणला
इवल्याशा पिलांसाठी
मऊ कापूस आणला.

असा विणला खोपा
त्यातून चंद्र दिसे.
पाहूनिया त्याला
पिलू खुदूखुदू हसे.



दूर दूर जाऊनी
आणते चिमणचारा
जोजवते पिलांना
घालून पंखांचा वारा.

खोप्यामधी फुलतो
राजाराणीचा संसार.
नाही चिंता भविष्याची
चित्ती समाधान फार.

असा खोप्यामधी खोपा
त्यात पिलं गोजिरवाणी
घेते कुशीत पिलांना
गाते अंगाईगाणी.

पिलांच्या पंखांत
येऊ दे रे बळ.
भरारी घेण्यासाठी
देवा तुझंच आभाळ.

**– डॉ. प्रतिमा जगताप**
pratima.vishwas@gmail.com



## माझी बाहुली

तिची एकच घाई
बघ ना ग आई
कशी करू हिची कट्टी
झालीय ती खूप हट्टी!

अंगावरी घालते
परकर अन् चोळी..
खायलाही मागते
सदाच पुरणपोळी..
सोबत तिला लागे
वाटी तुपाची मोठ्ठी!

बडबड करते
जणू बोलगाणी..
नाचताना म्हणते
ठेक्यामध्ये लावणी...
चल म्हणते गडावर
पोवाड्यासाठी...!


गुणगुणते नेहमी
जात्यावरची ओवी...
भूपाळी अभंगात तिची
सकाळ नवनवी
झोपण्यापूर्वी अंगाईआधी
सांग म्हणते गोष्टी!

उभारूनी गुढी सांगे
माय नसते लोकल
मराठीचा आवाज आता
झाला आहे ग्लोबल
येणार म्हणते इंग्रजी-हिंदी
आपोआप पाठी..!

छान माझी बाहुली
आवडे तिला मराठी...
गाणी नि कविता
कथा, शब्दकोडी
मैत्री करण्या पक्की
घालवीन म्हणते सुट्टी!

**– प्रभाकर साळेगावकर**

salegaonkar.prabhakar@gmail. com





## चिऊताई

चिऊताई  चिऊताई, कुठे गेली?
घर आंगणातली मज्जाच हरवली

घरअंगण झालं सुनं सुनं
कोण गाईल चिव चिव गाणं

एक घास चिऊचा देऊ कुणा
कसं मी खाऊ तुझ्याविना

हिरवं झाड पाहातं वाट
होते रात्र... होते पहाट

बागेमध्ये पक्ष्यांचा मेळा
चिऊताईशिवाय कसला सोहळा?

माणसं बेरकी करती चुका
घरट्यासाठी नाही जागा
निसर्ग हा उदार दाता

माणूस मारतो नुसत्याच बाता
चिऊताई चिऊताई माफ करा
नवीन घरट्यात या ना जरा

चला लवकर या पाहू...
चिव...चिव... गाणं मिळून गाऊ.

**– प्रा. लीला शिंदे**

lfshinde333@gmail.com

## आई केवळ झाडच असते....



आई असते एक झाड ते
खडकावरती उगवून येते
हिरवी बोली हिरवे गाणे
आनंदाने भरते येते

मातृभूमी अन् भाषेमधले
हिरवे हिरवे भान स्मरावे
संस्कृतीचे हिरवे गोंदण ते
अंगावर पांघरता यावे

ती उठल्याने पहाट होते
अवघी सृष्टी चंदन होते
दुःखालाही सजवत जाते
आयुष्याची मैफल होते

कधी झाड कधी झोका होते
वादळवारे कवेत घेते
हाती उरले शून्य जरी ते
न्यून कराया शक्ती देते

सर्वस्वाने देते जेव्हा
शून्यातूनही उसळून येते
आभाळमाया तिथे पसरते
आई केवळ झाडच असते
आई केवळ झाडाच असते...

**– प्रा. डॉ. वर्षा तोडमल**
varsha.todmal@gmail.com



## पोलिसमामा



पोलिसमामा पोलिसमामा
सांगू तुला किती
आई-बाबा दाखवतात
तुझीच की रे भीती

जेवण नाही केलं की
दम मला भरतात
थांब, तुला पोलिसमामा
धरून नेईल म्हणतात

चुकून कधी फुटते
जेव्हा माझी पाटी
तेव्हा मला दाखवतात
तुझीच की रे काठी

खोड्या कधी केल्या की
ढिंश्यऽ ढिंश्युऽ करतात
पोलिसमामा घेऊन बंदूक
पळत येईल म्हणतात

पोलिसमामा पोलिसमामा
राहतोस एकदम टाईट
खरं सांग तू एवढा
आहेस का रे वाईट?

**– माधव चुकेवाड**
madhavchukewad0@gmail.com





# काव्यकोडी

ज्योती कपिले

१) चौकोनी आकार माझा,
चारी टोकाला चार घरं
त्यात काळेपांढरे शिपाई
आणि लाल राणीची नवलाई
दोघादोघांची जोडगोळी
हरण्या-जिंकण्याची कहाणी
ओळखा कोण?

२) चौसष्ट घरांची रणभूमी
त्यात बत्तीस शिपायांची चढाई
प्यादे, घोडा, उंट, हत्ती
राजा आणि हुशार राणी
एकमेकांवर कुरघोडी
करत जातात खरोखरी
चेकमेट करण्याचा
भावनांपेक्षा डोक्याचा हा खेळ
बसवा बुवा उत्तराचा मेळ

३) मैदानावर खेळताना
एकमेकांना पकडताना
सतत जोडी करावी लागते
सांगा बरं ही कोणती
पकडापकडी असते?

४) गोल करून बसा, पोटभर हसा
एक जण फिरतो मग सगळ्यांच्या पाठी
रुमाल घेऊन चोरासारखा गुपचूप
बाकी मुलं, एकच ओळ गातात खूप
एखाद्याच्या पाठी टाकून रुमाल
पळत सुटतो तो मुलगा धूम
त्याला पकडलं रुमाल मिळालेल्या मुलानं तर बरं
नाहीतर त्यालाच रुमालचोर व्हावं लागत खरं

५) इकडे एक खांब
तिकडे एक खांब
मध्ये बसला एक गट
वेड्यात काढत बसलेल्यांना
पळत राहावं लागतं पळणाऱ्यांना
दमलं तर खैर नाही
पाठीवर धप्पा मारून उठवा
दुसऱ्या भिडूला मदतीला बोलवा



६) मैदानात खेळतात दोन गट खेळ
कधी ताकदीचा तर कधी युक्तीचा मेळ
वरचढ होऊन दुसऱ्या गटाला
एका दमात आऊट करावं लागतं
तेवढ्याच चपळाईनं खेळाच्या नावाचा जप करत
स्वत:च्या गटात परतावं लागतं.
त्याच्या गटाच्या रेषेला लागताच
योद्ध्याचा हात किंवा पाय
आऊट तर होणारच त्याला अडवणारे, काय?

७) चार भावांचं कुटुंब
एकूण संख्या बावन्न
जोकर असतात मदतीला
लहानमोठे खेळायला
खेळ म्हणून खेळाल तर
करमणूक होते भारी
पैसे लावून खेळताच
माणूस होतो जुगारी, कंगाली

८) पाच, सात, नऊ
सये आपण खेळत राहू
वर बघत खालून
उचलतात सोंगट्या
नजर आणि वेळेचं
भान हरवलं तर साईसुट्ट्या
कधी कधी खेळला जातो
मग रडीचा डाव
हा खेळ आमचा,
म्हणून मुली खातात भाव!

९) डोळ्याला बांधून रुमाल
लपाछपी खेळण्याची कमाल
अर्ध नाव भारी या खेळाचे
अहो, आहे चक्क खाण्याचे

१०) खेळ भारी हा व्यायामाचा
दोरीवर किंवा खांबावर चढण्याचा
लवचिक शरीराचा गवसतो ठेवा
मुलगा असो वा मुलगी
आता हा भेद नाही तर दोघांना मेवा

**– ज्योती कपिले**
jyotikapile@gmail.com



ललित



# पुस्तकाने बोट धरले तेव्हा...

प्रवीण दवणे

आईबाबांनी मला बोट धरून जणू एका गुप्त खजिन्यात सोडले, नि म्हणाले, आता तुला हवेय ते धन हवे तेवढे लुटत रहा. तेव्हापासून ह्या क्षणापर्यंत मी त्या खजिन्यातून बाहेरच पडलेलो नाही. एक वेगळेच जग माझी तिथे वाट पाहात होते. माझ्या नेहमीच्या जगाहून वेगळं जग! ह्या नगराला लागुनिया सुंदर ती दुसरी दुनिया! ह्या माझ्या चवथीच्या मराठीच्या पुस्तकातील ओळी मी अनुभवत होतो.

खरंच ती वेगळीच दुनिया होती. पुस्तकांची, नि तीही विविधरंगी सुंदरतेची दुनिया! पुस्तकाने माझे नि मी पुस्तकाचे बोट केव्हा धरले ते कळलेही नाही. पुस्तकाच्या कोऱ्या पानांना पहिल्या पावसानंतर मातीला येतो तसा सुगंध येत होता. त्या सुगंधानेच कवितेच्या बिया मनात अंकुरू लागल्या. शब्दांचे बरसणारे आभाळ माझ्या सोबतीला आले, नि मी त्यात भिजू लागलो. पावसात नाचण्याचा आनंद मला कवितेच्या अंगणात मिळाला. नाशिकच्या माझ्या बालपणी घराजवळच्या वाचनालयात मी शाळकरी वयातच सभासद झालो. गंमत म्हणजे ते 'शरणपूर वाचनालय' असंख्य झाडांनी वेढलेले होते. स्वप्नातले वाटावे असे कौलारू छप्पर मधुमालतीच्या वेलींनी, गुलमोहराच्या फुलांनी झाकलेले असे. शाळेला उन्हाळ्याची सुट्टी लागली की त्या वाचनालयाची मला साद येऊ लागायची. केव्हा एकदा तिथे जातोय नि माझया त्या जादुई पुस्तकनगरीत विसावतोय असे मला व्हायचे. भोवतीच्या झाडांचा अगदी वेगळाच सुगंध मला तिथे जणू ओढत घेऊन जायचा. मी तिथल्या ग्रंथालयकाकांना विचारले, 'काका, ह्या फुलांचं, त्या झाडांचं नाव काय? किती वेगळा सुगंध आहे!'


त्यांनी माझ्या पाठीवरून मायेने हात फिरवत सांगितले, 'बाळ, हा एप्रिलच्या फुलांचा सुगंध आहे.'


मला हे सर्व जरा अचंबित करणारे वाटले. माझ्या चेहऱ्यावर बहुधा त्यांना भलेथोरले प्रश्नचिन्ह दिसले असावे! पुस्तकाच्या दुनियेतील त्या पांढऱ्याशुभ्र मिश्यांच्या काकांना चेहरे वाचता येऊ लागले असावेत.

काका म्हणाले, 'अरे, ह्या झाडांना फक्त एप्रिल आणि मे ह्या महिन्यांतच बहर येतो. म्हणून ही एप्रिलची झाडं!'

त्याही वेळी वाटून गेले, अरे, आपणही एप्रिलचे झाडच आहोत की! सुट्टीत फुलणारे!

त्या अगदी वेगळ्याच सुवासाचे आणि वाचनाच्या सुरेल प्रवासाचेही छान नाते जडले; नि आता वाचनाच्या उपवनाचा एप्रिल मनात फुलू लागला. पुस्तकाने माझे बोट आता घट्ट धरले. ती सांगतील त्या बेटावर मी जाऊ लागलो. कधी ती म्हणाली, चल, कवितेच्या बेटावर चल, नि तिथे मला, 'पावसाच्या धारा येती झर झरा, झाकळले नभ सोसाट्याचा वारा' ह्या ओळी गात येणाऱ्या शांता शेळके यांनी भिजवले. तर 'कधी, टपटप पडती, अंगावरती, प्राजक्ताची फुले, भिरभिर भिरभिर त्या तालावर, गाणे अमुचे जुळे' असे म्हणत येणाऱ्या मंगेश पाडगावकरांनी नवाच ताल दिला. कधी पुस्तके म्हणत, आता धम्माल नाटके वाच. नि मग नवीनच दालन उघडले. सई परांजपे, रत्नाकर मतकरी, यांची डोळे रंगीत करणारी कितीतरी नाटके मला 'अचाट गावच्या



अफाट मावशी'कडे घेऊन गेली. नाटक प्रत्यक्ष बघावे तर आम्ही राहात होतो तिथून खूप दूर आणि घरातील गरजांसाठी आधीच अपुऱ्या असणाऱ्या वडिलांच्या पगारात ते अवघडच नाही तर अशक्य होते. मग मनाच्या रंगमंचावर 'हिमगौरी नि सात बुटके' उभे करताना, आपणही का लिहून बघू नये असे वाटू लागले.

माझे बोट घट्ट धरलेले पुस्तक म्हणाले, राजा, आता ह्या बोटात पेन धर, नि बघ शाळेच्या स्नेहसंमेलनासाठी छोटे नाटुकले लिहिता येतेय का! आणि गंमत म्हणजे सातवीत असतानाच एक नाटुकले लिहून वर्गमित्रांनी ते धमाल सादरही केले. लेखक म्हणून नाव जाहीर झाले तेव्हा वाटले, साऱ्या मित्रांच्यात मीच उंच आहे!

पुस्तकेच बोट धरून मला उंच करत होती. त्यांनीच पुढे चरित्र-आत्मचरित्रांच्या दालनात नेले. सुमती देवस्थळे ह्या लेखिकेसोबत मी टॉलस्टॉयमधील माणूस पाहिला. अल्बर्ट श्वाइटझरचा संघर्ष अनुभवला. सानेगुरुजींनी जीवनातील मांगल्य शिकवले. बोट घट्ट धरलेल्या पुस्तकांनी मग म्हटले, बेटा, प्रत्यक्ष प्रवास करशील तेव्हा करशील रे, पण आधी प्रवासवर्णन तर वाच नि मी पुस्तकदोस्ताचे ऐकले. मग, गंगाधर गाडगीळ यांनी 'सातासमुद्रापलीकडे' नेले. तर पुलंनी मला प्रवासातली 'अपूर्वाई' दाखवली. जग आपल्या घराएवढेच नाही, तर त्याही पलीकडे आहे हे पुस्तकमित्रानेच सांगितले.

पुढे सारे आयुष्य पूर्ण बदलले ते केवळ पुस्तकाने; पुस्तकाने माझे नि मी पुस्तकाचे बोट घट्ट धरले म्हणून. आजही मी तसेच ते घट्ट धरले आहे.

आणि आता तर माझे आईबाबाच पुस्तक आहेत!


**– प्रवीण दवणे**

dilkhukass@rediffmail.com

ग्रंथाली

# आरोग्याचे डोही

## डॉ. उज्ज्वला दळवी




**मूल्य ४५० रुपये**
**सवलतीत २८० रुपये**

आरोग्याची काळजी घेण्यासाठी शरीराचीही सर्वांगीण माहिती असणं आवश्यक असतं. तसंच आसपासच्या परिस्थितीचा, सद्यस्थितीत पर्यावरणाचा, कसा परिणाम होतो हेही जाणून घेणं गरजेचं असतं. ते समजावून सांगायची उपयुक्त कामगिरी डॉ. उज्ज्वला दळवी यांनी 'आरोग्याचे डोही' या ग्रंथामार्फत केली आहे. त्यासाठी त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून तर्कशुद्ध मांडणी केली आहे. अलीकडे निर्माण झालेली फॅमिली डॉक्टरांची उणीव भरून काढायला डॉ. दळवींनी लाखो नागरिकांचा फॅमिली डॉक्टर बनण्याचा उपक्रम केला आहे.

**– डॉ. बाळ फोंडके**

# स्त्रियांचे आरोग्य

## प्रा. डॉ. राजश्री दयानंद कटके




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

'स्त्रियांचे आरोग्य' या पुस्तकामध्ये मुख्यत: स्त्रियांच्या स्वास्थ्यावर विचार केंद्रित करण्यात आलेले आहेत. स्त्रियांसाठी आहार व व्यायाम, किशोरवयीन मुलींचे आरोग्य, तरुणपणीचे प्रश्न, गरोदरपणातील समस्या, स्त्रियांना होणारे आजार, रजोनिवृत्ती व स्त्रियांचे कुटुंबातील स्थान असे सहा भाग यात आहेत. वृद्धपणी स्त्रियांची रजोनिवृत्ती होते, या काळात मधुमेह, उच्च रक्तदाब, थायरॉइड, तसेच स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग आदि आजार डोके वर काढतात. कारण प्रतिकारशक्ती पण कमी झालेली असते. अशा वेळी काय काळजी घ्यावी यांचे विमोचन डॉ. राजश्री कटके यांनी या पुस्तकात केले आहे.

**– डॉ. तात्यासाहेब लहाने**



परिसंवाद



# वाचन घडवी जीवना

विद्या प्रभू

वाचनं ज्ञानदं बाल्ये तारुण्ये शीलरक्षकम् ।
वार्धक्ये दुःखहरणं हित सद्ग्रन्थवाचनम्।।

वाचनामुळे बालपणी ज्ञान मिळते, तरुणपणी व्यक्तिमत्त्व घडते, म्हातारपणी दुःख नाहीसे होते, असे वाचन सर्वांनाच हितावह असते.

ज्ञांनी माणसाला सर्वत्र मानसन्मान मिळतो. ज्ञानाची, गुरूची पुजा करणे, सन्मान करणे ही आपली परंपरा आहे. हे ज्ञान मिळवण्यासाठी आपण वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तकं वाचतो. पुस्तके वाचल्यामुळे वाचणारी व्यक्ती विवेकी होते, योग्य विचार करायला शिकते. सार-असार, बरे-वाईट याची निवड करण्याची दृष्टी प्राप्त होते आयुष्याच्या प्रवासात योग्य मार्गावर चालण्याचा, योग्य साथसंगत निवडण्याचा, आयुष्याकडे पाहण्याचा योग्य दृष्टिकोन लाभतो.

'वाचनाविना न मिळे ज्ञान
ज्ञानाविना न मिळे भान'

आपल्या आयुष्याला, विचारांना शिस्त लावण्याचे काम वाचन करते. आपल्या महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटून योग्य ती साधना करण्याचे निश्चयात्मक बळ वाचन देते. वाचनाने अनेक गुणांचा संग्रह आपल्याठायी होतो. उत्तम वाचक उत्तम लेखनही करू शकतो, त्याच्या वाणीला वजन प्राप्त होते. वाचन आपल्याला विचारांची श्रीमंती देते. आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध, बहुश्रुत करते.

या विश्वातल्या सगळ्याच बाबींचे अनुभव आपण स्वतः घेऊ शकत नाही. म्हणून इतरांचे अनुभव वाचून, विविध विषयांची माहिती/अनुभूती घेऊन, आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण अधिक चांगला माणूस म्हणून व्हावी यासाठी अखंड वाचू या.

'आनंदाचे डोही आनंद तरंग'

अशा आनंदाच्या पालखीचे भोई होऊन आपण आपल्या अवतीभोवती तो पसरवण्याचे, पोहोचवण्याचे समाजभान आपल्याला वाचनच देते.

विश्वाच्या इतिहासात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने आपली नावे कायमची कोरून ठेवली आहेत त्यांपैकी बहुतांश कर्तृत्ववान व्यक्ती या वाचनवेड्या होत्या. वाचनाने त्यांना घडवले आहे.

भारतीयांच्या भारतरत्न, ज्ञानपीठ, पद्मविभूषण, पद्मभूषण पद्मश्री अशा पुरस्कारप्राप्त श्रेष्ठांची यादी पाहिली तरी वाचनाच्या संस्कारांनी त्यांना त्यांच्या क्षेत्रात उत्तुंग यश मिळवण्याचे ध्येयाप्रत जाण्याचे आत्मभान दिले, मानसिक बळ दिले हे अधोरेखित होते.

स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्र.के. अत्रे, सानेगुरुजी, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम, जयंत नारळीकर, कुसुमाग्रज ही आणि अशी अनेक नावे डोळ्यांसमोर येतात.

या लेखात आपण अशाच विविध क्षेत्रांतील काही मान्यवरांना त्यांच्या बालपणात झालेले वाचनसंस्कार, त्यावेळची वाचनसंस्कृती. त्यांची आवडती पुस्तके व लेखक, त्या काळातील वाचनाविषयीचे वातावरण याबद्दल बोलते केले आहे.



**सुप्रिया विनोद –** सुप्रसिद्ध अभिनेत्री, लेखिका
(सुप्रिया रत्नाकर मतकरी)

यांच्या घरी, आजोळच्या घरी सर्वत्र पुस्तकांनी भरलेली कपाटे व वरच्या कप्प्यातील पुस्तके काढण्यासाठी असलेली

शिडी हे आज दुर्मिळ दिसणारे चित्र होते. एवढी पुस्तके अवतीभवती असताना मुद्दाम पुस्तके निवडून, विकत घेऊन वाचण्याची वेळ क्वचितच आली. जी पुस्तके घरी असायची ती दर्जेदारच असायची. घरातील साहित्यिक वातावरणामुळे बालपण इतर मुलांपेक्षा वेगळे होते.

हॅम सँडरसन यांच्या परिकथा, इंग्रजी नर्सरी ऱ्हाइमची सुंदर सचित्र रंगीबेरंगी, जाड पुठ्ठ्यांची महागडी पुस्तके वडील रत्नाकर मतकरी आवर्जून आणून देत. सगळा पगार त्यात खर्च झाला तरी पर्वा करत नसत. ही सारी पुस्तके आजही त्यांच्या संग्रही आहेत. वॉलडिस्नेचे सिनेमे पाहात मोठे होताना त्याही नाटकांमधून कामे करू लागल्या होत्या. कुमार, किशोर, चांदोबा ही मासिके दर महिन्याला घरी येत होती. दिवाळी अंकही यायचे. असेच एकदा मा. रामदास भटकळ फास्टर फेणेंची सिरीज घेऊन घरी आल्याची आठवण सांगताना सुप्रियाताई म्हणाल्या, हा खजिना पाहून मी हरखून गेले होते व अधाश्यासारख्या त्या पुस्तकांचा फडशा पाडला होता. तेव्हापासून त्या फास्टर फेणे या कॅरॅक्टरच्या फॅन बनल्या.

नाथ माधव आणि इतर लेखकांची दर्जेदार पुस्तके मुलांनी वाचावीत याकडे वडिलांचा कटाक्ष असायचा.

पुढे साहित्यिक वडिलांविषयी बोलताना सुप्रियाताईंनी शाळेतील शिक्षकांविषयीची एक आठवण सांगितली. ते म्हणायचे, तुझे वडील प्रसिद्ध लेखक आहेत, ते छान कथा लिहितात. तोपर्यंत म्हणजे चौथीपर्यंत वडिलांच्या कथा त्यांनी वाचल्या नव्हत्या. मुद्दाम त्यांनी बालवयाला साजेसा विषय असावा म्हणून ‘कलकीचं बाळ’ ही कथा वाचायला घेतली. या कथेचा विषय लहान मुलांसाठी भीतिदायक होता. ते बाळ मॉनस्टर बेबी होती. बाबांच्या गूढकथांशी झालेली पहिली ओळख अशी होती. सुप्रियाताईंनी अभिनय केलेले पहिले नाटक ‘अलबत्या गलबत्या.’ लहान मुलांसाठीच्या पुस्तकांबरोबरच मोठ्यांसाठीची पुस्तकेही त्या व भाऊ गणेश मतकरी वाचत राहिले. त्या वयात जेवढे कळेल तेवढे कळत होतं. चिं.वि. जोशींची पुस्तके, गडकरींची नाटकं, गाजलेले स्क्रीन प्ले, विनोदी मराठी साहित्य दिवाळी अंक असा वाचनाचा आनंद घेत मोठे होण्याचे भाग्य लाभले. आजच्या पिढीपुढे, मुलांसमोर अनेक अवधाने आहेत, प्रलोभने आहेत, त्यामुळे पुस्तकांचे वाचन कमी झाले असले तरी माझा मुलगा इंग्रजी पुस्तकं वाचतो. ‘व्हाट्सॲप, इनस्टा, फेसबुक’च्या माध्यमातून त्यांचे वाचन सुरू आहे. तरीही पुस्तकं वाचण्याच्या आनंदाला मुलं पारखी होऊ नयेत त्यासाठी आईवडिलांच्या हातात पुस्तके दिसायला हवीत. घरात पुस्तकांना स्थान असेल तर मुलांसमोर, पुढच्या पिढीसमोर वाचनाचा संस्कार रुजला जाईल अशी फार बोलकी प्रतिक्रिया सुप्रिया विनोद यांनी दिली.



**डॉ. आशुतोष रारावीकर**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये संचालकपदावर कार्यरत असून नामांकित अर्थशास्त्रज्ञ आहेत. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय आर्थिक क्षेत्रात त्यांचे योगदान आहे. उच्चविद्याविभूषित, सुवर्णपदक विजेते डॉक्टरेट, एमबीएएमए नेट, सीएआयआयनी, अमेरिकेतील सीएफए इन्स्टिपूर व आयएमएक हार्वर्ड एम आय टी यांच्या प्रमाणपत्रांचे व अनेक शिष्यवृत्त्यांचे मानकरी, आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय पुरस्कारांचे मानकरी. त्यांचे ‘यशपुष्प’ हे जीवनाची आशा आणि दिशा देणारे पुस्तक प्रकाशित आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्य सुरू आहे. अमोघ वक्तृत्वशैली असलेले लोकप्रिय वक्ते व आंतरराष्ट्रीय व्याख्याते, सुमधुर शास्त्रीय गायक, संस्कृत व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, योगविदया प्रशिक्षित आध्यात्मिक साधक . असे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व कसे घडले हे त्यांच्याच शब्दात वाचूया. या यशस्वी जीवनाचे ते स्वतः शिल्पकार आहेत. त्यांनी जाणीवपूर्वक स्वत:ला घडवले आहे. वाचनाची आवड होतीच. मात्र त्यांनी काय वाचले हे फार महत्त्वाचे आहे. लहानपणापासून त्यांनी चरित्रवाचन केले त्यात स्वामी विवेकानंदांच्या चरित्राचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. आचार्य अत्रे यांच्या ‘कऱ्हेचे पाणी’चे सर्व खंड , गोविंद तळवलकरांच्या अग्रलेखांचे पुस्तक वाचतावाचता हे सदर, अरेबियन नाईट्स, गोट्या, शेरलॉक होम्स, मनाचे श्लोक नाथमाधवांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, कुसुमाग्रजांचे सर्व लेखन, रामगणेश गडकरी यांची पुस्तके या साऱ्या वाचनातून संस्कारक्षम आयुष्य कसे जगायचे? कसे घडवायचे याची प्रेरणा व ज्ञान त्यांना मिळाले.

स्वत:ला आलेल्या अनुभवातून मुलांनी काही चांगले वेचावे म्हणून संरांनी पाच ‘क’ सांगितले आहेत.

१) काय वाचायचं? महापुरुषांची चरित्रे - प्रेरणादायी पुस्तके अग्रलेख मनाचे श्लोक, विविध प्रकारचे लेखन.

२) का वाचायचं?/कशासाठी वाचायचं? - आयुष्याच्या प्रवासात कुठे पोहोचायचे, आदर्श कोण असावेत ? या प्रवासात ध्येयापर्यंत कसे जायचे? हा मार्ग शोधण्यासाठी वाचायचे.

३) केव्हा वाचायचे? - सतत वाचायचे, रोज वेळ मिळेल तेव्हा वाचायचे.

४) किती वाचायचे? - अमर्याद वाचायचे, भरपूर वाचायचं.
५)काय करायचं?(वाचल्यानंतर)- मनन करायचे. चांगली वाक्ये लिहून ठेवायची. ती वाक्ये पाठ करणे, संस्कृत श्लोक वाचावे. पाठ करावे. मातीपासून मूर्ती घडण्याचा प्रवास या वाचनाने साध्य होतो. दिसामाजी काहीतरी लिहावे- यासाठी चार 'पं' ध्यानात ठेवावेत
१. पुस्तके वाचावी, २. प्रगटीकरण, ३. प्रवास,
४. परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग

लहान वयापासून वाचल्यामुळे जीवनापुढे आदर्श उभा राहिला. कुसुमाग्रज, प्र.के. अत्रे, राम गणेश गडकरी, यांची भाषा व लिखाण आवडायचे. स्वामी विवेकानंदाच्या नावात दोन शब्द आहेत. विवेक आणि आनंद. विवेक - योग्य/अयोग्य ठरवण्याची निवडण्याची शक्ती आणि आनंद - वेदनेपासून मुक्ती म्हणजेच आनंदाची प्राप्ती. हे आयुष्याचे ध्येय आहे. विवेकातून आनंद मिळाला. स्वामी विवेकानंदांच्या चरित्रातून विवेकशक्ती, विचारशक्ती विकसित झाली. लहान वयापासून वाचन केल्याने ग्रहणक्षमता विकसित होत गेली. टिपकागदासारखे टिपत जाण्याची वृत्ती लहान वयात असते. म्हणून चरित्रवाचनातून एक उत्तम चरित्र उभे रहाते/घडते. आपल्यात ते गुण येण्यासाठी प्रयत्नशील राहणारा विद्यार्थी नक्कीच यशस्वी होतो. लहानवयातील वेचलेले, वाचलेले, टिपलेले आयुष्यभर पुरते अशा आश्वासक शब्दात बालकुमारांशी डॉ. आशुतोष रारावीकर यांनी संवाद साधला आहे.



**मेधा पाटकर -** सुप्रसिद्ध समाजसेविका, नर्मदा आंदोलनामुळे जगप्रसिद्ध.

मेधाताईंनी फारच मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या प्रत्येक शब्दातून लहान मुलांपासून कुमार वयोगटातील विद्यार्थी व समाजातील वंचित घटकाविषयी जिव्हाळा, प्रेम व्यक्त होत होतं. त्या करत असलेल्या कार्याविषयी माहिती दिली, त्यांचे मन गरीब वर्गातील मुलांसाठी तळमळीने काहीतरी सकारात्मक करण्यासाठी उत्सुक आहे. त्या संवेदनशील बनण्यामागे त्यांचे वाचन व घरातील व आजूबाजूची माणसे यांच्याशी झालेल्या आंतरक्रिया, विचारांच्या देवाणघेवाणीचा मोठा वाटा आहे.

वाचनामध्ये प्रामुख्याने 'साधना साप्ताहिका'चा उल्लेख त्यांनी केला. साधना साप्ताहिक घरी येत होते, रोजचे वर्तमानपत्र वाचून त्यातील बातमीविषयी कमीत कमी १० वाक्ये लिहायची हा नियम होता. 'बालमित्र' ही वर्तमानपत्राची, पुरवणी यायची त्या पुरवणीतील कात्रणे चिकटवून लायब्ररी चालवल्याची आठवण त्यांनी सांगितली. सानेगुरुजी कथामालेच्या माध्यमातून मुलांना कथा सांगण्यासाठी चालताचालता कथा सुचायची यातून लेखन सुरू झाले. कथा सांगण्यासाठी, कथामालेत बोलण्यासाठी, चर्चा करण्यासाठीही पुस्तके वाचत होते. त्यात भा.रा. भागवतांची पुस्तके जास्त असायची. श्रमिकांविषयीची, समाजवादी विचारसरणीची सानेगुरुजींची पुस्तके आवर्जून वाचत होते. शाळेतून वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळत गेली त्याची तयारी करण्यासाठी अनेक तज्ज्ञांशी चर्चा, पुस्तके वाचून टिपणे काढण्याची सवय लागली व वाचनही होत गेले. हे सांगत असतानाच, वाचताना फार आवडणारी गोष्ट म्हणजे कविता, हेही त्यांनी आनंदाने सांगितले. दिवाळी अंक हातात आला तर त्यातल्या कविताच वाचायचे. कवी अनिल, कवी ग्रेस, वसंत आबाजी डहाके, पुष्पाताई भावे यांच्या घरी वाचन करायचो. ते फार आवडायचे. 'युगवाणी' मासिकासारख्या मासिकांचे वाचन, कविता, गाण्याची पुस्तके वाचत होत्या. नर्मदा आंदोलनामध्ये गाणी, घोषणा रचायचे काम मेधाताई आवडीने करत होत्या. ग्रंथालीची अनेक पुस्तके वाचली. वेगवेगळ्या विचारांच्या जीवनानुभवावरची पुस्तके वाचली. वाचन चळवळ त्या काळी जोमात सुरू होती आणि वाचनप्रिय कुटुंबाचा आपण भाग आहोत ही गोष्ट आनंददायी व अभिमानाची होती.

मराठीबरोबरच इंग्रजी पुस्तके वाचणे, विश्वाच्या भविष्याबद्दलची, अदिवासी समाजाविषयीची, प्रश्नाविषयी पुस्तके, गोदावरी परुळेकराचे 'आणि माणूस जागा होतो' या आणि अशा पुस्तकांतील विचारांनी मनाला आकर्षित केले. 'विकासाची अवधानं' या विषयावरच्या पुस्तकांचे वाचन झाले. सेवादलाच्या शिबिरातील बौद्धिकांच्या निमित्ताने नरहर कुरुंदकरांची पुस्तके, भाषणे यांचे वाचन होत गेले. भाषणे ऐकणे हा छंद त्या काळात लागला. कधीकधी तर बॅरिस्टर नाथ पैंची भाषणे ऐकायला त्या शाळा चुकवून जायच्या. त्या भाषणांतून समाजवादी विचारसरणी अधिक बळकट झाली. शिक्षण या विषयावर फार वाचन केले. वयाच्या ७ वर्षांपर्यंतच्या वाचनाबरोबरीने वैचारिक वातावरणाचा प्रभाव पुढील आयुष्यावर झाला. विनोबा भावे यांची जीवनप्रणालीविषयीची भाष्ये प्रेरणादायी आहेत. या साऱ्या वाचनप्रवासातून, कथामालेतून समाजवादी विचारसरणी, गरीब वर्गासाठी त्यांच्यासोबत उभं राहण्याची प्रेरणा आणि हिंमत दिली. ज्या प्रेरणेतून, हिमतीतून नर्मदा बचाव आंदोलनासारखे काम उभे राहिले. आजही आदिवासी पाड्यातून शिक्षण

देण्याचे, त्यांचे प्रश्न सोडवण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरातमधील गावांमध्ये निवासी आणि दिवसाच्या शाळांची व्यवस्था तयार केली आहे. त्यांच्या कामाची ओळख व दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे. अनेक पुरस्कारांनी त्यांच्या कार्याचा सन्मान झाला आहे. पर्यावरण कार्यकर्ता ही त्यांची ओळख आहे; तसेच लढवय्यांची स्फूर्ती म्हणजे मेधा पाटकर असे अभिमानाने म्हणावेसे वाटते.



**डॉ. विजया वाड**

लेखिका, बालसाहित्यिका, मराठी विश्वकोशमंडळाच्या पहिल्या महिला अध्यक्षा ही त्यांची ओळख. ज्येष्ठ साहित्यिका, उत्तम शिक्षिका, एक कर्तृत्ववान, प्रेमळ स्त्री, बुद्धिमत्तेचे, शिक्षणाचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर विलसत असते. हसतमुख आणि सरस्वतीचा वरदहस्त लाभलेल्या, अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड यांची आई ही आहे डॉ. विजया वाड यांची संक्षिप्त ओळख. पायाला दुखापत झाल्याने मैदानावरचे खेळणे थांबले आणि पुस्तकांशी मैत्री झाली. पुस्तकांच्या रूपाने छानछान मित्र मैत्रिणी भेटल्या. या छान पुस्तकांच्या वाचनाने मी शहाणी झाले असे विजयाताई म्हणाल्या. पुस्तकांशी मैत्री तर झाली, शिवाय आईने त्यांना लिहितेही केले. वाचनाने भाषाशैली विकसित झाली. निबंध लिहिताना स्वतंत्र विचार व्यक्त होऊ लागले, वाचनामुळे सर्वांपेक्षा सुंदर निबंध विजयाताई लिहायच्या. आई म्हणाली तू तुझे स्वतःचे लेखन कर. आणि विजयाताई कविता, कथा लिहू लागल्या. वयाच्या विसाव्या वर्षी पहिले पुस्तक आले. आतापर्यंत १५६ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

विजयाताईंना त्या कोणती पुस्तके वाचत होत्या असे विचारल्यावर सानेगुरुजींच्या गोड गोष्टी, श्यामची आई वि.स. खांडेकर, ना.सी. फडके यांच्या पुस्तकांनी मोहिनी घातली होती.

सानेगुरुजींचे सर्वच लेखन वाचत होते; पण गोड गोष्टींनी जास्त वेड लावले. 'श्यामची आई' तर पाठच झाली होती. श्यामची आई श्यामला सर्वांचा आवडता हो म्हणायची. बाळबोध असले तरी सानेगुरुजीचे संस्कार देणारे लेखन विजयाताईंना आवडले. विश्वकोष डिजिटल करण्याचे मोठे काम त्यांच्या हातून घडले. आज त्या कृतार्थ आहेत. त्याही त्यांच्या लेखनातून मुलामुलींना संस्कारांची हीच शिदोरी वाटण्याचे महान कार्य करत आहेत. बाह्य सौंदर्यापेक्षा, आंतरिक सौंदर्य, सामर्थ्य वाढवा, स्वत:ला कमी लेखू नका, संधी मिळते ती शोधता आली पाहिजे, संस्कारक्षम वाचनाशी मैत्री करा, स्वत:ची ओळख निर्माण करा, हा मोलाचा संदेश विजयाताईंनी बाळगोपाळांना दिला आहे.

चारही मान्यवरांनी त्यांच्या बालवयात, संस्कारक्षम वयात काय वाचले, काय वाचायला आवडत होते हे आपल्याला त्यांच्या मनमोकळ्या मनोगतातून सांगितले आहे. आजचे या साऱ्यांचे त्यांच्या क्षेत्रातील यश हे सहज मिळालेले नाही. त्यामागे त्यांनी केलेल्या वाचनाचा, प्रयत्नांचा, निष्ठेचा, निश्चयाचा सिंहाचा वाटा आहे.

त्यांच्यासारख्या विभूती वाचनाने घडल्या. आदर्श बालकुमारांसमोर असावा या भावनेने आपण त्यांना बोलते केले. कर्तेपणाचा कोणताही अभिनिवेश न बाळगणाऱ्या सत्त्वगुणी व्यक्तींची संस्कारांची शिदोरी सोबत घेऊन आपण उजेडाच्या ज्ञानाच्या तेजाच्या मार्गावर चालत राहू या.

थोरांचे हे बोल जाणुनी
जगणे करू या सार्थ
वाचनात लपला आहे
यशाचा परम अर्थ

**– विद्या प्रभू**

vidyaprabhu1964@gmail.com

पुढील अंक

**विश्व मराठीचे**

**अतिथी संपादक – ज्ञानेश्वर मुळे**

अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सॅन होजे येथील अधिवेशनानिमित्त. जगभरातील मराठीच्या पाऊलखुणा सांगणारा विशेषांक

**काव्यकोडी उत्तरे –**

१. कॅरम, २. बुद्धिबळ, ३. जोडीची साखळी, ४. मामाचं पत्र हरवलं, ५. खो खो, ६. कबड्डी, ७. पत्ते, ८. सागरगोटे, ९. आंधळी कोशिंबीर, १०. मल्लखांब





# विज्ञानिका

**उमेश घेवरीकर**

'मुलांनो, सध्याचे युग हे संगणकयुग म्हणून ओळखले जाते. इंटरनेट, डिजिटल, एआय हे या युगात परवलीचे शब्द असतील मात्र तुम्ही सर्वांनी एक लक्षात ठेवायला हवे, हे दुधारी शस्त्र असणार आहे. त्याचा वापर करणाऱ्याच्या सद्सद्विवेकबुद्धीवर परिणाम अवलंबून असतील. तंत्रज्ञानाचे फायदे आहेत तसेच तोटेही भरपूर आहेत. सजगपणे सोशल मीडिया आणि नेटचा वापर करणाराच शहाणा ठरेल,'ऑफ तासाला आलेले गोखलेसर तळमळीने आम्हाला सांगत होते. लवकरच शाळेत पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी सायबरतज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तास संपला, शाळा सुटली. मी आणि सुजय, माझा वर्गमित्र- घराकडे चालू लागलो. सुजयच्या डोक्यात नेहमी काहीतरी भन्नाट सुरू असायचे. आम्ही मित्र त्याला बिरबल म्हणत असू. शाळेतून येताना आम्ही गोखलेसरांनी सांगितले त्यावर बोलत होतो. सुजय सांगत होता, त्यांच्या गावाकडच्या एका मुलीने फेसबुकवर पोस्ट केलेल्या फोटोला कमी लाईक आल्याने चक्क स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केला होता. नशिबाने ती वाचली. हे ऐकून मला तर धक्काच बसला. मागील आठवड्यात वर्तमानपत्रात आलेल्या एका बातमीवरही आम्ही चर्चा बोललो. एका फ्रॉडरने फिशिंग लिंक पाठवून एका वृद्धाची काही लाखांची फसवणूक केल्याची ती बातमी होती. आमच्या शाळेतील मोठ्या वर्गातील काही मुलेसुद्धा तासन्तास मोबाइल गेम खेळत असतात आणि त्यामध्ये दिलेले धोकादायक टास्क पूर्ण करण्यासाठी काहीही करत असतात असे आम्ही ऐकून होतो. सुजय म्हणाला, 'वरद, खरे तर या तंत्रज्ञानाचा उपयोग खूप चांगल्या कामासाठी, अभ्यासासाठी करता येईल, पण आपले मित्र तसा विचारच करत नाहीत रे.' बोलत बोलत आम्ही घरी आलो.

माझ्या डोक्यात अजूनही तोच विषय घोळत होता.

नेट आणि तंत्रज्ञानाने कितीतरी बाबी सोप्या झाल्या आहेत. त्यामुळे लोकांचे श्रम, वेळ आणि पैसा वाचतो आहे. जगभरचे लोक एकमेकांशी क्षणात जोडले जात आहेत. असे असूनही याच क्षेत्रात फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. खरे तर सर्वांनीच या क्षेत्राचा चांगला उपयोग करायला हवा, माझ्या डोक्यातील विचारचक्र सुरू होते. घरी पोचलो तेव्हा आईने मला हायपाय धुऊन परवचा म्हणायला सांगितले. थोडा अभ्यास करून जेवण केल्यानंतर मी झोपून गेलो.

दुसऱ्या दिवशी रविवार असल्याने शाळेला सुट्टी होती. सुटीच्या दिवशी मी आणि सुजय आमच्या घरासमोरच्या ओट्यावर झाडाच्या सावलीत निवांत बसायचो. पुस्तक वाचणे, वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारत बसणे हा आमचा आवडता उद्योग होता. त्या कट्ट्याला आम्ही मैत्रिकट्टा म्हणत असू.आजही आम्ही तसेच बोलत बसलो होतो. सुजयने नुकतेच स्टीव्ह जॉब्सचे चरित्र वाचले होते, त्यातील माहिती तो मला सांगत होता. मी त्याला विचारले, 'सुजय, तू काल म्हणालास की तंत्रज्ञानाचा खूप चांगला उपयोग होऊ शकतो, तो कसा?'

त्यानंतर सुजय मला प्लेस्टोअरवर उपलब्ध असलेल्या 'दीक्षा' ॲपचा शिक्षणात कसा उपयोग करता येतो ते सांगू लागला. शालेय अभ्यासक्रमातील प्रत्येक घटकावर तिथे दर्जेदार व्हीडिओ उपलब्ध असून आपल्याला हवे तेव्हा आपण ते पाहू शकतो. काही कारणाने शाळेत न येऊ शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही तर पर्वणीच वाटली मला. आमच्या घरासमोरील रस्त्याचे रुंदीकरण सुरू होते. कामावरील मजूर खडी, वाळू रस्त्यावर टाकत होते. मी आणि सुजय त्यांची कामे मन लावून पहात होतो. इतक्या उन्हात हे मजूर किती कष्ट करतात त्याचा मोबदला त्यांना किती मिळत असेल? अशा चर्चा सुरू होत्या. इतक्यात आमच्यासमोर एक अनोळखी गृहस्थ त्यांच्या नव्या कारमधून उतरले. कार रस्त्याच्या बाजूला पार्क करून ते घाईने समोरच्या गल्लीत निघून गेले. आम्हाला त्यांची ती नवी

कोरी कार खूप आवडली. आता आम्ही तिचे फीचर्स कोणते असतील यावर बोलू लागलो.

मध्ये काही वेळ गेला. मला भूक लागली. मी आणि सुजय आमच्या घरी आलो. जेवण केले. इतक्यात बाहेरून गलका ऐकू येऊ लागला. आवाज वाढत गेल्याने आम्ही दोघे घाईने बाहेर आलो. आमच्या घरासमोर त्या गृहस्थाने पार्क केलेल्या कारचा रस्त्याच्या कामात अडथळा येत होता. कार तिथून हलवावी लागणार होती. तरच रस्त्याचे काम सुरू राहणार होते त्यामुळे कारच्या मालकाचा शोध सुरू होता, पण कुणालाच त्यांचा संपर्क होत नव्हता. कारवर कुठेही त्यांचा संपर्क नंबर नव्हता. त्यामुळे मजूर आणि ठेकेदार कारच्या भोवती जमा होऊन मालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागले.



आम्ही दोघे त्यांच्या जवळ जाऊन काही मदत करता येते का– हे पाहू लागलो. समोरच्या गल्लीत जाऊन एक-दोन घरी आम्ही चौकशी केली, पण ते गृहस्थ तिथे नव्हते. ऊन वाढत होते. मजुरांचे काम खोळंबले होते. काहीही करून कारमालकाचा शोध घेणे आवश्यक होते, पण तो कसा घ्यावा हे मात्र कुणालाच सुचत नव्हते.

सुजय आणि मी पारावर येऊन झाडाच्या सावलीत येऊन बसलो. काय करावे? ही समस्या कशी सोडवावी? यावर आम्ही विचार करत होतो. इतक्यात सुजयला काहीतरी भन्नाट सुचले असावे. तो मला म्हणाला, ‘वरद तुझ्या घरी अँड्रॉइड मोबाइल असेल ना?’ मी हो म्हणताच तो ओढत मला घरी घेऊन आला आणि म्हणाला, ‘तो मोबाइल घेऊन ये पटकन.’

मी त्याला प्रश्न न विचारता आईकडून तिचा मोबाइल घेतला आणि निघालो.

‘पण सुजय, मोबाइलवरून त्यांना कसा शोधणार तू?’

‘तू चल रे’ ... म्हणत त्याने मला कारजवळ नेले. जाताना त्याने प्ले स्टोअर वरून कुठलेसे ॲप डाऊनलोड केले . कारचा नंबर मला मोठ्याने वाचायला सांगून त्याने तो नंबर त्या ॲपमध्ये टाकला आणि काय आश्चर्य? कारचा नंबर टाकताच कारच्या मालकाचे नाव स्क्रीनवर दिसले. तेव्हा मला समजले सुजयाच्या डोक्यात नेमके काय सुरू होते ते. सुजयला आम्ही उगाचच बिरबल म्हणत नव्हतो! मी त्याला म्हणालो, ‘सुजय त्या कारचा मालक कोण हे समजले, पण यावरून त्यांचा संपर्क कसा होणार? त्यांचा मोबाइल नंबर इथे कुठे आहे दिलेला?’

सुजय हसत मला म्हणाला, ‘बात मे दम है तेरे, पण काहीतरी मार्ग काढता येईल. बघ ती व्यक्ती आपल्या गावात आली म्हणजे तिचा गावातील कुणाशीतरी संपर्क असेलच ना, आता आपण त्यांचे फेसबुक अकाउंट चेक करू त्यांच्या फ्रेंडलिस्टमध्ये आपल्या गावातील कुणी असेल तर त्यांना भेटू आणि समजा नसेल कुणी तर वेगळा मार्ग शोधता येईल, आपला मोकळा वेळ चांगल्या गोष्टीत तर जाईल ना.’

आता मात्र मला सुजयच्या बुद्धीचे कौतुक वाटू लागले. जमलेले लोक आम्ही काय करतोय ते कौतुकाने पाहू लागले.

सुजयने फेसबुक लॉग इन केले. त्यावर कार मालकाचे नाव सर्च करून प्रोफाइल शोधले आणि सुजयचे बोल अक्षरशः खरे ठरले. त्यांच्या फ्रेंडलिस्टमध्ये आमच्या गावातील एका व्यक्तीचे नाव होते. ती व्यक्ती नगरसेवक असल्याने जमलेल्या गर्दीतील अनेकांकडे त्यांचा मोबाइल नंबर होता. त्यापैकी एकाने लगेचच नगरसेवकांना फोन करून कारमालकाचा फोन नंबर आहे का याची विचारणा केली. जे घडले आहे त्यांची थोडक्यात कल्पना दिली. त्यांनी परिस्थिती लक्षात येताच लगेच त्या कारमालकाला फोन करून कार हलवण्यास सांगितले.

अवघ्या दहा मिनिटांत ते गृहस्थ कारजवळ आले आणि कार तिथून हलवली. लगेच रस्त्याचे काम सुरू झाले. मजूर पुन्हा जोमाने काम करू लागले. रस्त्यावर खडी, वाळू पसरवली जाऊ लागली.

गर्दीतील लोक आमच्या युक्तीचे कौतुक करत होते.एक जण म्हणाला, ‘आजकाल पोर मोबाइलवर फक्त गेम खेळतात पण पोरांनो, तुम्ही मोबाइलचा वापर करून पाहुणा शोधून काढला हे लै भारी झालं बर का..!’

सुजय समाधानाने माझ्याकडे पाहात हसत होता. जणू काही तंत्रज्ञानाचा चांगला वापर कसा करता येतो हे प्रात्यक्षिक त्याने मला दाखवले होते. सोमवारी शाळेत गेलो की गोखलेसरांना सुजयची ही तंत्रकरामत मी सांगणार होतो.

**– उमेश घेवरीकर**

umesh.ghevarikar@gmail.com



लेख




# साने गुरुजी विद्यार्थिप्रिय शिक्षक

आशा कुलकर्णी

सन १९२४ ते १९३० या काळात अमळनेरच्या प्रताप हायस्कूलमधील सर्वच विद्यार्थ्यांचे शालेय जीवन समृद्ध झाले, कारण याच काळात साने गुरुजी येथे शिक्षक आणि छात्रालयाचे रेक्टर म्हणून कार्यरत होते. तो काळ स्वातंत्र्यलढ्याचा होता. खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या या शाळेचे नाव सुरुवातीला म्हणजेच १९०८ मध्ये विद्यामंदिर असे होते, नंतर काही काळ प्रताप विद्यालय म्हणून ही शाळा ओळखली जाई व पुढे प्रताप हायस्कूल असे शाळेचे नामकरण झाले. पांडुरंग सदाशिव साने प्रताप हायस्कूलमध्ये रुजू झाले तेव्हा उच्चशिक्षित, बुद्धिमान आणि जाज्वल्य देशभक्तीची मूर्ती असलेले जगन्नाथ गोपाळ गोखले प्रताप हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. आई.सी.एस.च्या उच्च शिक्षणासाठी लंडनला गोखलेसरांना पाठवण्याचे ब्रिटिश सरकारने ठरवले होते, परंतु सरकारचे हे निमंत्रण विनम्रपणे नाकारून गोखलेसरांनी आपल्या देशबांधवांची सेवा करण्याचे व्रत घेऊन शिक्षणक्षेत्र निवडले. साने गुरुजी त्यांच्याच तालमीत तयार झाले, साने गुरुजी म्हणत, अमळनेरचे आणि प्रताप हायस्कूलचे भाग्य थोर की गोखलेसरांनी देशसेवेसाठी प्रताप हायस्कूलची निवड केली. शाळेत गुरुजींना सानेमास्तर किंवा सानेसर म्हणून संबोधत. पुढे स्वातंत्र्यलढ्यादरम्यान १९३२ साली धुळ्याच्या तुरुंगात असताना सानेसरांचे साने गुरुजी झाले त्याचीही कहाणी वेगळी आहे. साने गुरुजी शाळेत इतिहास आणि मराठी असे दोन विषय शिकवत. छात्रालयाचे रेक्टर म्हणून त्यांना छात्रानंद म्हणत. छात्रालयातील मुलांवर गुरुजींनी समाजसेवेचे, देशभक्तीचे, माणुसकीचे संस्कार केले. पालकांपासून-घरापासून दूर राहणाऱ्या आणि काही आईविना वाढलेल्या मुलांना गुरुजींनी आईची माया तर दिलीच, तशी शिस्तही लावली. हा गुरुजींचा नैसर्गिक स्वभावच होता. आणि गरीब गरजू मुलांची फी आपल्या पगारातून गुरुजी भरत असत. मुले म्हणजे देवाघरची फुले, देशाचे भविष्य ही भावना असल्याने साने गुरुजी मातृहृदयी शिक्षक म्हणून विद्यार्थिप्रिय होते. छात्रालयाची बैठी इमारत शाळेपासून काहीशी लांब बाजूला पडली होती. शाळा आणि छात्रालय यामध्ये मोठे मैदान होते. या मैदानावर फूटबॉल, हॉलिबॉलचे आंतरस्कूल व राज्यस्तरीय सामने होत असत. छात्रालयाची बैठी इमारत त्यामुळे वेगळी वाटे, म्हणून आणि आजूबाजूचा परिसर अतिशय रुक्ष आणि काट्याकुट्यांनी भरलेला असल्याने छात्रालयाला अंदमान असे नाव पडले होते. गुरुजी छात्रानंद झाल्यावर या जागेत आमूलाग्र बदल झाला. मुलांच्या मदतीने सानेगुरुजींनी परिसरात फुलबाग फुलवली आणि अंदमानचे आनंदभुवन झाले. छात्रालयातील वातावरण अगदी खेळीमेळीचे होते. छात्रानंद मुलांबरोबर मनमोकळ्या गप्पा मारत. मधाच्या पोळ्याभोवती मधमाश्या जशा घोंघावतात अगदी तसेच छात्रालयातील विद्यार्थी सानेगुरुजींच्या अवतीभोवती घुटमळत असत. छात्रालय म्हणजे एक कुटुंबच होते जणू आणि कुटुंब प्रमुख होते साने गुरुजी!

सानेगुरुजींनी विद्यार्थ्यांना सेवा धर्माची शिकवण दिली, सेवाधर्माचे महत्त्व समजावले, आणि तेही स्वतःच्या कृतीतून. अमळनेरच्या प्रताप हायस्कूलच्या छात्रालयात गोपाळ नावाचा एक गडी होता. अनाथ होता बिचारा! आई-वडील, बहीण-भाऊ कोणी नव्हतं त्याला, शाळेच्या आवारात कोपऱ्यात एका लहानशा झोपडीत तो राही आणि संस्थेचे पडेल ते काम करी. एकदा गोपाळ आजारी पडला. दिवसभरात तो परिसरात दिसला नाही म्हणून सानेगुरुजींनी विचारले, अरे दामू, तू गोपाळला कुठे पाहिलेस का? मला आज दिवसभरात दिसला नाही. दामू म्हणाला, सर, गोपाळ आजारी आहे. तो त्याच्या झोपडीत झोपला आहे. गुरुजी ताबडतोब गोपाळला भेटायला गेले. गोपाळला खूपच ताप भरला होता. गुरुजींनी लगेच प्राथमिक उपचार सुरू केले. गोपाळला ते छात्रालयात आपल्या खोलीत घेऊन आले. डॉ. म्हस्करांचे औषध सुरू केले. ताप उतरेना, गुरुजी रात्र रात्र गोपाळच्या उशाशी बसून असत. निदान झाले,

गोपाळला विषमज्वर झाला होता. या मुदतीच्या तापात रुग्णाची फार सेवा करावी लागते. त्याचे मलमूत्र काढून साफ करावे लागते. कारण कधी कधी त्याची शुद्धही हरपते. त्याचा स्वतःवर ताबा राहात नाही. सानेगुरुजींनी गोपाळची सगळी सेवा केली. कारण गुरुजींचा शब्दापेक्षा कृतीवर भर असे. परंतु दुर्दैवाने गुरुजींना यश आले नाही. या विषमज्वराच्या आजारात गोपाळचा मृत्यू झाला. सर्वांना खूप वाईट वाटले. रडू आवरेना. अनाथ गोपाळची अंत्ययात्रा निघाली. सर्व शिक्षक आणि विद्यार्थी सामील झाले. गुरुजींनी पार्थिवाला आधी खांदा दिला आणि नंतर मडके धरले. एका गरीब अशिक्षित मजुराचे अंत्यसंस्कार एका उच्चशिक्षित साहित्यिकाने केले. सानेगुरुजींनीच गोपाळला अग्नी दिला. नंतर सुतकही पाळले, म्हणाले, गोपाळ माझा धाकटा भाऊच होता या प्रसंगातून सानेगुरुजींनी सेवाधर्माची आणि माणुसकीची महान शिकवण विद्यार्थ्यांना आणि समाजाला दिली.



साने गुरुजी छात्रालयातील गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण चालू राहावे, पैशाअभावी त्यात खंड पडू नये म्हणून दक्ष असत. छात्रालयाच्या जेवणघरात दोन प्रकारचे जेवण असे. एक, साधे म्हणजे भाजीभाकरी किंवा झुणका-भाकरी आणि दुसरे, स्पेशल. गुरुजी साधेच जेवण घेत. आणि तरीही अधूनमधून उपाशी राहून पैसे वाचवून गरीब मुलांची फी भरत. हायस्कूलचे मुख्याध्यापक जगन्नाथ गोपाळ गोखले एकदा भोजनगृहात तपासणीसाठी आले. त्यांनी अन्नाचा दर्जा, स्वयंपाकघर, पिण्याचे पाणी, स्वच्छता इत्यादी तपासले. नंतर हजेरीपत्रक तपासले, सानेगुरुजींचे नाव साध्या जेवणाच्या भागात होते, आणि तरी हजेरीपटात दोन-चार दिवसांनंतर एकदा गैरहजर असल्याचा शेरा होता. तपासणीनंतर भोजनगृहातून गोखलेसर तडक सानेगुरुजींच्या खोलीवर गेले, गुरुजींचे नेहमीप्रमाणे खाली मान घालून लिखाण चालू होते. गोखलेसर अधिकारवाणीने म्हणाले साने... उपाशी राहून जेवणाचे पैसे वाचवून मुलांची फी भरतोस? उद्यापासून माझ्याकडे जेवायला यायचे! बस्स.. एवढे बोलून गोखलेसर निघून गेले. झाले.. मुख्याध्यापकांची आज्ञा! सानेगुरुजींना सकाळ-संध्याकाळ गोखलेसरांकडे जेवायला जाणे भाग होते. गोखलेसरांच्या पत्नी शांताबाई फार प्रेमळ, सुगरण सुगृहिणी, त्यांनी अतिशय मायेने सानेसरांना चारी ठाव जेवण वाढले. वरण-भात, भाजी-पोळी, चटणी-कोशिंबीर, दही-ताक! सानेसर कसेबसे दोन दिवस जेवले. तिसऱ्या दिवशी हळूच शांताबाईना म्हणाले, मी उद्यापासून जेवायला येणार नाही, मी हे श्रीमंती जेवण जेवू शकत नाही. माझ्या घशाखाली घास उतरत नाही, कारण माझ्या गरीब विद्यार्थ्यांना जे मिळत नाही ते मी कसे खाऊ? हे ऐकून शांताबाई व्यथित झाल्या. गोखले सरांना जेव्हा हे समजले ते अवाक् झाले. इतकी संवेदनशील आणि ध्येयवादी व्यक्ती आपल्या शाळेला लाभली या विचारांनी गोखलेसर धन्य झाले.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये काही ठिकाणी अंधश्रद्धा दिसून येते असे सानेगुरुजींना जाणवले. बारकाईने लक्ष ठेवल्यावर त्यांना असे दिसले की परीक्षा जवळ आली की काही विद्यार्थी शाळेच्या मागच्या बाजूस असलेल्या मारुतीमंदिरात दर शनिवारी रुईच्या फुलापानांचा हार आणि तिळाचं तेल घेऊन जातात आणि पूजा करतात, पास होण्यासाठी नवस बोलतात. रोज प्रदक्षिणा घालतात, आणि त्या फेऱ्या दिवसागणीक वाढवतात.


एकदा इतिहासाच्या तासाला गुरुजींनी सहज विचारले, मंदिरात पूजा आणि नवस करायला कोण कोण जाते? काही जणांनी हात वर केला. गुरुजींनी उद्देश विचारला तेव्हा कारण समजले. गुरुजी म्हणाले अरे, नवस करून कोणी पास होईल का? त्यासाठी अभ्यास करावा लागतो, मेहनत करावी लागते. आणि तो देव तरी ही पूजा स्वीकारील का? तो हनुमान खरंच जागा झाला न, तर त्याची गदा घालेल तुमच्या डोक्यात आणि म्हणेल अरे मूर्खा, मला फेऱ्या काय घालतोस, जा आणि पुस्तक घे हातात! अशा प्रकारे खेळीमेळीत गुरुजींनी विद्यार्थ्यांच्या मनातील अंधश्रद्धेचे भूत अगदी सहजपणे घालवले.

त्या काळात साने गुरुजी विद्यार्थ्यांसाठी हस्तलिखित वार्तापत्र लिहीत, जेणेकरून विद्यार्थ्यांना जगातील घडामोडी समजाव्या, तसेच बालमनावर राष्ट्रीय विचार बिंबवले जावे. पहाटे ४ ते ५ या वेळेत वार्तापत्राचे एकटाकी लिखाण करत. सुंदर हस्ताक्षरातील ते वार्तापत्र देशविदेशाच्या वृत्तांनी भरलेले आणि अर्थपूर्ण सुभाषितांनी नटलेले असे. मुलांना विश्वदर्शन घडवत असे. साक्षात सानेगुरुजींसारख्या थोर साहित्यिकाने या दैनिक हस्तलिखित वार्तापात्रातून संस्कारक्षम वयातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचा खजिना आणि संस्काराची सुगंधी फुलेच दिली. एकदा सानेगुरुजींच्या कानावर आले की त्यांचा एक विद्यार्थी सिगारेट ओढतो, तो व्यसनी झालाय. गुरुजी खिन्न झाले, अस्वस्थ झाले. हे समजल्यावर गुरुजींनी वार्तापत्रात या घटनेचा उल्लेख केला. त्यांनी माझा विद्यार्थी व्यसनी झाला. हा माझाच अपराध आहे. मी संस्कार करण्यात कुठेतरी कमी पडलो. माझ्या या अपराधाला शिक्षा ही झालीच पाहिजे. मला कोणीतरी शिक्षा करा रे....! असे आर्त शब्द लिहिले होते. गुरुजींनी स्वतःलाच शिक्षा करून घेतली. संपूर्ण शाळेत, विद्यार्थ्यांमध्ये, संस्थेच्या कार्यालयात सर्वत्र चर्चा झाली. कोण हा विद्यार्थी? हे काय घडलं? अर्थातच परिणाम योग्य तोच झाला. त्या सिगारेट ओढणाऱ्या विद्यार्थ्याने गुरुजींचे पाय धरले आणि माफी मागून व्यासनापासून दूर राहण्याचे वाचन दिले! दोघांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले. अपराध, चूक, नाराजी, खिन्नता सगळे सगळे या अश्रूंच्या लोंढ्यात वाहून गेले. मळभ दूर झाले. मनाचे आवकाश स्वच्छ सुंदर झाले! विद्यार्थांनी व्यसनी होऊ नये म्हणून सानेगुरुजींची ती तळमळ आज कुठे पाहायला मिळेल का?

**– आशा कुलकर्णी**
antidowry498a@gmail.com


# Almitra Patel
Waste Warrior


**Sharad Kale**




**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

आयुष्यभर शाश्वत मूल्ये जपणाऱ्या आणि त्यासाठी झगडणाऱ्या अल्मित्रा पटेल यांचे हे इंग्रजी भाषेतील चरित्र. अल्मित्रांची प्रेरणादायी जीवनकथा समाजातील विविध स्तरांवर पोहोचवणे हाही एक महत्त्वाचा उद्देश त्यात आहे. घनकचराव्यवस्थापनात त्यांचे व्यवस्थापन आणि योगदान प्रेरणादायी आहे.

# नवे नीतिसार
**सुधा देसाई**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

मूल जन्माला आल्यापासून खऱ्या अर्थाने माणूस बनण्यासाठी आई, वडील, गुरू व उन्नत समाज यांच्या मार्गदर्शनाची, सुदृढ व भक्कम पायाची नितांत आवश्यकता असते. हे खांब त्याच्या जीवनाला आकार, मानवतेचा धर्म आणि संस्कारांचा त्याच्यावर योग्य तो परिणाम होतो. अनेक माणसांशी आलेल्या संबंधातून, घडलेल्या घटनांतून जे दिसले, मनात राहिले ते पुस्तकरूपात शब्दबद्ध करावे.







नाटिका



# सागरगान

संध्या कुलकर्णी

(सकाळची वेळ. एका मोठ्या समुद्रात पाण्याच्या पृष्ठभागावर दोन छोटे चंदेरी मासे येऊन वर आकाशाकडे बघत आहेत. ते खूप आनंदात आहेत. नाचत गात आहेत. एकाचे नाव आहे चमचम आणि दुसऱ्याचे चांदी.)

चमचम – ''ए चांदी, बघ ना आकाश किती छान दिसत आहे ना निळं निळं .. मधेच पांढरे शुभ्र ढग..''

चांदी – ''ढगामधून. सूर्याचे चमचमते किरण पाण्यावर पडले आहेत.''

चमचम – ''समुद्राच्या लाटा किती चमकत आहेत...''

चांदी – ''अरे, आपलं अंग, शेपूट, पंख, कल्लेसुद्धा किती छान चमकत आहेत. अरे यार, तू भी तो चमक रहेला हे भाई.''

दोघे जण – 'चंदेरी चंदेरी आम्ही चंदेरी.
चमचम चमकतो आम्ही चंदेरी.
सूर्याचे किरण सुंदर
पडले आमच्या अंगावर.
दिसतो आम्ही सुंदर सुंदर
चंदेरी चंदेरी आम्ही चंदेरी.
चमचम चमचम आम्ही चंदेरी.'

चंदेरी – ''पाणीसुद्धा किती उबदार आहे नाही?''

चांदी – ''आहा किती छान वाटतं आहे.''

दोघे जण – ''आता कसं वाटतंय? उबदार वाटतंय. आता कसं वाटतंय? उबदार वाटतंय.''

चंदेरी – ''नाहीतर... आपण आधी राहत होतो. तिथे किती थंडी होती ना?''

चांदी – ''हो ना? सारखं आपलं कुडकुड कुडकुड कुडकुड थंडी.''

चंदेरी – ''इसलिये तो... आपले आई-बाबा, काका-काकू सगळे गाव सोडून इतक्या लांबून इथे आले ना.''

चांदी – ''इतके सगळे चंदेरी मासे एकदम येताना बघून, माणसांनी आपले किती किती फोटो काढले!''

चंदेरी – ''पाण्याच्या आत शिरून व्हिडिओपण खूप काढले.''

चांदी – ''मला वाटतं. आपण सगळे. खूप म्हणजे खूपच छान दिसत होतो.''

चंदेरी – ''आपल्या सगळ्यांचा ग्रुप फोटो खूपच छान आला असेल ना.''

चांदी – ''अरे क्या बात है! मागे बघ... अरे मागे वळून बघ. आपले सगळे गाववाले. एकत्र पोहत येताना किती छान...अं अं.''

चंदेरी – ''अरे! कोणीच दिसत नाही... कुठे गेले सगळे?''

चांदी – ''आई... बाबा... काका...''

चंदेरी – ''ताई... दादा... आजोबा...''

चांदी – ''सूर्य बघायला पुढे आलो... तर. आपल्याला सगळे सोडून गेले... आता त्यांना कुठे शोधायचं?''

चंदेरी – (जोरात रडत.) ''आपण हरवलो.''

(जोरात रडू लागतात. तेवढ्यात. तिथे. एक लाल मासा, गुलाबी मासा, एक खेकडा, एक कासव येतात. त्यांची नावं आहेत. लाल आणि गुल आणि कच्छू आणि वाकड्या.)

लाल – ''अरे, कुणाच्या तरी रडण्याचा आवाज येतो आहे... कोण रडतं आहे?''

गुल – ''अरे सांगाना. कोण रडत आहे?''

कच्छू – ''अरे ते बघा तिकडे दोन चंदेरी मासे रडत आहेत.''

वाकड्या – ''अरे रडू नका... सांगा तरी काय झालं?''

लाल – ''तुम्ही आमच्या समुद्रातले दिसत नाही. कुठून आलात? काय झालं? का रडता?''

वाकडया – ''अरे बावळटांनो, बोला काहीतरी.''

चंदेरी – ''आमचे आईबाबा हरवले. आम्ही खूप लांबून आलो आहोत. खूप मोठा प्रवास करून आलोय.''

चांदी – ''आमचे आजोबा, ताई, दादा, काका हरवले. आम्ही खूप खूप थंड प्रदेशातून इथे आलो आहोत.''



चंदेरी – ''आता कसं शोधायचं त्यांना?''
चांदी – ''खरं म्हणजे आम्ही हरवलो आहोत.''
लाल – ''घाबरू नका. आम्ही तुम्हाला मदत करू. हे घ्या. मऊ मऊ किडे आहेत. खाऊन घ्या आधी. भूक लागली असेल ना.''
कच्छ – ''तुम्ही चला आमच्याबरोबर...ए वाकड्या. कशी मदत करायची यांना?''
वाकड्या – ''सांगतो सांगतो. तुम्ही आमच्याबरोबर आमच्या शाळेत या.''
चंदेरी आणि चांदी – ''शाळेत? नको नको. आमची आता सुट्टी चालू आहे. आम्हाला कंटाळा येतो शाळेचा. शाळा, सो बोरिंग.''
वाकड्या – ''आईबाबांना भेटायचं आहे ना? मग चला आमच्याबरोबर.''
लाल आणि गुल – ''आमचे सर खूप हुशार आहेत. त्यांना सगळं माहीत असतं. ते बरोबर शोधून काढतील तुमच्या आईबाबांना.''
चंदेरी – ''कोण आहे तुमचे सर?''
लाल – ''आमचे डॉल्फिन सर, खूप हुशार आहे. ते खूप वेळा माणसांबरोबर असतात. त्यामुळे त्यांचं जी के खूप चांगलं आहे. अरे एवढा पण समजत नाही. जनरल नॉलेज!''
कच्छू – ''चला आमच्या शाळेत.''
(सगळे जण जातात. ब्लॅक आउट.)

समुद्रातील शाळेचे दृश्य.
(डॉल्फिन सर. टीना. आणि टुनटुन. आणि तारामासा तिथे आहेत.)
डॉल्फिन– ''अरे टीना, टुनटुन आणि तारा तुम्ही तिघेच आला.? बाकीचे कसे नाही आले अजून?''
टीना – ''सर. काल. तुम्ही चित्र काढायला सांगितलं होतं ना? निसर्गचित्र? मग त्यासाठी झाड-सूर्य-आकाश बघायला हवं ना.''
तारामासा – ''म्हणून ते सगळे जण. पाण्याच्या वर जायचं ठरवत होते.''
टुनटुन – ''बहुतेक ते सगळे वर गेले असतील. पण शाळा सुरू होईपर्यंत परत येतो म्हणाले होते.''
डॉल्फिन – ''कसे आहेत हे मासे? वेडे कुठले? अरे मी तुम्हाला काल निसर्गाचं वर्णन करून सांगितलं होतं. कल्पनाशक्ती म्हणजे इमॅजिनेशन पॉवर वापरून चित्र काढायचं होतं.''
(लाल, गुल, कचू आणि वाकड्या. या दोन्ही चंदेरी माशांना घेऊन तिथे येतात.)
टीना आणि टुनटुन – ''आले सगळे. काय रे, या रडक्यांना कुठून घेऊन आलात? कसले भोकाड पसरून रडतायत!''
डॉल्फिन – ''काय रे कुठे गेला होता न सांगता. वेडे आहात का तुम्ही?''
सगळे – ''नाही सर आम्ही झाड, सूर्य बघायला वर गेलो होतो.''
डॉल्फिन – ''पण काही संकटात सापडला असता तर? जाळ्यात अडकला असता तर? किती वेळा तुम्हाला सांगितलं आहे?''
वाकड्या – ''सर, तुम्ही आम्हाला ट्रेनिंग दिलेलं आहे. जाळ्यात कसे अडकायचं नाही हे शिकवलं आहे. त्यामुळे आम्ही नाहीच जाळ्यात अडकलो.''
लाल आणि गुल – ''कालच तुम्ही आम्हाला एक सुविचार शिकवला होता. नेहमी दुसऱ्यांना मदत करावी. त्याप्रमाणे आम्ही या चंदेरी माशांना मदत केली.''
कचू – ''हे दोन्ही चंदेरी मासे रडत होते.''
लाल – ''ते दोघे खूप लांबून आलेले आहेत.''
गुल – ''वाट चुकलेले आहेत.''
चंदेरी आणि चांदी – ''आमचे आई-बाबा, काका-काकू मामा-मामी. कुणीच सापडत नाहीये. त्यांना कसं शोधायचं?''
(दोघे रडायला लागतात.)
डॉल्फिन – ''अरे अरे. रडू नका. दरवर्षी थंड प्रदेशातून समुद्रातील मासे. इकडे येतात. आणि ते या समुद्राच्या कुठल्या भागात असतात ते मला माहीत आहे.''
लाल आणि गुल – ''बघा, आम्ही म्हणालो होतो की नाही आमचे सर खूप हुशार आहेत.''
डॉल्फिन – ''आजची शाळा झाली की मी तुम्हाला तिथे घेऊन जातो. मग तिथे तुमचे आई बाबा तुम्हाला भेटतील. त्याआधी

आजचा सुविचार सांगा. कोण सांगेल?''
लाल आणि गुल - ''आम्ही सांगतो. आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांची काळजी घ्या.''
डॉल्फिन - ''अगदी बरोबर. अतिथी देवो भव. म्हणजेच. अतिथी म्हणजे पाहुणे. अतिथी हा देवासारखा असतो. त्यांना मान दिला पाहिजे.''
तारामासा - ''मग आजचे आपले पाहुणे आहेत हे चंदेरी मासे. मघाशी टिना आणि टुनटुन तुम्ही त्यांना चिडवत होता. असं चिडवायला नाही पाहिजे ना?''
डॉल्फिन - ''अगदी बरोबर. त्यांना मदत करायला हवी. चला आज आपण एक गाणे शिकू या. पृथ्वीवरील सर्व समुद्रामधील मासे हे आपले. बहीणभाऊच आहेत.''

*सागर सा*
*रेती रे*
*गलबत ग*
*मासा म*
*पडाव प*
*धरती ध*
*निळे पाणी.*
*सात सुरांचे सागरगान.*
*मिळून गाऊ. आपण छान.*
*आपुला आहे सागर हा*
*स्वच्छ सुंदर राखू या*

चांदी - ''किती छान आहे गाणं. मला खूप आवडलं.''
चंदेरी - ''डॉल्फिन सर. यू आर ग्रेट. आता तुम्ही आम्हाला आई-बाबांकडे पोहोचवाल ना.''
डॉल्फिन - ''हो हो नक्की.''
(एवढ्यात खूप मोठ्याने बोलण्याचा, आरडाओरडा केल्याचा, भांडण केल्याचा आवाज येऊ लागतो.)
डॉल्फिन - ''अरे अरे कोण आहे तिकडे? कोण ओरडत आहे? चला, चला.. छोट्या माशांनो. पलीकडे खडकामागे लपून बसा. कोणीतरी आपल्यावर हल्ला करायला येत आहे.''
(सगळे मासे लपून बसतात. आणि खूप सारे चंदेरी मासे. डॉल्फिनवर चाल करून येतात.)
चंदेरी मोठा मासा - ''कुठे आहेत आमची मुलं? आमची चांदी आणि चमचम कुठे आहेत? तुम्ही त्यांना लपवून का ठेवले आहे? आम्ही त्यांना आमच्याबरोबर घेऊन जाण्यासाठी आलो आहोत. सोडा त्यांना, सोडा त्यांना... नाहीतर आम्ही तुमच्यावर हल्ला करू.''
डॉल्फिन - ''अरे अरे. मला मारू नका. तुमचे चमचम आणि चांदी इकडेच आले, वाट चुकून. माझ्या विद्यार्थ्यांनी त्यांना मदत केली, त्यांना खाऊ दिला. उलट तुम्ही आमच्यावरच संशय घेताय.''
(खडकामागून. हळूहळू छोटे मासे बाहेर येतात. चमचम आणि चांदी. आईबाबांना जाऊन बिलगतात.)
चंदेरी - ''आईबाबा. हे सगळे मासे खूप चांगले आहेत. त्यांनी आम्हाला मदत केली. आणि डॉल्फिनसर आता आम्हाला तुमच्याकडे घेऊन येणार होते.''
चांदी - आई-बाबा, काका-काकू त्याच्याशी भांडू नका. ते खूप चांगले आहेत. आणि इथला समुद्रपण खूप छान आहे. उबदार आहे. आणि बघा बघा हे पाहा, त्या खडकामागे आम्हाला काय सापडलं आहे. किती छान आहे ना. भूक लागली आहे. खाऊ का आम्ही हे?''
(त्यांच्याकडे एक प्लास्टिकची पिशवी आहे. तिने तोंडात धरली आहे. चमचमच्या हातात एक प्लास्टिक बॉटल आहे.)
डॉल्फिन - अरे मुलांनो, तुम्ही जे काही तोंडात पकडलं आहे ते अजिबात चांगलं नाही. त्यानं आपल्याला धोका आहे. ते प्लास्टिक आहे. माणसं समुद्रामध्ये सगळा कचरा फेकतात. आणि त्याचा आम्हाला खूप त्रास होतो. त्यामुळे अशा अनोळखी वस्तूंना आपण हात लावायचा नसतो.
चंदेरी मोठा मासा - ''आम्हाला माफ करा. आम्ही उगाचच तुमचा संशय घेतला. आमच्या मुलांना तुम्ही कोंडून ठेवलं आहे असं आम्हाला वाटलं.''
डॉल्फिन - ''असं आम्ही का करू? आम्ही तर आलेल्या पाहुण्यांची काळजी घेतो. आपण वेगवेगळ्या समुद्रातले मासे असलो तरी आपण एकमेकांचे भाऊभाऊच आहोत. आपण एकमेकांत भांडायचं नाही. उलट समुद्रामध्ये जी काही संकटं असतील त्याची एकमेकांना जाणीव करून द्यायची. हा समुद्र आपला आहे. त्यामध्ये कोणीही दु:खी राहता कामा नये यासाठी आपण सर्व मिळून प्रयत्न करू.''
चंदेरी आणि चांदी - ''हो हो नक्कीच करू.''
लाल गुल - ''तुम्ही काही दिवसांनी परत तुमच्या भागात जाल. पण परत पुढच्या वर्षी याल तेव्हा आम्हाला विसरू नका. आम्हाला भेटायला नक्की या.''
चंदेरी आणि चांदी - ''हो हो नक्की येणार.''

*दोस्त मस्त आपण सारे*
*एकमेकांची काळजी घेऊ रे*
*एकमेकाला मदत करूया*
*बंधुभाव राखूया*
*सागर आमुचा विशाल सुंदर*
*त्याची सुंदरता वाढवू या.*

**- संध्या कुलकर्णी**
sandhya16360@gmail.com



नाटिका



# सुट्टीतली धमाल!

डॉ. मीरा शेंडगे

वंदू : ''चला चला मिटींगला उशीर झाला.''
संजू : ''वंदू, पण मीटिंग कशाची आहे? आणि आपण लहान मुलं काय करणार आहोत.''
सीमा : ''हेच रे ते आपलं. शशी तू सांग.''
जितू : ''अरे, आज आपली परीक्षा संपली ना. मग सुट्टीत काय काय करायचे, नवीन काय शिकायचं, असं काही असेल. त्या राजूभय्याच्या डोक्यात.''
वंदू : ''खरं आहे. राजू भैय्या आपल्यासाठी किती करतो. कधी कधी आपल्याला शाळेत सोडतो. आई-बाबा घरी नसतील तर आपली काळजी घेतो. वॉचमनकाकांनाही खूप मदत करतो.''
संजू : ''ए, पण सुट्टीत मला आजी-आजोबांकडे जायचे आहे. मी नाही हे या तुमच्या कार्यक्रमात भाग घेणार.''
वंदू : ठीक आहे ना. पण मीटिंगला यायला. तिथं काय ठरतं ते ऐकायला काय हरकत आहे.''
सीमा : हो ना, आपले कॉलनीतले इतर मित्र-मैत्रिणीही येणार आहेत. ''
अथर्व : ''मी एक धमाल प्लॅन केला आहे. आपण सगळे जण त्यात सहभाग घेऊ शकता.''
सगळेजण : ''सांग ना कोणता प्लॅन? कसला प्लॅन?''
वंदू : ''ए ऊगाच भाव खाऊ नकोस.''
अन्वी : ''नाहीतर काय? तो प्लॅनही यानं त्यांच्या दीदकडून आयता घेतला असणार. मागे नै का गणपतीत यानं विविध गुणदर्शनाचं अँकरिंग केलं, ते सगळं त्याच्या दीदीनं तर लिहून दिलं होतं.''
ओजस : ''म्हणून काय झालं. सांग रे प्लॅन तुझा.''
अथर्व : ''आपण एक पर्यावरण मंडळ स्थापू आणि कॉलनीतल्या झाडांची काळजी घेऊ.''
अन्वी : ती काही माणसं आहे का, म्हणे काळजी घेऊ!''
अथर्व : ''अग, तसं नाही ग. म्हणजे झाडांना पाणी घालणं, कोणाला झाड तोडू न देणं, जिथं जागा असेल तिथ रोप लावणं.''
ओजस : ''पाहिलस किती सोपं आहे ते.''
वंदू : ''मलापण एक कल्पना सुचली आहे. आता आपल्याला उन्हाळ्याची सुट्टी लागली आहे ना, तर आपण रोज सकाळी फिरायला जाऊ या का? सकाळी छान वातावरण असतं. पक्ष्यांची किलबिल, झाडांची सळसळ...''
सीमा : ''ओ कवयित्रीबाई, लगेच कविता नका करू.''
जितू : ''ए, कवितेवरून आठवलं. अरे, तो अभिदादा आहे ना तो सुंदर हस्ताक्षराचा क्लास घेतो. त्याच्याकडून आपण अक्षर सुधारण्यासाठी काही शिकून घ्यायला काय हरकत आहे?''
अन्वी : ''अरे, पण तो त्याची फी घेतो. पुन्हा आपल्या आई-बाबांची परवानगी...''
ओजस : ''कोणतीही चांगली गोष्ट करायला मोठी माणसं नाही म्हणत नाहीत. असं आपल्या बाई म्हणतात हे माहीत आहे ना?''
अथर्व : ''संजू तू काहीच बोलत नाही आहेस..''
वंदू : ''अरे त्याला आजोळी जायचं आहे ना गावी.''
अथर्व : ''ए, गावाला जायला वेळ आहे ना अजून. तोपर्यंत इथे आमच्यात यायला, खेळायला काय हरकत आहे?''
सीमा : ''ए, सुट्टीत आपणच ट्रिप काढली तर.''
अन्वी : ''पण आपण एकटेच कसे जाणार, आई-बाबांना तर ऑफिस असेल ना.''
सीमा : ''राजूभय्या जिंदाबाद!''
अन्वी : ''आणि पैसे! परवानगी!''
सीमा : ''अग, एक दिवसाची सहल. विज्ञानकेंद्राला भेट, सकाळी जाऊन संध्याकाळी परत. कशी आहे आयडिया?''
ओजस : ''बेस्ट! फन्टास्टिक! भारी!''
अथर्व : ''पण राजूभय्याला पटवावं लागेल.''
अन्वी : ''ते काम माझं. पण मग त्या वाचनवर्गाचं काय? निशादीदी घेणार होती ना. मस्त छान-छान गोष्टी आपल्याला



वाचून दाखवणार होती.''
वंदू : ''ते फक्त सोमवारी एक दिवस हं. तेही सकाळी, संध्याकाळी आपल्याला खेळायचं असतं...''
जितू : ''मी तर क्रिकेट क्लब जॉईन करणार आहे.''
ओजस : ''मलाही फूटबॉल खेळायला जायचं आहे. 'ग्रीन्स क्लब'ला.''
वंदू : ''ए विराट, ए मेसी, जा ना तुम्ही खेळायला, आम्ही मुली-मुली कॉलनीच्या बागेत योगासनं करणार आहोत. ओऽ, स..., म...''
अन्वी : ''हो ग हो, आपण सगळी योगासनं शिकूया. अगदी सूर्यनमस्कारापासून सुरुवात करू. शाळेत ती सई किती भाव खाते. तिला योगासनं येतात ना. आणि करून दाखवण्यासाठी बाई तिलाच घेतात.''
बंडू : ''अन्वी, हे बरोबर नाही हं. आपण योगासनं शिकू ते छानच आहे, पण सईला कमीपणा दाखवण्यासाठी नको.''
सीमा : ''आता चर्चा फार झाली आहे. पहिले सांगा, की टिम लीडर कोण होणार? एक खेळाचा प्रमुख, दुसरा इतर उपक्रमांचा प्रमुख.''
संजू : ''त्याअगोदर सुट्टीत आपण काय-काय करायचं ठरवलं आहे व काय आपल्याला जमणार आहे, याची यादी करूया का? म्हणजे मीटिंगमध्ये सांगता येईल.''
ओजस : ''मी करतो लिस्ट थांबा हं. हा कागद! हा पेन!
आईबाबांना घरात कामात मदत करणं.
सोसायटीच्या झाडांना पाणी घालणं.
सकाळी वॉकला जाणं.
योगासनं शिकणं.
सुंदर हस्ताक्षरवर्गाला जाणं.
झालं की, आणखी काही ठरलं का? आपलं?''
अन्वी : ''ते साठेकाकूंकडून श्लोक शिकणं.''
ओजस : ''साठेकाकू कशाला? आता ऑनलाइनही आपण शिकू शकतो घरच्या घरी.''
संजु : ''पण मोबाइल आपल्याला कोण देणार? सगळे किती चिडतात आपण मोबाइल घेतला तर.''
अथर्व : ''चांगल्या गोष्टींसाठी...''
सगळेजण : ''कळलं, कळलं...''
वंदू : ''झाली का यादी! छान! आता मीटिंमध्ये मजा येईल.''
संजू : ''ए मीटिंग संपल्यावर समोर आपण भेळ-पुरी खायला जाऊ या का?''
अथर्व : ''अरे, पण पैसे! ते कुठे आमच्याकडे आहेत?''
संजू : ''अरे, मी माझ्या बचतीचा बॉक्सच घेऊन आलोय. माझ्याकडून पार्टी भेळ-पुरीची.''
सगळेच : ''थॅंक्स हं संजू, तू किती भारी आहेस!''
ओजस : ''सेल्युट भावा!''
संजू : ''पण तुमचा निकाल लागला, तुम्ही पास होऊन पुढच्या वर्गात गेलात, की तुमची सगळी पुस्तकं मला द्यायची.''
सीमा : ''का रे? कशासाठी?''
संजू : ''अग, आमच्या शाळेत पुस्तकांची बँक आहे. आम्ही तिथे नको असलेली पुस्तकं जमा करतो. आमच्या बाई ती पुस्तकं गरजू मुलांना देतात.''
राजूभय्या : ''मुलांनो, पुस्तक ही आपल्याला कधीच नकोशी नसतात. उलट पुस्तक हे आपले मित्रच असतात. जी आपली सोबत कधीच सोडत नाहीत. ज्ञान देतात, माहिती देतात, आपलं मनोरंजन करतात, चांगले विचार देतात.''
संजू : ''मग ठरलं तर! हे एक! इथून पुढे वाढदिवसाला आपण गिफ्ट म्हणून एकमेकाला पुस्तकच भेट म्हणून देऊ या.
राजूभय्या : ''तुम्ही मुलं अशी शहाणी आहात ना, म्हणूनच तुम्ही मला आवडता. म्हणूनच मी ही ठरवलंय, या उन्हाळ्याच्या सुट्टीत तुम्हाला मदत करायची. सगळी मदत!''
सगळे जण : ''येस! राजूभय्या जिंदाबाद!
मजा करू अमर्याद!
खुप करू मस्ती,
घट्ट करू दोस्ती!''

**– डॉ. मीरा शेंडगे**
meerashendage010@gmail.com



नाट्यछटा



# स्वप्नांचे ओझे

## राधिका देशपांडे

काय म्हणालात? का रागावलो आहे? अहो, एक कारण असेल तर सांगू आणि फक्त मोठ्यानेच रागवायचे असते का.. आम्हालाही राग येतो की पण काय कसला राग आला एवढा? अहो, मी जन्माला आलो तो दिवस मला अगदी चांगला आठवतो आहे. तो दिवस मी कधीच विसरू शकणार नाही. मला पाळण्यात ठेवल्या ठेवल्या, पिंजऱ्यातले प्राणी बघायला जसे गर्दी करतात ना तशी गर्दी माझ्या घरातल्यांनी केली आणि त्याच वेळेला माझ्या आईने मला ॲक्टर बाबांनी, डॉक्टर आजोबांनी, इंजिनीयर आणि आजीने सिंगर बनवून टाकले होते. माझ्या एवढ्याशा खांद्यावर केवढे मोठे ओझे टाकले होते.. काय? कुठले ओझे? अहो, स्वप्नांचे. त्यांच्या स्वप्नांचे ओझे. स्वप्नं त्यांनी बघायची आणि पूर्ण आम्ही करायची. आम्ही मुले म्हणजे यांना स्वप्न पूर्ण करण्याचे मशीन वाटलो का?

त्या दिवशी माझ्या बाबांचे मित्र घरी आले होते तर त्यांनी मला विचारले, काय श्रीजय तू मोठेपणी काय होणार? मी म्हणालो नवरा. अरे तसे नाही रे, म्हणजे तू मोठा होऊन काय करणार? मी म्हणालो लग्न.. अरे बाबा तसे नाही. म्हणजे मला असे म्हणायचे आहे की तू मोठा होऊन आई-वडिलांना काय देणार? मी म्हणालो सून.. माझ्या या उत्तरावर माझे बाबा जोरात रागवले आणि चालता हो म्हणाले घराच्या बाहेर.... अरे, त्यात माझे काय चुकले? बाबांनी जे केले तेच मी करणार ना! खाण तशी माती. बाबा म्हणाले, तू माझ्या स्वप्नांची माती माती केलीस. आता त्यांची स्वप्नं पूर्ण करता करता माझी माती झाली नाही म्हणजे मिळवली...

अलीकडेच मला एक शोध लागला, की आजकालचे पिक्चर बघून आई-बाबांच्या स्वप्नांना चांगलेच खतपाणी मिळते. काय? कुठले पिक्चर? अहो, एक असेल तर सांगू दंगल, मेरी कोम, राणी लक्ष्मीबाई, आनंदी गोपाळ, एमएस धोनी, एटी थ्री, मिशन मंगल, त्या दिवशी बाबा एमएस धोनी बघून आले आणि त्यांनी मला लगेच क्रिकेटला घातले.. मला जायचेय, नाही जायचे कोणी विचारले नाही. लगेचच त्यांना मी क्रिकेटर झाल्याचे स्वप्न पडले असावे. त्यानंतर आई मिशन मंगल बघून आली आणि आईला लगेच मी सायंटिस्ट झाल्याचे स्वप्न पडले. मग काय सायन्स संडे स्कूलला माझी ॲडमिशन झाली. सूर नवा ध्यास नवा या रिॲलिटी शोमुळे तर मी सिंगर झालो होतो. माझ्या आजी-आजोबांच्या स्वप्नात त्यामुळे माझा शास्त्रीय संगीताचा क्लास सुरू झाला. बरे इथपर्यंत सगळे ठीक चालले होते, पण माझे आई-बाबा ॲक्टर होण्याचे स्वप्न बघायला लागले तेव्हा तर मी हादरलोच.. हे खूळ त्यांच्या डोक्यात कसे आले याचा शोध घेतला आणि कळले की ते नुकतेच 'आणि डॉक्टर काशिनाथ घाणेकर' पिक्चर बघून आले होते.. काय? मग काय झाले? अहो मग काय होणार. नाट्यशिबिरामध्ये माझी रवानगी करण्यात आली म्हणजे ॲडमिशन घेतली. कारण डॉक्टर काशिनाथ घाणेकरचे सुपरस्टार सुबोध भावे या पुण्यातील नाट्यशिबिरातच शिकले म्हणे.




बाबा म्हणतात, तू खूप छान क्रिकेट खेळतोस. तू सचिन तेंडुलकरच होणार.. आई म्हणते, तू ॲक्टिंग खूप छान करतोस. तू सुबोध भावेच होणार.. आजी-आजोबा म्हणतात, तू खूप छान गातोस. तू शंकर महादेवनच होणार.. पण मी म्हणालो, मला हे सगळे नाही बनायचे.. मग कधी नव्हे ते बाबांनी मला विचारले, मग तुला कोण बनायचे आहे? मी म्हणालो, मला श्रीजय देशपांडेच बनायचे आहे.. काय, म्हणजे कोण? अहो मीच...!

**- राधिका देशपांडे**

radhikadeshpande1411@gmail.com



नाट्यछटा



# असंस्कृत

**निर्मला भाटे**

एवम् सतत युक् ... काय आहे ते? हं .....युक्ताये ..... एवम् सतत युक्ताये भक्तास्... बापरे किती अवघड आहे हे! आईची ना सारखी नवीन नवीन फॅडं असतात. आता काय तर म्हणे गीता पाठांतराची स्पर्धा! मान्य आहे माझं पाठांतर चांगलं आहे, सगळं लवकर पाठ होतं माझं.... पण ज्याचा अर्थच काही कळत नाही.. ते पाठ कसं होणार?

सकाळपासून आईनं ८ वेळा आठवण केली... स्पर्धा जवळ आली आहे पाठ कर. सारखं उदाहरण देते ते शेजारच्या आर्याचं. तिनं गीतेचे दोन अध्याय पाठ केलेत. अहो पण ती मराठी मीडियम शाळेत जाते, तिच्या शाळेतच पाठांतर करून घेतात.... कदाचित त्यांच्या टीचर त्यांना त्याचा अर्थ पण सांगत असतील.... इथं आम्हाला साध्यासोप्या मराठी भाषेमध्ये लिहिलेलं नीट समजत नाही... हे मी नाही बरं का... माझी आज्जी म्हणते. ...तर अशी माझी परिस्थिती असताना... हे एवढं अवघड संस्कृत कसं पाठ व्हायचं? आणि अर्थ कळला तर माझं नक्की पाठ होईल. चला.... मस्त आयडिया मिळाली. आईला हेच कारण सांगतो, मला सगळ्या श्लोकांचा अर्थ सांग, मग पाठ करतो. मला माहीत आहे, तिलापण नक्की येणार नाही. अहो, का म्हणजे काय, तीपण इंग्रजी मीडियममधलीच! आज्जी नेहमी म्हणते... ह्या इंग्रजी शाळेत शिकलेल्यांना मराठी शब्दांचे अर्थ कळत नाहीत आणि मग काहीतरी गैरसमज करून घेतात. दोघींची वादावादी चालू असते ना, तेव्हाचं ठरलेलं वाक्य आहे हे. अहो, मजा म्हणजे, मला शाळेत घालायच्या वेळीपण इंग्रजी की मराठी मीडियम, यावरून खूप वाद झाला होता म्हणे. आज्जी आणि बाबा मराठीच्या बाजूनं आणि आई.... विरोधी पार्टी... म्हणजे इंग्रजी!

त्याचवेळी आमच्या कामवाल्या मावशीपण नेहमीप्रमाणे, काम करता करता, कान टवकारून ऐकत होत्या आणि त्यांनी त्यांची very important suggestion दिलीच. मराठी शाळेत म्हणे मुलांचं इंग्रजी फारच कच्चं राहतं म्हणून त्यांनीपण त्यांच्या मुलांना सेमी इंग्रजीमध्ये घातलं आहे. आणि इंग्रजी शाळेत मुलं खूप स्मार्ट होतात म्हणून मला पण इंग्रजी शाळेतच घालावं... मग तर काय आईची बाजू एकदम भक्कम! आणि माझी रवानगी इंग्रजी स्कूलमध्ये!

तरी आज्जी सारखी म्हणते, तुझा बाबापण लहानपणी मराठी शाळेतच गेला, तरी एवढा मोठा सर्जन झालाच ना? मग आई बाबांना ऐकू जाणार नाही, हे बघून म्हणते... पण मुलं स्मार्ट होतात इंग्रजी स्कूलमध्ये!

अरे बापरे! विसरलोच, की या स्मार्ट मुलाला १२ वा अध्याय पाठ करायचा आहे. काय म्हणता? कर की पाठ? संस्कृत पाठांतरामुळे उच्चार शुद्ध स्पष्ट होतात? हो बरोबर आहे तुमचं, आमच्या ड्रामा टीचरपण हेच सांगतात. मान्य आहे मला संस्कृत ही आपली भाषा आहे आणि ती खूप भारी आहे... वगैरे वगैरे. आमच्या शेजारचे आजोबा, सकाळी धीरगंभीर आवाजात संस्कृत श्लोक म्हणत असतात तेव्हा ऐकायला खूप छान वाटतं.

पण... मी काय करू?

अर्थ कळत नाही तर पाठ कसं करू?

थांबा, आई बोलावते आहे बहुतेक. काय ग आई? काय? शेजारचे आजोबा मला श्लोकांचा अर्थ सांगणार, आणि स्पष्ट उच्चार शिकवणार आहेत?

माझ्या मनातलं सगळं कळतं का काय हिला? तिचं आणि माझं ब्ल्यू टूथ connection एकदम strong आहे हो.

मला असंस्कृतपासून सुसंस्कृत बनवायचा पक्का decision घेतलेला दिसतोय आईनं. चला तर मग लागतो पाठांतर करायला. आता मी होणार सुसंस्कृत! आणि अगदी स्पष्ट उच्चारात संस्कृतम् फडाफडम् बोलम्!

**– निर्मला भाटे**
sandhya16360@gmail.com



# मूल्यमापनाचे मूल्यमापन

डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी

आमच्या महाविद्यालयात पर्यवेक्षकाविना परीक्षा ही कल्पना काही राबवता आली नाही. परंतु अशी परीक्षा अन्य ठिकाणी घेतली गेल्याचा उल्लेख वाचनात आला. 'जगप्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ प्रोफेसर हरबन मुखिया, जवाहरलाल नेहरू विद्यापीठात इतिहास शिकवायचे. इतिहासाच्या परीक्षेचा त्यांचा पेपर सर्वात अजब असायचा. नेहमीच्या परीक्षेसारखेच या परीक्षेतही सहा-सात प्रश्न असायचे; पण शेवटचा प्रश्न असायचा की तुम्हाला वरील प्रश्न आवडले नसतील तर तुम्ही स्वतः प्रश्न तयार करा आणि त्याचे उत्तर लिहा. आम्ही काही विध्यार्थ्यांनी असे केलंही होते. प्रश्नपत्रिका विद्याार्थ्यांना देऊन प्रोफेसर मुखिया गायब व्हायचे आणि दोन तासानंतर वेळ संपली, की ते आमच्या उत्तरपत्रिका घ्यायला यायचे.' (प्रिय मुख्याध्यापक - शंकर मुसाफिर-अनु. डॉ. प्रदीप गोटुस्कर-मनोविकास प्रकाशन, मे २०१५). तेव्हा परीक्षा कशी घ्यावी हा मुद्दा कायमच चर्चेत राहिला आहे.

जगात सर्वात आधी परीक्षा कोणी तयार केली असा प्रश्न गुगलला विचारला तर त्याचे उत्तर येते, १९व्या शतकातील हेन्री फिशेल या उद्योगपतीने पहिली परीक्षा सुरू केली. विशेषतः, त्यांना चीनमधील शाही परीक्षाप्रणालीचे श्रेय दिले जाते. सरकारी पदांवर काम करण्यासाठी योग्य उमेदवारांची निवड करण्यासाठी ही परीक्षा घेण्यात आली. या हेन्री फिशेलबद्दल फारशी माहिती मिळत नाही, पण परीक्षापद्धती सुरू केल्यामुळे इतर माध्यमांमध्ये त्याच्या नावाने यथेच्छ बोटे मोडलेली वाचायला मिळाली.

तसेच मग भारतात पहिली परीक्षा कोणी आणि कधी सुरू केली याचा तपास केला तर कळले, की भारतात ईस्ट इंडिया कंपनी आणि नंतर ब्रिटिश साम्राज्याने नागरी सेवा परीक्षा सुरू केल्या. परीक्षेने ओपन जॉब पोझिशनसाठी उमेदवारांना नामनिर्देशित करण्याची पूर्वीची प्रणाली बदलली. ही परीक्षा आजही तशीच घेतली जाते, जशी ती सरकारी विभागांमधील प्रशासकीय पदांसाठी उमेदवारांना नियुक्त करण्यासाठी होती.

सन १९८६ साली त्यावेळच्या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये परीक्षेत 'काय असावे' व 'काय असू नये' यांबाबत काही सुधारणा सुचवल्या होत्या : १. अवसर/यदृच्छा (Chance) आणि व्यक्तिनिष्ठता यांवरील भर नाहीसा करावा. २. परीक्षा केवळ विद्यार्थांच्या स्मरणशक्तीवर आधारीत नसावी. ३. वार्षिक व अर्धवार्षिक परीक्षा यांसह संपूर्ण वर्षभर चाचण्या घेण्यात येऊन अभ्यासक्रम व अभ्यासेतर क्रिया या दोन्ही अंगाने मूल्यमापन करण्यात यावे. ४. मूल्यमापनात विद्यार्थी, शिक्षक व पालक या सर्वांचा सहभाग असावा. काही विद्यापीठांनी १९८६ च्या शैक्षणिक धोरणांच्या सूचना लक्षात घेऊन अखंड अंतर्गत चाचणी घेणे, प्रश्नपेढी सुरू करणे, मध्यवर्ती मूल्यमापन पद्धती, प्रथम-द्वितीय सत्रांत परीक्षापद्धती इत्यादी मूल्यमापनाच्या दृष्टीने बदल केलेले आढळतात. परंतु हे सर्व बदल करताना परीक्षांचा मूळ ढाचा आणि उद्दिष्टे बदलले असे दिसत नाही. परीक्षा हे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक गुणवत्तेचे आणि विकासाचे मूल्यमापन करणारे एक सर्वांत महत्त्वपूर्ण तंत्र असल्याचे मान्य केलेले दिसते. अध्ययन-अध्यापनाच्या परिणामांच्या मोजमापाचे साधन म्हणजे परीक्षा असेही म्हटले जाते. मात्र प्रचलित परीक्षापद्धतीतून खरेच विद्यार्थ्याच्या ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक गुणवत्तेचे आणि विकासाचे मूल्यमापन होते का, हा मूळ प्रश्न आहे. त्याचे उत्तर नकारार्थी मिळत असल्याने परीक्षापद्धतीत बदल करणे अपेक्षित आहे.

मूल्यमापन आणि परीक्षा हे समानार्थी शब्द वाटत असल्यानेही विद्यार्थ्यांच्या मनात खूप गोंधळ झाला आहे. सहसा मुलांना परीक्षेसाठी शिकायचे, अभ्यास करायचा म्हटले की त्या शिकण्याचेच ओझे वाटू लागते. कुतूहल वाटते म्हणून, व्यक्तिमत्त्वविकास करायचा म्हणून, नवीन ज्ञान मिळवायचे म्हणून, वास्तवाला यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी म्हणून अशी जी शिक्षणाची उद्दिष्टे आहेत ती बाजूलाच पडतात आणि परीक्षेतल्या गुणांवरच फक्त विद्यार्थ्याचे मूल्यमापन केले जाते. मुलांना परीक्षा न आवडण्याची कितीतरी कारणे सांगता येतील, उदाहरणार्थ,

१) कामगिरी करण्यासाठी एकमेव संधी असल्याने आता नाही

तर कधीच नाही असा दबाव.

२) परीक्षेतले यश ही भविष्य घडविण्याची एकमेव संधी वाटत असल्याने अपयशाची भीती.

३) परीक्षेच्या निकालावर अनेक गोष्टी अवलंबून असल्याने त्यावर लावलेले उच्च दावे- stakes

४) ग्रेड, मार्क याला अवाजवी महत्त्व, परीक्षेत मार्क कमी पडले की विद्यार्थी 'ढ' गटात कायमचा ढकलला जातो.

५) या सगळ्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांच्यावर येणारा तणाव व वाटणारी चिंता परीक्षा नकोशी करतात.

६) सदोष चाचणी पद्धतीमुळे विद्यार्थ्याचे नेमके कोणते गुण वा वर्तन पारखायचे आहे त्याची स्पष्टता नसते.

७) परीक्षेकडे ती जणू प्रगतीची एकमेव संधी आहे असे बघितले जात असल्याने परीक्षा हुकली किंवा अपयश आले तर पुन्हा संधी नाही असे वाटून निराशा निर्माण होते.

८) यशस्वी होणे अनिवार्य असल्याने फसवण्याच्या अनेक क्लृप्त्या योजल्या जातात आणि फसवणूक संस्कृतीत झपाट्याने वाढ होताना दिसते.

९) या सगळ्यामुळे फक्त परीक्षेतली प्रश्नउत्तरे आणि त्यांना मिळणारे गुण यावरच भर देत असल्याने खरे शिक्षण दूरच राहते, वास्तविक शिक्षणाकडे दुर्लक्ष होते आणि शिकण्याचा मूळ हेतूच साधला जात नाही.

सन १९८०च्या दशकात बारावीच्या महाराष्ट्र बोर्डाच्या इंग्रजी पाठ्यपुस्तक-युवक भारतीमध्ये- 'रिफंड' नावाची फ्रित्झ कॅरींथी या हंगेरिअन नाटककाराची एकांकिका समाविष्ट केली होती. नाटकाचे कथानक वॅसरकॉफ नावाच्या माणसाभोवती फिरते, जो १८ वर्षांनंतर त्याच्या शाळेत परत येतो आणि त्याने भरलेल्या शिकवणीशुल्काचा परतावा मागतो. तो दावा करतो की शाळेने त्याला काहीही शिकवले नाही म्हणून आता तो बेरोजगार आहे आणि तो सगळ्याच बाबतीत अयशस्वी ठरला आहे. तो शाळेच्या मुख्याध्यापकांना आणि शिक्षकांना आव्हान देतो की त्यांनी त्याची पुन्हा परीक्षा घ्यावी आणि तो नापास झाला तर त्याला त्याचे पैसे परत मिळावेत. मुख्याध्यापक आणि शिक्षक त्याच्या या मूर्खपणाच्या विनंतीमुळे हैराण होतात, संतापतात. तरीही पुन्हा त्याची परीक्षा घ्यायचे कबूल करतात. विज्ञानाचे, भूगोलाचे, भाषा विषयाचे शिक्षक त्याला अगदी सोपे प्रश्न विचारतात. इतकेच काय त्याला उत्तरे सांगण्याचाही प्रयत्न करतात. परंतु वॅसरकॉफ त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला जाणीवपूर्वक चुकीची उत्तरे देतो. तो अयशस्वी झाला तर त्याला त्याच्या फीचा परतावा मिळेल अशी त्याला आशा असते. दुसरीकडे, शिक्षक त्याची उत्तरे फिरवून आणि ती बरोबर असल्याचे दाखवून त्याच्यापेक्षा हुशार बनण्याचा प्रयत्न करतात. ते त्याच्या शिष्टाचार, देहबोली, संस्कृती, सजगता, चिकाटी, तर्कशास्त्र आणि महत्त्वाकांक्षा यासाठी त्याची प्रशंसा करतात. आइनस्टाइनचा सापेक्षतासिद्धांत, फ्रॉइडचा मनोविश्लेषण सिद्धांत आणि डार्विनचा उत्क्रांतीसिद्धांत यासारखी स्पष्टीकरणे देऊन त्याच्या हास्यास्पद उत्तरांचे समर्थन करण्यासाठी विविध युक्त्या आणि सिद्धांत वापरतात. शेवटी गणिताच्या शिक्षकांची प्रश्न विचारण्याची पाळी असते. ते वॅसरकॉफला सांगतात की ते त्याला दोन प्रश्न विचारणार आहेत, एक सोपा आहे, एक अवघड आहे. कोणता आधी विचारू असे म्हटल्यावर वॅसरकॉफ सोप्या प्रश्नाची निवड करतो. त्या प्रश्नाचे त्याचे उत्तर चुकले असे शिक्षक जाहीर करतात व त्याला शाळेकडून किती परताव्याची रक्कम अपेक्षित आहे असा सवाल करतात. वॅसरकॉफ अगदी रुपये, आणे, पै याचा चोख हिशोब सादर करतो. गणिताचे शिक्षक सांगतात की हा त्यांचा अवघड प्रश्न होता व त्यात वॅसरकॉफने उत्कृष्ट कामगिरी केली असल्याने, शाळेने त्याला व्यवस्थित शिकवले हे सिद्ध होते. त्यामुळे शाळा त्याचे कोणतेही देणे लागत नाही. अशा प्रकारे वॅसरकॉफ हा पुनर्परीक्षेत अव्वल मार्क मिळवून उत्तीर्ण झाल्याचे जाहीर करतात व त्याची बोळवण करतात.

हे नाटक १९३८ साली लिहिले गेले. म्हणजे त्यावेळीही मूल्यमापन आणि शिक्षणाची परिस्थिती आजच्यासारखीच होती म्हणायचे. विद्यार्थ्यांना त्यांच्या वास्तविक जीवनासाठी आणि करिअरसाठी तयार करण्यात अयशस्वी ठरलेल्या शिक्षणव्यवस्थेवर यामध्ये एक विनोदी पण बोचरी टीका आहे. विद्यार्थ्यांच्या शिकण्यापेक्षा स्वतःच्या प्रतिष्ठेची चिंता करणाऱ्या शिक्षकांचा ढोंगीपणा आणि अप्रामाणिकपणाही त्यातून उघड होतो. शिक्षणाचे मूल्य आणि हेतू काय आणि शिक्षण म्हणजे काय असे प्रश्नही या नाटकातून उपस्थित केलेले आहेत. 'रिफंड' ही एकांकिका विनोदी संवाद, प्रसंग आणि उपरोधिक वळणांनी भरलेली असली तरी तिने निर्माण केलेले शिक्षणव्यवस्था आणि परीक्षापद्धती याबद्धलचे प्रश्न अत्यंत गंभीर आहेत.

'असर' म्हणजे ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन. भारतातील शिक्षण क्षेत्रात गेल्या दशकभराहून अधिक काळ काम करत असलेली 'प्रथम' ही स्वयंसेवी संस्था शैक्षणिक सर्वेक्षण करून अहवाल प्रसिद्ध करते. 'असर २०२३-२०२४'च्या अहवालात महाराष्ट्राच्या शैक्षणिक स्थितीविषयी म्हटले आहे-

- ६८% विद्यार्थ्यांना भागाकार करता आला नाही.
- २१% विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील परिच्छेद वाचता आला नाही, जो दुसरीतल्या विद्यार्थ्यांनी वाचणे अपेक्षित आहे. यात आणखी धक्कादायक हे, की दुसरीतल्या मुलांना वाचता आले नाहीच, पण आठवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनाही समाधानकारक रितीने वाचता आले नाही.
- ३९% विद्यार्थ्यांना इंग्रजीतील सोपी वाक्ये वाचता आलेली नाहीत.
- स्मार्ट फोनचा वापर अभ्यासापेक्षा मनोरंजनासाठीच होताना दिसला.

एकूणच देशातली परिस्थिती ही फारशी उत्साहवर्धक नसल्याचे 'असर'ने नमूद केले आहे. अर्थात या सर्वेक्षणात

काही त्रुटी असल्याचे समोर आले आहे. उदाहरणार्थ, सदोष कार्यपद्धती, अपुरा सॅम्पल साइज, सर्वेक्षणात भौगोलिक आणि सामाजिक असमानतेला विचारात घेतलेले नाही, इत्यादी, असे असले तरी सर्वेक्षणाचा अहवाल प्रत्येक वर्षाच्या अहवालासारखा राज्यातली आणि देशातली शिक्षणाची विदारक परिस्थितीच कथन करतो हे खरे आहे. पस्तीस टक्के मार्क मिळाले की विद्यार्थी पुढील इयत्तेत जातो. म्हणजे जे शिकवले त्यातील फक्त पस्तीस टक्केच आत्मसात केले असा अर्थ होतो व पुढील इयत्तेत बसायला इतके पुरेसे आहे असे समजतो. प्रत्यक्ष जगताना ही अशी टक्केवारीने कोणत्याही बाबीची पूर्तता केलेली चालत नाही. पस्तीसच टक्के पोळी-भाजी, स्वयंपाक, करायला शिकून तो पस्तीस टक्केच जमलेला स्वयंपाक खायची पाळी आली तर कसे होईल? प्रत्यक्ष जगताना सगळे काही शंभर टक्केच लागत असेल तर शिक्षणात तेवढी पासष्ट टक्क्यांची सूट/तडजोड का बरे?

म्हणूनच शिक्षण परिणामकारक बनवायचे असेल तर परीक्षापद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

नुकतेच वाचनात आले की येत्या वर्षापासून काही शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर इयत्ता नववी ते बारावी च्या विद्यार्थ्यांसाठी गणित, इंग्रजी आणि विज्ञान या विषयांसाठी सी.बी.एस.ई. बोर्डने खुली परीक्षापद्धती (Open Book) राबवायचे धोरण स्वीकारले आहे. वरवर बघता ही पद्धत विद्यार्थ्यांना परीक्षेच्या सध्याच्या ताणापासून दिलासा देणारी वाटत असली तरी या पद्धतीमध्ये वापरले जाणारे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वेगळे असणार आहे. पारंपरिक परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीचे परीक्षण होत असे. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्याची संकल्पना समजल्याची, विचार करण्याची, परस्परसंबंध जोडता येण्याची, विश्लेषण करण्याची, समीक्षण करण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता तपासली जाणार आहे. त्यामुळे परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांची तयार उत्तरे उपलब्ध असणार नाहीत जी मुले लीलया उतरवून काढू शकतील. आणि या प्रश्नपत्रिकेच्या उत्तरांना शंभर टक्के मार्कच मिळवावे लागणार, पस्तीस टक्क्यांचा हिशोब कालबाह्य होणार.

असा प्रयोग परदेशी विद्यापीठांमध्ये यशस्वीपणे राबवला जातो आहे. आपल्याकडे पूर्वीही असे प्रयोग झाले होते, आणि काही संस्था उदाहरणार्थ, आयआयटीमध्ये आजही होत आहेत. येणारा काळ तर अधिकच आव्हानात्मक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि त्याच्या मदतीने गुगल, सिरी, अलेक्सा, गुगल असिस्टंट, बिक्स्बी, यास्पर, चॅट जीपीटी, अशा डिजिटल असिस्टंट यांच्याकडून होणारा माहितीचा महास्फोट आपल्या विद्यार्थ्यांना तारून नेतो की त्यांना गुदमरून टाकतो, त्यांची चिकित्सक वृत्ती जागृत ठेवतो की ज्ञान आणि माहितीच्या भव्यतेने त्यांना कोमेजून टाकून गलितगात्र करतो हे काळावर सोडून चालणार नाही. या सगळयाला योग्य त्या अभ्यासक्रमाची आणि शिकण्यातल्या बदलत्या पद्धतींची जोड आवश्यक असणार आहे.

एका बाजूला राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा अंगीकर करून आपण हे प्रयोग विद्यार्थ्यांचा स्वयंआकलनाला, बुद्धीला, विचारशक्ती आणि स्वतंत्र प्रतिभेला चालना देणाऱ्या पद्धतींचा स्वीकार करायला हवा असे म्हणताना,

'आजीआजोबांचीही होणार परीक्षा : उल्लास - नवभारत साक्षरता कार्यक्रमातर्गत १७ मार्चला चाचणी'

अशा मथळ्याखाली ही बातमी वाचनात आली. त्यात लिहिले होते,

'देशातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसित करून देशातील असाक्षर व्यक्तींमध्ये महत्त्वपूर्ण जीवनकौशल्ये विकसीत करण्यासाठी या पद्धतीच्या परीक्षांचा वापर केला जात आहे. केंद्रशासन पुरस्कृत 'उल्लास'-नवभारत साक्षरता कार्यक्रमात (Ullas-Nav Bharat Literacy Programme-Understanding of Lifelong Learning for All in Society- ज्याला प्रौढ साक्षरता असे नाव पूर्वी होते), पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (Numeracy Assessment Test) येत्या रविवारी १७ मार्च रोजी महाराष्ट्रासह देशातील तेवीस राज्यांत होणार आहे. राज्यात आतापर्यंत ६ लाख २० हजार इतक्या असाक्षरांची ऑनलाइन नोंदणी (Online Registration of Illiterates) केंद्रशासनाकडे झाली असून त्या सर्वांची १७ मार्च २०२४ रोजी परीक्षा घेण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. त्यामुळे नातवंडांसह आता आजी-आजोबाही परीक्षा देणार असल्याने अभ्यासात मग्न आहेत... पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणीची प्रश्नपत्रिका ही पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याच्याशी संबंधित तीन भागांमध्ये विभागलेली असून एकूण १५० गुणांची आहे. अनुक्रमे (वाचन) ५० गुण, (लेखन) ५० गुण, (संख्याज्ञान) ५० गुण असे आहेत. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागासाठी ३३ टक्के (१७ गुण) अनिवार्य आहेत व एकूण १५० गुणांपैकी ३३ टक्के (५१ गुण) अनिवार्य असतील. ही परीक्षा विहित निकषानुसार उत्तीर्ण झाल्यानंतर नवसाक्षरांना केंद्रशासनाकडून प्रमाणपत्र/गुणपत्रक देण्यात येणार आहे. (https//eduwarta.com-15 मार्च २०२४)

बॅक टू स्क्वेर वन! सापशिडीत ९९ व्या अंकाच्या चौकोनात पोहोचून सापाच्या तोंडातून पहिल्या चौकोनात परत आल्यासारखे वाटले! ज्ञानेश्वरमाऊलींनी मोक्षपटाची रचना करून आपल्याला परिचित असलेल्या सापशिडीची निर्मिती केली. त्या पटातील शेवटचे घर मोक्षाचे! इथे शिक्षणाच्या सापशिडीमध्ये कपाळमोक्षाचे घर शंभराव्या चौकोनात असू नये एवढीच आशा!

**- डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com




# नोबेल? त्यात काय मोठे? डोरिस लेसिंग्ज

संजीवनी खेर

सन २००७ ह्या वर्षीचं साहित्याचं नोबेल पारितोषिक ब्रिटननिवासी डोरिस लेसिंग हिला मिळालं. साहित्यासाठी नोबेल मिळवणारी ही अकरावी महिला. वयानं सर्वांत अधिक म्हणजे ८८ वर्षं वय असलेली; ही झुंजार, निडर साहित्यिक. एकापरीनं ती स्वैर जीवन जगली. मनात आलं, जे पटलं, ते केलं. त्यात दैहिक आकर्षणापासून राजकीय आकर्षणापर्यंत कशालाही अस्पर्श ठेवलं नाही. परंतु ह्या सर्वाचा न्यायनिवाडा कुणाला तिनं करू दिला नाही. कारण तिनं जे काही केलं, जशी काही वागली; त्याचे जे सामाजिक, वैयक्तिक वा राजकीय परिणाम होतील ते सोसायची वा सहज स्वीकारायची तिची तयारी होती. ती कधी त्याबद्दल रडत बसली नाही वा कुढली नाही. कठोर वैचारिक विचारसरणीला अनुसरून तिनं त्या वागण्याचा अर्थ लावला. त्यातून तिची अनेक तर्कनिष्ठ विचारांची पुस्तकं निर्माण झाली. तिला नोबेल पारितोषिक जाहीर झालं तेव्हा ती बाजारात गेली होती. घरी येताच तिनं पाहिलं की घराभोवती पत्रकार नि चॅनेलवाल्यांचा गराडा पडलेला होता. त्यांच्याकडूनच तिला बक्षिसाबद्दल कळलं. त्यावर प्रतिक्रिया विचारता तिनं खास ब्रिटिश पद्धतीनं म्हटलं, ''काय वाटायचंय त्यात? तीस वर्षांपासून ते बक्षीस मिळाल्याच्या बातम्या यायच्या, अखेर आलं. एवढंच एक बक्षीस मिळायचं राहिलं होतं म्हणा, तेही मिळालं. झालं!''

तिच्या कादंबऱ्या नि कथा ह्यात तिनं आताच्या झिंबाब्वेमध्ये (ऱ्होडेशिया) भोगलेलं जीवन लिहिलं. तिचं बालपण जुना पर्शिया - आताचा इराण- ऱ्होडेशियानंतर ब्रिटन अशा भ्रमंतीत व्यतीत झालं. तिथं जे मानवी स्वभावाचे नमुने, राजकीय दडपशाही नि वर्णसंघर्षाचं चित्र तिला दिसलं. त्यानं एक आकर्षक कथारूप, कादंबरी रूप घेतलं नि रसिकांना तिच्या लेखनाची ओढ वाटू लागली.

लेखनकर्मी व्यक्तीच्या प्रतिभेचा मागोवा घेताना त्या व्यक्तीच्या कुटुंबाचा नि परिसराचा विचार करणं स्वाभाविक




डोरिस लेसिंग्ज

असतं. कारण लेखन कितीही वैश्विक झालं तरी लेखनाच्या मनोभूमीला खतपाणी मिळतं ते अनुभवातूनच. त्यामुळेच लेखिकेचं बालपण, तिच्यावर संस्कार झालेल्या बाबी यांची नोंद घेणं रसिकाला अत्यावश्यक वाटतं. कारण अनेकदा कथांतील माहोल हा घरगुती, साध्या अनुभवातून तयार होतो नि तो एक सार्वत्रिक अनुभव कसा होत जातो हे पाहणं अत्यंत रहस्यमयी बाब असते. तिच्या कादंबऱ्यांत तर तीव्र बुद्धिवाद, राजकीय तत्त्वज्ञान आणि अनुयायांचे काटेकोर विश्लेषण, वैचारिक जग नि संसारी जग यांच्या कात्रीत सापडलेल्यांची तडफड ती नेमकेपणानं टिपते.

तिचा जन्म २२ ऑक्टोबर १९१९ रोजी खेमनशाह - इराण इथे झाला. वडील बँकेत कारकून होते. तिचं माहेरचं नाव होतं डोरिस मे टेलर. आईवडील दोघंही टिपिकल ब्रिटिश. जहाल, तुसड्या जिभेचे. तो वारसा डोरिसला पुरेपूर मिळाला

आहे. त्यानंतर अधिक उत्तम आर्थिक जीवनासाठी तिच्या आईवडिलांनी ऱ्होडेशियाला मक्याची शेती करायचा निर्णय घेतला. एक हजार एकर जमिनीवर मक्याची शेती सुरू झाली नि लहानग्या डोरिसला, ब्रिटिश वसाहतवादाचं रूप दिसू लागलं. आई टिपिकल ब्रिटिश असल्यानं शिस्तीला ती सतत प्राधान्य देत होती. वागायचे कसं, बोलायचं कसं नि कुणाशी, मेजवान्यांत कसं वर्तन असले पाहिजे ह्याबाबत ती फार दडपणं आणत असे, त्या उच्चभ्रू जीवनात आई मग्न होती. लेकीला वळण लागावं म्हणून सॅलिस्बरीला धाडलं गेलं. लेकीला धार्मिक संस्कार व्हावेत म्हणून मठातही ठेवलं. तिथे नन्सनी स्वर्गनरकाच्या गोष्टी सांगून नरकाच्या भीतीनं नीट वागण्यावर भर दिला. लेक सरळमार्गी व्हावी ही आईची इच्छा पूर्ण होण्याची शक्यता अधिकच मावळत गेली. ह्या सर्वांचा उबग येऊन डोरिसनं शाळाच सोडायचं ठरवलं. खरं तर ह्या संकटातून सुटका करून घ्यायची म्हणून तेराव्या वर्षी तिनं शिक्षणच सोडलं. घरी राहून ती अभ्यास करी. घरी लंडनहून खूप पुस्तकं येत असत त्यामुळे तिची जिज्ञासा चाळवली गेली नि भरपूर वाचन ती करत सुटली. ह्याचा परिणाम तिच्या विचारशक्तीवर, भाषाशैलीवर झाला. ती म्हणते लेखिका व्हायचं ह्या उद्देशाने ती वाचत नव्हती तर भोवतालच्या काचणाऱ्या वातावरणातून सुटका करून घेण्यासाठी तिला हे काल्पनिक जग आवडू लागलं. आईच्या शिस्तीविरुद्ध तिच्या मनानं बंड केलं नि वयाच्या पंधराव्या वर्षी तिनं घर सोडलं. कुठंही मिळेल ते काम ती करू लागली. सुदैवानं ती घरगुती मदतनीस म्हणून काम करत होती. तिथली स्त्रीही वाचनप्रेमी होती. त्यामुळे तिथं तिची भूक भागू लागली. तिला तिच्या वडलांनी दुसऱ्या महायुद्धात भोगलेल्या काळाबद्दलही खूप समजत गेलं नि ती अस्वस्थ होत गेली. साऱ्या जगाला दुःख नि वेदनांच्या गर्तेत नेणाऱ्या महायुद्धाचे पडसाद तिच्या लेखनात उमटू लागले. महायुद्धानं आपलं जीवन भकास केल्याचं नि सर्वांनाच युद्धाभिमुख केल्याचं हतबल करणारं वास्तव तिला दिसत होतं. युद्धात लढताना तिच्या वडलांनी एक पाय गमावलेला होता. ऱ्होडेशियातील शेतावरील जीवन तिच्या दृष्टीचं कमालीच्या नरकयातना देणाऱ्या एकाकीपणाचं होतं.




तारुण्यातील शारीरिक आकर्षणाच्या काळात तिनं ती जिथं काम करत होती तेथील एकाशी प्रेम केलं. आवेग ओसरला नि लक्षात आलं की त्याला हे झेपणार नाही. तिचे स्वैर जीवनाबद्दलचे अनुभव साहित्यात एक स्वभाव विश्लेषणाच्या आधारानं येत जातात. फ्रॅंक विज्डमशी विवाह झाला. नंतर दोन मुलं झाली पण ती अधिकाधिक अस्वस्थ होत गेली. चारच वर्षांत लग्न नि त्यानंतर आलेली बंधनं यांमुळे तिचा भ्रमनिरास झाला. ती वेगळी झाली. ती म्हणते, ''अनेक बुद्धिवादी स्त्रियांचा विकास लग्नानंतर थांबतो. मुलंबाळं, घर, संसार ह्यांत त्यांची ऊर्जा खर्च होते नि मग वैचारिक कृतीला जे धैर्य नि वेळ लागतो तो शिल्लकच राहत नाही. मग ती वैतागत जाते. आपली काय होण्याची नि करण्याची शक्यता आहे (शालेय जीवनात स्वतःच्या ताकदीबद्दलच्या ज्या कल्पना आकारत गेलेल्या असतात. त्यांना वास्तवात काहीच किंमत राहिलेली नसते.) याबाबत तिचा भ्रमनिरास होतो. अशा प्रकारे अख्खी पिढीच अशा सापळ्यात पडते.'' ती जिथं काम करत होती तेथील स्त्री ही राजकीय विचारांनी भारलेली होती. त्यामुळे तिने डोरिसला राजकीय परिवर्तनाच्या दिशेने नेणाऱ्या साम्यवादी विचारसरणीचा परिचय करवला.

सॅलिस्बरीलाच ती घर सोडून वेगळी राहू लागली नि डाव्यांच्या बौद्धिक चमकीनं ती भारावली. वाद घालणं, विचारांचा कस लावून पाहणं, जागतिक स्थितीचा नि सामान्यांच्या जीवनावर होत असलेल्या परिणामांचा विचार ती करू लागली. ह्याच काळात तिनं साम्यवादी विचारांच्या ओढीनं साम्यवादाचा अभ्यास केला. त्या लोकांत वावरू लागली. पण थोड्याच काळात तिला त्यातील फोलपणा जाणवला. दरम्यान तिनं गॉटफ्राइट लेसिंग नामक साम्यवाद्याशी विवाह केला होता नि आणखी एका मुलाची आईही झाली होती. परिणाम? तिनं गॉट फ्राइटला घटस्फोट देऊन मुलासह ब्रिटन गाठायचा निर्णय घेतला. त्यावेळी तिच्याबरोबर मुलासह एका कादंबरीचं बाडही होतं. 'ग्रास इज सिंगिंग' ज्यात तिनं वांशिक भेदामुळं विभक्त झालेलं प्रेम नि वांशिक द्वेषाचे बळी ठरलेले लोक यांची कहाणी रेखाटली होती. ह्या पहिल्याच कादंबरीची खूप प्रशंसा झाली. त्यानंतर तिनं मागे वळूनच पाहिलं नाही. तिच्या नावावर आजवर साठहून अधिक पुस्तकं आहेत. ह्यात नाटकं, कविता, कथा आहेत. त्यात पंचवीसहून अधिक कथानकांत आत्मपर लेखन आहे. ज्यात आपल्या बिनधास्त जीवनाचे पैलू तिनं मांडले आहेत.

ह्या कादंबरीपासूनच तिचं साहित्यिक म्हणून अस्तित्व आकाराला येऊ लागलं. १९०१ पासून अल्फ्रेड नोबेलनं ह्या पारितोषिकांची योजना आखली. त्यात साहित्यिक स्त्रियांची संख्या कमीच राहिली आहे. काळ्या खंडातील वेदना टिपणाऱ्या गोऱ्या नदीम गॉर्डिमियरला नोबेल मिळालं. कृष्णवर्णियांच्या व्यथा समर्थपणे टिपणाऱ्या टॉनी मॉरिसन ह्या

कृष्णवर्णियांच्या साहित्यिकेला नोबेल मिळालं. एका रंगाची वेदना ह्या मंडळींनी जगाला सांगितली. त्यातील काही गोरे तर काही काळे होते. डोरिसच्या लेखनाला वैचारिक चर्चेचा धागा आहे. माणुसकीनं गदगदलेल्या तिच्या कादंबऱ्या त्यामुळेच रुक्ष होत नाहीत. राजकीय दृष्टीकोनानं तिचं लेखन हे समाजातील दुःखाला प्रश्न विचारू शकतं नि सर्वस्वी माणसांना दोष न देता, ही जी जीवनशैली आचरणात येत आहे त्यामुळे मानवतेचं किती नुकसान होतंय हे ती दाखवून देते. संस्कृतिसंघर्ष, वसाहतवादाची दंडेली, कृष्णवर्णियांचा सांस्कृतिक वारसा यांची जाणूनबुजून झालेली पायमल्ली यांतून मानवी मनाचे पदर उलगडत जातात.

दक्षिण आफ्रिकेतील तिच्या वास्तव्यात तिनं जे स्पष्ट नि परखड विचार मांडले त्यामुळे तिच्यावर देश-निष्कासनाची वेळ आली. महायुद्धानंतर बहुसांस्कृतिक जीवन जगात स्थिरावू लागले होते. त्याची चाहूल डोरिसच्या लेखनातून मिळू लागली. व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि सामूहिक हिताचा संघर्ष तिच्या लेखनात प्रकर्षानं येतो. तिच्या १९५०-६० च्या दरम्यान लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांत ह्या घटनांचं प्रतिबिंब दिसतं. काळ्यांची होत असलेली मानहानी नि गोऱ्यांचा उन्मत्तपणा यांचे चित्रण त्यात दिसतं. 'चिल्ड्रेन ऑफ व्हॉयलन्स' ह्या कादंबरी मालिकेतून ती हेच मांडू पाहते.

ढोबळमानानं तिच्या कादंबऱ्यांचे तीन भाग करता येतील. एकात तिचं विचारविश्व हे मानसशास्त्रीय विश्लेषणातून जातं, दुसरं साम्यवादी विचारांच्या अंगानं जातं तर तिसरं सुफी विचारप्रवाहातून जातं. संस्कृतीच्या लढ्यात गोऱ्यांची हडेलहप्पी तिला असहनीय वाटते. अनेक कथा-कादंबऱ्यांतून ती आपल्या वैयक्तिक आठवणीच जाग्या करत असते. तिच्या लेखनाचा काळ हा स्त्रियांनी माणूस म्हणून जगण्याचं भान येण्याचा होता. तिची मतं ही माणूसपणाची जाणीव होत असलेल्या, राजकीय ध्येय असलेल्या तत्कालीन आधुनिक स्त्रियांविषयी होती. पण तिनं फेमिनिस्ट हा टिळा लावून घ्यायला नकार दिला होता. कारण त्या मंडळींचे विचारही हवेतील आदर्शवादी होते, अवास्तव आहेत. आपल्याला कुठेही बदल आलेले दिसत नाही. तरीही तिचा विचार नि आचार स्त्रीवाद्यांना आपली तत्त्वं पुढे नेणारा वाटत राहिला. १९८५ साली तिची 'गुड टेररिस्ट' ही कादंबरी आली. त्यात तत्त्वं नि ती प्रत्यक्षात आणायचे मार्ग यांची चर्चा ती करते. ती तरुण स्त्री काही वैध कारणांसाठी अतिरेकी बनते. तिला ती सिस्टमच कसं पेचात पकडते याचं प्रभावी चित्रण आहे. तिच्या घराच्या तळघरातच बॉम्ब लपवलेले असतात. अनेकदा सिस्टम तिला वापरते. जे कदाचित आजच्या माहोलमध्ये अधिक जवळचे वाटेलसं आहे. 'ती घरातल्या पडद्यांना नैतिक वा राजकीय तत्त्वांपेक्षा अधिक महत्त्व देतेय' असं एखादी जहाल तत्त्वनिष्ठ स्त्री म्हणते तेव्हा ती इतर सर्वांचा एकप्रकारे निषेधच करत असते. त्याकाळी स्वकडे पाहू लागलेल्या स्त्रियांना घर हे आपल्या स्वसाठी कैदखाना असल्याचे वाटल्यास नवल नाही. संपूर्ण समाजाची ह्या प्रश्नाकडे पाहायची दृष्टी बदलत गेली. नि स्त्री नि स्वत्व हे आकारत गेले. पण मूळ झगडा कायमच राहिला. संसारी मन नि क्रांतिकारी मन यांचा संघर्ष स्त्रीला वा कदाचित पुरुषांनाही डाचत असलेच ह्याची जाणीव ह्या कादंबरीतील स्त्रीची द्विधा मनःस्थिती वाचून येत जाते.

तिनं ऱ्होडेशिया सोडला नि एकटीच तिसऱ्या मुलाला घेऊन ब्रिटनला राहायला गेली. त्याबद्दल अनेक जण तिला स्वकेंद्रीत म्हणून हिणवतात. पण वर्णद्वेषी देशात राहणं नि सतत अन्याय पाहणं किती अशक्य होतं, हे कुणाला सांगून कळण्याजोगं नाही. वेड लागायची अवस्था होती. वास्तविक आपण असा निर्णय तडकाफडकी कसा घेतला हेच तिला आठवत नव्हतं. कारण हातात काहीही नसताना तिनं हा अत्यंत वेदना देणारा निर्णय घेतला. ती म्हणते की जगाला काही सांगायचं, शिकवायचंय असं म्हणून काही लिखाण होत नाही. स्वानुभवाच्या, आत्मशोधाच्या कथनातूनच वास्तवातलं सत्य समोर येतं. लहानपणी घरात बिथोवेन आणि चॉपिंग ह्या क्लासिकल संगीतकारांचं संगीत आई पियानोवर वाजवत असे नि बाहेर मैदानातून आफ्रिकन लोकांच्या ड्रमचे आवाज येत असत. ह्या दोन संस्कृतींचा मनोमिलाफ कधी होईल की नाही याचं दुःख तिच्या मनात खदखदत होतं. नि त्यानंतर वर्णद्वेष निवळल्यावर तिला सन्मानानं तिथं बोलावलं गेलं.

मानवी मनाच्या विशाल जगातील काही खंड दाखवायचं अवघड काम तिच्या लेखणीनं केलं आहे. 'द फिफ्थ चाइल्ड'मध्ये एका सीध्यासाध्या घरात जिथं, भावनिक, नैतिक निष्ठा माणसं कसोशीनं पाळत होती त्या घरातील स्त्रीला पाचव्या वेळी दिवस जातात. परंतु जन्माला आलेलं मूल हे दैत्यवृत्तीचं असतं. त्याला आपलंसं करणं, त्याच्यावर प्रेम करत त्याची काळजी घेणं ह्यात त्यांच्या सुखी संसाराचा बोजवारा कसा उडतो हे दाखवताना मानवी मनाचा शोध ती घेत असते. 'मेमॉयर्स ऑफ ए सर्व्हायव्हर' ह्यातही आपल्या गतजीवनाबरोबरच एक आत्मशोधाचा आंतरिक प्रवासाचा शोध ती घेत आहे. न्यूक्लियर युद्धानंतरची भीषण अराजक स्थिती वर्णन करून त्यातील मध्यमवयीन नायिका एका तरुणीची जबाबदारी स्वीकारते. तिची मूल्यमान्यता व्हिक्टेरियन आहे पण जग हे रस्त्यावरच्या गुंडांच्या ताब्यात गेलेलं आहे. तिथले नियम वेगळेच आहेत ह्या भयंकर स्थितीशी सामना करत ती कशी जगते याचा वेध तिनं घेतला आहे. 'अंडर माय स्कीन'मधील स्त्री ही सतत प्रस्थापितांविरुद्ध सामना करत असते. एका सृजनशीलाचं मन जे सामाजिक बंधनांना धडका देतं, तडजोड करत नाही, आपल्याला जसं वाढवलं गेलं


त्याबद्दल बंड करतं, जगाकडे कठोरपणे पाहातं, स्पष्टपणे चांगल्या-वाईटचा वेध घेतं तरीही माणुसकीचा दोर हातातून सुटू देत नाही. कारण युद्ध, वसाहतवाद, वंशवाद, भेदाभेद ह्यांनी समाजाची वेदना सतत वाढत राहिली आहे.

'गोल्डन नोटबुक' ह्या कादंबरीत तिनं निवेदनाची एक अनोखी शैली मांडली आहे. एका स्त्रीचा वैचारिक, भावनिक प्रवास ह्यात कळतो. नव्या स्त्रीचा उदय दिसू शकतो. एक कार्यकर्ती-लेखिका स्त्री चार वह्या नोंदीसाठी वापरत असते. एका काळ्या वेष्टनाच्या वहीत ती आफ्रिकेतील अनुभव नोंदते, तर लाल वहीत राजकीय अनुभव नि भ्रमनिरास टिपते, पिवळ्या वहीत अनुभवांचं पुनःस्मरण टिपते तर निळ्या वहीत अगदी अंतर्मनातल्या भावना लिहिते. ह्या सर्वांना एकत्र गुंफत कादंबरी आकारत जाते, आधुनिक जग आणि स्त्रीचं आकारत चाललेलं व्यक्तिमत्त्व. आधुनिक जगातील ताणतणाव, गुंतागुंत, माणसाची क्षमता वाढवली तरी कायम राहते नव्हे तर ती अधिकच वेदनामय होत जाते. अनुभवांचं वर्गीकरण करून सुलभता आणण्याचा प्रयत्न करणारी नायिका जगण्याचे कप्पे करून जगू पाहते पण ते यशस्वी होत नाही. कारण जगणं असं तुकड्यातुकड्यांत नसतं. हे एकत्रितच जगावं लागतं. शोधावं लागतं. ह्या रंगांच्या वह्यातील सत्य हे वास्तव आहे, ह्याची जाणीव स्वप्रयत्नानं तिला येते.

तिचा आत्मप्रवास अखेरपर्यंत सुरू होता. तिच्या विज्ञानकथा, विश्लेषण करणाऱ्या कथा, जगाचं वास्तव छेदणाऱ्या कथा यांतून ती मानवातील माणूस नि सैतान शोधत नि मांडत असे. स्त्री-पुरुषसंबंधातील व्यामिश्रता तिला लेखनाला नेहमीच आव्हान देत असते. अवकाशयात्रेवर पाच कादंबऱ्या, मांजरांवर विलक्षण जीव असलेली ही लेखिका त्यांच्यावरही तीन पुस्तकं लिहिते. युद्ध, साम्यवाद, स्त्रीप्रश्न ह्यांत आस्था असलेली डोरिस लेसिंग साऱ्या वेदनांचा प्रवास मांडताना सकारात्मक दृष्टी बाळगते. सत्य सांगून नुसतं विव्हल करत नाही तर मानवी प्रयत्नांनी त्यावर विजय मिळवता येतो हे तिचं सूत्र आहे. थेट भिडणारी शैली, रहस्यमय मानवी वर्तनातील गुंतागुंत तिला लेखनाला प्रवृत्त करते. तर बेफिकिर वागण्यातही मानवी जीवन सुखी-समाधानी असावं ही तिची आंतरिक इच्छा तिच्या लेखनातून डोकावताना दिसते. कारण माणूस किती निर्दयी होऊ शकतो हे तिनं पाहिलं होतं, वडिलांनी युद्धात गमावलेला पाय तिला सतत युद्धाची भीषणता जाणवून देत असे. ह्यातून माणूस मुक्त व्हावा हेच ती जाणवून देत असते. अशा ह्या संवेदनशील स्त्रीला २००७ चा साहित्याचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला. तिचा मृत्यू इंग्लंडमध्ये १७ नोव्हेंबर २०१३ साली झाला.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com


॥ग्रंथाली॥✲॥



**विज्ञान-नाटके**

**नंदिनी थत्ते, सुधीर थत्ते**

**मूल्य १०० रुपये ● सवलतीत ६० रुपये**



**शरद काळे यांची नवीन पुस्तके नाट्यातून विज्ञानाकडे भाग १, २ आणि ३**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**





**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**




# एनसीपीएमध्ये रंगणार 'प्रतिबिंब' नाट्योत्सव

राजीव जोशी

भारतात व जगभरात एनसीपीए हे एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र म्हणून नामांकित आहे. तेथील थिएटरचा मराठी रंगभूमीशी अतिशय घनिष्ट संबंध आहे. सुरुवातीच्या काळात ज्येष्ठ साहित्यिक-नाटककार पु. ल. देशपांडे होते. दिग्दर्शक वामन केंद्रे ह्यांनी दिलीप प्रभावळकरांना घेऊन 'एक झुंज वाऱ्याशी' हे नाटक केले. पुढे विजयाबाई होत्या. तरुण पिढीचे चेतन दातार, वामन केंद्रे, डॉ. शुभदा शेळके होते. प्रामुख्याने नामोल्लेख करावा लागेल तो डॉ. अशोक रानडेंचा, ज्यांनी इथल्या प्रांगणात कलेला विशेषतः संगीत आणि सांगीतिक कार्यक्रमांना नवा आयाम दिला. २०१० पासून सुरू केलेल्या 'प्रतिबिंब' नाट्य-महोत्सवाने मराठी प्रायोगिकवर होणाऱ्या नवनवीन प्रयोगांची सातत्याने दखल घेतली आहे. त्यामुळेच बहुभाषक तोंडवळा असलेल्या मुंबापुरीतील प्रेक्षकांना मराठी थिएटरचे महत्त्व-मोठेपण कळण्यास हातभार लागलेला आहे. गेली काही वर्षे होत असलेल्या 'प्रतिबिंब' नाट्यमहोत्सवांत सतीश आळेकर, शफाअत खान, सुषमा देशपांडे, मनस्विनी लता रवींद्र, अनिरुद्ध खुटवड, गो. पु. देशपांडे-अतुल पेठे ह्यांची वेगळ्या आशयाची नाटके इथे मंचित झाली. आविष्कारचे -चित्रगोष्टी, आयदान, बया दार उघड, पुण्याचे शोकपर्व, सिंधू, सुधाकर रम आणि इतर, असे प्रयोग सादर झाले. आनंदभोग मॉल, एमएच-१२१६, समाजस्वास्थ्य, एक शून्य तीन, हे राम अशा आशयगर्भ नाटकांनी इथे आलेल्या मराठी व अमराठी प्रेक्षकांना बदलत्या प्रायोगिक प्रवाहांची यथार्थ चुणूक दाखवली. इथे होणाऱ्या कट्टा-चर्चासत्रात रंगकर्मी, नाट्यसमीक्षक व प्रेक्षक सहभागाने अधिकाधिक रंगत वाढत गेली. आजही एनसीपीए आयोजित प्रतिबिंब महोत्सव हे नाट्यकर्मी आणि नाट्य-रसिकांसाठी एक पर्वणी मानली जात आहे. गेल्या वर्षी झालेल्या प्रतिबिंब नाट्योत्सवात दर्पण नाट्य-लेखन उपक्रमात सर्वप्रथम आलेल्या 'कलगीतुरा' या नाटकाचा प्रथम प्रयोग सादर करण्यात आला होता. याखेरीज मकरंद साठे लिखित 'प्रस्थान' हे विचारप्रवृत्त करणारे नाटक, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद देशपांडे ह्यांचा एकपात्री प्रयोग, विविध कार्यशाळा आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'चारचौघी' या एकतीस वर्षांपूर्वी गाजलेल्या नाटकाचे नव्या कलावंत संचात झालेल्या प्रयोगाला रसिक प्रेक्षकांना उदंड प्रतिसाद दिला होता. या पार्श्वभूमीवर यंदाचा 'प्रतिबिंब' नाट्योत्सव मे महिन्यात होतो आहे हा कलावंत आणि प्रेक्षक ह्यांच्यासाठी एकत्र येण्याचा आणि रंगमंचीय कलांचा रसास्वाद घेण्याचा सोहळाच आहे.




कलगीतुरा



'पत्रापत्री'ची रिहर्सल करताना दिलीप प्रभावळकर आणि विजय केंकरे

यंदाचा प्रतिबिंब मराठी नाट्योत्सव शुक्रवार, १७ मे २०२४ ते रविवार, १९ मे २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला आहे.

या तीन दिवसीय महोत्सवात तरुणाईने केलेली प्रायोगिक नाटके, तसेच सर्वोत्कृष्ट ठरलेल्या व्यावसायिक नाटकांचे प्रयोग होतील. याखेरीज मराठी नाट्यसृष्टीतील मान्यवरांची भाषणे व चर्चा, कॅम्पस टूर असा भरगच्च कार्यक्रम असणार आहे. मराठी रंगभूमी ही एक गौरवशाली परंपरा असलेली म्हणून नावाजली गेली आहे. यंदाच्या एनसीपीए प्रतिबिंब महोत्सवात त्याची प्रचीती आपणास येईल. अशा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेच्या सोहळ्यात नाट्यरसिक म्हणून आवर्जून उपस्थित राहा.

ह्याकरिता शिल्पा कुमार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे.

यंदाच्या प्रतिबिंब नाट्योत्सवाची खास झलक हे दिलीप प्रभावळकर-विजय केंकरे ह्यांचे नवे नाटक 'पत्रापत्री' हे यंदाचे प्रमुख आकर्षण असणार आहे. ज्येष्ठ अभिनेते व लेखक दिलीप प्रभावळकरांच्या नवीन नाटकाचा हा शुभारंभाचा प्रयोग प्रतिबिंब महोत्सवात होणार आहे. नीरज शिरवईकर लिखित संहितेचे दिग्दर्शन केले आहे ज्येष्ठ दिग्दर्शक विजय केंकरे ह्यांनी. शिवाय ते या नाटकात प्रभावळकर ह्यांच्यासमवेत अभिनयही करत आहेत. अनेक वर्षांनी दिलीपजी रंगमंचावर काम करत आहेत ही नाट्य-प्रेक्षकांसाठी आनंदाची बाब आहे. बदामराजा प्रोडक्शनने या नव्या नाटकाची निर्मिती केलेली आहे.

नाटकाच्या बरोबरीने प्रतिबिंबमध्ये नव्या कलावंतांसाठी अभिनयाचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी एका शिबिराचे आयोजन केले गेले आहे. रंगभूमी-मालिका व चित्रपटातील अभिनेता-लेखक-दिग्दर्शक व निर्माता प्रियदर्शन जाधव हे या शिबिराचे मार्गदर्शक असणार आहेत. १८ मे रोजी होणाऱ्या शिबिरात नाट्य-अभिनय करू इच्छिणाऱ्या नवोदितांसाठी ही विशेष संधी आहे. थिएटर आणि फिल्मबाबत सेट डिझाईन, आर्ट डिरेक्शन याद्वारे स्थळ-काळ दर्शवण्यासाठी नेपथ्य उभे करणे, पात्रांच्या आर्थिक-सामाजिक परिस्थितीनुरूप तसेच प्रसंगानुसार नेपथ्य करण्याबाबत दिनांक १९ मे रोजी सकाळी १०.३० ते २.३० या वेळात मार्गदर्शन केले जाईल. आर्किटेक्चर व इतिहास विषयांमध्ये विशेष स्वारस्य असलेले ख्यातनाम कलानिर्देशक मच्छिंद्र शिंदे हे या शिबिराचे मार्गदर्शक असणार आहेत. ब्लॅक, सावरिया व मेरी कॉमसारखे गाजलेले सिनेमे आणि सा रे ग म पा या गाजलेल्या रिॲलिटी शो, झी, आयफा व स्टार प्रवाह ॲवार्डचे सेट डिझाईन करणारे शिंदे ह्यांच्या अनुभवाची शिदोरीचा लाभ प्रशिक्षणार्थींना मिळू शकेल.

एनसीपीएच्या प्रांगणातील थिएटर, ग्रंथालय व अन्य सुविधांची माहिती नाट्यप्रेमी व कला रसिकांना मिळावी म्हणून गेल्या वर्षीप्रमाणे एनसीपीएने टेक्निकल मनेजर नयन काळे



प्रियदर्शन जाधव



'घंटा घंटा घंटा' नाटकामधील दृश्य



'गोलकोंडा डायमंड' नाटकामधील दृश्य



'दगड आणि माती' नाटकामधील दृश्य

ह्यांच्यासमवेत परिसर वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी टूरचे आयोजन केलेले आहे. एनसीपीए ग्रंथालय व दस्ताऐवज विभाग प्रमुख सुजाता जाधव आपल्याला त्यांच्याकडील विविध पुस्तके व केसेट-सीडीजबाबत माहिती देतील. त्यांच्या संग्रहात उपलब्ध असलेल्या मौल्यवान खजिन्याचा प्रत्यक्ष परिचय व माहिती मिळू शकेल. ही टूर विनामूल्य असली तरी त्याबाबत आगाऊ नावनोंदणी करणे जरुरीचे आहे.

'दगड आणि मातीचा' शुभारंभ गेल्या वर्षी कलगीतुरासारखे प्राचीन परंपरेचे अनवट नाटक लिहणारे नाटककार दत्ता पाटील ह्यांच्या 'दगड आणि माती' या नवीन नाटकाचा प्रथम प्रयोग सादर होतो आहे. पुन्हा एकदा आपल्या मातीशी नाळ जोडणारी सशक्त संहिता प्रेक्षकांना पहावयास मिळेल अशी खात्री आहे. अर्थात दिग्दर्शन आहे सचिन शिंदे ह्यांचे. या नाटकांत उमेश जगताप, अश्विनी कासार, अजय पाटील, कृतार्थ शेगावकर, अभिजित झुंजारराव व ओंकार गोवर्धन अशी प्रायोगिक रंगभूमीवर सातत्याने काम करणाऱ्या कलावंतांची टीम आपल्याला दिसणार आहे. निरंजन पेडणेकर हे नाव चांगल्या रूपांतरित नाटकांमुळे परिचित आहे.

'लव्ह इज हानिकारक' हे वेगळ्या नावाचे नाटक राखाडी स्टुडिओ प्रेझेंट करणार आहे. राजीव जोसेफ ह्यांच्या 'ग्रुसम प्लेग्राऊंड इन्ज्युरीज'चे मराठीतले रुपांतर रंगमंचावर येत आहे. निरंजन दिग्दर्शित या दोन पात्री नाटकांत दीक्षा केतकर व सिद्धेश धुरी हे कलावंत काम करत आहेत.

चांगली आशयगर्भ प्रायोगिक नाटके हे एनसीपीएच्या 'प्रतिबिंब'चे नेहमीच खास आकर्षण राहिलेले आहे. यंदाही आपल्याला 'गोलकोंडा डायमंड्स' आणि 'घंटा, घंटा, घंटा'सारखी वैशिष्ट्यपूर्ण नाटके पाहता येतील.

प्रतिबिंब २०२३-२४ च्या लेखन उपक्रमात निवड झालेले गोलकोंडा डायमंड्स हे योगेश्वर बेंद्रे लिखित नाटकाचे दिग्दर्शन संदेश दुगजे करत आहेत. या नाटकात ओंकार मोरे, योगेश्वर बेंद्रे, स्वागत मेडगे, ओंकार सातपुते व अन्य कलाकार काम करणार आहेत. मराठी रंगभूमीवरील नवउन्मेषाचे दर्शन घडवणारी ही नाट्यनिर्मिती निश्चितच प्रेक्षकांना आवडेल.

'घंटा घंटा घंटा' - मूळ लेखक सॅम स्टेनर ह्यांच्या 'लेमन्स लेमन्स लेमन्स लेमन्स लेमन्स' या नाटकाचे मराठी रुपांतर निरंजन पेडणेकर ह्यांनी केले आहे. या आगळ्यावेगळ्या प्रायोगिक नाटकाचे डिझाईन व दिग्दर्शन प्रायोगिक रंगभूमीवर आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटवणारे मोहित टाकळकर ह्यांचे आहे. निर्माते आशिष मेहता ह्यांनी हे नाटक आसक्त संस्थेसाठी या नाटकाची निर्मिती केली आहे. भाषा सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट ह्यांची साथ त्यांना लाभलेली आहे. स्त्री भूमिका करत आहे हिंदीतील अभिनेत्री मल्लिका सिंग हन्सपाल तर पुरुष भूमिकेत आहे मराठीतील लोकप्रिय अभिनेता ललित प्रभाकर.


'अस्तित्व' नाटकामधील दृश्य

आदित्य व फिरोझा हे परस्परविरोधी जातकुळीचे जोडपे आणि त्यांच्या आयुष्यातील ताणतणाव आपल्याला अनुभवता येतील. प्रतिदिनी १४० शब्दांपेक्षा अधिक शब्द बोलले जावू नयेत असा नवीन कायदा अमलात आल्यानंतर होणारी कुचंबणा आणि त्यातून होणारी त्यांच्यातील नात्यातील गोची, अवघडलेपण मंचित होणार आहे. आपल्या देशातील सद्य:कालीन परिस्थिती पाहता या नाटकाचा विषय नुसताच वेगळा नाही तर त्याला अन्वयार्थ प्राप्त होतो.

दोन व्यावसायिक नाटकांचा खास नजराणा - 'प्रतिबिंब'मध्ये मराठी रंगभूमीवर सध्या गाजत असलेल्या यशस्वी नाटकांचे प्रयोग होणे ही तुम्हा-आम्हा प्रेक्षकांसाठी खास बाब म्हणता येईल. लोकप्रिय विनोदी अभिनेता भरत जाधव ह्यांची निर्मिती असलेल्या 'अस्तित्व' या नाटकातून मुंबापुरीसारख्या महानगरातील सर्वसामान्य नागरिकांच्या निवाऱ्याच्या प्रश्नाचा वेध घेतलेला दिसेल. एका कुटुंबातील कुटुंबप्रमुख व त्याच्या तरुण मुलातील संघर्षाचे वास्तव चित्रण नक्कीच अंतर्मुख करणारे ठरेल. अभिनेता भरत जाधव ह्यांनी साकारलेली संतोष हसोळकर ही भूमिका म्हणजे त्यांच्या अभिनयसामर्थ्याचा भिडणारा आविष्कार म्हणता येईल. अभिनेत्री चिन्मयी सुमित ह्यांची आईची भूमिका पाहताना त्यांच्या अभिनयाच्या बरोबरीने संवेदनशीलतेची प्रचीती देणारी आहे. शनिवारी १८ मे रोजी हे आशयघन सामाजिक नाटक रात्री ८ वाजता टाटा थिएटरमध्ये सादर होणार आहे आणि तो प्रयोग प्रेक्षकांनी जरूर अनुभवावा. तरुण रंगकर्मी स्वप्नील जाधव ह्यानेच या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन केलेले आहे. एकांकिका व स्पर्धारंगभूमीवर यशस्वी झालेल्या या उदयोन्मुख रंगकर्मीकडून यापुढेही अशाच सशक्त कलाकृतींची अपेक्षा आहे. भरत जाधव एन्टरटेनमेंटची निर्मिती असलेल्या नाटकात भरत जाधव, चिन्मयी सुमित, जयराज नायर ह्यांच्या समवेत श्याम घोरपडे व युवा कलाकार सलोनी सुर्वे व हार्दिक जाधव काम करत आहेत.

जर तरची गोष्ट - रविवार १९ मे रोजी विशेष आकर्षण असणार आहे ते प्रिया बापट आणि उमेश कामत या पॉप्युलर जोडीचे सध्या धडाक्यात हाउसफुल्ल होत असलेले नाटक. अनेक

आशयपूर्ण नाटके लिहिणारी नाटककार इरावती कर्णिक हिने या नाटकाच्या माध्यमातून हल्लीच्या तरुण कपल्समधील विसंवादावर खुसखुशीतपणे बोट ठेवलेले आहे. नाटकातील व्यक्तिरेखांच्या क्रिया-प्रतिक्रियांचा समतोल सांभाळत दिग्दर्शक अद्वैत दादरकर व रणजित पाटील ह्यांनी सकस संहितेला आपल्या दिग्दर्शन कौशल्याने फुलवले आहे. अर्थातच मुख्य नायक-नायिका म्हणून उमेश कामत व प्रिया बापट हे वास्तव जीवनातील पती-पत्नी प्रेक्षकांवर गारुड करतात. त्यांच्याच बरोबरीने पल्लवी अजय व आशुतोष गोखले हे सह-कलाकार तितक्याच मनस्वीपणे आपापल्या भूमिका निभावतात. चार पात्रांचा रंजक खेळ पाहणे प्रतिबिंब ही प्रेक्षकांकरता व उमेश-प्रियाच्या चाहत्यांसाठी जणू संडे-फिस्टच असणार आहे. सोनल प्रोडक्शन्सची निर्मिती असलेल्या या लोकप्रिय नाटकाची सादरकर्ती अभिनेत्री प्रिया बापट आहे.

...कवी जातो तेव्हा - नाटकांच्या बरोबरीने कवितेविषयक आगळावेगळा कार्यक्रम '..कवी जातो तेव्हा' डॉ. समीर कुलकर्णी सादर करणार आहेत. मराठीतील ख्यातनाम कवी ग्रेस ह्यांच्या कवितांचा रंगमंचावर होणारा आविष्कार हे ह्याचे वैशिष्ट्य असणार आहे. दिग्दर्शन अमित वझे आणि गजानन परांजपे, अमित वझे, निनाद सोलापूरकर, जयदीप वैद्य व अंजली मराठे हे कलाकार हा कार्यक्रम सादर करतील. रूपक संस्थेची निर्मिती असलेला हा कार्यक्रम जागरतर्फे प्रेझेंट होईल.


एनसीपीए सभासद आणि प्रेक्षकांसाठी असणारा हा नाट्योत्सव विद्यार्थ्यांना नेहमीच सवलतीमध्ये बघायला मिळतो हेही त्याचे एक वैशिष्ट्य आहे. कारण त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांना आजच्या मराठी रंगभूमीची नक्कीच ओळख होऊ शकते आणि त्यांना त्यात रुची निर्माण होऊ शकते.

आवर्जून अनुभवावा असा हा 'प्रतिबिंब' नाट्यमहोत्सव आहे.


**- राजीव जोशी**
लेखक-रंगभूमी अभ्यासक
rmjoshi52@yahoo. co. in


ग्रंथाली

दिलीप पांढरपट्टे यांची पुस्तके











**चारही पुस्तकांचा एकत्रित संच**
**मूल्य ६७० रुपये सवलतीत ४०० रुपये**


प्रसिद्ध होत आहेत
अ.पां. देशपांडे यांची दोन पुस्तके

महाराष्ट्राची तीन लाडकी व्यक्तिमत्त्वे

आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे आणि पं. भीमसेन जोशी




**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**




कृतार्थ मी, कृतज्ञ मी...

आत्मकथन

**मूल्य ४०० रुपये सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपरिचय



**अरुण मोतीराम भंडारे**
९८२००५५७७४

**कवडसे**
**अनुजा संखे**




पोनल्लगर देवेंद्र हा अगदी अंधुक दृष्टी असलेला युवक. गोकुळाष्टमीला उंचच उंच थर लावून दहीहंड्या फोडणाऱ्या गोविंदापथकांनी त्या दिवशीच्या माहोलाने या युवकाला मोहित केले. त्याच्या मनात आले आपणही दृष्टिबाधितांचे गोविंदापथक उभारून हा थरार अनुभवावा. मात्र यात धोके फार. उंचच उंच मनोरे रचून दहीहंडी फोडताना थर कोसळून जायबंदी होणाऱ्या डोळस गोविंदांची संख्या दुर्लक्षणीय नाही. जायबंदी गोविंदा प्रसंगी प्राणालाही मुकण्याची उदाहरणे आहेत. अशा पार्श्वभूमीवर दृष्टिबाधितांचे गोविंदापथक उभारणे म्हणजे चक्क मृत्यूला आव्हान. पोनल्लगर देवेंद्र यांनी हे आव्हान स्वीकारले आणि आपल्यासारख्या अंधुक दृष्टी असलेल्या तसेच पूर्णतः अंध असलेल्या युवकांचे गोविंदापथक उभारून, कठोर परिश्रम घेऊन २०१४ या वर्षी गोकुळाष्टमीला चार थर लावून सलामी दिली. देवेंद्र आणि त्याच्या दृष्टिबाधित गोविंदाची ही यशोगाथा सांगत आहेत, दृष्टिबाधित लेखिका अनुजा संखे–घोडके आपल्या 'कवडसे' या पहिल्याच पुस्तकात. ते शारदा प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. पुस्तकात दिव्यांग, विशेषकरून दृष्टिहीन व्यक्तींच्या जगण्याचे अनेक पदर उलगडून दाखवले आहेत. अंध व्यक्तीदेखील परिश्रमाने, स्वकर्तृत्वाने निवडलेल्या करिअरमध्ये यश मिळवू शकतात, सामान्य डोळस नागरिकांप्रमाणेच आयुष्यावर प्रेम करत हरतऱ्हेचा आनंद लुटत आयुष्य जगतात हे लेखिकेने वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या यशस्वी दृष्टिहीनांच्या मुलाखतीतून वाचकांसमोर मांडले आहे. यामध्ये आहेत प्रख्यात सूत्रसंचालक निवेदिका अनघा मोडक, पाली भाषेचे गाढे विद्वान महेश देवकर, बुद्धिबळपटू आर्यन जोशी, दृष्टिहीन वेगवान गोलंदाज अनिल करचे. या यशस्वी दृष्टिबाधितांबरोबरच अंध व्यक्तींचे जीवन सुसह्य व्हावे म्हणून झटणाऱ्या डोळस हितचिंतकांचीदेखील शब्दचित्रे अनुजाने रेखाटली आहेत.

अनुजाचे हे कवडसे प्रथम प्रसिद्ध झाले 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये. म.टा.चे निवासी संपादक समीर कर्वे यांनी अनुजाचे फेसबुकवरचे लिखाण वाचले होते. त्यांनी ठाणे आवृत्तीसाठी अनुजाला लिहिते करायचे ठरवले. दृष्टिबाधितांचे वेगळेपण जगासमोर यावे, त्यांच्या जीवनाला उभारी देणाऱ्या पैलूंवर प्रकाश पडावा तसेच त्यांना दैनंदिन जीवनात जाणवणाऱ्या समस्यांचा लेखांमध्ये विचार व्हावा असे हे लिखाण असेल असे ठरले. कॅनरा बँकेत अधिकारी असलेल्या अनुजाने आपली नोकरी सांभाळून हे स्तंभलेखन केले.

सामान्यपणे अंध, दृष्टिबाधित व्यक्ती म्हणजे टेलिफोन बूथ चालक, लोकलमध्ये अथवा रेल्वेपुलावर लॉटरी तिकिटे, इतर लहान–सहान वस्तू विकणारे विक्रेते, बँकांमध्ये टेलिफोन ऑपरेटर अशी एक प्रतिमा जनसामान्यांच्या मनात रुजलेली असते. यांच्याविषयी दया, करुणा अशा भावनाही असतात. एखाद्या दृष्टिबाधिताला रस्ता ओलांडायला मदत केली म्हणजे समाजकार्य केले असेही काही जणांना वाटते. आणि दुसरे टोक म्हणजे दिव्यांगांविषयी, त्यांच्या समस्यांविषयी असलेले प्रचंड औदासीन्य.

अंध व्यक्तींविषयी असलेले सर्व समज–गैरसमज अनुजाने आपल्या कवडशांतून दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रगत तंत्रज्ञानाने अंधांचे जीवनही सुसह्य केले आहे. 'विरंगुळ्याचे क्षण' या लेखात अनुजाने दृष्टिबाधित जीवनाचा आनंद कसा घेतात ते सांगितले आहे. ते पत्ते खेळतात, ग्रूपने सिनेमाला जातात. आणि हो, आणखी एक रंजक खेळ ही मंडळी खेळतात, तो म्हणजे हॅण्ड क्रिकेट. या खेळाविषयी जाणून घ्यायला मात्र पुस्तकच वाचायला हवे.


महाराष्ट्र टाइम्सचे समीर कर्वे आणि रंगकर्मी सोनाली कुलकर्णी यांचे मनोगत पुस्तकात आहे. पुस्तकाला प्रस्तावना आहे मान्यवर लेखिका, सिने–नाट्यदिग्दर्शिका सई परांजपे यांची. त्यांच्या प्रस्तावनेतील शेवटच्या काही ओळी इथे उद्धृत कराव्याशा वाटतात. 'अनुजा, कवडसा म्हणजे भिंतीवर उमटलेला आपल्याशीच खेळणारा एक मोहक लहानगा मंद प्रकाशगोल किंवा ठिपका. तुझ्या कवडशांचा प्रकाशझोत प्रखर आहे, प्रभावी आहे.' सई परांजपे यांच्या प्रस्तावनेतच पुस्तकाचे यश दडलेले आहे.

'कवडसे'चा प्रकाशन सोहळादेखील हृद्य होता. प्रकाशन २५ फेब्रुवारीला मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे येथे प्रसिद्ध कवी, लेखक आणि दंतवैद्य (दंतचिकित्सक) डॉ आशुतोष जावडेकर यांच्या हस्ते झाले. अनुजाच्या दृष्टिबाधित आणि डोळस मित्रमैत्रिणी, सहकारी तसेच अनेक मान्यवर दृष्टिबाधित उपस्थित होते. त्यामध्ये होते पाली भाषेचे अभ्यासक डॉ. महेश देवकर. पुस्तकाचे प्रकाशन झाल्यावर अनुजाने आपल्या हातातील नव्याकोऱ्या पुस्तकाचा गंध आपल्या श्वासात सामावून घेतला. प्रकाशनसोहळ्यात निवेदन ,सूत्रसंचालन केले एका दृष्टिबाधिताने, अनुजाच्या पतींनी 'कवडसे'मधील काही लेखांचे वाचन केले. ते देखील अंध आहेत. महेश देवकरांबद्दल सांगायला हवे. त्यांनी पदवी परीक्षेसाठी संस्कृत भाषा निवडली. प्रचंड मेहनत घेऊन परीक्षेत ते मुंबई विद्यापीठात तिसरे आले. एम.ए. त्यांनी पुणे विद्यापीठातून केले, संस्कृतमध्ये ते दुसरे आले. त्यानंतर त्यांनी पाली भाषेतही असेच प्रावीण्य मिळवले. पुणे विद्यापीठात पाली विभागाचे ते विभाग प्रमुख आहेत. पाली भाषेच्या अध्ययनासाठी, त्या विषयाच्या अभ्यासासाठी देशविदेशातून त्यांचे मार्गदर्शन घेतले जाते. जपान, जर्मनी हंगेरी अशा अनेक देशांतील विद्यापीठांशी ते जोडले गेले आहेत. या प्रकाशन सोहळ्यात त्यांनीही आपले विचार मांडले.

मूकं करोती वाचालं पंगुं लंघयते गिरिम् या संस्कृत सुभाषितात दृष्टिबाधितांचाही समावेश व्हायला हवा असे वाटते.

**कवडसे**
अनुजा संखे
शारदा प्रकाशन
पृष्ठ – १२६, किंमत – रु. २००/–

# शतकवीर पर्यटक अरुण सबनीस यांची मुलाखत




**अरुण सबनीस आणि आत्माराम परब**

ईशा टूर्स आणि ग्रंथाली–प्रतिभांगण आयोजित 'आनंदयात्रा पर्यटनाची' या कार्यक्रमाच्या पहिल्या भागात शंभर देशांमध्ये पर्यटन केलेल्या अरुण सबनीस यांच्या मुलाखतीचे आयोजन शनिवार, १३ एप्रिल २०२४ रोजी करण्यात आले होते. प्रतिभांगणच्या वास्तूत झालेल्या या संवादात ईशा टूर्सचे संचालक आत्माराम परब व अश्विनी भोईर यांनी विचारलेल्या प्रश्नांना सबनीस यांनी अतिशय मनमोकळेपणाने, दिलखुलास उत्तरे दिली. अरुण सबनीस म्हणाले की त्यांच्या वडिलांकडूनच त्यांच्या मनात पर्यटनाचं बीज रुजले गेले. वडिलांना पर्यटनाची आवड होती पण जबाबदाऱ्यांमुळे त्याना ती आवड जोपासता आली नाही. ती आवड आपण जोपासायची असे मनोमन ठरवले होते. प्रथम भारतामध्ये अनेक ठिकाणी फिरलो, विशेषतः अनेक धार्मिक ठिकाणे पाहिली आणि मग परदेशभ्रमंतीही सुरू झाली.


पर्यटन करायला जाण्यापूर्वी त्या त्या देशाची मी इत्थंभूत माहिती माझ्याकडे नोंदवून ठेवत असतो. ती डायरी सोबतच असते. मग पर्यटन करत असताना पुष्कळ फोटो काढत पर्यटनाचा आनंद मी लुटतो. ते पुढे म्हणाले, मिळालेली अधिकची माहितीही मी माझ्या डायरीत नोंदवून घेतो. पर्यटनाला जाताना कमीत कमी कपड्यांचे ओझे आपण सोबत न्यावे. मूळ उद्देश पर्यटन हाच असावा. पर्यटनाची आवड जोपासण्यासाठी आर्थिक नियोजन महत्त्वाचे आहे. मी आयुष्य जगत असताना अनावश्यक खर्च कधी केले नाहीत, माझे अग्रक्रम मला ठाऊक होते, त्यानुसार फिरण्यासाठी मात्र मी पैसे साठवून खर्च केले. पर्यटन करत असताना मी कोणताही मुखवटा चढवत नाही, जसा आहे तसा वागतो. गातो, नाचतो. पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी तक्रारी करत न राहता आहे त्या परिस्थितीशी तडजोड करणारे लवचीक मन पर्यटकाकडे हवे, असे त्यांनी सांगितले.

सात खंडांमध्ये आपण पर्यटन केलेले असून अंटार्टिका इथला अनुभव अद्भुत होता. पृथ्वीच्या निर्मितीपासून नैसर्गिकरितीने आहे तशा प्रदेशाला भेट देणे, हा एक रोमांचकारी अनुभव होता. माझी अभिनेत्री असलेली नात श्रिया पिळगांवकर हिच्यासोबत क्रूझवर केलेली टूर अविस्मरणीय होती. क्रूझवरील परदेशी पर्यटकांना मी श्रियाचा बॉयफ्रेंड वाटलो होतो, याबाबतचा धमाल किस्साही सबनीस यांनी सांगितला.

विविध देशांमधील माणसे, निसर्ग, खाद्यसंस्कृती अशा विविध विषयांना स्पर्श करणारी सबनीस यांची मुलाखत उत्तरोत्तर रंगत गेली. ही मुलाखत लवकरच ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहायला मिळेल.

**– अश्विनी भोईर**


ग्रंथाली




# सागरात हिमशिखरे

**मेधा आलकरी**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**

# पुस्तक प्रकाशनाचा आगळा वेगळा अनुभव – शरद काळे




**प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, अरुण जोशी, श्रीनिवास राजू, डॉ. मृण्मयी भजक, शरद काळे, अल्मित्रा पटेल, डॉ. खुसरू घडियाली, प्रकाश अंबुरे, हिलेल ज्युडा, सौ. ज्युडा, छाया अंबुरे व सौ. काळे**

रवींद्रनाथ टागोरांची बागेत झाडाखाली शिकण्याची संकल्पना अतिशय सुंदर आणि हृदयस्पर्शी आहे. शिक्षण हे वर्गाच्या चार भिंतींमध्ये मर्यादित असू नये. विद्यार्थी नैसर्गिक वातावरणात अधिक चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रित करतात. तेथील शुद्ध व ताजी हवा त्यांच्यातील उत्साह वाढवते. शिक्षणाचा हा अभिनव दृष्टिकोन आधुनिक जगात सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि ज्ञानाचे सखोल आकलन होण्यासाठी वेगळा वाटला तरी महत्त्वाचा आहे. प्राचीन भारतातील गुरुगृहे अशीच जंगलात चालायची. त्यावेळी शिकण्याचा हा एकमेव मार्ग होता. आधुनिक शैक्षणिक क्षेत्रात शाळा, महाविद्यालये आली आणि शिक्षणाचा अविभाज्य अंग बनली. आता झाडांखाली शिकणे हे अपारंपरिक ठरले! पारंपरिक शैक्षणिक प्रणाली शाळा बनली. काळानुसार विचार केला आणि सम ाजाच्या गरजांचा विचार केला तर त्यात वावगे काही नाही. तरी त्यातून प्रमाणित चाचणीला प्राधान्य देण्याच्या पद्धतीमुळे एक मोठा विद्यार्थीवर्ग ज्ञानाच्या आकलनाच्या बाबतीत अनभिज्ञ राहतो.

नैसर्गिक वातावरण शिकण्यासाठी अधिक एकात्मिक आणि अनुभवात्मक दृष्टिकोन देण्यासाठी प्रोत्साहित करते. विद्यार्थ्यांना त्यांच्या आंतरिक जिज्ञासेचा मागोवा घेण्यासाठी, त्यातून जीवनाची दिशा शोधण्यासाठी त्यांच्या सभोवतालच्या वातावरणाशी संलग्न राहता येते आणि प्रत्यक्ष अनुभवामधून शिकण्याचे स्वातंत्र्य असते. निसर्गाच्या सान्निध्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या सभोवतालच्या जगाचे निरीक्षण करण्यासाठी, प्रश्न विचारण्यासाठी आणि त्याच्याशी संवाद साधण्यासाठी उत्तम वातावरण असते. कुतूहल जागवण्यासाठी निसर्गाइतका मोठा गुरू शोधून सापडणार नाही. असे हे बहुगुणी वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि आकलनशक्तीला चालना देते, कारण विद्यार्थी नैसर्गिक जगाच्या सौंदर्याने आणि त्यातील विलक्षण रहस्यमय क्लिष्टतेने प्रेरित होत राहतात.

निसर्गसान्निध्यात शिकल्यामुळे निसर्गाशी सुसंवाद वाढतो, त्याचबरोबर इतर सजीवांबद्दल सहसंवेदना वाढीस लागते, त्यातून समतोल पर्यावरणासाठी आवश्यक असलेली शाश्वत मूल्ये जोपासली जातात. पर्यावरणाबद्दल कृतज्ञता निर्माण होऊन भावी पिढ्यांसाठी त्याचे जतन करण्याच्या जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत होते. 'स्व'च्या चक्रातून बाहेर पडून त्यापलीकडे काहीतरी करायचे आहे, जे आहे ते राखण्यासाठी 'स्व'चीपण मोठी जबाबदारी आहे हे वेगळे शिकवावे लागत नाही. एकंदरीत, झाडांखाली शिकण्याची टागोरांची संकल्पना शिक्षणाची एकात्मिक दृष्टी दर्शवते. माणूस तनाने आणि मनाने नैसर्गिक जगाशी एकरूप होऊन सुसंगतपणे वाढवण्याचा प्रयत्न करतो. हे खरे शिक्षण ज्ञान आणि कौशल्य संपादन करण्यापलीकडे जाते. हे शिक्षण स्वतःबद्दल, इतरांबद्दल आणि आपण राहत असलेल्या जगाचे आकलन विकसित करते. दुर्दैवाने आजची शिक्षणपद्धती या मूलभूत शैक्षणिक मूल्यांपासून दूर गेली आहे. आणि त्याचाच दृश्य परिणाम समाजात निर्माण झालेली स्वार्थी वृत्तीने स्वमग्नतेत रमणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड वाढत चाललेली दिसते.

हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे अल्मित्रा पटेल या विदुषीच्या 'अल्मित्रा पटेल – वेस्ट वॉरियर' ह्या मी इंग्रजीमध्ये लिहिलेल्या चरित्राचा जो प्रकाशन समारंभ भरउन्हाळ्यात आणि भरदुपारी १२ वाजता बंगलोर येथील के. सी. पॅलेस क्लबच्या बागेत झाडाखाली संपन्न झाला, त्यात ही वैशिष्ट्यपूर्ण टागोर झलक ठळकपणे दिसली. २७ एप्रिल २०२४ रोजी बेंगलुरू शहराचे तापमान ३८ अंश सेल्सियस इतके होते. एरवी बंदिस्त ठिकाणी १५० मंडळी एकत्र आली असती तर वातानुकूलित

यंत्रणेसाठी जी ऊर्जा लागणार होती त्या ऊर्जेची बचत झालीच, शिवाय श्रोत्यांना त्या गर्द झाडीत उन्हाचा कसलाही त्रास जाणवला नाही. कुठेही पाण्याच्या बाटल्या नव्हत्या. कोपऱ्यात ठेवलेल्या पाण्याचा ड्रम काचेच्या पेल्यांमधून श्रोत्यांची तहान भागवत होता. श्रोत्यांच्या आहारासाठीदेखील अल्मित्राबाईंनी ठरवलेले शाकाहारी भोजन अतिशय रुचकर होते. त्यांना एक वेळ वापरून फेकून दिल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा तिटकारा आहे हे जाणून सुदेश हिंगलासपूरकर यांनी समयोचित प्रसंगावधान राखून केळीच्या पानांचा त्यासाठी कौतुकास्पद उपयोग केला होता. टेबलावर केळीच्या पानांमध्ये बांधून ठेवलेल्या पुस्तकांचा गठ्ठा प्रकाश अंबुरे यांनी हलक्या हाताने उघडून पुस्तकाचे प्रकाशन केले, त्यावेळी अल्मित्रांच्या निरागस चेहऱ्यावरचा आनंद देवदुर्लभ होता. तो क्षण अतिशय मौल्यवान आणि चिरंजीव होता.

आयुष्यभर शाश्वत मूल्ये जपणाऱ्या आणि त्यासाठी झगडणाऱ्या अल्मित्रांचे जीवन म्हणजे एक आदर्श असे पुस्तकच आहे. त्या पुस्तकाचे पुस्तक लिहिणे आव्हानात्मक असले तरी माझ्यासाठी हा एक उत्तम असा शैक्षणिक अनुभव होता. चरित्र लिहिण्यामागे अनेक प्रेरणा असतात. समाजातील येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शक ठरू शकेल असा अमूल्य वारसा जतन करणे हे या चरित्रलेखनाचे महत्त्वाचे कारण आहे. अल्मित्रांची प्रेरणादायी जीवनकथा समाजातील विविध स्तरांवर पोहोचवणे हाही एक महत्त्वाचा उद्देश त्यात आहे. देशाच्या इतिहासावर किंवा संस्कृतीवर अशा प्रभावी व्यक्तींच्या विचारांचा कसा परिणाम होतो हेही अशा प्रेरणादायी चरित्रांमधून समजते. मी अल्मित्रा पटेल यांचे चरित्र लिहायचे का ठरवले? लेखन हा माझा व्यवसाय नाही. म्हणजे त्यामागे आर्थिक कारण नक्कीच नव्हते. अल्मित्राबाईंचे निसर्गप्रेम आणि विशेषत: घनकचराव्यवस्थापनात त्यांचे प्रेरणादायी अनमोल योगदान ही मुख्य कारणे ह्या चरित्रलेखनामागे होती, कारण हे विषय मलाही अतिशय जवळचे आहेत. घनकचरा व्यवस्थापन हा माझा गेली पंचवीस वर्षे संशोधनाचा विषय राहिला आहे. ह्या पुस्तकातून गेल्या तीन दशकांतील भारताच्या कचराव्यवस्थापनाच्या वाटचालीचे शब्दांकन करताना त्याचे व्यवस्थितपणे दस्तऐवजीकरण करण्याच्या गरजेवर भर दिला आहे.

अल्मित्रांचा घनकचराव्यवस्थापनातील लढा अतिशय महत्त्वाचा असला तरी समाजातील मोठ्या वर्गाला त्याची माहिती नाही. कचऱ्याकडे तुच्छतेने पाहण्याचा दृष्टिकोन केवळ प्रशासकांचाच आणि राजकारणी मंडळींचा असतो असे नसून समाजमनातही ह्या विषयाला स्थान नाही. गेली पंचवीस वर्षे या विषयाचे प्रबोधन करत असताना हा दृष्टिकोन मला ठिकठिकाणी दिसला आहे. आणि हीच ह्या महत्त्वाच्या विषयाबद्दल असलेली तुच्छता माझ्यासाठी एक प्रेरक शक्ती बनली. जर त्यांनी हा सातत्याने दिलेला लढा समाजासमोर आला नाही तर मानवजातीच्या इतिहासातील ती त्रुटी राहील असे मला वाटले, म्हणून हे पुस्तक लिहिणे मला गरजेचे वाटले. एकवेळ व्यक्ती दुर्लक्षित राहिली तरी चालेल, पण विषय दुर्लक्षित राहू नये हा माझा उद्देश आहे. अर्थात अल्मित्रांचे योगदान कमी लेखण्याचे काहीच कारण नाही, उलट त्यांच्या मनस्वी प्रवृत्तीचे आणि लढाऊ वृत्तीचे दर्शन त्यातून होते, व त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यातून अधोरेखित होते. म्हणूनच त्यांचे चरित्र लिहिण्याचा निर्णय म्हणजे त्यांचे जीवन, कार्य आणि वारसा याकडे लक्ष वेधण्याचे ते माध्यम आहे, त्यामुळे त्यांचे सांस्कृतिक, सामाजिक आणि घनकचराव्यवस्थापन क्षेत्रातील महत्त्व अधिक सखोलपणे समजून घेण्यात मदत होते. अलमित्रा यांच्या प्रभावी योगदानातून मिळालेली प्रेरणा आणि त्यांच्या जीवनाचे शब्दांकन करण्याच्या महत्त्वावर असलेला दृढविश्वास हीदेखील हे चरित्र हाती घेण्यामागची प्राथमिक कारणे आहेत.

पुस्तकाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अल्मित्राबाईंची एक ज्ञानी व्यक्ती म्हणून असलेली माझी धारणा हा आहे. मी शहाणपणाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे आणि ज्ञानी व्यक्तींशी संबंधित मुख्य गुणधर्म आणि वर्तनांची रूपरेषा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात विषयाचे आकलन, योग्य निर्णय, भावनिक बुद्धिमत्ता, नम्रता, ऋजुत्व, संवेदनशीलता आणि दीर्घकालीन दृष्टी यांचा समावेश आहे. अल्मित्राबाईंमध्ये या गुणधर्मांचा निःसंशयपणे समावेश आहे, त्यामुळेच या पुस्तकासाठी त्या एक आदर्श विषय बनल्या आहेत. या पुस्तकात अल्मित्राबाईंची समस्या सोडवण्याची कौशल्ये, सर्जनशील विचार आणि दीर्घदृष्टी, संवेदनशीलता आणि सर्वसमावेशक आकलनासह जीवन जगण्याची त्यांची क्षमता अधोरेखित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. व्यक्तिमत्त्व विकासातून सुसंस्कृत व्यक्ती आणि सुसंस्कृत समाज ही संकल्पना मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. अल्मित्राबाई ह्या संस्कृती, कला, साहित्य, इतिहास आणि सामाजिक नियमांचे विविध पैलू समजून घेणाऱ्या आणि समजावून देणाऱ्या सुसंस्कृत व्यक्तीच्या रूपात शब्दांकित केल्या आहेत. मानवी हक्कांचा आदर, कायद्याचे राज्य, सांस्कृतिक आणि बौद्धिक विकास आणि पर्यावरणीय शाश्वतता यासह सुसंस्कृत समाजाची वैशिष्ट्ये रेखांकित केली आहेत. वाचकांना हे पुस्तक प्रेरणादायी वाटेल असा विश्वास मनात आहेच.

●

# राज्यपालांच्या हस्ते डॉ. नरेंद्र जाधव यांच्या ‘आमचा बाप आन् आम्ही’च्या २००व्या आवृत्तीचे प्रकाशन




धनश्री धारप, वसुंधरा जाधव, डॉ. नरेंद्र जाधव, राज्यपाल रमेश बैस आणि सुदेश हिंगलासपूरकर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून अर्थतज्ज्ञ, राष्ट्रपतीनियुक्त माजी खासदार डॉ. नरेंद्र जाधव यांच्या ‘आमचा बाप आन् आम्ही’ या पुस्तकाच्या २००व्या आवृत्तीचे प्रकाशन महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते रविवार, १४ एप्रिल रोजी राजभवन येथे, डॉ. जाधव यांच्या पत्नी वसुंधरा, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, कार्यक्रम संयोजक धनश्री धारप यांच्या उपस्थितीत झाले.


यावेळी बोलताना राज्यपाल म्हणाले, ‘‘राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यामुळे डॉ. नरेंद्र जाधव यांच्याप्रमाणेच करोडो उपेक्षित लोकांना सन्मानपूर्वक जीवन जगण्याची प्रेरणा मिळाली, त्यामुळे त्यांच्या जयंतीदिनी 'आमचा बाप आन आम्ही' या पुस्तकाची दोनशेवी आवृत्ती प्रकाशित होणे औचित्यपूर्ण आहे.’’

लौकिकार्थाने ‘आमचा बाप’ हा आपल्या पुस्तकाचा नायक असला तरी, खऱ्या अर्थाने या पुस्तकाचे ‘मूकनायक’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असल्याचे डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सांगितले. त्यांनी या पुस्तकाच्या विविध भाषांमध्ये प्रसिद्ध झालेल्या आवृत्त्यांची माहिती दिली.

आरंभी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. या पुस्तकाचे प्रथम प्रकाशन विजय तेंडुलकर यांच्या हस्ते झाले, पुस्तकाच्या पंचविसाव्या आवृत्तीचे प्रकाशन पुल देशपांडे यांच्या हस्ते झाले, तर पुस्तकाच्या जनावृत्तीचे प्रकाशन निळू फुले यांच्या हस्ते झाल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे निवेदन डॉ. जाधव यांच्या पत्नी वसुंधरा जाधव यांनी केले. ●

ग्रंथाली




आमचा बाप आन् आम्ही

डॉ. नरेंद्र जाधव

मूल्य ४०० रु.

सवलतीत २५० रु.

२००वी आवृत्ती!

## ग्रामीण भागातून येणाऱ्यांचा प्रवास अधिक खडतर –मकरंद अनासपुरे




**सुदेश हिंगलासपूरकर, अरुण शेवते, कुमार केतकर, मकरंद अनासपुरे, लेखक श्रीकांत बोजेवार, डॉ. रोहित साने आणि विद्याधर ठाणेकर**

'आयुष्यात प्रत्येकाला कमीअधिक प्रमाणात संघर्ष हा करावाच लागतो. यशस्वी होण्यासाठी ठरावीक टप्प्यावर रस्ते ओलांडावेच लागतात, परंतु ग्रामीण भागातून शहरात नशीब आजमावण्यासाठी येणाऱ्यांना तुलनेने अधिक अडचणींचा सामना करावा लागतो. श्रीकांत बोजेवार आणि मी वेगवेगळ्या क्षेत्रांत कार्यरत असलो तरी ग्रामीण भागातून रस्ता ओलांडून आलेली प्रातिनिधिक उदाहरणे आहोत,' असे सांगून सुप्रसिद्ध अभिनेते आणि नाम फाऊंडेशनचे संचालक मकरंद अनासपुरे यांनी मुंबईतील त्यांच्या संघर्षाच्या काळातील काही आठवणींना खुमासदार शैलीत उजाळा दिला.

सुप्रसिद्ध लेखक आणि 'महाराष्ट्र टाइम्स'चे ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत बोजेवार यांच्या 'आणि मी रस्ता ओलांडला' या पुस्तकाचे प्रकाशन ग्रंथाली आणि मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच झाले. ज्येष्ठ पत्रकार, माजी राज्यसभा खासदार कुमार केतकर, 'माधवबाग'चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रोहित साने, 'ऋतुरंग'चे संपादक अरुण शेवते, 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर यावेळी उपस्थित होते. श्रीकांत बोजेवार यांनी त्यांच्या मनोगतात आयटीआय टेक्निशियन ते पत्रकारिता क्षेत्रातील मुशाफिरीचा थोडक्यात आढावा घेतला. या प्रवासात अरुण टिकेकर आणि कुमार केतकर यांच्या सान्निध्यात खूप शिकायला मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

'प्रत्येकाच्या आयुष्यात नाट्यमय घटना असतात. त्या इतरांसाठी स्फूर्तिदायक ठरू शकतात. ग्रंथालीने अगदी सुरुवातीपासून सर्वसामान्य व्यक्तींची आत्मचरित्रे प्रकाशित केली. त्या पुस्तकांना वाचकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांना अनेक पारितोषिके मिळाली,' असे नमूद करत कुमार केतकर यांनी श्रीकांत बोजेवार यांच्या दृक्‌श्राव्य लेखन शैलीचे कौतुक केले. उत्तम निरीक्षणशक्ती आणि सहज मांडणी ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. ते एक उत्तम संहितालेखक असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. रोहित साने यांनी त्यांच्या भाषणात बोजेवारांना 'असेच रस्ते ओलांडात राहा आणि यशस्वी व्हा' अशा शुभेच्छा दिल्या.

श्रीकांत बोजेवार यांनी 'ऋतुरंग' दिवाळी अंकात लिहिलेल्या लेखांचे संकलन असलेल्या या पुस्तक प्रकाशनानिमित्त मुंबई-ठाणे परिसरातील साहित्य-कला क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. अरुण शेवते यांनी 'ऋतुरंग'मधील लेखांचे संकलन असलेले हे ७९ वे पुस्तक असल्याचे सांगितले. पुस्तकांमुळे दिवाळी अंकातील साहित्य अधिक वाचकांपर्यंत पोहोचते, असे ते म्हणाले.

प्रस्ताविकात सुदेश हिंगलासपूरकर यांनी 'ग्रंथाली'च्या आगामी उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले. ●




### आणि मी रस्ता ओलांडला

**श्रीकांत बोजेवार**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**


# आजच्या पत्रकारितेचा विकास झाला की दृष्टीला तडा गेला – विजय कुवळेकर




**धनश्री धारप, संदीप चव्हाण, वैजयंती कुलकर्णी–आपटे, मधुकर झेंडे, लेखक घन:श्याम भडेकर–राधिका भडेकर, विजय कुवळेकर, नरेंद्र वाबळे, सुदेश हिंगलासपूरकर आणि डॉ. मृण्मयी भजक**

''खिळे जुळवण्याच्या पत्रकारितेच्या पूर्वीच्या काळात वृत्तपत्रात फोटो स्पष्ट दिसू नये म्हणून शाई जास्त टाका असे सांगणारे व आजची पत्रकारिता पाहता, ज्या दोन व्यक्ती भेटल्याच नाहीत त्यांची दृश्ये एकत्रित करण्याची कला पाहता आजच्या पत्रकारितेचा विकास झाला की दृष्टीला तडा गेला? तंत्रज्ञान कोणतेही असू द्या मात्र मंत्र तोच आहे,'' असे विचार ज्येष्ठ पत्रकार, व्यासंगी वक्ते विजय कुवळेकर यांनी ज्येष्ठ वृत्तछायाचित्रकार घन:श्याम भडेकर यांच्या 'शूट आऊट' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यावेळी सांगितले.

यावेळी माजी पोलीस अधिकारी मधुकर झेंडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, पत्रकार संघाच्या विश्वस्त वैजयंती कुलकर्णी–आपटे, 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.




**शूटआऊट**

**शब्द आणि फोटो यांचा थरार!**

**घन:श्याम भडेकर**

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाह संदीप चव्हाण म्हणाले, लेखणी ही तलवार असते. मात्र घन:श्याम भडेकर यांच्या कॅमेऱ्याची लेन्स ही बुलेट ठरली आहे. त्यांनी काढलेला एक फोटो लाखो शब्दांपेक्षा मोलाचा आहे. जीवनात काही प्रसंग असे येतात त्यावेळी आपल्याला राग येतो. मात्र घन:श्याम भडेकर यांना मी कधीही रागावलेले पाहिले नाही. आज त्यांच्या १९१ पानी 'शूट आऊट' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभास सर्व क्षेत्रांतील मान्यवरांची गुंफण घन:श्याम यांनी केली आहे.

पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनी चारोळीच्या माध्यमातून घन:श्याम भडेकर यांच्या पुस्तकाचे व त्यांचे कौतुक केले. तर संघाच्या विश्वस्त वैजयंती कुलकर्णी आपटे यांनी घन:श्याम भडेकर यांच्या सोबत सुरू केलेली कारकीर्द कशी होती याबद्दल सांगितले. माजी पोलीस अधिकारी मधुकर झेंडे म्हणाले, १६ वर्षांखालील व महिलांना जबानी घेण्यासाठी पोलिसांनी त्यांच्या घरी जावे असा कायदा आहे. मात्र त्याचे पालन कोणी करत नाही. घन:श्याम यांनी त्यांच्या काळातील फोटोग्राफीबद्दल जे काही सांगितले तेव्हा सर्व आठवणी डोळ्यासमोर आल्या. असे अनेक किस्से सांगत त्यांनी घन:श्याम यांचे कौतुक केले.

घन:श्याम भडेकर यांनी त्यांना संधी देणाऱ्या सर्व संपादकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या खुमासदार शैलीत त्यांनी छायाचित्रे घेतानाचे, त्यानिमित्त त्यांना भेटलेल्या व्यक्तींचे किस्से सांगितले. डॉ. मृण्मयी भजक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

●

# ‘ऐल तटावर पैल तटावर’ – एक समरस अनुभव




**सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे**

ग्रंथालीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ‘ऐल तटावर पैल तटावर’ या कार्यक्रममालिकेचा पहिला भाग ललितलेखिका राणी दुर्वे आणि कवयित्री सुनंदा भोसेकर यांनी ग्रंथाली–प्रतिभांगण वास्तूत, मंगळवार, ३० एप्रिल २०२४ रोजी सादर केला. या कार्यक्रमाची संकल्पना व लेखनही त्यांचेच आहे. साठोत्तरीपासून आधुनिक मराठी साहित्याचा वेध ही या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे. बालकवींच्या ‘औदुंबर’ या कवितेच्या वाचनाने राणी दुर्वे यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. त्याला जोडून कार्यक्रमाविषयी बोलताना सुनंदा भोसेकर म्हणाल्या की एका अनामिक, गूढ काळ्या डोहाकडे कवितेच्या अंती पोचवणारा औदुंबर, वाटेवर जसा आनंद पेरत जातो तसाच आपल्या सगळ्यांचा साहित्यप्रवास आनंदाच्या ऐहिकतेपलीकडच्या पातळीवर जावा ह्या हेतूने सादर केला जाणारा हा कार्यक्रम असावा असे आमचे ध्येय आहे.

राणी दुर्वे आपल्या विवेचनात म्हणाल्या की ह्या साहित्ययात्रेचा केंद्रबिंदू म्हणून १९७५ हे ग्रंथाली स्थापनेचे वर्ष धरले आहे. अर्थात १९७५ या वर्षाबद्दल आपल्या मनात इतरही संदर्भ आहेत, पण तूर्तास हे सारे साहित्यबाह्य संदर्भ दूर ठेवून निखळ साहित्यप्रवासाला आपण सुरुवात करत आहोत.

कार्यक्रमातून राणी व सुनंदा यांनी अभिवाचन व आशयसूत्राचे विवेचन करत सादर केलेला कार्यक्रम उत्तरोत्तर रंगात गेला. या कार्यक्रमातून त्यांनी पुढील कार्यक्रमांची रूपरेषा ओघवत्या शैलीत मांडली. ललितलेखन, कथा, कविता, कादंबरी या विविध साहित्यप्रकारांविषयी थोडक्यात पण मुद्देसूद केलेली मांडणी पुढील कार्यक्रमांचा आलेख डोळ्यांसमोर उभी करणारी होती. दुर्गाबाई भागवतांच्या ‘पैस’मधील उताऱ्याचे भावगर्भ वाचन, ‘अंतर्नाद’मधील अरविंद गोखले यांच्या विश्राम बेडेकरांविषयीच्या लेखातील काही अंशाचे वाचन, कवी बी, दिलीप चित्रे, नीरजा, यशवंत मनोहर, बा.भ. बोरकर, प्रभा गणोरकर, इंदिरा संत, नामदेव ढसाळ, प्रज्ञा पवार, अशोक नायगावकर असा विविध काळातील, विविध शैलींत लिहिणाऱ्या कवितांचे एकामागून एक केलेले वाचन, मधूनमधून येणारे साहित्यविषयक, जीवनविषयक विचार अशा बहुरंगी व दर्जेदार मांडणीमुळे कार्यक्रम साहित्यविषयक गंभीर विचारदर्शक झाला, हे या कार्यक्रमाचे यश आहे.

‘ऐल तटावर पैल तटावर’ या कार्यक्रमातून होणाऱ्या पुस्तकांच्या उल्लेखांविषयी बोलताना सुनंदा भोसेकर म्हणाल्या, काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेल्या, वेगवेगळ्या कारणांनी महत्त्वाच्या असलेल्या पुस्तकांच्या व्यक्तिसापेक्ष याद्या तयार करण्याची पद्धत आपल्याकडे नाही. इंग्रजी भाषेत अशा याद्या सहज सापडतात. ग्रंथालीमध्ये अशी एक यादी बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली होती. ‘निवडक अंतर्नाद’मध्येही ती यादी समाविष्ट आहे. पण मला वाटतं १९८६ पर्यंतची ती यादी आहे. म्हणूनच असे वाटते की ह्या कार्यक्रमाअंती, मराठी साहित्याची, म्हणजे ज्याला आपण नवसाहित्य म्हणतो तिथपासून अगदी आजतागायत अशी महत्त्वाच्या पुस्तकांची किमान काही अंशी यादी सगळ्यांच्या सहभागाने घडावी. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला मराठी साहित्यविषयक कार्यक्रमाचा प्रारंभ आपल्याला करता आला, याविषयी राणी दुर्वे आणि सुनंदा भोसेकर यांनी आनंद व्यक्त केला आणि ‘माझ्या मराठीचा लावा, ललाटास टिळा’ या काव्यपंक्तींनी पहिली भागाची सांगता झाली.

‘ऐल तटावर पैल तटावर’ कार्यक्रममालिकेच्या पहिल्या भागाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक अश्विनी भोईर यांनी केले.

●

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**नाट्यातून विज्ञानाकडे**
**भाग तीन**
**शरद काळे**




**विज्ञान आपल्या हाती.**

विज्ञान हा विषय थोडासा नीट समजावून सांगितला तर तो प्रत्येकाला आकलन होऊ शकतो. विज्ञान हे मुळातच क्लिष्ट आहे या संकल्पनेला छेद देता येतो, आणि विज्ञानआकलन झाल्यानंतर त्यातला मिळणारा आनंद हा चिरस्थायी स्वरूपाचा असतो, याचा अनुभव 'नाट्यातून विज्ञानाकडे' हे पुस्तक वाचले की अनुभभवास येते. आपल्या स्वयंपाकघरात विज्ञान आहे याची आपल्याला फारशी कल्पना नसते. म्हणजे आपण स्वयंपाक घरात वापरात असलेली भांडी यांच्याकडे कधीही कुतूहलाने पाहत नाही. वास्तविक या स्वयंपाकघरात अॅल्युमिनियम, हिंडालियम, टेफ्लॉन, तांबे, पितळ यांची भांडी आपल्या नजरेस समोर असतात. त्यातली काही कल्हई दिलेलीसुद्धा असतात. या प्रत्येक भांड्यामागे एक विज्ञान आहे. ती केव्हा वापरायची, कशी वापरायची, याबाबत माहिती असते ती केवळ गृहिणीला. मात्र या प्रत्येक भांड्यामागे असणारा वैज्ञानिक दृष्टिकोन पाहिला तर आपल्याला आश्चर्य वाटते.

वातानुकूलितयंत्र वापरणे ही शहरी वास्तव्यात असणाऱ्यांची गरज ठरलेली आहे. या यंत्रातून मिळणारी शीतल हवा इतकाच आपला उद्देश असतो; परंतु हे यंत्र आपण ज्या ठिकाणी बसवतो त्या जागेत आर्द्रता निर्माण करून तेथील उष्ण हवा शोषून घेतो. या प्रक्रियेत एक नळी जोडलेली असते की जिच्यातून पाणी सतत संथपणे ठिबक ठिबक पद्धतीने गळत असते. दिवसाकाठी एका यंत्रात एका टनाच्या यंत्रातून किमान चार ते पाच लिटर पाणी बाहेर पडते. हे पाणी उर्धोपातन केलेल्या पाण्याइतकेच शुद्ध असते, हे मात्र आपल्या लक्षात येत नाही. त्यामुळे एकूण देशभरात बसवलेल्या वातानुकूलनयंत्रांमधून दिवसाकाठी किती शुद्ध पाणी आपण वाया घालवतो, तेही पाण्याची आपल्याकडे असणारी कमतरता लक्षात घेता, याबाबत किती उदासीन आहोत हे लक्षात येते. पाण्याचे शुद्धीकरण करण्यासाठी कोणते उपाय अमलात आणावे, याची शास्त्रशुद्ध माहिती आपणास नसते, तसेच बाटलीबंद पाण्यामध्ये ऑक्सिजनची अधिक मात्रा आहे अशी अधिकची जाहिरातीमध्ये सतत बिंबविले जाते, ती खरोखर आवश्यक असते का, आणि मुळात असे काही असते का, हे आपण समजून घेत नाही.

आपल्या देशात तंबाखू खाणे आणि सिगारेट, बिडीमधून ओढणे याचे प्रमाण अधिक आहे. तंबाखूमध्ये असणाऱ्या निकोटीनचे प्रमाण अधिक असल्याने त्यातून तोंडाचा कॅन्सर होण्याची शक्यता असते, आणि परिणामी मृत्यूचा दर त्यातून अधिक आहे याकडेही आपले लक्ष जात नाही. विशेषतः तंबाखूविक्रीच्या जागेवर अनेक ठिकाणी तंबाखूचा वापर करण्याबाबतचा धोकादायक इशारा दिलेला असूनही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. हे प्रमाण किती आहे याचा उलगडा झाला तर आपल्या लक्षात येईल की आपण मृत्यूच्या किती जवळ आहोत.

तिबेट हे शेजारचे राष्ट्र आता ते चीनच्या ताब्यात आहे असे राजकीयदृष्ट्या कळते. त्या तिबेटवरून विमाने उडत नाहीत, ही बाब आपणासाठी नक्कीच आश्चर्याची आहे. परंतु त्यामागे असणारी कारणे पाहिली तर पहिले कारण चीन आणि त्यांचे राजकीय संबंध हेच आपल्या नजरेसमोर येते. प्रत्यक्षात खरी कारणे वेगळीच आहेत ती आपण लक्षात घेत नाही. समुद्रसपाटीपासून उंचीवर असणाऱ्या तिबेटसारख्या प्रदेशात हवेमध्ये असणारे ऑक्सिजनचे प्रमाण अतिशय कमी असते. त्याचप्रमाणे विमानातील असलेला ऑक्सिजनचा पुरवठा आणि तातडीच्या प्रसंगी उतरण्यासाठी लागणाऱ्या सुविधा यांचे प्रमाण व्यस्त असल्याने, ही समस्या निर्माण झालेली आहे.

या सगळ्यांची नोंद इथे करण्याच कारण 'नाट्यातून विज्ञानाकडे' या मालिकेतील भाग तिसरा हे पुस्तक होय.

पाणबुडीच्या विश्वात, हरितगृहवायूंच्या अंतरंगात, प्राचीन काळातील हवामानबदल, कचरा आणि कचरास्त्रोत, माणसाचे मन, अशा अनेक विषयांवर अतिशय अभ्यासपूर्ण माहिती या पुस्तकात देण्यात आलेली आहे. कोंबडी आधी की अंडे आधी, हा सनातन प्रश्न अनेक वर्षे आपण ऐकतो आहोत आणि पुढेही ऐकणार आहोत. या प्रश्नासाठी संशोधकांनी शास्त्रीय पद्धतीने शोध घेतला आहे की नाही याची चर्चा नक्कीच उद्बोधक ठरते. विज्ञानामध्ये असणाऱ्या अनेक सूत्रांचा आणि घटकांचा शोध घेणारे अनेक शास्त्रज्ञ अहोरात्र संशोधन करत असतात. त्यांच्या त्या कार्याची नोंद निश्चितचपणे आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जाते. आणि त्यांना नोबेलसारख्या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केले जाते. यापैकी आहेत डॉ. सुब्रमण्यम चंद्रशेखर, ज्यांना भौतिक विषयाचे नोबल मिळालेले आहे. डॉ. जे जे थॉमसन यांनी अणूचे विखंडन यावर संशोधन केले. तसेच इलेक्ट्रॉनच्या शोधासाठी त्यांना हे नोबेल देण्यात आलेले आहे. डॉक्टर रॉबर्ट कोच यांनी कॉलरा, देवी, क्षय यांसारख्या आजारांचा फैलाव करणाऱ्या पेशींचा शोध घेऊन अनेक आजारांचे मूळ शोधून काढलेले आहे. क्षयावरील कामासाठी त्यांना नोबेल देण्यात आलेले आहे. या शास्त्रज्ञांची माहिती या पुस्तकात आलेली आहे.


अवघड विषय नाट्यमय संवादातून विद्यार्थी आणि समाजापर्यंत पोच करण्याचे अवघड काम डॉ. शरद काळे यांनी केले आहे. डॉ. शरद काळे हे स्वतः शास्त्रज्ञ आहेत. पद्मश्री पुरस्काराने ते सन्मानित आहेत. आणि चाळीसहून अधिक काळ त्यांनी डॉक्टर होमी भाभा अणुसंशोधन केंद्रात संशोधनाचे कार्य केलेले आहे. विज्ञानाविषयीची आस्था, त्याचा प्रचार आणि प्रसार यासाठीची तळमळ त्यांच्या या लेखनातून दिसून येते. डॉ. अ.पां. देशपांडे यांची या पुस्तकाला मौलिक प्रस्तावना लाभलेली आहे. सतीश भावसार यांचे या पुस्तकाला सुंदर मुखपृष्ठ लाभलेले आहे.

मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये

# ग्रंथपान

**परका**

**लालासाहेब जाधव**




**जन्म ज्यांचा वणव्यात होता**

'परीक्षेचा फॉर्म भरण्याची मुदत टाळून गेली. आता आपले वर्ष फुकट जाणार अशा एक प्रकारच्या निराशेतच मी गावी आलो. अनेकांना मागूनही पैसे मिळत नव्हते. फार्म भरण्याची मुदत संपली. मी वेळेत फॉर्म भरू शकलो नाही. आता लेट फी भरून फॉर्म भरण्यासाठीही फक्त तीन दिवस राहिले होते. मी परीक्षेला बसू शकणार नाही असंच वाटत होतं. माझ्या पत्नीला ही माझी काळजी वाटू लागली. तीही चिंतेत होती. काळजीच्या स्वरात मी तिला म्हणालो, 'भरपूर अभ्यास करूनही पन्नास रुपये न मिळाल्यानं माझं हे वर्ष आता वाया जाईल.'

गरिबीत जन्म घेतलेल्या तरुणांची अवस्था आगीत जन्म घेतल्यापेक्षा वेगळी नसते. दाहकतेच असह्य चटके सहन करावे लागतात, तरीही त्या विरोधात कुठेही बोलण्याची सोय नसते. सर्व काही मुकाटपणे सहन करणे इतकेच हाती उरते. परंतु लालासाहेब जाधव सारखे कष्टाळू, अभ्यासू आणि उद्याचा आशावाद उराशी बाळगलेले, भविष्याला आपल्या मुठीत धरून ठेवण्याची जिद्द सिद्ध करतात, तेव्हा परिस्थितीच नाही तर वर्तमानकाळ देखील शरण आल्याचे दिसून येते.

लालासाहेब जाधव हे कैकाडी समाजातील एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व! घरात अठरा विश्वे दारिद्र्य जन्मासोबतच पाहण्याचे, अनुभवण्याचे दुर्भाग्य त्यांच्यावर आले. ते लिहितात, 'पोट तर आमच्या कैकाडी जमातीच्या पाठीच लागलेलं असतं. कष्ट काही सुटत नाहीत आणि सुख काही दिसत नाही अशी आमच्या कैकाडी जमातीची परिस्थिती...' निरगुडी, कावळी, निळूंबी, शिंदी, करंजा, धामणीचे फोक रानातून कापून आणायचे आणि त्या फोकांपासून कणगी, टोपल्या, पाट्या , झाप, कुडके बनवून त्या विकून त्यावर गुजराण करणार.

नामदेवराव जाधव यांचे कुटुंब. खाणारी तोंडे घरभरून. नामदेवराव पहिलवान परंतु देवीच्या आजारात आपले दोन्ही डोळे देवीच्या हवाली करून बसलेले. त्यामुळे सगळा कुटुंबाचा भार आईवर आलेला. आईला मदत करणे ही जबाबदारी पर्यायाने मुलांवर आलीच. यात लालासाहेब ऊर्फ लाल्या पूर्णपणे स्वतःला झोकून देतात. वडिलांचा दूरदृष्टिकोण असा, की आपली परिस्थिती बदलायची असेल तर मुलांना शिक्षण देणे हा एकच उपाय असू शकतो. त्यांचा हा निर्णय त्यांनी समाजात असलेला विरोध डावलून अमलात आणला. त्यामुळे नामदेवराव कैकाडी यांची तीनही मुले शाळेपर्यंत पोहोचली. स्वतःच्या परिस्थितीची जाणीव ठेवून आणि परिस्थितीवर मात करून त्यांनी आपल्या वडिलांचा दूरदृष्टिकोण सार्थ ठरवला. मोठा भाऊ शिक्षक झाला, लहान भाऊ पोलीस सब इन्स्पेक्टर झाला आणि लालासाहेब जाधव विधानभवनात कक्ष अधिकारी म्हणून रुजू झाले. पाठीशी कुणी खंबीरपणे उभा असेल आणि स्वतःमध्ये आपला मार्ग आपणच निवडायचा आहे याची जिद्द असेल तर या जिद्दीतून जे निर्माण होते ते परिस्थितीला शरण आणायला भाग पाडणारे असते, हा सिद्धांत सिद्ध होतो. तो नामदेवराव कैकाडी आणि त्यांच्या मुलांनी सिद्ध केला.

कैकाडी समाज हा तसा इतर गावकुसाबाहेरील समाजाप्रमाणेच एक समाज. तसा लोकसंख्येने विरळ असलेला. तरीही दारिद्र्याने गांजलेला. त्यातच अनेकांकडून होणारा छळ, अत्याचार, मारहाण, शिवीगाळ, अपमान यांचीही भर पडतेच. यात आणखी एक दुर्गुण, आपल्याच समाजातील लोक आपल्याला मदत करण्यास पुढे येत नाहीत. उलट झालेली प्रगती त्यांना पहाणे कठीण होते, असे अनुभव लालासाहेब जाधव यांना अनुभवास आलेले आहेत. शिक्षणासाठी त्यांना पन्नास रुपये समाजाकडून मिळाले नाहीत. पत्नीच्या पायातील चांदीचे पैंजण त्यांना त्यासाठी गहाण ठेवावे लागले. तीच गोष्ट मुंबईमध्ये आल्यानंतर समाजातील लोकांचा आणि नातेवाईकांचा जो अनुभव त्यांच्या गाठीशी आहे तोसुद्धा त्यांचा अंत पाहणारा होता. लालासाहेब जाधव यांनी या सगळ्यांवर मात करून स्वतःची व्यक्तिमत्त्व सिद्ध केले आहे. परंतु त्यावरच ते थांबलेले नाहीत तर ज्या समाजातून आपण आलेले आहोत त्या समाजाचा स्तर इतर मागासवर्गीयांप्रमाणेच उंचावला पाहिजे यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. अनेक वेळा झालेले इतरांवरचे अन्याय दूर करण्यासाठी ते पाठीशी उभे राहिले. त्यासाठी थेट शरद पवार यांसारख्या मुख्यमंत्र्यांपर्यंत त्यांना जावे लागले. विधानभवनातच नोकरीला असल्याने जातीच्या प्रश्नासाठी त्यांनी विधानभवनात अनेकदा आपला प्रश्न चर्चेसाठी मांडण्यास भाग पाडलेले आहे. समाजाविषयी असणारी ही आत्मीयता हे त्यांचे मोठेपण आणि सामाजिक भान सिद्ध करते. समाजात असणाऱ्या चालीरीती, 'विळा' याला जातीत असणारे महत्त्व, अन्यायाचे, अत्याचाराचे अनेक प्रसंग व अनुभव त्यांनी या पुस्तकात मांडलेले आहे. आपल्या कुटुंबातील आई, वडील, बहीण, भाऊ यांच्याविषयी त्यांनी केलेले वर्णन हा आत्मीयतेचा आणि ममत्वाचा संवेदनशील मनाचा भाग आहे, तसा ज्यांनी ज्यांनी मदत केली त्या सगळ्यांविषयीचा कृतज्ञभाव त्यांच्या मनात आहे, तो नोंद घ्यावा असाच आहे.

लालासाहेब जाधव यांनी लिहिलेले हे आत्मकथन यापूर्वी आलेल्या अनेक मान्यवर साहित्यिकांच्या आत्मकथनात्मक साहित्याच्या मांदियाळीत समावेश व्हावा इतके दर्जेदार आणि प्रामाणिक आहे. त्यांच्या लेखनात जाती, धर्म, अंधश्रद्धा याविषयीचे उल्लेख जरूर आहेत परंतु त्याविषयीचा कडवटपणा आलेला नाही. समाज आहे त्या परिस्थितीतून बाहेर यावा यासाठीची तळमळ या लेखनातून व्यक्त होते.


महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामध्ये एकूण ३६ वर्षे शासकीय सेवा करून अवर सचिव या पदावरून ते सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था या शासकीय संस्थेमध्ये त्यांनी 'प्रकल्प संचालक' म्हणूनही काम पाहिले आहे. देशातील बहुतेक सर्व राज्यांमध्ये त्यांनी अभ्यासदौरा केलेला आहे. 'भारत भ्रमणयात्रा' हे त्यांचे पुस्तक प्रकाशित आहे. त्यांनी आतापर्यंत केलेल्या समाजसेवेसाठी त्यांना 'समाजभूषण', 'समाजरत्न', 'आदर्श समाज भूषण' असे अनेक पुरस्कार मान्यवर संस्थांच्या वतीने प्रदान झालेले आहेत. आत्मकथनाच्या शीर्षकाची साम्य दर्शवणारे आशयगर्भ मुखपृष्ठ सरदार जाधव यांनी साकारलेले आहे.

**मूल्य ४०० रुपये सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

**विज्ञान–नाटके**

**नंदिनी थत्ते, सुधीर थत्ते**




**चला विज्ञान समजून घेऊ**

'शेवटी बुद्धिमानांक म्हणजे एका विशिष्ट चाचणीतून काढलेला एक आकडा. समजा वजनाच्या काट्यावर आपण वजन केलं तर आपल्याला वजनाचा आकडा कळतो; पण तो वजनाचा आकडा हा काही आपली तब्येत नक्की कशी आहे, याचं पूर्ण चित्र उभं करू शकत नाही. तसंच काहीसं बुद्धिमानांकाचं आहे. त्यामुळेच तो काही बुद्धिमत्तेचा एकमेव निकष ठरत नाही.'

विज्ञानात अनेक घटक सामावलेले असतात परंतु त्यांचे एकत्रित रूप फक्त आपल्याला दिसून येते, जसे हिमनगाबाबत म्हटले जाते. विज्ञान समजून घेण्यासाठी आपल्याला प्रत्येक घटकाची वेगळी वेगळी मालिका समजून घ्यावी लागते. तसे झाले तर हा विषय सहजसोपा वाटू शकतो. तो कसा तर त्याचे उत्तर आहे विज्ञान–नाटके!

अगदी साधा विषय 'चॉकलेट' ज्याच्याशी आपला नियमित संबंध आहे; परंतु त्याच्या अंतरंगात असलेल्या गोडीशिवाय आणखी घटकांचा समावेश आहे याकडे आपले फारसे लक्ष असत नाही. चॉकलेट या शब्दाचा उगम दक्षिण अमेरिकेतल्या ॲझ्टेक या प्राचीन संस्कृतीतल्या 'नाहुआटल' नावाच्या भाषेत आहे. त्या भाषेत चॉकोआ म्हणजेच कोकोच्या बिया आणि लाटल म्हणजे अन्न . आणि या दोन शब्दांपासून चॉकलेट हा शब्द बनला. या नावाचा अर्थ देवाचे अन्न असा होतो. हे वाचताना सोबतच कोकोच्या बियांपासून मिळणारी कोको पावडर किंवा कोको बटर यांचेही संदर्भ येतात आणि आपल्याला चॉकलेटचे अंतरंग आपोआप कळत जाते. चॉकलेटची आवड असणाऱ्या प्रत्येकाने हे प्रकरण वाचायला हवे.

परीक्षेच्या काळात शेवटी शेवटी खूप जागरण करून अभ्यास केला जातो. असे केल्याने मेंदूच्या कार्यात विशेषतः स्मरणशक्तीत किती आणि कसा फरक पडतो, यातून स्मरणशक्तीची तरलता कशी निर्माण होते आणि शेवटी मेंदूला विश्रांतीची गरज असतेच, या टप्प्यापर्यंत आपण येतो. हे 'झोपेल तोच शिकेल' या प्रकरणातून आपल्यासमोर येते. हीच गोष्ट आपली मातृभाषा आणि तिच्या व्यतिरिक्तची अन्य भाषा शिकण्यामध्ये येणारा सहज सोपेपणा आणि अडचणी यांचे विश्लेषण 'मायबोलीची महती' या प्रकरणात विशद केलेली आहे. फुलपाखरू हा प्रत्येकाचा नेहमीच उत्सुकतेचा आणि आवडीचा विषय आहे. त्याच्या नाजूक पंखावर असणारे रंग आणि त्याची पडणारी भुरळ ही नेहमीच सुखावणारी बाब आहे; परंतु या रंगांमध्ये आणि सूर्याच्या किरणांमध्ये एक विज्ञान आहे हे आपल्याला 'छान किती दिसते फुलपाखरू' या प्रकरणातून लक्षात येते. 'परग्रहावरचा पाहुणा' हासुद्धा संशोधनाचा आणि कुतूहलाचा विषय. त्यासाठी शास्त्रज्ञ अहोरात्र संशोधन करत आहेत. यातून खगोलशास्त्राची माहिती तर होतेच, जोडीला संशोधन का आवश्यक आहे त्याचीही माहिती यात मिळते.

बेडकासारखा प्राणी जो फारसा लक्षात घेतला जात नाही; परंतु त्याच्या जगण्यात आणि त्याच्या शरीर रचनेत हवामानानुसार कसा बदल होतो आणि त्याचा स्वीकार त्याच्याकडून कसा केला जातो याची माहिती 'प्राण्यांचा अद्‌भुत लपंडाव' या प्रकरणात आहे. फ्लेमिंगो उर्फ रोहित पक्षी यांची स्थलांतर करत असताना उडण्याची क्षमता ताशी ४५ ते ५० किलोमीटर वेगाची आहे, हे वाचताना आपण थक्क होतो. स्थलांतर करण्या मागचे विज्ञान हे खगोलशास्त्रावर अवलंबून आहे हेदेखील यातूनच आपल्या लक्षात येते. अलीकडे कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर सातत्याने चर्चा होत आहेत. ही कृत्रिम बुद्धिमत्ता नेमकी काय आहे आणि ती कशी उपयोगात आहे याची माहिती 'कृत्रिम बुद्धिमत्ता' या प्रकरणात आहे. हसणे हा आपला प्रत्येकाचा परिचयाचा विषय परंतु यामागे असणारे शरीरशास्त्रीय कारणे आणि होणारी प्रतिक्षिप्तक्रिया याची माहिती कळल्यानंतर आपोआपच आपणच आपल्या अज्ञानाला हसू लागतो. 'आईसक्रीम' आणि 'विश्वाची सफर' ही दोन प्रकरणे यात आणखी आहेत.

विज्ञान–नाटके या पुस्तकात एकूण बारा प्रकरणे आहेत. वास्तविक ही प्रकरणे नसून एकांकिका आहेत. ज्या लहान आणि मोठ्या वयोगटातील प्रत्येकाला सहज सादर करता येऊ शकतील. विज्ञानाचा प्रसार आणि ते समजून घेणे यासाठी सोप्या, सहज आकलन होतील अशा संवादाची गरज असते, ती लेखक नंदिनी थत्ते आणि सुधीर थत्ते यांनी नेमकी लक्षात घेतलेली आहे. केवळ एकांकिका लिहून विज्ञान आपल्यापर्यंत आणायचे, इतकाच हेतू नाही तर तो अधिक प्रभावीपणे कसा सादर करता येईल, याचे मार्गदर्शनदेखील त्यांनी त्यांच्या प्रस्तावनेत केलेले आहे. संवादाची भाषा जशी सहजसोपी असावी लागते तशीच विज्ञानाला आपल्या दैनंदिन जगण्यातले संदर्भ दिले तर त्यातून आकलनाची क्षमता अधिक वाढते, हेही त्यांनी लक्षात घेतलेले आहे. तसेच विषय एकसुरी सपाट होऊ नये म्हणून लहान लहान प्रसंगांची गुंफण त्यात केलेली आहे. एक उदाहरण आपल्यासमोर ठेवतो. 'ज्ञानी माणसाची स्थिती धान्य साठवणाऱ्या कोठारासारखी असते. त्यामुळे तो नवनवीन कल्पना करू शकत नाही. याउलट बुद्धिमान माणसाची स्थिती नवनवीन धान्य पिकवत राहणाऱ्या शेतासारखी असते. त्यामुळे परिस्थिती बदलेल त्याप्रमाणे काय करता येईल याच्या नवनवीन कल्पना त्याला सुचत राहतात.'

नंदिनी थत्ते आणि सुधीर थत्ते यांचा आपणा सगळ्यांना परिचय आहे तो 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने' या त्यांच्या पुस्तक मालिके मुळे. जागतिक पातळीवरच्या अतिशय महत्त्वाच्या विज्ञान संशोधनाला दरवर्षी नोबेल पारितोषिक मिळते. त्याची माहिती आपणा सर्वांना व्हावी म्हणून अतिशय सुंदर पद्धतीने ते या मालिकेद्वारे १९९६ सालापासून आपल्या भेटीला येत आहेत. त्यांच्या या उपक्रमाची नोंद आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आलेली आहे. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना अनेक प्रतिष्ठेला पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. डॉ. सुधीर थत्ते हे मुंबईच्या भाभा अणुसंशोधन केंद्रातले निवृत्त वैज्ञानिक आहेत. नंदिनी थत्ते या विज्ञानलेखिका आहेत. विज्ञान–नाटके हा त्यांच्या उपक्रमाचा पुढील भाग आहे. जो सर्वांना आपलासा वाटेल.

**मूल्य १०० रुपये सवलतीत ६० रुपये**

# ग्रंथपान

**मावलाया**
**भगवान इंगळे**




**आपुलकीची सरोवरे समुद्र होतात तेव्हा**

'भामाबाईनं फरताळातली काशाची परात काढली. तिला घसांड्यानं घसा घसा घासून पांढरी फेक केली. दाजीनं परात भिताडाला उलट्या आंगानं हुबी करून लावली. तिला हाळद-कुंकू वाहिली. छाटनीतनं शिवराई काडून त्यालाबी पूजलं. मग डोळं मिटून बुट बुट करीत, शिवराय परातीला चिटकून सुकून बघू लागलं.'

पद्मिनबाई सगळ्यात मोठी. लग्नाचे सुख न लाभलेली. ९० वर्षांपैकी फक्त दोन वर्षं संसारसुख पाहिलेली. स्वतःच्या मुला बाळाचं तोंड न पाहता माहेरी परतलेली. माहेरचे दारिद्र्य आणि खाणारी तोंडे अधिक, यांचा सगळ्यांचा भार आईसोबत उचलणारी, आणि आई गेल्यानंतर भावंडांची आई झालेली पदाबाई. स्वभावाने स्पष्ट, कष्टाळू, जिवापाड मेहनत करणारी, नुकसान सहन न करणारी, तरीही अपमानांची अनेक लक्तरे सहन करणारी, कुठल्याही लाभालोभाला बळी न पडता आपल्या भावंडांच्या सुखासाठी शेतजमीन मिळवणे, जागा मिळवणे, यासाठी सतत धडपडणारी, शेवटपर्यंत कष्ट आणि कष्टच उपसत राहिलेली अशी ही पदाबाई सगळ्यांची आई म्हणून सगळ्यांच्या हृदयात कायम राहीली, इतरांनी केलेल्या उपेक्षेकडे दुर्लक्ष करून. ही सगळ्यात मोठी बहीण आईच्या जागी आई झालेली. सर्व भावंडांच्या एकूण गोतावळ्यात सहभागी झालेली. सुख, वैभव समोर आले तेव्हा त्याकडे त्रयस्थ नजरेने पाहणारी, आपल्या इमानाशी इमान राखणारी पदाबाई.

नागाबाई ही मात्र आठ लेकरांची आई. घरची परिस्थिती बरी असलेली. परंतु पुढे मुलांचा नाकर्तेपणा आड आला. परवड झाली आणि नागाबाईला परिस्थितीला शरण जावे लागले.

कस्तुरबाई कष्टाळू, बसून राहणे हा तिचा स्वभाव नाही, स्वभाव मवाळ, आपुलकी, दूरदृष्टी असलेला. मुलांना शिक्षण देण्यात पुढाकार घेणारी. परंतु उत्तम असलेला संसार नवऱ्याच्या व्यसनापायी पार बुडाला आणि कस्तुरबाई संकटांच्या डोंगराच्या पायथ्याशी येऊन बसली.

द्रौपदाबाई धीराची आणि तितकीच धैर्याची. अन्यायाविरुद्ध थेट दंड थोपटणारी. काबाडकष्टासाठी मागे न पाहणारी. आपल्या मुलाबाळांचे भवितव्य लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणाची कास धरणारी.

त्यांच्यानंतर सरस्वतीबाई आणि सखुबाई या दोन बहिणी. अशा एकूण आठ बहिणींचे हे चरित्र आहे. हे चरित्र नसून भगवान इंगळे यांच्याभोवती विणलेले एक मोठे नात्यांचे जाळे आहे. ज्यात आठ बहिणी, चार भाऊ हे तर आहेतच, त्यांच्यासोबत रक्ता-नात्याने आलेले सर्व नातेवाईक, त्यांचा वृद्धिंगत होत गेलेला परिवार, असा खूप मोठा नातेसंबंधांचा अवकाश या 'मावलाया'मध्ये सामावलेला आहे. त्यांच्याविषयीची तपशीलवार इत्थंभूत माहिती लेखकाने यात वर्णन केलेली आहे. आपलेपणाने, आपुलकीने आणि तितक्याच ममत्वाने एकरूप होऊन. लेखकाचे 'ढोर' आणि 'उभारणी' हे दोन आत्मचरित्रात्मक खंड प्रसिद्ध झालेले आहेत आणि त्यांना तितकाच उत्तम लोकमान्यतेचा प्रतिसाददेखील लाभलेला आहे. त्याच खंडांचाच परिवारात्मक तपशिलवार असलेला पुढील खंड म्हणजे 'मावलाया'.

या खंडात केवळ व्यक्तींचे, नात्यांचे चित्रण आहे असे नाही, तर त्यासोबतच भावभावनांचे, नात्यातील तलम संबंधांचे, आर्थिक पारिवारिक गुंतागुंतीचे, आपण ज्या परिसरात राहतो त्या परिसराचे चित्र, रिवाजानुसार चालत आलेल्या परंपरा, पिढीजात चालत आलेल्या व्यवसायाचे, त्यानंतर झालेल्या बदलाचे चित्रण लेखकाने केलेले आहे. या सगळ्या चित्रणात लेखकाचे स्वतःचे अस्तित्व निवेदनकार इतकेच राहत नाही तर, स्वतः लेखक या सगळ्यात दुधात लोणी असावे अशा रितीने एकजीव झालेला आहे, त्याचा अनुभव हे पुस्तक वाचताना पदोपदी दिसून येतो.

या आठही बहिणींचे चरित्रलेखन करताना लेखकाने भूतकाळ आणि वर्तमान याचा सुंदर संगम केलेला आहे. मानवी स्वभाव, माणसाचे जगणे, वागणे, त्यातून आलेले यश-अपयश या सगळ्यांकडे लेखक अतिशय तरलपणे पाहताना दिसून येतो. पुस्तकाच्या शीर्षकाकडेही आपले लक्ष वेधून घेतले आहे. 'माउली' म्हणजे आई. या 'माउली'चे अनेक वचन 'मावलाया'! याचाच अर्थ या सर्व भगिनी, ज्या त्यांना आईच्या ठिकाणी आहेत. या मावलायांनी केलेले प्रेम, घेतलेली काळजी, केलेले पालन-पोषण हे आईप्रमाणेच आहे, असे लेखक ममत्वाने व्यक्त करत आहे.

लेखकाची स्वतःची एक शैली आहे, जी प्रथमपुरुषी निवेदनातून व्यक्त होते. तिला अहमदनगर भागात असलेल्या बोलीभाषेचा नाद आणि लय आहे. निवेदन आणि संवाद या दोन्हींसाठी हीच बोलीभाषा आहे. लहान लहान वाक्ये आणि त्यात आलेली खुमासदार चपखल संवादांची गुंफण आपल्यालाही वाचत असताना त्यात गुंफून टाकते. 'आई- बापानं ओवलेल्या झेंडूच्या १२ फुलांच्या मळ्यातलं एक रसरशीत फूल आकस्मात गळून पडलं होतं.', 'कुनाच्या वाढल्या पाचोळ्यावर पाय देणार नाहीत.', 'गरिबी असली तरी ती कायमची रहात नसती. घरावरलं ऊन जातं, सावली येती.', 'सकाळी भरल्याला टाच रांजण सांच्याला खाली व्हतो का नाय? भंजून न्हाय खल्ल्यावर लक्ष्मी ठरती का बाबा, सांग?', 'ज्याचं नाही कुनी ते पडलं वनी.' अशी वाक्ये, म्हणी, वाक्प्रचार, तर सर्व पुस्तकभर आपल्या भेटीला येत राहतात. जोडीला पाळणा आणि गीतेही आहेत.

लेखक भगवान इंगळे यांची यापूर्वी 'ढोर', 'उभारणी', 'भिडू ' ही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. महाराष्ट्र शासनाचा साहित्यसम्राट न.चिं. केळकर मराठी वाङ्मय राज्य पुरस्कार, अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार, आशीर्वाद पुरस्कार, सदाशिव नारायण कदम गुरुजी वाङ्मय पुरस्कार, अशा अनेक मानांच्या पुरस्कारांनी त्यांना त्यांच्या साहित्यिक योगदानासाठी सन्मानित करण्यात आलेले आहे. विश्वकोश निर्मिती मंडळावर सभासद म्हणूनदेखील त्यांनी काम पाहिलेले आहे. मुंबई विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालयात ३५ वर्षे त्यांनी अध्यापन केलेले आहे.

पुस्तकात आठ भगिनींची रेखाचित्रे रेखाटलेली आहेत. ही चित्रे आणि मुखपृष्ठावरील राबलेल्या हातांचे चित्र सतीश भावसार यांचे आहे.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २०० रुपये**



LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत
एलआयसीची
जीवन धारा II
UIN: 512N364V01
Plan No. 872
तरुण वयात रिटायर व्हा
रिटायर झाल्यावरही निश्चिंतपणे जगा
तुमच्यासाठी आणि तुमच्या जीवलगांसाठी
आजीवन गॅरंटीड उत्पन्न मिळवा.
तुमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विस्तृत पर्यायांसह वार्षिकी योजना
• स्थापनेपासून गॅरंटीड ॲन्युइटी
• वाढत्या वयांमध्ये वाढते ॲन्युइटी दर
• स्थगिती कालावधीमध्ये लाइफ कव्हर
• नियमित आणि सिंगल प्रीमियम पेमेंटचा पर्याय
• विद्यमान एलआयसी पॉलिसीधारकांसाठी वर्धित लाभ
प्लॅन ऑनलाइन विक्रीसाठी देखील उपलब्ध
एक नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग, इंडिविज्युअल, सेविंग्ज, डिफर्ड ॲन्युइटी प्लॅन
LIC/R1/2023-24/19/MAR
LIC मोबाइल ॲप डाउनलोड करा LIC digital
भेट द्या: licindia.in
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
अधिक माहितीसाठी एजंटशी/जवळच्या एलआयसीच्या शाखेशी संपर्क साधा किंवा तुमच्या शहराचे नाव 56767474 ह्या क्रमांकावर एसएमएस करा
आमचा वॉट्सॲप नं. 8976862090
बोला 'Hi'
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512
भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय कोणत्याही पॉलिसीजची विक्री, बोनस घोषित करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक करणे यासारख्या कामकाजात सहभागी होत नाही. अशा प्रकारचे कॉल्स स्वीकारणाऱ्या जनतेस पोलीसात तक्रार करण्याची विनंती करण्यात येत आहे. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.